# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. ०३/०५/२००७

आज दि. ०३/०५/२००७ रोजी दि. १६/०४/२००७ रोजीची मिरा भाईंदर महानगरपालिकेची तहकूब झालेली महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०१ दि. ०४/०४/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ३) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ४) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सभापती, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती |
| ५) | श्रीम. संगिता विजय म्हात्रे | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ६) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
| ७) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| ८) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ९) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १०) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ११) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १२) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १३) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १४) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १५) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| १६) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| १७) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १८) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| १९) | श्री. नलावडे दिनेश दगडू | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०३ |
| २०) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| २१) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २२) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २३) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २४) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| २५) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| २६) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| २७) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| २८) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| २९) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ३०) | श्रीम. सय्यद नुरजहॉं नझरहुसेन | अध्यक्षा, प्रभाग समिती क्र. ०४ |
| ३१) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ३२) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ३३) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सभापती, आरोग्य परिरक्षण समिती |
| ३४) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| ३५) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ३६) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ३७) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ३८) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ३९) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०२ |
| ४०) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ४१) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |

| | | |
|---|---|---|
| ४२) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ४३) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ४४) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ४५) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ४६) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ४७) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ४८) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ४९) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ५०) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ५१) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ५२) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ५३) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| २) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ३) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ४) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| ५) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| ६) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ७) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ८) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| ९) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| १०) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर ऊर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ११) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| १२) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| १३) | श्रीम. जयाबाई यशवंत भोईर | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| १४) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| १५) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| १६) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| १७) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| १८) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| १९) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| २०) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| २१) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| २२) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| २३) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| २४) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| २५) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य (सभापती, शिक्षण मंडळ) |
| २६) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज दिलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०१ |
| २) | श्रीम. ऊर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| ३) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ४) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ५) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |

(राष्ट्रीयगीत वंदे मातरम् नंतर महासभेला सुरुवात झाली.)

**मा. महापौर :-**

नमस्कार, दि. ३ मे २००७ ची महासभा सुरु होत आहे. महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये उपस्थित असलेले या शहराचे आयुक्त श्री. सुदामराव गायकवाड साहेब, सचिव, श्री. हरेश पाटील तसेच सभागृहात उपस्थित असलेले विशेष समित्यांचे सभापती, सर्व प्रभाग समित्यांचे अध्यक्ष उपस्थित असलेले नगरसेवक - नगरसेविका प्रेक्षक गॅलेरीत उपस्थित असलेले प्रेक्षक बंधु पत्रकार गॅलेरीत उपस्थित असलेले सर्व पत्रकार, सर्व मा. उपायुक्त, सर्व खात्याचे अधिकारी यांचे मी हार्दिक स्वागत करते. आजची महासभा तहकुब महासभा असून आपण सर्वांनी विषयपटलावरील उर्वरित विषयावर चर्चा करुन पूर्ण करावयाचे आहेत. तसेच, विशेष बाब म्हणजे मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये दि. १३/४/२००५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचा ठराव या महासभेने मंजुर केलेला होता. त्या ठरावातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे आपल्या महानगरपालिकेच्या आवारात दि. ३० एप्रिल २००६ रोजी अनावरण करुन आपण सर्व नगरसेवकांनी, सर्व पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी चांगल्या प्रकारे सहकार्य केले आणि आपण त्याचा उद्‌घाटन सोहळा पार पाडण्यासाठी आदरणीय नामदार श्री. रामदासजी आठवले साहेब यांच्याहस्ते पार पाडण्यात आला. तसेच विधान परिषदेचे सन्मा. सदस्य श्री. रामदास मोते, सन्मा. सदस्य श्री. कपिल पाटील साहेब, विधान परिषदेचे सदस्य श्री. केळकर साहेब या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडलेला आहे. आपल्या मिरा भाईंदर शहरासाठी एक अतिशय आनंदाची आणि आरणीय बाब अशी आहे की, आपण घेतलेल्या कार्यकालामध्ये हा ठराव पारित करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धाकृती पुतळा दि. ३० एप्रिल रोजी बसवून सर्वांनी सहकार्य केल्याबद्दल मी सर्व नगरसेवकांची आभारी आणि ऋणी आहे. आपले यापुढे असेच सहकार्य लाभेल अशी मी अपेक्षा करते आणि माझे दोन शब्द संपवते. धन्यवाद.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे अनावरण केलेले आहे. त्याचे उद्‌घाटन झालेले आहे. ही एक चांगली गोष्ट आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे अनावरणाचा कार्यक्रम फार सुंदर झालेला आहे. त्याला अपवाद नाही. ह्याने शहराची शोभा वाढलेली आहे. त्याला सुध्दा अपवाद नाही. परंतु, कार्यक्रम करताना काही चुका प्रशासनाकडून होतात आणि प्रशासनाने त्या चुकांकडे लक्ष न दिल्यामुळे या शहरामध्ये चुकीचा मॅसेज जात आहे. जो कार्यक्रम झाला त्याबद्दल काहीही शंका नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा फार पूर्वी व्हायला पाहिजे होता. तो आता झाला ही आनंदाची गोष्ट आहे. मा. महापौर मॅडम, जेव्हा आपण कुठल्याही कार्यक्रमाचे नियोजन करित असतो, त्या कार्यक्रमाचे नियोजन करीत असताना जे अधिकारी वर्ग या कार्यक्रमाला स्वरुप आणण्याचा प्रयत्न करतात त्यांनी काही गोष्टी लक्षात घ्यायला पाहिजेत. त्या लक्षात घेत नाहीत. या महासभेमध्ये वारंवार कार्यक्रमपत्रिका छापली जाते. चर्चा करतात. त्या चर्चेमध्ये त्रुट्या राहतात, कार्यक्रमामध्ये त्रुट्या राहतात. असे अनेक विषय महासभेमध्ये येतात. या समारंभामध्ये फार मोठी चुक झालेली होती. मी स्वतः सचिवांना फोन करुन ती चुक निर्दशनास आणून दिल्यानंतर त्याला कुठेतरी न्याय लागला पाहिजे असे कुठेतरी घडले पाहिजे. आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारला आपण तो पुतळा सुशोभित केला, त्या पुतळ्याला हार घातले. परंतु, त्याचा सरळ रस्त्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आहे. त्या पुतळ्याकडे कोणत्याही अधिकाऱ्याचे लक्ष नव्हते. त्या पुतळ्याला कोणीही हार घातलेला नाही. जेव्हा मला घरातून फोन आला आणि मी बाहेर पडलो तेव्हा ही बाब माझ्या लक्षात आली. मी आपल्या अधिकाऱ्यांना फोन केला आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हार घालायला सांगितले. जे अधिकारी वर्ग असे कार्यक्रम नियोजित करतात त्यांना हे लक्षात यायला पाहिजे. त्यावेळेला कार्यक्रम पत्रिका व्यवस्थित नियोजित करायला पाहिजे. नाहीतर हा चुकीचा मॅसेज या महापालिकेच्या माध्यमातून लोकांपर्यंत जातो. दुसरी गोष्ट अशी आहे की, आपण व्यासपीठावर बघतो की सर्व अधिकारी वर्ग, नेतेमंडळी बसलेले असतात. या महापालिकेचे सचिव जे आहेत. जर आपण या सचिवाचे पद बघितले तर यासचिवांचे सर्वात महत्वाचे पद आहे. मी स्वतः सचिवांनी सांगितले की, तुम्ही एका प्युनसारखे काम करता. तुम्ही फक्त डायसवर बसा. परंतु, त्या दिवशी सचिवसाहेब डायसवर नव्हते. सध्या या पदावर ज्या पध्दतीने काम करीत होते. ते काम महापालिकेला शोभण्यासारखे नाही. म्हणून आपण हा कार्यक्रम नियोजित करताना अधिकाऱ्यांना लक्षात येत नाही की आपल्या नगरसेवकांपैकी प्रत्येक पदाचे, प्रत्येक पक्षाचे लोक त्या गॅलेरीत बसलेले असतात आणि हा कार्यक्रम आणखी सुंदर कसा होईल? आपण याची दक्षता घ्यावी. नाहीतर आपण वेळोवेळी महासभेमध्ये फक्त बोलतो आणि अधिकारी वर्ग तशाच चुका करतात ही एक गंभीर बाब आहे. तसेच या महापालिकेचा चुकीचा मॅसेज जातो. याची आपण नोंद घ्यावी.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी सांगितलेल्या घटनेशी मी सहमत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याकडे दुर्लक्ष होण्याचे काहीही कारण नव्हते. कदाचित ते चुकून घडले असेल. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, घटनातज्ञ आणि आपलेच डॉ. दुर्घटनातज्ञ डॉ. राठोड यांची यासभागृहाला माहिती द्यायला पाहिजे. राठोड यांची या सभागृहाला माहिती द्यायला पाहिजे. संपूर्ण वर्तमानपत्रामध्ये काय घडले? ते

छापुन आले किंवा प्रशासनाकडून ते कसे पकडले गेले तुम्ही याचे विनेदन करा अशी विनंती करतो. या सभागृहाला माहिती देणे आवश्यक आहे. त्यामुळे तुम्ही आम्हाला ती माहिती द्यावी. कारण आम्ही जे घडलेले वर्तमानपत्रामध्ये वाचतो आणि शहरामध्ये त्या गोष्टींवर चर्चा होते. या महापालिकेतील एक अधिकारी भ्रष्टाचारामध्ये गुंतला जातो हे खरे आहे की खोट आहे? ते सांगा. तसेच १ तारखेला महापालिका बंद असताना ते अधिकारी बिनधास्तपणे महापालिकेत येतात. आम्ही ही बातमीसुध्दा वाचली. ह्याच्यामध्ये नक्की काय आहे? त्यांनी किती रुपयांची लाच घेतली? कशी घेतली? कुणाकडून घेतली? त्याचे भागीदार कोण आहेत? न्यायाधीश कोण आहे?

**शशिकांत भोईर :-**

डॉ. राठोड यांना अटक झालेली आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला याच्यामध्ये काहीही अडचण नाही ना. जर तुम्हाला काहीही अडचण नसेल तर आम्ही आमचा अधिकारी घटनातज्ञ आहे की दुर्घटनातज्ञ आहे ते सांगु शकतो.

**मा. आयुक्त सो. :-**

सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील यांनी सभागृहामध्ये जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. मी त्या संदर्भात सभागृहाला माहिती देउ दच्छितो की, आरोग्य अधिकारी श्री. रुंदन राठोड हे २६ तारखेला महापालिकेत कार्यरत असताना लाचलूचपत प्रतिबंधक विभागाचे पथक या कार्यालयामध्ये आले आणि त्यांनी डॉ. रुंदन राठोड यांना अटक केलेली आहे. आम्हाला जी काही माहिती मिळालेली आहे. मी त्या माहितीच्या आधारे सांगु इच्छितो की, त्यांच्यावतीने कोणीतरी लाच स्विकारली. त्याच्यानंतर डॉ. रुंदन राठोड त्यांच्या निवासस्थानी गेल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने त्यांच्या घरापर्यंत जाउन पुन्हा त्यांना आपल्या कार्यालयामध्ये आणले आणि त्या ठिकाणी त्यांची चौकशी वगैरे चालु केली. त्यानंतर त्यांना पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आलेले आहे. यासंदर्भात २६ तारखेला घटना घडल्यानंतर मी २७ तारखेला माझा अहवाल ते ज्या विभागात कार्यरत होते त्या विभागाला पाठवलेला आहे आणि या ठिकाणी जो काही प्रसंग घडलेला होता. तो प्रसंग त्यांच्या निर्दशनास आणून दिलेला आह आणि त्याच्यावर योग्य ती कार्यवाही त्वरीत करण्याबाबत विनंती करण्यांत आलेली आहे.

**जयंत पाटील :-**

डॉ. राठोड १ तारखेला महापालिकेच्या कार्यालयात आलेले होते का?

**मा. आयुक्त सो. :-**

दि. १ मे हा 'महाराष्ट्र दिन' आणि 'कामगार दिन' असतो. मी, मा. महापौर आणि सन्मा. नगरसेवकांच्या समवेत कार्यक्रमाला उपस्थित होतो. आम्ही सकाळी १०.४५ पर्यंत कार्यालयात होतो. आम्ही सकाळी १०.४५ वाजता कार्यालय सोडले. मी त्याच्यानंतर माझ्या निवासस्थानी गेल्यानंतर मला निरोप आला की या ठिकाणी डॉ. राठोड आलेले आहेत. मला मोबाईलवर फोन आल्यानंतर माझे जे पी.ए. श्री. गोडसे आहेत त्यांना ताबडतोब कार्यालयामध्ये पाठवले. डॉ. राठोड याठिकाणी आलेले होते हे सत्य आहे. खरे म्हणजे डॉ. राठोड यांनी सुट्टीच्या दिवशी येण्याची गरज नव्हती. जर त्यांना यायचे असेल तर त्यांनी मला कळवायला पाहिजे होते. परंतु, तशाप्रकारे झालेले नव्हते. डॉ. राठोड महापालिकेत आलेले होते. परंतु, मी श्री. गोडसे यांना पाठवल्या बरोबर श्री. गोडसे यांनी त्यांना सुट्टीच्या दिवशी कार्यालयामध्ये येउ नका असे ताबडतोब सांगितले. जर तुम्हाला सुट्टीच्या दिवशी कार्यालयामध्ये यायचे असेल तर तुम्ही कमिशनर साहेबांची परवानगी घ्या.

**जयंत पाटील :-**

तुमची परवानगी घेतलेली नव्हती का?

**मा. आयुक्त सो. :-**

माझी परवानगी घेतलेली नव्हती.

**जयंत पाटील :-**

मुळात डॉ. राठोड यांनी सुट्टीच्या दिवशी आपल्या कार्यालयामध्ये येताना तुमची परवानगी घेणे आवश्यक आहे.

**मा. आयुक्त सो. :-**

त्याप्रमाणे सुरक्षा रक्षकांना सुचना दिल्या की, सुट्टीच्या दिवशी जो कर्मचारी येण्याच्या आणि जाण्याच्या काम करण्यासाठी कामावर येत असेल तर त्याच्या नोंदी घ्यायच्या.

**जयंत पाटील :-**

डॉ. राठोड यांची आजची काय परिस्थिती आहे? आज डॉ. राठोड आपल्या कार्यालयामध्ये ड्युटीवर आहेत का? मी तुम्हाला कायदेशीर बाब विचारतो.

**मा. आयुक्त सो. :-**

सध्या डॉ. राठोड आपल्या कार्यालयात येत नाहीत.

**जयंत पाटील :-**

डॉ. राठोड आता पुन्हा कार्यालयामध्ये येउ शकतील का? आपण या डेप्युटेशनवरच्या अधिकाऱ्यांना नियमानुसार त्यांच्यावर आरोप करणार का?

**मा. आयुक्त सो. :-**

आपल्याला या संदर्भात शासनाकडे जो अहवाल पाठवायचा होता. आम्ही तो शासनाकडे अहवाल पाठवलेला आहे. शासनाने त्यांच्यावर त्यांच्या विभागा अंतर्गत जी काही कार्यवाही करायची असेल ती कार्यवाही करायची आहे. मिनव्हाईल ते कस्टडीमध्ये किती तास होते? त्याचाही स्वतंत्र अहवाल त्यांच्या कार्यालयात पाठवण्याची एखादी व्यवस्था झाली असेल किंवा अहवाल पाठवला गेला असेल. आपल्याला अजुनपर्यंत त्या अहवालाची प्रत मिळालेली नाही.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, डॉ. राठोड सुट्टीच्या दिवशी आलेले होते आणि त्यांनीच हा मुद्देमाल गायब केला असेल तर आपण काय करणार? त्या संदर्भात जी काही कागदपत्र असतीलती गहाळ केली असतील तर त्याला कोण जबाबदार आहे? ते इकडे कार्यालयात आल्यानंतर तुम्ही पोलिसांना कळविले का? तुम्ही पोलिसांना पत्र देवून कळवा की, अमुक-अमुक वेळेमध्ये विना परवानगी अमुक-अमुक अधिकारी आलेले होते. मग तुमची जबाबदारी संपली. परंतु, जर पुन्हा त्यांनी त्या संदर्भात पेपर गायब केले असतील तर त्याला जबाबदार कोण? डॉ. राठोड यांनी सुट्टीच्या दिवशी यायला नको होते. तरीसुध्दा ते सुट्टीच्या दिवशी कार्यालयामध्ये आलेले होते. जर ते पेपर घेउन गेलेले असतील किंवा मुद्देमाल घेउन गेलेले असतील तर केस करुन काहीही होणार नाही. मा. आयुक्त साहेबांनी या संदर्भात पोलिस आणि लाचलुचपत खात्याला पत्र द्या. आता आपण जे अधिकारी प्रतिनियुक्तीवर घेतो. त्यांच्याबाबत आपण अशातऱ्हेने नीट बोध घेतला पाहिजे. शिक्षण आधिकारी श्री. सुर्यवंशी यांच्या बाबतीतसुध्दा असेच झालेले होते. आता ह्यांच्या बाबतीतसुध्दा असेच झालेले आहे. त्यामुळे आपण प्रतिनियुक्तीच्या अधिकाऱ्यांसाठी ठराव करतो. परंतु, आपण आता कुठल्याही प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांना घेउ नये असे मला वाटते. आता हे जे येणारे अधिकारी असतात तेच भ्रष्टाचारी असतात. आमच्या महापालिकेला या अधिकाऱ्यांमुळे काळीमा फासला जातो. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आमच्या महापालिकेची बदनामी होते. आपण आता ठराव करु या की, आम्हाला हे प्रतिनियुक्तीवर येणारे अधिकारी नको आहेत. दुसरी गोष्ट अशी आहे की, आपल्या महापालिकेच्या जागेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आहे. मा. महापौर महोदया ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. यांचे पुतळे असायला पाहिजे. परंतु, आपण महाराष्ट्रामध्ये अनेक बातम्या वाचतो. अनेक वर्तमानपत्रामधून बातम्या येत असतात. अनेक ठिकाणी दंगली झालेल्या असतात. तुम्ही आताच त्याला असे कडक नियम करा की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ज्यावेळेला जयंती असते. त्यावेळेला फक्त मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त आणि अधिकारी वर्ग या लोकांनीच त्या पुतळ्याला हार घालायचे. त्याच्या शिवाय शिवजयंती असेल त्यावेळेला या लोकांनीच पुतळ्याला हार घालायचे. बाहेरच्या कुठल्याही लोकांना हार घालण्यास प्रतिबंध करावा असा कडक नियम करुन त्या दोन्ही पुतळ्याच्या शेजारी नियम करुन लावा. ह्याच्यामध्ये इतर कोणालाही परमिशन देउ नये. कारण प्रत्येकजण येउन हार घातले आणि मला हार घालायला दिलेला नाही, त्यांनी मला अडवले असे होईल. आपल्या आवारात हे पुतळे आहेत. हे पुतळे बाहेर असते तर वेगळी गोष्ट होती. आपण ह्याची पूर्ण दक्षता घेतली पाहिजे. आपण ह्याचे कडक नियम करुन दोन्ही पुतळ्याचे रुल बनवले पाहिजेत. त्याबाबतीत नियम करुनच लोकांना कळवले पाहिजे की याबाबतीत कोणालाही आतमध्ये शिरकाव करायला दिले जाणार नाही. आपण याची दखल घ्यावी आणि तसे नियम करावेत अशी माझी सुचना आहे.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे महापालिकेच्या आवारात उद्घाटन झाले. आपल्याला उद्घाटन करताना काही सदस्यांनी त्या संदर्भात जाणीव करुन दिली. प्रशासनाकडून अनेक वेळेला अशा चुका झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा म्हणजे महापुरुष आहेत. आपण कमीतकमी यासंदर्भात दखल घ्यायला पाहिजे होती. ती दखल प्रशासनाने घेतलेली नाही. वास्तविक छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळ्याला हार घालणे हे तुम्ही आम्ही प्रत्येक भारतीय किंवा महाराष्ट्रीयन लोकांचे कर्तव्य आहे. आम्हाला या कर्तव्याची जाणीव आहे का? याचा आम्हांला खुलासा करावा.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, अभी यहाँपर डॉ. रुंदन राठोड के बारेमें यहाँपर चर्चा हुई है। वह रिश्वत लेकर पकडे गये यह सब ठिक है। लेकिन रिश्वत कितनी ली है? हम लोगोंने ऐसे सुना है की उनका पहला दवामें २५ टक्के से ३० टक्के तक कमिशन था। उसके बादमें उसका ज्यादा डिमान्ड किया था। ४० टक्के या ४५ टक्के ऐसे कुछ डिमांड किया था। मा. आयुक्तसाहेब मी तुम्हांला विनंती करतो की आपल्याकडे जी दवा आणलेली आहे. तुम्ही ती चेक केली पाहिजे. जर ती दवा हलक्या क्वालिटीची असेल तर ती भाईंदरच्या नागरिकांना हानीकारक असेल. त्याचा वास एकदम घुमू शकतो. तुम्ही त्याचा स्टॉक चेक केला पाहिजे. तुम्ही याची ताबडतोब दखल घ्या.

**रोहिदास पाटील :-**

मी तुमच्या रेकॉर्डवर दाखवा की तुमची दवा फवारणी होते. कारण एकही मच्छर मरत नाही. हे औषध खरोखर मच्छर मारण्यासाठी वापरतात की मच्छर पोषक आहे, मच्छर वाढतात की कमी होतात ते सांगा.

**डॉ. पडवळ :-**

मच्छर कमी होते.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही हा विषय वेगवेगळ्या अँगलने बघत आहात. आता हा विषय क्लॅप झालेला आहे म्हणून प्रश्न येत नाही. परंतु, आता वर्षभर मच्छरसाठी झालेल्या दवा फवारणीमुळे मच्छर मरत नाही. ती दवा फवारणी मच्छरांना लागू पडत नाही. मॅडम, तुम्ही ह्या विषयाबाबत फक्त एकून घ्याल आणि सोडून द्यालं अस होता कामा नये. परंतु, ह्याच्यामध्ये नक्की काय आहे? ओरिजनल कंपनीची दवा येते की नामदार कंपनीची दवा येते की ड्युप्लीकेट कंपनीची दवा येते की बी.ई.एस.टी. ने येते की टॅक्स झाल्यामुळे बिल वेगळे येते. असा कुठेतरी अभ्यास व्हायला पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, औषधे चेकींग करण्याचे रुलिंग द्या. त्याशिवाय काहीही माहिती पडणार नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. धनराज अग्रवाल, सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील साहेब यांनी या ठिकाणी जी काही सुचना मांडलेली आहे की, आपल्या शहरामध्ये मच्छर फवारणीसाठी येणारे औषध आणि शहराच्या ठिकठिकाणी असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी येणारी औषधे, दवा-गोळ्या या चेकींग केल्या पाहिजेत. त्या कोणत्या उत्कृष्ट दर्जाच्या आहेत? की निकृष्ट दर्जाच्या आहेत याचीसुध्दा पाहणी केली जाईल. मी प्रशासनाला याबाबत सुचीत करते की, आपण प्रत्यक्ष लक्ष देउन ते औषध कुठल्या दर्जाचे आहे ते बघावे. जर ते औषध निकृष्ट दर्जाचे असेल तर ते औषध तिथल्या तिथे परत करुन शहराचे आरोग्य लक्षात घेता आपल्या शहराला चांगल्या प्रकारचे व चांगल्या दर्जाचे औषध कशाप्रकारे देता येईल? यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत. विशेष करुन ही गोष्ट सन्मा. सदस्यांनी प्रशासनाच्या लक्षात आणून दिलेली आहे. आपण सर्वांनी मिळून याची खबरदारी घेतली पाहिजे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही माझ्या प्रश्नावर रुलिंग द्या. श्री. रुंदन राठोड साहेब १ तारखेला आपल्या कार्यालयात सुट्टीच्या वेळेला आलेले होते. त्याबाबतचे पत्र पोलिस स्टेशनला द्यायचे होते. त्याचेसुध्दा रुलिंग द्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील यांनी सुचना केली की डॉ. रुंदन राठोड यांनी महापालिकेच्या आवारात जो गैरप्रकार घडवला त्याची सखोल चौकशी करुन तसेच, कायद्याच्या नियमानुसार त्यांच्याबाबत जेवढी बंधनकारक प्रशासनाकडून करता येईल ती केली जाईल. श्री. मिलन पाटील यांनी पोलिस स्टेशनला तक्रार नोंदवल्याचे सुचित केलेले आहे. संबधित खात्याचे प्रमुख व प्रशासनाचे मुख्य म्हणून आयुक्त साहेब याकडे लक्ष देवून तक्रार देवून तक्रारदेखील करतील.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, याठिकाणी एक प्रश्न अराईज करायचा आहे की, डॉ. रुंदन राठोड यांना ॲन्टी करप्शन ब्युरोने पकडलेले आहे. त्यांच्यावर कार्यवाही किंवा पी.सी. वगैरे लागल्यामुळे ते सुटलेले आहेत. परंतु, ते महानगरपालिकेमध्ये डेप्युटेशनवर होते. आपण त्यांना सस्पेन्ड केलेले आहे किंवा कार्यमुक्त केलेले आहे असा शासनाचा काही आदेश आहे का? आपण प्रशासन म्हणून ही घटना घडल्यानंतर तुम्ही कमिशनर म्हणून त्यांना सस्पेन्ड वगैरे केलेले आहे अशी कार्यवाही केलेली आहे का? ही एक टेक्नीकल बाब आहे. परंतु, डॉ. रुंदन राठोड यांनी सुट्टीच्या दिवशी ऑफिसला यायला नको होते हे आपण मान्य करतो. परंतु, महापालिका चालू असताना ते येणार की येणार नाही ही एक बाब आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की, डॉ. रुंदन राठोड तर्फे ज्या माणसाने पैसे वसुल केले किंवा पैसे हातात घेतले तो आपल्या महानगरपालिकेचा एक कॉन्ट्रॅक्टर आहे. त्याचे नाव श्री. राजेश सिघांनिया असे आहे. आपल्याला जी वाहने पुरवली जातात. त्याचे त्याने कॉन्ट्रॅक्ट घेतलेले आहे. आपण अशा कॉन्ट्रॅक्टरला ब्लॅकलिस्टमध्ये टाकले पाहिजे. कारण त्या कॉन्ट्रॅक्टरने वाहनांचा ठेका घेतलेला आहे. मला त्याबाबत असे वाटते की त्याच्याकडे पोलिस परमिट नाही. तुम्ही चौकशी करा. तो कॉन्ट्रॅक्टर चुकीचा ठेका चालवत आहे. तुम्ही त्या कॉन्ट्रॅक्टरला ब्लॅक लिस्टमध्ये टाका.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या प्रांगणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा बसवला गेलेला आहे. आपल्याकडे महापुरुषांचे पुतळे असावेत. कारण आपली येणारी पिढी एक नवीन आदर्श घेउन त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालवेल. परंतु, मी तुमच्या एक निर्देशनास आणून देतो की एवढा मोठा पूर्णाकृती शिवाजी महाराजांचा पुतळा आपल्या प्रवेशद्वारावर आहे. त्याच्यावर किती फुट धुळ चढलेली आहे ते तुम्ही बघितले आहे का? तुम्ही त्याचे मोजमाप करुन बघा. आपले जे गोल्डन नेस्टचे जंक्शन आहे. तिथे असे पुतळे

उभे आहेत. त्याच्यावर किती इंचाचा थर आहे? ते बघा. शिवाजी महाराजांचा प्रांगणातील पुतळा आणि नवीन बसवलेला पुतळा त्याच्यावर अशी फुटभर धूळ बसली तर इथे लाखो रुपये खर्च करुन काहीही उपयोग नाही. आपण नगरपालिका असल्यापासून हा पुतळा बसवलेला आहे. आज त्याची किंमत नक्कीच कमी असेल. जर आपण तो पुतळा आज बसवला तर त्याची किंमत करोड वर जाईल. परंतु, इतका मोठा स्मृतीदायक पुरुषाचा पुतळा आपण त्याची निगा घेतो? प्रशासन आस्थापनेवर भरपूर खर्च करते. आपल्याकडे भरपूर सफाई कामगार आहेत. परंतु, आपण आपला एक सफाई कामगार त्या पुतळ्याच्या निगराणीसाठी ठेवू शकत नाही का? आपण पुतळे कशासाठी बसवायचे? आपण हे पुतळे धुळ खाण्यासाठी बसवायचे का? आपण आणखी पुतळ्यात वाढ का करायची? आपण हे जे पुतळे बसवलेले आहेत. त्याच्या निगराणीसाठी स्पेसिफिक माणूस ठेवा. त्या पुतळ्यांची एक दिवसाआड किंवा चार दिवसांनी स्वच्छता करायची असे करु नका. त्या पुतळ्यांची रोजच्या रोज निगराणी करा. तुम्ही हे पुतळे धुळ खाण्यासाठी बसवू नका.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या मागे जी आपल्या मिरा भाईंदरच्या प्रवेशद्वारावर मिरा भाईंदरचे भुषण म्हणून आपण कमान बांधणार आहोत. परंतु, सध्या वस्तुस्थिती वेगळी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या मागे सध्या एका कंपनीने कमान बांधलेली आहे. मिरा भाईंदर महापालिकेने त्यांना फुकटमध्ये कमान बांधून दिलेली आहे. मला प्रशासनाला असा प्रश्न विचारायचा आहे की, ती एस्सलवर्डची कंपनी आहे. या एस्सलवर्डच्या कंपनीला मिरा भाईंदरच्या हद्दीमध्ये किती कमानी बांधायला दिलेल्या आहेत? त्या कंपनीचे किती भाडे मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये जमा होते? अशा पध्दतीने आणखी कोणाकोणाला कमानी बांधयला देणार आहोत? आता आपण जी कमान उभी करणार आहोत. ती छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या मागे उभी करणार आहोत की, पुढे करणार आहोत? कारण ऑलरेडी जी मागे कमान आहे. तुम्ही ती कमान काढणार आहात का? तुम्ही हेसुध्दा जाहिर करा. पहिला प्रश्न असा आहे की कमान ज्या कंपनीला दिलेली आहे. त्याला भाडे कसे मिळते? त्याला कशा पध्दतीने परवानगी दिलेली आहे? आपल्या महापालिकेला किती नफा होतो? आपल्याला त्यांनी आणखी किती परवानगी दिलेली आहे? त्याच्याकडून किती भाडे मिळते? या सगळ्याची माहिती मिळू द्या. त्याला किती परवानग्या दिलेल्या आहेत? त्याचासुध्दा खुलासा करावा. महापालिकेकडे किती पैसा जमा झालेला आहे? त्या कमानी फुकटमध्ये दिलेल्या आहेत की पूर्ण आंदण दिलेले आहे. ते आम्ही कसे समजायचे ते सांगा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी उपस्थित केलेल्या सुचना आणि प्रश्न याचा प्रशासनाने खुलासा करावा.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, त्या संदर्भात एकदमच खुलासा करतील मा. आयुक्तसाहेब आपण आता इथे जी काही परमिशन दिलेली आहे. त्याला परमिशन आहे का? आता माझ्या असे निदर्शनास आलेले आहे की, तुम्ही पुर्वी परमिशन दिलेली होती का? आपण जी कमान बांधलेली आहे त्याला तुमची परमिशन आहे परंतु, आपण आता जी काही कमान बांधणार आहोत. त्याबाब आपल्या बजेटमध्ये प्रोव्हीजन आहे का? जर ती कमान बांधली तर त्या कमानीची जबाबदारी कोण घेईल? मला माझ्या याप्रश्नाचे श्री. रतन पाटील यांच्या प्रश्नाच्या सोबत उत्तर द्यावे.

**दिपक खांबित :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की प्रथम श्री. मिलन पाटील यांच्या प्रश्नाचे उत्तर देतो. आपल्याकडे कमानी बांधण्याकरीता चालु अर्थसंकल्पात तरतुद नाही त्यामुळे आपण आपली डिझाईन करुन त्यांना विनंती करु की तुम्ही आमच्या डिझाईनप्रमाणे कमान बांधुन द्या. कारण जर आपण ती परवानगी रद्द केली तर लिटिगेशन मध्ये सगळे होईल.

**मिलन पाटील :-**

आपण अगोदर परवानगी दिलेली होती. त्याचे काय?

**दिपक खांबित :-**

आपण अगोदर परवानगी दिलेली होती.

**मिलन पाटील :-**

आपण त्यांची परमिशन कॅन्सल केली तर काम करायचे?

**दिपक खांबित :-**

आपण स्थायी समितीच्या मंजुरीने त्यांना परवानगी दिलेली होती. त्यांनी त्याप्रमाणे चार कमानी बांधलेल्या आहेत. एक कमान गोल्डन नेस्टजवळ बांधलेली आहे. दुसरी कमान सिल्व्हर पार्कला बांधलेली आहे. दुसरी कमान काशिमिऱ्याला शिवाजी पुतळ्याच्या मागे बांधलेली आहे. आणि चौथी कमान सुभाषचंद्र बोस मैदानाजवळ बांधलेली आहे.

**मिलन पाटील :-**

आपण आता ह्या ज्या परवानग्या दिलेल्या आहेत त्या कॅन्सल करणार का?

**दिपक खांबित :-**

अपल्याला ह्या परवानग्या रद्द करता येत नाहीत या कमानीबाबत स्थायी समितीने ठराव केलेला आहे.

**मिलन पाटील :-**

मग तो कमान बांधणारा कोर्टात जाईल ना.

**दिपक खांबित :-**

आपण त्यालाच विनंती करुया. आपण काशिमिऱ्याला जी कमान आहे त्याची डिझाईन देउन त्याप्रमाणे त्याच्या खर्चाने बांधायला सांगु.

**मिलन पाटील :-**

त्याचे जाउ दे. परंतु, आपल्याकडे प्रोव्हिजन नाही. मग संबधच येत नाही. जर आपल्या प्रशासनाकडे प्रोव्हिजन नसेल तर प्रश्न येत नाही.

**आसिफ शेख :-**

आपण सुरुवातीला त्याला कमान बांधण्यासाठी प्रोव्हिजन दिलेली आहे हे बरोबर आहे. आपण सुरुवातीला कमान बांधायसाठी परवानगी देतांना त्याच्याशी चांगल्याप्रकारे सुसंवाद झाला. असेल त्याला काहीतरी टाईमिंग दिला असेल तेव्हा त्याने लाखो रुपये खर्च करुन आपले एवढे पैसे वाचवले असतील. आता काय झाले? आपण पुर्वी त्याला परवानगी दिलेली होती. आता पुन्हा महासभेपुढे आणुन वेळ वाया घालवायचा असे करु नका. आपण एकदा त्याला परवानगी दिली आता पुन्हा खर्च करायचा म्हटले तर बजेटमध्ये तरतुद नाही. मग आता पैसे कुठुन आणणार त्यामुळे कमानीचा विषय येणे आवश्यक नाही. तुम्ही तूमच्या स्पष्ट अभिप्राय द्यायला पाहिजे की, त्याला कमान दिलेली आहे त्यामुळे आपल्याला ती कमान परत घेता येत नाही तुम्ही स्पष्ट अभिप्राय महासभेपुढे ठेवायला पाहिजे होता. तुम्ही ''नरोवा कुंजरो वा'' सारखा निर्णय का घेता तेच मला परिस्थिती सभागृहात मांडायला पाहिजे होतो.

**हॅरल बोर्जीस :-**

मा.पिठासीन अधिकारीसाहेब आपण ज्यावेळेला पॅन इंडियाला परवानगी दिली आपण त्यासाठी त्यांना काहीतरी संसिफिकेशनचे डॉईंग दिलेले असते. त्यांनी त्यांच्या मनाप्रमाणे नक्कीच काम केलेले नसेल. आता प्रश्न असा उद्‌भवलेला आहे की, श्री. खांबित साहेब सांगतात की त्यांची परवानगी रद्द न करता आपण त्यांनाच डिझाइन तयार करुन देउ आणि त्यांनाच कमान तयार करायला सांगु आता त्यांनी जो काही खर्च केलेला आहे त्याचे कसे होणार? त्यांनी त्यावेळेला या सगळ्या कमानी उभारल्या त्यावेळेला त्यांनी त्यांच्या मनाप्रमाणे त्यांच्या ड्रॉईंगप्रमाणे काम केलेले नसेल प्रशासनाने त्या संदर्भात काही ड्रॉईंग दिलेले असेल.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्तसाहेब ही कमान पहिल्यांदा देतांना आम्ही या कमानिला विरोध दर्शवलेला होता ज्यावेळेला महापलिका किंवा नगरपालिषदेच्यावतीने त्याचे निटनिटके डिझाईन तयार केले होते. हे डिझाईन देतेवेळी आपण ह्याचा खर्च करित नाही. ती लोक त्यांचा खर्च करतात असे सांगितले गेले तेव्हा हे डिझाईन आलेले नव्हते स्थायी समितीमध्ये आजच नाही तर कधीही कुठलेही विषय घाईगर्दीमध्ये येतात. मग, आपण स्थायी समितीचे मंजुरी आहे असे साळसुद उत्तर देतो ते उत्तर तितके समाधानकारण होत नाही. आजच्या परिस्थितीमध्ये सुध्दा जो हायवे आहे तो सहा पदरी होणार आहे. त्याच्यावर पुल व्हायचा आहे तुमच्याकडे अशी काहीतरी डिझाईन आहे का? आपण कोणत्याही विषयावर कितीतरी चर्चा करतो मग नक्की काय आहे? आपण आता तुम्ही आम्हाला सांगाल की महासभेची परवानगी दिलेली आहे. हा धोरणात्मक विषय आहे. तुम्ही अशा पध्दतीने घाई करुन सभागृहाची दिशाभुल करित आहात.

**रतन पाटील :-**

आम्ही अशा पध्दतीने परवानगी देणार नाही आम्ही प्रथम महापालिकेला काय उत्त्पन्न मिळेल? ते बघणार आणि मग परवानगी देणार.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, तुम्ही अर्धाच्या टर्मला सुध्दा होते.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, तुम्ही हा विषय पेंन्डिग ठेवा. याच्यावर चर्चा करु नका. पुढिल विषय घ्या. तुम्हाला हे व्यवस्थित देता येणार नाही. आपण जे सद्‌सद्‌विवेक बुध्दीने केलेले आहे. ते चालु राहु द्या तुम्ही दुसरे नवीन सार्वजनिक बांधकाम खात्याने हे प्रवेशद्वार नाही. सार्वजनिक बांधकाम खात्याचे हे प्रवेशद्वार आहे असे सांगितलेले आहे का? आपले हे प्रवेशद्वार नाही दहिसर चेकनाका आाला हायवे आला, काजुपाडा आला हे तीन प्रवेशद्वार आहेत आपले जे प्रवेशद्वार आहे आपला प्रवेशद्वार सन्मानित आहे. त्याची स्वच्छता ठेवा. मघाशी श्री. अविनाश अग्रवाल यांनी सांगितल्याप्रमाणे तो पुतळा तसाच आहे. ह्याचा बोर्ड आहे त्याचा बोर्ड आहे त्याचे हार आहेत त्याच्यावर काबळे बसेलेले आहेत. हे कुणी बघायचे आहे? प्रशासनाला किंवा अधिकाऱ्यांना हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आहे असे व वाटते पाहिजे. आपण एका बाजुने नवीन विषय घेतो. आणि दुसऱ्या

बाजुने त्या विषयाची चिंता नाही शंका नाही चर्चा नाही मा. महापौर मॅडम, तुम्ही या विषयासाठी अजिबात वेळ न घालवता रुलिंग या विषयासाठी अजिबात वेळ न घालवता रुलिंग द्या हा विषय पेन्डिग ठेवा. आपल्याला तिथे गोष्टीची गरज नाही. आम्ही विरोध करतो.

(सन्मा. सदस्य श्री. महेंद्रसिंग चौहाण ह्यांनी सभागृहासमोर ठरावाचे वाचन केले )

**दिपक खांबित :-**

आपण खर्च करायचा नाही. आपण त्यालाच खर्च करायला सांगुया.

**रतन पाटील :-**

साहेब, तसे नाही.

**रोहिदास पाटील :-**

हा मुद्दा आवश्यक आहे. मी, पहिल्यांदा बोलतो की, प्रशासनाने प्रथम याची फिजिबिलिटी द्यायला पाहिजे आमच्या माहितीनुसार तिथे फिजिबिलिटी नाही. त्या रस्त्याचे रुंदीकरण व्हायचे आहे तिथे ओव्हर ब्रिज व्हायचा आहे तिथे तिन पुल होत आहेत. जर तुम्हाला याची माहिती नसेल तर मला जी काही माहिती असेल ती मी तुम्हाला सांगतो त्यामुळे तिथे असेलेली कमान निघणार आहे. जर तिथे नवीन कमान बनवायची असेल किंवा नवीन कमान दुरुस्त करायची असेल तर हे सभागृह ह्याला मंजुरी देते म्हणुन हे आपले अज्ञान ठरेल त्यामुळे जरी हा ठराव श्री. महेंद्रसिंग चौहानानी मांडलेला असला तरी आम्ही ह्या ठरावाला विरोध नोंदवतो जर विरोध नसेल तर ह्या विषयावर चर्चा होणार नाही. मग हा विषय कॅन्सल करा.

**स्टिवन मेंन्डोसा :-**

हा विषय कॅन्सल करु नका.

**नरेंद्र मेहता :-**

काशिमिरा नाक्यावर जे प्रवेशद्वार बांधलेले आहे. त्या ठिकाणी प्रवेशद्वार नसतानासुध्दा तिथे जाहिरात बोर्ड ९९ टक्के जाहिरात वर पत्र्याचे बोर्ड दर मिरा भाईंदर महानगरपालिका हे वाक्य लिहिलेले आहे. साहेब, तुम्ही छोट्या अक्षरामध्ये ते वाक्य लिहिलेले आहे. साहेब तुम्ही काशिमिऱ्याला बघितले असेल. त्या बोर्डवर साधारण ३ हजार स्क्वेअर फिटचा एरिया असेल. त्याच्यावर महानगरपालिका हे नाव फक्त ५० स्क्वेअर फिटमध्ये आहे हे २९५० स्क्वेअर फिॅट एरिया फॅक्त जाहिरातीसाठी वापरलेला आहे. आपण त्यापेक्षा जाहिरात बोर्ड बांधले तर आपल्याला उत्पन्न मिळेल आणि जाहिरात बोर्ड सुध्दा लागेल मग आपल्याला प्रवेशद्वार बाधांयचे आहे की, जाहिरात बोर्ड बांधायचे आहे ते तुम्ही ठरवा. त्या ठिकाणी नक्की जाहिरात बोर्ड बांधावे असे मला वाटते कारण त्या ठिकाणी कुठल्याही अँगलने प्रवेशद्वार होउ शकत नाही. तुम्हाला ज्या पध्दतीने प्रवेशद्वार किंवा जाहिरात बोर्ड बांधायचा असेल तुम्ही त्या पध्दतीने टेंडर कॉल करा म्हणजे प्रश्न मिटतील आपल्याला त्याचा रेव्हेन्यु मिळायला पाहिजे. आपण होर्डींग लावतो तेव्हा आपल्याला रु. ३ लाख ते रु. ४ लाखापर्यंत रेव्हेन्यु येतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी जी टिपणी दिलेली आहे. प्रशासनाने ही टिपणी देतांना सर्व बाबींचा खुलासा केलेला नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आपण प्रवेशद्वार तरी कमी कमी आपल्या खर्चाने बांधुया आपण ते प्रवेशद्वार या वर्षी बांधुया किंवा पुढच्या वर्षी बांधुया किंवा दोन वर्षानंतर बांधुया परंतु, आपण हे प्रवेशद्वार सुध्दा जाहिरात देउन बांधायचे आहे का? काहीतरी पध्दत ठेवा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम मी, तुम्हाला या टिपणीच्या आधारे सांगु इच्छितो पहिली गोष्ट अशी आहे की, याप्रवेशद्वाराची महापालिकेच्या बजेटमध्ये नमुद केलेली नाही. महापालिकेच्या बजेटमध्ये प्रवेशद्वाराची तरतुद नाही म्हणुन प्रशासनाने हा विषय प्रशासनाने आणायला नको होता दुसरी गोष्ट अशी आहे की, प्रशासनाने हा विषय आपलेला आहे. आणि हा विषय आणण्यासाठी ज्या कंपनीला आदेश दिलेला आहे त्या कंपनीला कूठल्या टर्म्स - कंन्डिशन्स दिलेल्या आहेत? त्या कंपनीने टर्म्स - कन्डिशन्सचे व्यवस्थित पालन केलेले आहे की, नाही जर त्या कंपनीने व्यवस्थित पालन केले असेल तर एखाद्या माणुस कोर्टात जाईल. नवीन बांधकाम करिल आणि त्यालाच परवानगी देउन पैसे वाचवले प्रत्येकवेळी त्यालाच परवानगी देउन पैसे वाचवेल प्रत्येकवेळी पैसे वाचवतो आपली एवढी मोठी महापालिका रु. ५० हजारासाठी कमी नाही की एखादा कंपनीने कॉन्ट्रक्ट दिल्यानंतर आपण कमान बांधु शकतो असे नाही. माहपालिकेचे रु. साडे तीनशे कोटीचे बजेट आहे. आपण एका छोट्या खेडेगावात गेली तरी आपल्याला असे आढळुन येईल की, तेथिल ग्रामपंचायत आपले सुंदर प्रवेशद्वार बांधते आणि आपली तर महापालिका आहे. म्हणुन आपण ज्या कंपनीला प्रवेशद्वार बांधायला दिलेले आहे. आपण त्या कंपनीला पुन्हा प्रवेशद्वार बांधायाला देण्याचे काय कारण आहे? आपण फक्त पैसे वाचवायचे का? या टिपणीमध्ये प्रशासनाने व्यवस्थित खुलासा केलेला नाही. सर्वात महत्वाची गोंष्ट अशी आहे की, बेजटमध्ये प्रवेशद्वारासाठी तरतुद नाही म्हणुन तुम्ही हा विषय पुढच्या वेळेला म्हणजेच जेव्हा तरतुद केली

जाईल तेव्हा विषय पटलावर घ्या जर त्या गोष्टीमध्ये बसलो तर या टिपणीमध्ये त्याचा खुलासा करावा आणि हा विषय पुन्हा महासभेत घ्यावा अशी आमची मागणी आहे आणि आम्ही असा ठराव मांडतो.

**शिवप्रकाश भुदेका :-**

अपको यह विषय कोर्टमे जा सकता है उसे लगता है तो आज उसका होर्डिंग निकाल कर आप चले जाईऐ। श्री. चौहाण साहब को ठराव रखनेका नैतिक अधिकार नही है वह सिर्फ सुपारी लेकर ऐसा ठराव रखते है।

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, या कमानीमुळे मिरा भाईंदर महापालिकेचे उत्पन्न किती लाख रुपयांनी वाढलेले आहे. एवढे सांगा. आपल्याला किती उत्पन्न मिळत आहे ते सांगा?

**महेंद्र सिंग चौहाण :-**

वह क्या बोलेंगे? वह पाँच साल जमीनपर बैठे है जमिनपर बैठै है वह बोलते है । मगर जो उपर बैठे है वह क्या बोलेंगे?

**रतन पाटील :-**

साहेब, आपली एवढी मोठी मिरा भाईंदर महापालिका आहे आणि त्याचे नाममात्र भाडे एका कंपनीला दिले जाते हे योग्य नाही. जर महापालिकेने प्रवेशद्वार बांधले असेल तर मिरा भाईंदरला त्याचे लाखो रुपयांचे उत्पन्न वाढले असते हा ठराव रद्द करुन मिरा भाईंदर महापालिकेने कमानी बांधुन त्या भाड्यांने देण्यात याव्यात सदर कमानीचा ठराव रद्द करावा अशी मी मा. महापौराकडे मागणी करतो महापालिकेला याचे रु. १/- सुध्दाउत्पन्न प्राप्त होत नाही. मग आपण ह्या कंपनीला कमान बांधायला कशाला द्यायच्या?

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण एखाद्या कमानिचे कुठेतरी होर्डिंग लावलेले असेल तर त्या क्लासेसचे कुठेतरी होर्डिंग लावलेले असेल तर त्या क्लासेसचे होर्डिंग काढुन तर त्या क्लासेसवाल्यांना बोलावुन त्यांना फोनवरुन दम दिला जातो की तुम्ही ह्या होर्डिंगचे पैसे भरलेले नाहीत. आम्ही आमच्या पध्दतीने तुमच्यावर कारवाई करु आता आपण एवढ्या मोठ्या कंपनीची नामपत्र फी न बघता ॲडव्हरटाईजमेंट करायला जातो. हा कुठला न्याय आहे ?

**रतन पाटील :-**

या पॅन इंडियाला महापालिकेने चार ठिकाणी कमानी बांधण्याची परवानगी दिलेली अहो. आपण अन्य ठिकाणी जिथे - जिथे कमानी लावलेल्या आहेत. आपण त्या कमानी लावल्याबद्दल त्यांच्याकडुन पैसे घेतो. आपण ह्यांच्याकडुन काय पैसे घेतो? मिरा भाईंदर महानगरपालिकेचे हे नुकसान आहे. सदर दिलेला ठराव रद्द करण्यांत यावा.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही काही दिवसांनी म्हणजेच कधीतरी एकदा आमच्या पैशाने होर्डिंग लावतो.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम आपल्या रुलिंगने सदर ठराव रद्द करण्यांत यावा व नवीन गोषवारा घेउन विषय घेउन या.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण आपल्या शहराच्या तोंडावर प्रवेशद्वार बांधणार आहोत. आपल्या शहरात प्रवेश करण्याऱ्या लोकांनी आपल्या शहराकडे आकर्षित व्हावे आपण इतके सुंदर प्रवेशद्वार बांधणार की, आातमध्ये प्रवेश केल्यानंतर हे शहर किती छान व सुदंर असेल असा विचार त्या लोकांच्या मनान येईल. त्यामुळे त्या माणसाचे किंवा त्या व्यापाऱ्याचे मन किंवा येणाऱ्या पाहुण्यांचे मन प्रसन्न रहायला पाहिजे. आपण यासाठी कमानी उभारलेल्या आहेत. आपला उपक्रम अतिशय स्तुल्य आहे. परंतु, माझ्या हिशेबाने आपण कमान का उभारतो? आपण स्वागत कमान लावु या. कारण या रस्त्यावर पुढे जाउन धाब्यानी थाटलेली. दुकाने आपल्या स्वागताला उभी आहेत. आपण स्वागत कमान उभारुया. पुढे गेल्यावर आपल्या स्वागतासाठी रिक्षा, गॅरेज थाटलेली आहेत. आपण स्वागत कमान उभारुया. पुढे गेल्यांनतर मोटारीची गॅरेजेस फार मोठ्या प्रमाणात आपले स्वागत करण्यासाठी उभी अहेत. उत्सुक आहेत. आपण स्वागत कमान उभारायचे कारण पाथवाले आणि फेरिवालेसुध्दा आपले स्वागत करायला उभे आहेत. आपण स्वागत कमान उभारुया. कारण मिरा भाईंदर मधील भंगारवाल्यांच्या रुपाने उभी असलेली एक छोटी धारावी आपले स्वागत करण्यासाठी आणखी पुढे उभी आहे. आपण स्वागत कमान उभारुया कारण त्याच्यापुढे जाउन आडवे, उभे,तिरके कसेही उसलेले टेम्पो आणि टेम्पोवाले आपले स्वागत करण्यासाठी सज्ज आहेत. आपण स्वागत कमान उभारुया कारण त्याच्याही पुढे जाउन पिण्याच्या पाण्याचे टॅकरवाले आणि टॅकंर आपले हारफुलांनी घेउन स्वागत करायला उभे आहेत. आपण एवढ्या सगळ्यांसाठी स्वागत कमान उभारायची का? आपण स्वागत कमान उभारण्यासाठी आपली आर्थिक तरतुद काय आहे? तुम्ही बघा आणि हे सगळे हटवा आणि मगच स्वागत कमान उभारा.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य प्रभात पाटील मॅडम, ने अभी जो कुछ कहा है उसके बोर मे मै यह कहुगा की बॉम्बस्फोट मे जो मर गये है आत्मा इसमे आगई है। इसलिये वह अभी खडी रही आप इन का भी स्वागत किजिऐ।

**प्रफुल्ल पाटील :-**

मी पिठासीन अधिकारी, या सभागृहात जेव्हा स्वागत कमान उभारण्याचा विषय आलेला आहे. त्यामुळे मला असे आठवते की, अशाप्रकारचा स्वागत कमान उभारण्याचा विषय नगरपालिकेच्या स्वागत कमान उभारण्याचा विषय नगरसेवक आणि आताचे नगरसेवक श्री. असिफ शेख यांनी त्या प्रवेशद्वाराचे सुंदर डिझाईंन बनवुन दिलेले होते. श्री. आसिफ शेख त्याच कमानीच्या मागे का लागलेले आहेत? ते मला समजत नाही. कारण त्यांनी त्यावेळेला एक सुंदर प्रवेशद्वाराचे डिझाईंन हाताने दिलेले होते. आपल्याला असेच प्रवेशद्वार पाहिजे आम्ही आर्किटेककडुन ते चांगले डिझाईन बनवुन घेतलेले आहे. तशा पध्दतीचे प्रवेशद्वार व्हावे अशी त्यांची मागणी होती. ती मागणी तत्कालीन नगरपालिकेने मंजुर केलेली होती. माझ्या माहितीप्रमाणे महानगरपालिकेचे इन्कम वाढावे म्हणुन टोल लावण्याचा जो विषय झाला. तो टोल एस्सेल वर्ल्डचा रस्ता सुरु होतो त्या एस्सेल वर्ल्डच्या प्रवेशद्वारावर टोल लावायचा असा महानगरपालिका आणि प्रशासनाने निर्णय चर्चेमध्ये घेतलेला होता. तेव्हा एस्सल वर्ल्डवाले आपल्याला आता भुर्दंड पडेल म्हणुन धावत गेले आणि महानगरपालिकेचे इन्कम वाढेल आपण त्यापेक्षा महानगरपालिकेला काहीतरी हिताचा सल्ला देण्याचा प्रयत्न करुया. आणि अचानक उलटीचक्र फिरली तत्कालीन प्रशासनाने एस्सल वर्ल्डची मागणी कशी मान्य केली? हे एस्सेल वर्ल्ड रु. ५०/- किंवा रु. १००/- टोल देउ शकत होते. ते एस्सेल वर्ल्ड एखाद्या गिरणी बंद पडल्या उदाहरणार्थ मुंबईमध्ये एखादे धुरांडे हटवण्यासाठी किंवा प्रदुषण दुर करण्यासाठी पत्र्याचे बॉक्स वापरले जातात. ते पत्र्याचे बॉक्स जुन्या बिल्डींगमधुन एस्सल वर्ल्ड आणुन ती कमान त्या ठिकाण उभारलेली आहे. खर म्हणजे आपल्याला हे आमच्या शहराचे प्रवेशद्वार आहे असे सांगायला शरम वाटते कारण ते पत्र्याचे बॉक्स असे लावलेले आहेत की असे वाटते की हे भंगार आहे.क्लबची जाहिरात मोठी केली. त्यांनी जाहिरात मोठी करायला सांगितलेली होती. मिरा भाईंदर महानगरपालिका एकदम लहान अक्षरात होते आणि एस्सर्ल वर्ल्ड मोठे लिहलेले होते. मला वाटते की मिरा भाईंदर महानगरपालिकेने नाव बदलुन (एस्सर्ल वर्ल्ड महानगरपालिका ठेवु या.) जर तुम्हाला त्यांचे तेवढे लाड करायचे असतील तर आपण नाव बदलुया. मला कोणीतरी सांगितले की, त्यांनाच हे काम देउया. आपली थोडी दिवसांनी महानगरपालिकेची जेवढी वाहन खात्याची कामे असतील आपण ती सगळी कामे एस्सेल वर्ल्डला देउ या. खरे म्हणजे या कमानिवर एस्सर्ल वर्ल्ड असा उल्लेख केला तर आपल्याला त्या गाडीमागे रु. ५०/- ते रु. १००/- टोल मिळु शकणार होता का? त्या ठिकाणी आपल्या जागेवर पत्राचे बॉक्स लावुन मोठ्या मोठ्या जाहिरातीद्वारे जे पैसे कमवतात. जर त्या जाहिराती महानगरपालिकेने दिल्या असत्या तर महानगरपालिकेला लाखो रुपये मिळाले असते म्हणुन या कमानी रद्द करण्यात याव्यात खरे म्हणजे कमानी लावण्याचा विषय धोरणात्मक विषय आहे. स्थायी समितीने ह्या विषयावर निर्णय घेतला कसा? आणि आयुक्त साहेबांनी या विषयाला मंजुरी दिली कशी? कमानी उभारले त्याच्या जागा ठरविणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा लावणे, त्याची जागा ठरविणे हा जसा महासभेचा विषय आहे. तो धोरणात्मक विषय आहे. हा विषय धोरणात्मक असल्यामुळे ह्या विषयाला महासभेने मंजुरी द्यायला पाहिजे होती. परंतु, या विषयाला महासभेने मंजुरी दिलेली नाही. किंवा महासभेची मंजुरी घेतलेली नाही आणि केवळ एस्सेल वर्ल्ड पर्सनल फायद्यासाठी हे झालेले आहे म्हणुन या कमानी रद्द करण्यांत याव्यात ज्या ठिकाणी प्रवेशद्वार असायला पाहिजे त्याच ठिकाणी प्रवेशद्वार व्हावे. आपण ज्या ठिकाणी कमान बांधलेली आहे. आपले प्रवेशद्वार त्या ठिकाणी नाही. म्हणुन प्रवेशद्वारासाठी वेगळी आणि योग्य जागा बघावी ज्या ठिकाणी आपल्या शहराच्या नागरिकांचा प्रवेश होतो. त्या ठिकाणी प्रवेशद्वार बांधण्यात यावे. आणि हा विषय प्रशासनाने पुन्हा आणावा.

**आसिफ शेख :-**

मा. पिठासीन अधिकारी सन्मा. तत्कालीन नगराध्यक्ष व आमचे परममित्र प्रफुल्ल पाटील साहेब यांनी या ठिकाणी जे काही सांगितले आम्ही त्यांच्या मताशी सहमत आहेत. तत्कालीन नगरपारिषदेच्या काळात मिरा भाईंदर शहरात एक सुंदर प्रवेशद्वार असावे ही सर्व प्रथम माझीच संकल्पना होती. त्या मागणीला अनुसरुन तत्कालीन मुख्याधिकारी श्री. संपतराव शिंदे साहेब यांनी सदर कमानी किंवा प्रवेशद्वार बाबत आर्किटेक श्री. गिरिश प्रधान यांच्याकडुन ती डिझाईन बनवुन घेतली ती डिझाईन आपल्या पालिकेत उपलब्ध असेल. परंतु, त्यावेळेला ती कमान प्रवेशद्वार मध्ये येत असल्यामुळे तयार झालेली नव्हती किंवा अन्य काही अडचणी आल्या असल्याची शक्यता आहे जी माझी भुमिका तात्कालीन नगरसेवक या नात्याने होती ती भुमिका आजही आहे. त्या भुमिकेत बदल होण्याचा कोणताही प्रश्न उद्भवत नाही. या ठिकाणी एस्सेल वर्ल्डवाल्यांना जी कमान बांधायला देण्याचा विषय या ठिकाणी आलेला आहे. तो एक धोरणात्मक निर्णय आहे. हा विषय कसा मंजुर झाला? ते माहिती नाही. आता आपल्याकडे बजेट नाही. आणि त्याची तरतुद सुध्दा नाही शहराच्या सौंदर्याकरणात भर पडावी या दृष्टीकोनातुन आपल्याला श्री. गिरिश प्रधान साहेबांनी जी डिझाईन तयार करुन दिलेली आहे अशा चांगल्या पध्दतीने प्रवेशद्वार तयार व्हायला पाहिजे. सर्व सन्मा. सदस्य अनेक ठिकाणी

दौऱ्यावर गेलेल होते. त्यांनी त्या त्या ठिकाणी व्यवस्थित अभ्यास केलेला आहे ते प्रत्येक शहरात जात असतांना त्या शहरातील प्रवेशद्वार किती सुंदर पध्दतीने बनवलेले आहे ते बघितले असेल. त्याच धर्तीने आपल्याकडे प्रवेशद्वार बनवायला पाहिजे होते. परंतु, आपल्याकडे जो विषय आलेला आहे तो विषय परिपुर्ण नाही हा विषय अपुर्ण आहे. या विषयाची टिपणीसुध्दा बरोबर आलेली नाही. आपण सर्वांना सर्व सन्मा. सदस्यांच्या भावना विचारात घेउन हा विषय रद्द करावा. आपल्याकडे जी डिझाईन तयार आहे त्या डिझाईन अनुसरुन पुरेशी तरतुद अर्थसंकल्पामध्ये घेउन आपण हा प्रस्ताव रद्द करुन त्याप्रमाणे प्रवेशद्वार बांधावे अशी मी विनंती करतो.

**शुंभागी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, सदर पॅन इंडिया कंपनीला दिलेली परवानगी रद्द करुन मिरा भाईंदर महानगरपालिकेने कमान उभारण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**प्रियांका करंबळे :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही हा विषय रद्द का करता? तुम्ही महापालिकेचे आर्थिक नुकसान का करता? तुम्ही महापालिकेचे आर्थिक नुकसान करण्यापेक्षा कमानी बांधायला ज्या परवानग्या दिलेल्या आहेत त्या रद्द करा. आपण हा विषय रद्द करून महापालिकेचे उत्पन्न वाढणार आहे का? त्याला दिलेल्या परवानग्या रद्द करून महापालिकेने कमान्या उभारण्यात असे म्हणा आणि महापालिकेच्या उत्पन्नात भर करावी? तुम्ही असे का बोलत नाहीत?

**मिलन पाटील :-**

आपल्याला कमानी उभारण्यासाठी बजेटमध्ये तरतुद नाही.

**रतन पाटील :-**

बजेट होईल तेव्हा होईल. तेव्हा आपण कमानी बांधुया आता तुम्हाला कमानीची काही आवश्यकता नाही.

**मिलन पाटील :-**

आता सध्या कमानीला कोण विचारतो?

**रतन पाटील :-**

तुम्ही आता मध्ये कोणाची दलाली करता? तुम्ही मध्ये बोलून दलाली करू नका. आपण विषय रद्द करायचा आणि त्याला दिलेल्या परवानग्या सुद्धा करायच्या. हा ठराव झालेला आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आपल्याकडे मिरा भाईंदर शहराच्या प्रवेशद्वारा संबंधिचा विषय सभागृहात उपस्थित केलेला आहे. या ठिकाणी सर्व पक्षाच्या नगरसेवकांनी आपले विचार अतिशय स्पष्टपणे मांडलेले आहेत. आपण सभागृहाचे लक्ष वेधून घेतले तर ह्या सभागृहाचे एस्सेल वर्ल्ड कंपनिला आपण जे प्रवेशद्वार दिलेले आहे ते काढून घेण्यासाठी सर्व सभागृहाची संमती मिळालेली आहे. हे प्रवेशद्वार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालकीचे व्हावे अशी सर्व सदस्यांची भावना आहे. आता जो आलेला विषय आहे तो तुम्ही रद्द करावा आणि पुढच्या महासभेत घ्यावा. एस्सेल वर्ल्डच्या ज्या चार कमान्या आहेत. आपल्याला प्रवेश करताना हेच वाटते की मिरा भाईंदर महानगरपालिकेचे एस्सेल वर्ल्ड आहे. आपल्याला श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांनी याचा चांगल्याप्रकारे खुलासा करून दिलेला आहे. मा. महापौर मॅडम, हा ठराव कोणत्या वर्षी आणि कशाप्रकारे संमत केलेला आहे? आणि त्याच्यामध्ये कशाप्रकारच्या सुचना आहेत? आपण त्याला किती वर्षाचा करारनामा केलेला आहे? अटीशर्ती कशा दिलेल्या आहेत? आपल्याकडून किंवा महासभेकडून नगरपालिकेचे सर्व अधिकारी ठराव मंजुर करून घेतात. आणि नंतर गैरफायद्याप्रमाणे ते त्या ठिकाणी परवानगी देतात. महानगरपालिकेच्या सभागृहात त्याचा खुलासा होत नसतो. आपण ही एस्सेल वर्ल्डसाठी जी कमान दिलेली आहे त्यामुळे आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे वर्षासाठी लाखो रूपयांचे नुकसान झालेले आहे. आज सदस्य जाउन या ठिकाणी बोर्ड लावतात. आम्ही स्वतः त्या ठिकाणच्या बोर्डचे पैसे भरतो. परंतु आपण एवढ्या मोठ्या कंपनिला आपला रस्तादेखिल फ्री दिलेला आहे. संपूर्ण एस्सेल वर्ल्डला जाणाऱ्या सगळ्या गाड्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रस्त्यावरून जातात आणि मिरा भाईंदर महानगरपालिका रस्त्यासाठी करोडो रूपये खर्च करते. आपण त्यांच्या सोयीसाठी रस्ते बनवलेले आहेत का? आपण आजदेखिल आपल्या उत्पन्नामध्ये वाढ होण्यासाठी एस्सेल वर्ल्ड टोल नाका बसवला तर या मिरा भाईंदर महानगरपालिकेला वर्षासाठी कमीत कमी करोडो रूपये मिळतील. आपण एक एक रूपया वाढवण्यासाठी प्रत्येक सदस्य मेहनत करतो. परंतु, आपण महत्वाच्या कामाकडे लक्ष देत नाही. मी सर्वांच्या भावना लक्षात घेउन या ठिकाणी ठराव मांडतो की हा विषय रद्द करावा. अन्यथा हा विषय महानगरपालिकेकडे आणावा. मा. महापौर मॅडम, आपण सदरची परवानगी एस्सेल वर्ल्डला किती वर्षासाठी दिलेली आहे.

**रतन पाटील :-**

आता परवानगी कशाला पाहिजे?

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहापूढे स्वागत कमान बांधण्याबाबत विषय आलेला आहे. याठिकाणी दोन मुद्दे उपस्थित होतात एक म्हणजे प्लॅन इंडियाने जी परवानगी दिलेली आहे. स्थायी समितीने त्यावेळेला सक्षम बॉडी नाही अशी परवानगी दिलेली आहे. श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांनी सभागृहात सांगितले की धोरणात्मक निर्णय असल्यामुळे वास्तविक ही बाब महासभेपुढे यायला पाहिजे होती. परंतु, त्याला तात्कालीन स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. वास्तविक ती ॲथेन्टीक बॉडी नाही. स्वागत कमान बांधण्याबाबत प्रस्ताव प्रशासनाने आणलेला आहे. त्याबाबतीत अंदाजपत्रकामध्ये कोणतीही प्रोव्हीजन नाही. त्यामुळे ह्यावर्षाच्या बजेटमध्ये कुठेही कमान बांधण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. आता एस्सेल वर्ल्डला जी कमान बांधायला परवानगी दिलेली आहे तो प्रश्न बाकी राहिला.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, सदरची परवानगी रद्द करा आणि महानगरपालिका म्हणजेच स्थायी समितीने मान्यता दिली असेल तर सभागृह त्यांना सर्व परवानग्या रद्द भरण्यासाठी याठिकाणी ही महासभा परवानगी देत आहे. जर आपल्याला ह्याच्यामध्ये महापालिकेचा निर्णय घ्यायचा असेल तर आपण करारनामा रद्द करू शकतो.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की आपण प्रशासनातर्फे गोषवारा दिलेला आहे. त्याच्यामध्ये स्पष्टपणे लिहलेले आहे की मे. पॅन इंडीया पर्यटन लिमिटेड यांना दिलेली परवानगी रद्द करावी लागेल त्यांनी परवानगी रद्द करण्यासाठी ठराव केलेला आहे. मग परवानगी रद्द करा.

**हॅरल बोर्जीस :-**

श्री. शशिकांत भोईर स्थायी समितीने दिलेली परवानगी ॲथेन्टीक होत नाही. महासभेने परवानगी दिली असती तर ॲथेन्टीक झाली असती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, बहूतेक सभागृहनेते विसरत आहेत. माझ्या माहितीप्रमाणे त्यावेळेला स्थायी समितीमध्ये त्या ठरावाला अनुमोदन किंवा सुचक म्हणून सभागृहनेते आहेत.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आता या ठिकाणी संपूर्ण चर्चा झालेली आहे. तुम्ही या ठिकाणी खुलासा करा. सदर जी कमानी दिलेली आहे तुम्ही त्याची परवानगी रद्द करणार का? सदरच्या ज्या कमानी दिलेल्या आहेत त्यासुद्धा रद्द झाल्या पाहिजेत. आपण सदर विषयाची सभागृहाला संपूर्ण माहिती द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, याठिकाणी ज्या पद्धतीने एस्सेल वर्ल्डने कमानी लावलेल्या आहेत. त्याचप्रमाणे आपल्या फ्लाय ओव्हर चढताना आणखी एक कमान दोन महिन्यापुर्वी बांधलेली आहे. आम्ही परवाना विभागाला विचारले तर आम्ही परवानगी दिलेली नाही असे त्यांनी सांगितले. तरी सुद्धा परवानगी चुकीची कमान आहे. तुम्ही तीसुद्धा परवानगी रद्दी करावी. ती कमान सुद्धा रद्द करावी.

**रक्षा शाह :-**

मा. महापौर मॅडम, मेडतीया नगरला जी कमान बांधलेली आहे त्या संदर्भात बोलत आहे.

**मा. महापौर सो. :-**

सन्मा. सभागृह, महासभेपुढे आलेला विषय आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये प्रवेशद्वारासमोर सुशोभित कमानी म्हणजेच प्रवेशद्वार उभे करण्यासाठी दि. २०/०९/०५ ठराव क्र. ४७ नुसार महासभेत सर्वांच्या मंजुरीने ठराव पारित करण्यात आलेला होता. ठाणे घोडबंदर रस्त्यावर स्वागत कमानी बांधणे दुसरी स्वागत कमान सर्व्हीस रोड महामार्ग ८ ब्रीज येथे स्वागत कमान बांधणे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मॅडम, इस ठराव का अनुमोदन और सुचक कौन है? यही भी बता दिजीए।

**मा. महापौर सो. :-**

तसेच, दहिसर चेक नाका येथे स्वागत कमान बांधणे अशा आपण तीन प्रकारच्या स्वागत कमानी बांधाव्यात म्हणून दि. २०/०९/२००५ रोजी ठराव पारित केलेला आहे. त्यामुळे महासभेमध्ये हा वेगळा ठराव पुन्हा आणण्याची गरज नाही. तरी महासभेने तीन स्वागत कमानी मंजुर करून दिलेल्या आहेत. जरी आपण बजेटमध्ये तरतुद केलेली नसली तरी आपला हा ठराव ऑलरेडी झालेला आहे. सन्मा. सभागृह चर्चा करित असताना पुढे विषय आलेला आहे की शिवाजी महाराज यांच्या मागे पॅन इंडीया पर्यटन लिमिटेड एस्सेल वर्ल्ड या स्वखर्चाने दिशादर्शक कमान बांधलेली आहे. या कमानी मधुन आपल्याला नाममात्र भाडे येते. मी अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यावर मला असे समजले की, फक्त रू. १००/- आपण त्या कमानीवर कमवतोय महानगरपालिकेच्या महासभेमध्ये सर्व सदस्यांनी चर्चा केल्याप्रमाणे डिजीटल बोर्ड बॅनर वगैरे लावतो तेव्हा विशिष्ट प्रकारचे भाडे आकारले जाते. बरेच सदस्य महानगरपालिकेला भाडे भरतात. ह्या विविध माध्यमातुन महानगरपालिकेचे इन्कम स्त्रोत वाढत असते. आपल्या सर्व सदस्यांनी त्यांच्या भावना सभागृहापुढे मांडलेल्या आहेत. आणि सर्वांनी इथे एका मंजुरीने खुलासा केलेला आहे की आपण एस्सेल वर्ल्डला ज्याठिकाणी कमानी

दिलेल्या आहेत. त्या रद्द कराव्यात सर्व सभागृहाचे मत लक्षात घेता पीठासिन अधिकारी म्हणून मी या ठिकाणी सर्व प्रशासन पदाधिकारी तसेच सन्मा. सदस्या शुभांगी नाईक व सन्मा. सदस्या प्रियांका करंबेळे ह्या सुचक व अनुमोदक होत्या. ह्यांनी सुद्धा ठराव मांडलेला आहे. त्याप्रकारे आपल्या महासभेत ठरल्याप्रमाणे पॅन इंडीया पर्यटन लिमिटेड एस्सेल वर्ल्डने बांधलेल्या सर्व कमानी रद्द करण्यात याव्यात आणि जेव्हा महानगरपालिकेला पैसा उपलब्ध होईल किंवा बी.ओ.टी. तत्वावर एखादी संस्था कमानी बांधण्यासाठी पुढे येईल आपण त्यावेळेला या सगळ्या कमानी बांधुन मिरा भाईंदर शहराचे सुशोभिकरण वाढवावे असा या सभागृहापुढे ठराव मांडलेला आहे. तो ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, तुमच्याकडून एक खुलासा बाकी राहिलेला आहे तुम्ही सदरच्या कमान्या केव्हा पर्यंत कॅन्सल करणार? तेवढीच सभागृहाला माहिती द्या.

**रक्षा शहा :-**

मा. महापौर मॅडम, मेडतीया नगरची कमान सुद्धा त्याच्यात घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी जी कमानीची सुचना मांडलेली होती. तुम्ही त्याचा काय निर्णय घेतला?

**मा. महापौर सो. :-**

सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील तुम्ही कमानीची जी सुचना दिलेली होती. ती कमान सौ. रक्षा शहा यांचीच कमान आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ती दुसरी कमान आहे आणि ती कमान आताच बांधलेली आहे.

**रक्षा शहा :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही कमानीचे नाव विचारून घ्या.

**मा. महापौर सो. :-**

प्रशासनाने ती कोणाची कमान बांधलेली आहे? आणि या कमानीला कुठल्याप्रकारे मंजुरी दिलेली आहे? याचा खुलासा करावा.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदर शहरामध्ये कुठलीही कमान उभी करताना कमीत कमी या सभागृहाची मंजुरी घेतली पाहिजे. आपण छोट्याशा बोर्डचे रू. ४००/- ते रू. ५००/- जे भाडे पंधरा दिवसासाठी घेतो. आपण कट-आउट लावताना नगरसेवक पंधरा दिवसांसाठी रू. २००/- ते रू. ३००/- भरतात. आपण त्यांना एवढ्या कमानी नाममात्र रू. १००/- दराप्रमाणे एक वर्षासाठी देतो. आपण नगरपालिकेचे करोडो रूपयांचे नुकसान करतो असे मला वाटते. ह्या कमानी केव्हा कॅन्सल होतील याची सभागृहाला माहिती द्या.

**आसिफ शेख :-**

सन्मा. पिठासिन अधिकारी आपले काशिमिरा रोडपासून भाईंदर पर्यंतचे जे प्रवेशद्वार आहे. त्याच्या मध्ये प्रत्येक स्टेजला कमानी आहेत. मग तुम्ही सगळ्या बाबतीत जो निर्णय घेणार आहात का? काय चाललेले आहे का?

**गिता जैन :-**

मॅडम, तुम्ही ठरावामध्ये फक्त एस्सेल वर्ल्ड असे लिहिलेले आहे.

**आसिफ शेख :-**

कथा कुणाची व्यथा कुणाला? असे चाललेले आहे. छत्रपती शिवाजी महाराज मार्गाकडून सुरूवात झालेली आहे. एस्सेल वर्ल्डने कमान बांधलेली आहे. मध्ये आले तर सिल्व्हर पार्ककडे कमान आलेली आहे. त्याच्यानंतर गोल्डन नेस्ट एस. के. स्टोन कडे सगळ्या कमानी आहेत. मग तुम्ही सगळ्या कमानींच्या बाबतीत हाच निर्णय घेणार आहात का? तुम्ही निर्णय घेताना विषय पत्रिकेवर काय विषय आहे? ते बघा.

**जेन्वी आल्मेडा :-**

तुम्ही फक्त ह्याच कमानी न काढता सगळ्या कमानी काढून घ्या.

**आसिफ शेख :-**

खरे म्हणजे हा विषय यायला नको होता. तुमची दिशा भुल करण्याचे काम चालू आहे. प्रशासनाच्या एका चुकीमुळे संपूर्ण सभागृहाचा एवढा वेळ वाया घालवायचा असे चाललेले आहे. तुम्हाला काही दुसरा कामधंदा नाही का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मी सांगितलेल्या गोष्टीचा खुलासा झालेला नाही.

**आसिफ शेख :-**

आम्हाला तो खुलासा पाहिजे तो सगळ्या बाबतीत करा.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा विषय यायला नको होता तरीसुद्धा तुम्ही हा विषय आणलेला आहे. दुसरी गोष्ट म्हणजे नगरसेवक पंधरा दिवसाचे व तीन चार बोर्डाचे रू. १५०/- भरतात तुम्ही ह्या कमानी फुकट देतात. मग हा कुठला न्याय आहे? याचा प्रथम खुलासा करा. नगरसेवकांनी पैसे का भरायचे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

स्थायी समितीने सभागृहामध्ये दिलेला निर्णय योग्य नाही. स्थायी समिती असा निर्णय घेउ शकत नाही. जर स्थायी समितीने निर्णय घेतला आणि ह्याच्यामधले कोणी कोर्टात गेले किंवा कोणी कोर्टात जनहित याचिका दाखल केली तर त्यावेळेला स्थायी समितीचे ते सर्व नगरसेवक जबाबदार राहतील आणि त्यांना ते पैसे वसुल करावे लागतील. हे लक्षात ठेवा. मी तुम्हाला हे सांगतो. त्यामुळे तुम्ही आता निर्णय घ्या शेवटी तुम्ही निर्णय घेतला नाही आणि प्रशासन नाईलाज आले तर आम्ही कोर्टात जाउ.

**हंसुकूमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, एक सालका रु. १००/- भाडा यह किसने मंजूरी दिया है? हमारे मिरा भाईंदर महानगरपालिकाने इतना बुद्धीमान इन्सान कौन है? बोर्डका पंधरा दिन का रु. १५०/- होते है और सालभर का रु. १००/- होते है। एस्सल वर्ल्डमें एक आदमी की एन्ट्री फी रु. ३५०/- है। व्हॅकेशन के टाईम में रु. ४००/- से रु. ४५०/-है। अंदर वॉटर किंगडम मे जायेंगे तो और भी ज्यादा पैसा है। उसका अलग रेट है। हम लोग सालका रु. १००/- लेते है लगाया है? यह मैं सुनना चाहता था। आप उस अधिकारीका नाम बताईये।

**शिवप्रकाश भुदेका :-**

अगर कोई अधिकारी नही रहेगा और सदस्य रहेगा तो उसका नाम बताईए।

**जयंत पाटील :-**

मिरा भाईंदरच्या लोकांसाठी एस्सेल वर्ल्डचा पास फ्री आहे का? तुम्ही रु. १००/- कोणत्या आधारे लावलेले आहेत?

**हंसुकूमार पांडे :-**

हम लोगोंको खुलासा चाहिये।

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, उसमे अधिकारी नही थे। सदस्य उनका नाम बताईये।

**हंसुकूमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, नगरसेवकोंने पंधरा दिनका रु. ५२५/- भरा है।

**शिवप्रकाश भुदेका :-**

दिनेश नलावडे बोलते है की रु. २००/- पंधरा दिनमें लगाते है। वह कहाँ भी सेटिंग करते है और अधिकारीयोंको रु. १५०/- देते है।

**हंसुकूमार पांडे :-**

इससे महानगरपालिकाकों काफी नुकसान होता है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, शंकर नारायण कॉलेज डोनेशन घेत नाही आणि लोकांना शिक्षण देते. तरी रु. ७५००/- भरायचे. शंकर नारायण कॉलेज जे या शहराला शिक्षण देते आपण अशा संस्थेकडून महिन्याचे रू. ७५००/- घेतो.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, आपकी परवानगीसे बोल रही हूँ की जो अधिकारी इस तरहका बना रहा है तो ऐसे अधिकारी मिरा भाईंदर में क्या कल्याण करेगा?जो मिरा भाईंदर का कुछ अच्छा नही सोच सकता, ऐसे अधिकारीको मिरा भाईंदर महानगरपालिकामे रहने की जरुरत नही है।

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, इसमें कोई सदस्य होगा तो उसका भी नाम बताईये। अभी आपको लगता है की श्री. हॅरल बोर्जीस या श्री. महेंद्रसिंग चौहाण है। अगर आपको ऐसा कोई सदस्य होगा तो उसका भी नाम बताईये।

**हंसुकूमार पांडे :-**

क्या मालूम श्री. शिवप्रकाश भुदेका भी होगे। वह सबका नाम लेते है तो वह कुछ कम नही है। जितने छोटे है उतने मोटे है।

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की आता हा जो एस्सल वर्ल्डला देण्यासाठी कमान बांधण्याचा ठराव झालेला आहे. आम्हाला या ठरावाची एक कॉपी मिळेल का? आपण आता जो प्रवेशव्दार एस्सल वर्ल्डला नाममात्र भाडयाने देण्यासाठी झालेला आहे. आम्हाला या ठरावाची स्थायी समितीची एक कॉपी मिळेल का? किंवा या ठरावाचे कॉपीचे सभागृहात वाचन करावे.

**सुर्यकांत भोईर :-**

सदर ठरावाचे वाचन व्हावे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

इस ठरावका अनुमोदन और सुचक है। तो आप सुचक को नही बता रहे है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

इस ठरावका सुचक सभागृहनेता है।

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावाच्या कॉपीचे सभागृहात वाचन करावे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

दुसरा कोई सुचक हेगा। सभागृह नेता यह सब काम करता ही है। मगर दुसरा सुचक होगा ना।

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आता जो विषय चाललेला आहे. त्याबाबत असा समज झालेला आहे की सदर ठराव स्थायी समितीमध्ये पारित झालेला आहे. परंतु, ठराव पारित झाल्यानंतर तो ठराव प्रशासनाने इम्प्लिमेंट करायला पाहिजे. मग प्रशासनाने एस्सेल वर्ल्डला लेखी परवानगी दिलेली आहे का? कारण आपण महासभेमध्ये सदर कमान आणि गेट वगैरे रद्द करण्याचा दुसरा ठराव मांडतो. तुम्ही दिलेली परवानगी घेउन तो कोर्टात जाउन स्टे आणणार. मग तुम्ही काय करणार? साहेब ही हसण्याची किंवा गंमत मस्ती करण्यासारखी गोष्ट नाही. आपण टेक्निकली आणि लिगली बघायचे. आपण रु. १००/- मध्ये कॅव्हेट फाईल करुन त्याची परवानगी रद्द करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. खांबित साहेब ठराव वाचा.

**दिपक खांबित :-**

हा ठराव स्थायी समिती सभा दि. २१/५/२००४ रोजी ठराव झालेला आहे. ठराव क्र. ९ आहे. सुचक श्री. आसिफ शेख आहेत.

**आसिफ शेख :-**

तुम्ही संपूर्ण ठराव वाचून दाखवा. आम्ही आमची जबाबदारी झुडकारत नाही. परंतु, ठराव काय झाला? त्या ठरावाचे वाचन करुन दाखवा. तुम्ही फक्त मुद्दयाचे बोलू नका.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही ठराव वाचून दाखवा.

**आसिफ शेख :-**

जे आहे ते स्पष्ट आणि पारदर्शक चालले पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, ठरावाचे वाचन करा.

**आसिफ शेख :-**

ठरावाचे वाचन करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. हरेश पाटील ठराव सर्वानुमते मंजूर आहे का?

**नगरसचिव :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजूर आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या ठरावामध्ये बी.जे.पी. चे किती सदस्य आहेत? म्हणजे भाजपाच्या सदस्यांनी सुद्धा अनुमोदन दिलेले आहे. हे लोक फेव्हरला होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही ठरावाचे वाचन केले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही ठरावाच्या फेव्हरला होते. तुम्ही ठरावाला विरोध केलेला नव्हता.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, श्री. ध्रुवकिशोर पाटीलको अक्कल नही है। हम लोगोंका हर ठरावमें विरोध रहना है। यह लोग बहूमत के आधारसे पास करते है और यह लोग सिर्फ संमती करने के लिए आते है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आप लोगोंने ठराव को मंजूरी दिया है। विरोध किधर किया है। आप लोगभी इसमें सामील है।

**शरद पाटील :-**

अगर हम लोगोंने ठराव को मंजूरी दिया होगा तो आप कोर्टमें जाईये।

**नगरसचिव :-**

(प्रकरण क्र. ७ च्या ठरावाचे वाचन केले.)

या ठरावाचे सुचक श्री. आसिफ शेख आहेत आणि अनुमोदक श्री. हॅरल बोर्जीस आहे. त्यावेळचे सभापती श्री. मॉरस रॉड्रिक्स आहेत.

**आसिफ शेख :-**

हम लोग यह बोल रहे है की हम लोगोंका कतनी करने मे फरक नही है। हम लोग जो करते है वह बोलते है। आपकी तरह नही है। आपको कतनी अलग है और करनी अलग है। हम लोग जो बोलते है वह आप शांतीसे सुनिए। आम्ही ठरावात महापालिकेने मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे असे म्हटलेले आहे आणि हा ठराव स्पष्ट व पारदर्शक आहे. तो एस्सल वर्ल्डचा नकाशा सदस्यांनी मंजूर केलेला नव्हता. तो नकाशा महापालिकेने मंजूर केलेला होता. जेव्हा हा विषय सुरुवातीला सभेमध्ये आलेला होता. तेव्हा त्यांनी परस्पर त्यांच्या मर्जीने कमान बांधलेली आहे असे सांगितलेले होते आणि महापालिकेने मंजूर करुन त्याच्याकडून बांधून घ्या. म्हणजे प्रशासन त्याची दिशाभूल करित आहे असे या सभागृहाने जिवंत चित्र आलेले आहे. अन्य ठिकाणी ज्या परवानग्या दयायच्या असतील तर त्या परवानग्या मा. आयुक्त यांच्या मंजूरीने तपासुन दयाव्यात आता त्या परवानग्या तपासण्याचे काम कोणाचे आहे?

**मिलन पाटील :-**

सचिव साहेब, हा ठराव सर्वांनुमते मंजूर झालेला आहे का?

**आसिफ शेख :-**

त्यावेळेला सभापती श्री. मॉरस रॉड्रिक्स होते आणि सदर ठराव सर्वानुमते मंजूर झालेला होता. आम्ही पहिल्या दिवसापासून सांगत आहोत की स्थायी समिती म्हणजे परफेक्टली अंडरस्टॅण्डींग कमिटी आहे. त्याच्यामध्ये हम सब भाई-भाई सब साथ मे चलते है। तब कुछभी नही होता है। तेव्हा एकही सदस्यचा विरोध नसतो. आपण आपल्या महापालिकेत एवढे चांगले काम करतो.

**मिलन पाटील :-**

त्यावेळेला श्री. शरद पाटील सुद्धा होते.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या शहरामध्ये नाममात्र रु. १००/- भाडे कुठे नमुद केलेले आहे? आपण रु. १००/- नाममात्र भाडयाने कमान देउ असे नमुद केलेले नाही. आपण एस्सल वर्ल्डला ॲडव्हरटाईजचे बोर्ड दिले. त्याच्यानंतर त्याला किती भाडे आकारायचे? त्याची महासभा व स्थायी समितीची मंजूरी दिलेली आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, जो ठराव केलेला आहे. त्याच्यामध्ये पालिकेचे कोणत्याही प्रकारचे आर्थिक नुकसान केलेले नाही. त्याचे पत्र तयार केले जात असेल ना.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, त्यावेळेला तो ठराव दोन दोन सदस्यांनी वाचून दाखवलेला होता आणि बी.जे.पी, शिवसेना व राष्ट्रवादीचे सदस्य उपस्थित होते.

**शरद पाटील :-**

त्यावेळेला सभागृहात एवढी घाई चालली होती की कॉंग्रेसवाल्यांनी अनुमोदनाची वाट बघितलेली नव्हती. त्यांनी त्यावेळेला सुचक आणि अनुमोदन देउन टाकले.

**मिलन पाटील :-**

तुम्ही तो ठराव मागवा आणि त्या ठरावामध्ये कोण कोण सदस्य होते ते वाचून दाखवा म्हणजे दूध का दुध आणि पानी का पानी होउन जाईल. कारण एक बी.जे.पी. यांचासुद्धा एक वाटा होता.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण आता जे लिहून दिले की सदरची कमान ही रु. १००/- वार्षिक भाडयाने दिलेली होती. मग सदरच्या ठरावामध्ये नाममात्र भाडयाने कमान दिलेली आहे असा कुठेही उल्लेख केलेला नाही.

**रतन पाटील :-**

त्यावेळेला विधी सल्लागार होते. त्यांना कोणी विचारलेले नव्हते. आम्हाला तुमची ठराव मांडण्याची पद्धत माहिती आहे. आम्ही तुम्हाला विचारलेले नाही. सुचक आणि अनुमोदन दयायचे ही तुमची पद्धत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

जर आता आपल्या महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले असेल तर आपल्याला ते नुकसान कोण भरुन देणार?

**शिवप्रकाश भुदेका :-**

इधर पाच सालमें कौन है?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण जे रु. १००/- भाडे ठरवलेले होते त्याचे ते आर्थिक नुकसान झालेले आहे ते कोण भरुन देणार?

**आसिफ शेख :-**

सन्मा. पिठासिन अधिकारी जो ठराव झालेला आहे तो स्वयंस्पष्ट ठराव आहे. मी तुम्हाला पहिल्या दिवसापासून आमचा अत्यंत कारभार पारदर्शक आहे असे सांगत आहे. महापालिकेच्या एकाही पैशाचे नुकसान इतर सन्मा. सदस्य किंवा आम्ही केलेले नाही. या सभागृहात जेवढे सदस्य आहे त्यापैकी कोणीही महापालिकेचे आर्थिक नुकसान करु इच्छित नाहीत. जर महापालिकेचे कोणीही आर्थिक नुकसान केले असेल तर त्याच्यावर कडक कायदेशीर कार्यवाही करायला पाहिजे. हा ठराव पारदर्शक आहे. ह्या ठरावामध्ये कमान रु. १/- नाममात्र भाडयाने दयावी असे म्हटलेले नाही. मग ही पछाट बुद्धी कोणाला सुचली?

**जयंत पाटील :-**

कमान नाममात्र भाडयाने देण्याचे कोणी ठरवले?

**आसिफ शेख :-**

मा. आयुक्त साहेब, ग्रामपंचायत स्थापन झाल्यानंतर नगरपालिका होती. आता नगरपालिकेची महानगरपालिका झालेली आहे. जर आपण या ठिकाणी चांगला अभ्यास केला तर आपण पि.एच.डी घेउ शकतो. आपल्या मिरा भाईंदरमध्यश् एवढे चांगले शिकण्यासारखे आहे. स्थायी समितीमध्ये जे काही घडते ते अंडरस्टॅण्डींग आहे. तिथे कोणाचाही विरोध नसतो. स्टॅण्डींग कमिटीमध्ये सगळे एकत्र असतात. परंतु, जेव्हा महासभेमध्ये विषय येतो तेव्हा मी नाही त्यातली कडी लावा आतली असा प्रकार असतो. या ठरावाप्रमाणे आमचे सर्व काही व्यवस्थित क्लिअर कट आहे. आम्ही या ठरावाला ॲटॅच आहोत. ह्या कमानी नाममात्र भाडयाने कोणी दिलेल्या आहेत? महापालिकेचे आर्थिक नुकसान कोणी केलेले आहे? त्याची चौकशी करावी. तुमच्या ज्या भावना आहेत. आम्ही त्याच सांगत आहोत.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम्, आपण ठराव वाचलेला आहे. तुम्ही त्या ठरावातील दोन गोष्टींचा उल्लेख बघितला तर तुम्हाला असे लक्षात येईल की ठाणे महापालिकेने जसा प्रवेशव्दार बनवलेला आहे तसा हा प्रवेशव्दार बनलेला आहे का? म्हणजे ठरावाप्रमाणे व्हायला पाहिजे तसे झालेले नाही आणि अटीशर्तीचे उल्लंघन झालेले आहे. जर आपण ठाणे महानगरपालिकेचा गेट बघितला तर तुम्हाला असे आढळून येईल की, त्या गेटवर ठळक अक्षरामध्ये ठाणे महानगरपालिका हे शब्द आहेत. इकडे कुठे महानगरपालिका असा शब्द दिसत नाही. तो शब्द कुठेतरी कोपऱ्यात असेल. म्हणजे ठळक अक्षरामध्ये आपले नांव असायला पाहिजे ते तिथे नाही. जर आपल्या अटीशर्तीच्या तिथे उल्लेख झाला असेल तर आपल्याला त्यांचे प्रवेशव्दार काढायला कुठलीही हरकत येणार नाही हे माझे प्रामाणिक मत आहे. आपल अटीशर्तीचा उल्लेख केलेला आहे. एकतर ठाणे महानगरपालिके प्रमाणे प्रवेशव्दार केलेले नाही हा त्यांनी केलेला गुन्हा आहे. काही भागातच जाहिरात करणार असे त्याच्यामध्ये आहे. त्यांनी काही भागात जाहिराती कराव्यात अशा प्रकारचा ठराव आहे. परंतु, त्यांनी संपूर्ण भागात जाहिराती केलेल्या आहेत. त्यांनी त्यांची स्वतःची जाहिरात केलेली आहे. काही भागात आपले नांव टाकलेले आहे. परंतु, बहूतांशी जागेमध्ये स्वतःची जाहिरात केलेली आहे. जर ह्या अटीशर्तीचे उल्लंघन होत असेल तर आपल्याला कुठलीही प्रवेशव्दार काढण्यासाठी अडचण येणार नाही. आपल्या ठरावामध्ये अटीशर्ती दिलेल्या आहेत. तुम्हाला वाटल्यास इकडे विधी अधिकारी उपस्थित आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. पिठासिन अधिकारी मघाशी काही सदस्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की आपण एस्सेल वर्ल्डला कमानी लावण्याची परवानगी काढून घेतली. जर कमानी काढल्या तर एस्सेल वर्ल्डला कोर्टात जाईल. आणि स्टे घेईल. आपण जर हा ठराव पाहिला तर ह्या ठरावामध्ये असा स्पष्टपणे उल्लेख आहे की कमानी उभाराव्यात. इतर ठिकाणी त्याच्या ज्या कमानी आहेत. त्या ठिकाणी दिशादर्शक कमानी आहेत ही जी कमान आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या मागे आहे. त्याच्यामध्ये फक्त एस्सेल वर्ल्डच्या ॲडव्हरटाईजमेंट आहेत. त्यामुळे ही कमान म्हणून समजता येत नाही. त्या एस्सेल वर्ल्डवाल्यांचा ॲडव्हरटाईजमेंटचे बोर्ड म्हणून समजले जाईल. तेव्हा या मुद्दयावर यांची ह्या कमानीबाबतची परवानगी नामंजूर करुन तुम्हांला ॲडव्हरटाईजमेंटचा टॅक्स का लावण्यात येउ नये अशाप्रकारची नोटिस प्रशासनाने बजावावी. जर तुम्ही नगरपालिका किंवा महापालिकेचा टॅक्स ठरवला आणि भरला नाही तर ॲडव्हरटाईजमेंट काढण्यात येईल ह्या ॲडव्हरटाईजमेंटचा टॅक्स किंवा थकबाकी असेल तर ती तुमच्याकडून वसूली केली जाईल. अशा प्रकारचा अर्थ होतो. म्हणून आपण ठरावानुसार या कमानी रद्द केल्या तर एक कमान ही कमान नसून दिशादर्शक कमान असून ॲडव्हरटाईजमेंट आहे. आपल्याला ती कमान रद्द करता येईल. बाकीच्या कमानी रद्द करायची गरज नाही. कारण त्याच्यावर अशा प्रकारची काही ॲडव्हरटाईजमेंट नाही. त्यामुळे तुम्ही ठरावात अशाप्रकारची दुरुस्ती करावी अशी मी सुचना मांडतो.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी जो ठराव सुचवलेला आहे. त्याला माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

ह्या विषयात एक क्लिअर होते की मघाशी उगाचच कोणालातरी बाहूमध्ये बळ आल्यासारखे बोलत होते. श्री. मिलन पाटील हे जेव्हा समोर दाखवायच्या तेव्हा जोर दाखवत नाही आणि कुठेतरी भलत्याच ठिकाणी जोर लावत बसतात. आता सभागृहात कुठला विषय आहे? कोण भांडते? सन्मा. सदस्य आसिफ शेख शिकलेले आहेत. परंतु, तेसुद्धा भरकटलेले आहेत.

**आसिफ शेख :-**

भरकटलेल्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तुम्हीच बोलले की स्टॅण्डींग कमिटीमध्ये ते कसे आले ते मला माहिती नाही. तुम्ही जबाबदारीने इथे असे बोलणार की स्टॅण्डींग कमिटीमध्ये कसे असे? आम्हाला माहिती नाही म्हणून मी मागच्या वेळेला बोललो की स्टॅण्डींग कमिटीमध्ये सगळे अंडरस्टॅण्डींग असते. सगळे एक असतात. परंतु, महासभेत वेगळी भुमिका दिसते. आम्ही शिकलेले, सवरलेले आहेत. ते आम्ही बरोबर आमच्या सद्‌सदविवेक बुद्धीला जे पटते आम्ही तेच करतो. आम्ही आमच्या भुमिकेशी ठाम आहेत. आपला ठराव स्वतंत्र आहे. आमच्या ठरावात कुठेही कमतरता नाही.

**रोहिदास पाटील :-**

आम्हांला आपल्या सद्‌सदविवेक बुद्धीबद्दल शंका घेण्याचे काहीही कारण नाही.

**आसिफ शेख :-**

तुम्ही शंका घेता म्हणून आम्ही बोलतो. तुमच्यासारखे संमंजस स्टॅण्डींग कमिटीमध्ये असून जर असा प्रकार होत आहेत तर त्यासारखे दुदैव नाही. स्टॅण्डींग कमिटीमध्ये विरोधी पक्ष दिसतात ना.

**रोहिदास पाटील :-**

असे होत की कधी कधी आपल्यावर उगीचच संशय येतो.

**आसिफ शेख :-**

विरोधी पक्ष दिसायला पाहिजे जर दिसले असते तर या ठिकाणी असे प्रकार आले नसते.

**रोहिदास पाटील :-**

आमचे असे म्हणणे आहे की स्टॅण्डींगमध्ये विरोधी पक्ष निटनेटका दिसतो. परंतु, बघण्यासारखी दृष्ये पाहिजे. आता तुम्हाला सगळे पिवळे दिसायला लागले तर आम्ही काय करणार? तो विषय नको आहे आपण असे म्हणूया की, हा जो पहिल्यांदा ठराव आलेला आहे की जिथे प्रवेशव्दार बनवायचे आहे त्यातील एक नक्की व्हायला पाहिजे की तिथे प्रवेशव्दाराची आवश्यकता नाही. एक जी कमान आहे. तिच पॅन इंडिया किंवा एस्सेल वर्ल्ड स्वतःसाठी वापरते. ती काढायची असेल तर तसे करा. तो प्रवेशव्दार काढण्यासाठी करावा. अन्य कसे आहे की त्यांची कोणाचीही उत्तरे नाहीत. याच्या अटीशर्ती नाहीत. महापालिकेची धोरणात्मक निर्णयाबाबत प्रशासनाकडून कोणतेही धोरण नाही की ह्याला किती वर्षासाठी परवानगी दिलेली आहे? किती भाडे दिलेले आहे? हे ज्यावेळेला स्टॅण्डींग कमिटी किंवा महासभेत येते वेळी गोषवारा पक्का आला असता तर हा विषय आला नसता. विषय येतेवेळी सत्ताधारी पक्ष घाई घाईत आणतात. आणि मग ते ऐकून घेतलेले आहे असे बोलले की ह्यांना ते झोंबते आणि झोंबून घ्यायचे कारण नाही.

**आसिफ शेख :-**

तुम्ही या ठिकाणी झोंबाझोंबीचा प्रकार करता. या ठिकाणी झोंबाझोंबीचा प्रकार करता. याठिकाणी झोंबाझोंबीचा प्रकार झालेला नाही. आम्ही जे बोलतो ते व्यवस्थित बोलता. श्री. रोहिदास पाटील साहेब, तुम्ही असे करु नका.

**रोहिदास पाटील :-**

नशीब की ते तुमचे नांव निघाले.

**आसिफ शेख :-**

आमचे नांव निघाले. परंतु, आमचे नांव चांगल्या गोष्टींसाठी असते. आमचे वाईट गोष्टींसाठी एकही नांव नाही. तुम्ही व्यवस्थित बघा. सगळे ठराव तपासून बघा. आम्ही ज्या ज्या भुमिका स्टॅण्डींगचे सदस्य म्हणून काम केले. एकही वाईट काम केलेले नाही. प्रभाग अध्यक्ष म्हणून काम केले एकही वाईट काम केलेले नाही. महापालिकेच्या सगळ्या आर्थिक उत्पन्नात कशी वाढ होईल? अधिकार कसे मिळतील? याबद्दल आम्ही प्रामाणिक प्रयत्न केलेले आहेत. आम्ही झोंबाझोंबीचा प्रकार अजिबात केलेले नाही.

**रोहिदास पाटील :-**

ह्याच्यामध्ये अनुमोदनसुद्धा राष्ट्रवादीकडून आहे. कॉंग्रेस वाल्यांकडून नाही. तुम्हाला एवढी घाई होती की कॉंग्रेसचे सदस्य असतानासुद्धा तुम्ही त्यांचे अनुमोदन म्हणून नांव घेतलेले नाही हे दिसून येते. आता विषय वाढवायचा असेल तर. संध्याकाळी ७.०० वाजेपर्यंत सभा चालू नसेल तर तुम्ही नक्की निवेदन करा आणि हा विषय संपवा. आपण काय शिकतो? कुठे शिकतो? कुठंपर्यंत चाललेले आहे? एकतर नक्की आहे की प्रशासनाने हा विषय आता आणतेवेळी नव्या विषयाची कुठलीही टिपणी नाही. नव्या विषयाबाबत हेतू नाही. जे प्रिन्सिपल आहेत ते नक्की नाहीत. ह्याच्यामध्ये तुमच्या हातामध्ये कुठलेही कागदपत्र नाही तुम्ही केलेल्या ठरावाची प्रत नाही. तुम्ही नाममात्र भाडे लावले तुम्हाला कोणी अधिकार दिले? ते तुम्ही सांगू शकत नाही. किती वेळ ही चर्चा करायची? मॅडम, आज तुम्हाला काहीही टेंन्शन नाही. तुम्ही उगीचच कशासाठी वेळ

काढता. ते मला समजत नाही. आज सगळे सभागृह बरोबर आहे. तुम्ही सांगा की हे आपल्या खर्चाने किंवा कोणाच्या खर्चाने नवीन प्रवेशव्दार बनणार नाही. हे रुलिंग व्हायला पाहिजे. दुसऱ्या खर्चाने एस्सल वर्ल्डचा छत्रपती महाराज पुतळ्यासमोर असलेले एक काढायचे आहे की सगळे काढायचे ते घ्या. नाहीतर विषय पेन्डींग ठेवा. जसे सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी सांगितले की कायदेशीर बाब काय ती सल्लामसलत करा आणि पुढच्या मिटींगमध्ये आणा. एवढा घाईचा कुठलाही विषय नाही. ह्या एका विषयावर दिड तास सभा चालली.

**प्रभात पाटील :-**

आपण हा विषय पुढच्या सभेत आणणार असाल तर मी मघाशी जे वाचले त्याला कविता नक्कीच म्हणणार नाही. परंतु, माझे जे काही शब्दप्रयोग होते. मला त्याबाबत असे वाटते की मी मा. महापौर आणि मा. आयुक्तांना देउन ठेवेन. म्हणजे ज्यावेळेला तुमचे प्रवेशव्दार लागेल. त्यावेळेला त्याच्यावर कार्यवाही झालेली असेल. मी तुम्हाला ते फेरमध्ये देईन? तुम्ही ते आपल्यासमोर नक्कीच ठेवा.

**हंसुकूमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, इसमें विधी अधिकारीका क्या मत है यह पुछिये।

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब प्रशासनाकडे कोणतेही कागदपत्रं नाही. पिठासिन अधिकारी त्याच्यावर कुठलाही निर्णय घेउ शकत नाही. मग काहीतरी मधला मार्ग काढा मला पाहिजे की नको. तुम्ही सांगा की उप महापौर तब्येतीची काळजी घ्यायला उपस्थित नाहीत.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. आयुक्त महोदय, जब यह ठराव पास हुआ तब प्रशासनको पुरी जिम्मेदारी प्रशासनको दी की आयुक्त महोदय इसको चेक करके अपना नुकसान न हो इस तरह का किया। लेकिन रु. १००/- की बात यहाँपर कहाँसे आ गयी। इससे नगरपालिकाको आर्थिक नुकसान कितना हुआ? यह ठराव किसीको भी पता नही है की रु. १००/- नाममात्र के दर पर यह ठराव पास किया गया। यह रु. १००/- नाममात्र कहाँसे आया? कृपया इसका खुलासा किजिये।

**हंसुकूमार पांडे :-**

जो नुकसान अधिकारी ने किया है वह नुकसान अधिकारीयोसे भरवाया जाय। हमारे पास विधी अधिकारी है तो उनसे यह राय लिजिये। उसके बारेमें विधी सल्लागार की राय ली जाए।

**शिवप्रकाश भुदेका :-**

सभापती की टिपणी जैसी आयेगी वैसे करनेका। उनको इसकी नोटिस मालूम नही और कमानीका स्वागत श्री. महेंद्रसिंग चौहाणजीने जोरजोरसे किया था।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

इसमें स्वागत की बात नही है। आप कमसे कम अपने दिमाग को खोलिये। मैं यह बोल रहा हूँ की उस टाईम बीजेपी वाले की साथमें थे। उनका क्या है? आपकी नगरपालिका क्या नुकसान हुआ? यह रु. १००/- नाममात्र भाडेसे लिया यह नुकसान हुआ है।

**प्रेमनाथ पाटील :-**

वह अधिकारी कौन है?

**शिवप्रकाश भुदेका :-**

श्री. चौहाणसाहब शहरका सब नुकसान आपके कारणही होता है। आप कैसा ठराव रखते है? वह पुरे शहरको मालूम है। आप बहूमत के आधार पर हिटलर शाही जैसा ठराव रखते है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

यह ठराव सर्व संमतीसे पास हुआ है। इसमें आपकी कमी नही है। यह मैं बता रहा हूँ। मैं क्या बोल रहा हूँ? यह आप समझिये। मैं आपको यह पुछ रहा हूँ की प्रशासनसे रु. १००/- नाममात्र लिखनेको क्या जरुरत थी?

**रक्षा शाह :-**

वह बादमें किसने लिखा?

**शिवप्रकाश भुदेका :-**

आपके ठरावमें के सुचक और अनुमोदन कौन है? यह हमें समझा नही रहे है।

**धनराज अग्रवाल :-**

ठरावमें रु. १००/- नाममात्र नही लिखा था।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

लिखा है।

**धनराज अग्रवाल :-**

किसने लिया है? यह मालूम नही है।

**शिवप्रकाश भुदेका :-**

श्री. चौहाण साहब आप सुननेका तैयार नही है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

वह शासनने लिखा है।

**शिवप्रकाश भुदेका :-**

आपके जो सुचक और अनुमोदन के दो सदस्य बिछेड हूए बचे हूए है। आप उनको बोलनेका तैयार नही है। आप हमारी बात समझनेकी कोशिश करे।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आप इनके साथ केबिनमे बैठके चाय पिते होंगे।

**शिवप्रकाश भुदेका :-**

मैं किसके पास केबिनमें चाय नही पिता हूँ।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

फिर यह रु. १००/- बाहरसे निकले है क्या?

**दिपक खांबित :-**

एक महिन्याची आगाउ नोटिस देण्याची तरतुद आहे.

**प्रभात पाटील :-**

हा सब्जेक्ट आयुक्तांकडे आहे. उनके पास जवाब माँगीये। श्री. चौहाणसाहबसे झगडा करने का टाईम निकल जायेगा।

**दिपक खांबित :-**

मॅडम, एक महिन्याची नोटिस देउन रद्द करण्याची तरतुद करार नाम्यामध्ये आहे.

**प्रभात पाटील :-**

बिल्कुल नही मेरे कविता मे काफी दम था, जो आप में नही है।

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब आमची एवढीच विनंती आहे की, कायदयाची काय तरतुद आहे? ती समजली पाहिजे. त्वरित करायचे असेल तर तो प्रशासनाचा अधिकार आहे. महासभेचा ठराव आहे असे सांगून नका. जर तुमच्या अधिकारात असेल तर ते एक महिना रद्द करता येईल. जर तुम्हाला आज रद्द करता येईल. जर तुम्हाला आज रद्द करायचे असेल तर आज रद्द करा. परंतु, ते महासभेने रद्द केले असे होणार नाही.

**दिपक खांबित :-**

एक महिन्याची नोटिस देउन रद्द करता येते.

**रोहिदास पाटील :-**

एकतर तुम्हाला जे ज्ञान आहे ते आम्हांला सांगत नाही. उशिरा सांगतात. आमचे असे म्हणणे आहे की आतासुद्धा हे प्रशासनाचे अधिकार आहेत असे मी समजतो. त्यांनी केलेली चुक त्यांना सुधारु दे. त्यांनी नाममात्र भाडे लावलेले आहे. जर आता ते कॅन्सल करायचे असेल तर त्यांनीच कोर्टात जायचे. त्यांनीच कोर्टात उत्तर दयायचे. त्याला सभागृह बांधील राहणार नाही. सभागृहाने स्पष्ट दिलेले होते. मग तुम्ही आमचा वेळ का घेता? ह्या ठिकाणी एक महिन्याची तरतुद आहे. तर एक महिन्याने दया. जर आता बुलडोझर पाठवण्याची तरतुद असेल तर आता बुलडोझर पाठवा आणि करुन टाका. एक महिन्याने सांगा. जर एक महिन्याने तरतुद दयायची असेल तर एक महिन्याने तरतुद दया आणि निर्णय सभागृहाने जे अधिकारी दिलेले नाहीत. तुम्ही ते अधिकार आमच्या माथी कसे मारता?

**आसिफ शेख :-**

आम्ही तो ठराव केलेला आहे.

**जयंत पाटील :-**

माझा तो प्रश्न नाही. माझा असा प्रश्न आहे की, रु. १००/- नाममात्र भाडे कोणी ठरवले? हा महत्त्वाचा मुद्दा आहे.

**आसिफ शेख :-**

या ठिकाणी महापालिकेचे आर्थिक नुकसान कशामुळे झाले? हा महत्त्वाचा मुद्दा आहे. आता सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील बोलले की तुम्ही पैसे वसूल करा. माझे या ठिकाणी असे म्हणणे आहे की मागच्या ज्या दिवसापासून ठराव झालेला आहे ते संपूर्ण पैसे वसूल करा. यासाठी जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावर कार्यवाही करा.

**जयंत पाटील :-**

एखादा ठराव झाल्यानंतर तो राईटिंगमध्ये आहे तसा असतो. त्याच्यामध्ये बदल कसा केला जातो? ठरावामध्ये बदल कसा होतो? रु. १००/- नाममात्र भाडे ठरवण्याचा निर्णय कोणी घेतलेला होता?

**आसिफ शेख :-**

या ठरावाची एक मोठी चार्टशिट तयार होईल. तुम्ही या ठरावाबाबत चौकशी लागलेली आहे की नाही. आम्ही सुचक आणि अनुमोदन दोन्ही मागणी करतो. सभागृहनेते मागणी करतात. मी स्वतः मागणी करतो. आम्ही दोघे मागणी करतो की चौकशी लावा. जो जबाबदार आहे त्याला चौकशी लावा. कारण तोही महापालिकेचा आहे.

**रोहिदास पाटील :-**

श्री. आसिफ शेख मी तुम्हाला एक धन्यवाद देतो की तुमची सही नाही असे तुम्ही दोघे बोलत नाहीत.

**आसिफ शेख :-**

आम्ही खोटे बोलणार नाही. आम्ही असे बोलणार नाही. आम्ही सहीचा प्रकार करणार नाही. माझी ओरिजनल सही आहे. ती डयुप्लीकेट सही नाही. आम्ही जे केले त्याला बांधील आहोत. आम्ही माघार घेत नाही. आम्ही दोघे चौकशीची मागणी करतो. मा. आयुक्त हा खुप मोठा प्रकार आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही आता जाहिरात कराच्या अधिकाऱ्याला बोलवा. मार्केटमध्ये जो रेट आहे ते अधिकारी त्या रेटप्रमाणे रु. १००/- दिले असतील तर आपण त्यांच्याकडे चौकशी करुन त्याच्याकडून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, रु. १००/- मध्ये कमान दयायला हे स्वतःला सत्ताधारी समजतात का?

**आसिफ शेख :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवालजी आपको ठराव दिखाई देता नही। आप ठराव बराबर पढिये।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाममात्र क्या होता है?

**आसिफ शेख :-**

आप ठराव देखिये। ठराव ऐसे कुछभी नही है।

**मा. आयुक्त सो. :-**

सन्मा. सभागृहामध्ये मघापासून ती चर्चा चालू आहे. मी त्या चर्चेच्या अनुषंगाने खुलासा करण्यासाठी उभा आहे. ह्या विषयाच्या अनुषंगाने सभागृहामध्ये जी चर्चा सुरु आहे. बऱ्याच ठिकाणी कमानी उभ्या केलेल्या आहेत. किंवा उभ्या केलेल्या नाहीत महापालिकेला कमानीचे भाडे मिळते किंवा मिळत नाही. अशा प्रकारे या ठिकाणी बरीच चर्चा तासाभरापासून सभागृहात सुरु आहे. त्याप्रमाणे पॅन इंडियाला जी परवानगी दिलेली आहे. किंवा पॅन इंडियाने जी काही कमानीची उभारणी केलेली आहे. त्या कमानीच्या उभारणीपोटी महापालिकेला नाममात्र रु. १००/- भाडे घ्यावे असे स्थायी समितीच्या ठरावामध्ये नमुद केलेले नव्हते. किंवा महापलिकेने असे निर्देश दिलेले नव्हते परंतु, पॅन इंडियाच्या संदर्भात जो करारनामा केलेला आहे की, शेवटी एक अशी अट टाकलेली आहे की, सदर कमानीचे भाडे हे नाममात्र रु. १००/- घ्यावे. कारण अशाप्रकारे स्थायी समितीने निर्देश दिलेले नव्हते. महासभेने निर्देश दिलेले नाहीत. या संदर्भात जे काही करारनामे दिलेले आहेत. त्या करारनाम्यामध्ये ज्या काही अटीशर्ती आहेत. त्या अटीशर्तीच्या अनुंषगाने आपण ज्यांना आपण परवानगी दिलेली आहे त्यांना आपण एक महिन्याची नोटीस देवून दिलेली परवानगी रद्द करु शकतो अशा प्रकारे करारनाम्यामध्ये अट आहे. आपल्याला ह्या अनुषंगाने जे काही नाममात्र भाडे लावलेले आहे. मी त्या भाड्यापोटी फक्त सभागृहात एवढे आश्वासन देउ इच्छितो की जे नाममात्र रु. १००/- भाडे लावलेले आहे ते भाडे इतर ज्यांनी ज्यांनी कमानी उभ्या केलेल्या आहेत त्याच्यावरती महापालिकेने किती प्रकारची आकारणी केलेली आहे किंवा कुठल्या दराने आकारणी केलेली आहे. आपण त्यांना त्या दराप्रमाणे आतापर्यंत जे काही बिल असेल ते त्यांना पाठवण्याची व्यवस्था करु. दुसरा मुद्दा असा आहे की जो विषय आपल्या सभागृहामध्ये आहे. आपल्याला तहकुब सभेमध्ये जो निर्णय घ्यायचा आहे. तहकुब सभेतध्ये जो विषय असेल त्याच्यावर आपण निर्णय घेणे कायद्याप्रमाणे आवश्यक आहे. मी आपल्या सभागृहाला विनंती करेन की, छत्रपती शिवाजी महाराज नाक्यावर काशिमीरा नाक्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या मागे स्वागत कमान बांधणे बाबत विचार विनीमय करुन निर्णय घ्यायचा आहे. आपण याबाबत निर्णय घ्यावा. त्याप्रमाणे या ठिकाणी मघासपासु जी चर्चा सुरु आहे. त्या संदर्भात मी सभागृहाला निवेदन करु इच्छितो की, मिरा भाईंदर शहर हे झपाट्याने वाढ होत आहे. त्या अनुंषगाने जो जाहिरातीच्या बाबतीमध्ये आपल्या शहरामध्ये एक नियोजनबध्द असा कार्यक्रम करणे आवश्यक आहे. त्यासाठी जे कोणी चांगले कन्सल्टन्ट असतील आपण त्यांच्याशी संपर्क साधु आणि त्यांच्याकडुन अशाप्रकारच्या प्रस्ताव आणुन आपण महासभेत त्यासंदर्भांत चर्चा करु जेणेकरुन जाहिरातीचा जो कायदा आहे किंवा शहरामध्ये जे नियोजन बध्द पध्दतीने जाहिरातीकरण होणे आपेक्षित आहे. आपण त्याच्यावर ह्या बाबतीमध्ये विचार विनिमय करु. मी सभागृहाला विनंती करेन की, तहकुब सभेमध्ये जो विषय आहे. त्या विषयावर आपण निर्णय घ्यावा. आणि या बाबतीमध्ये स्वागत कमान करायची किंवा नाही आपण या बाबतीमध्ये निर्णय घ्यावा. त्याप्रमाणे प्रशासन त्याची अंमलबजावणी करेल.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, प्रशासनाच्यावतीने आयुक्त साहेबांनी निवेदन केले. आम्हाला तहकुब सभा आहे. हे माहिती आहे. तहकुब विषय घ्यायला पाहिजे होते. परंतु मा. स्थायी समितीला अधिकार नसतांना स्थायी समितीमध्ये ठराव करुन. प्रशासनाने करारनामा केला तर नाममात्र भाड्याने म्हणजे मा. स्थायी समितीची सुध्दा दिशाभुल केलेली आहे. महासभेची सुध्दा दिशाभुल केलेली आहे. कारण हा धोरणात्मक निर्णय आहे. धोरणात्मक निर्णय महासभेत घेणे गरजेचे होते. ते झालेले नाही. म्हणजे जो विषय प्रशासनाने स्थायी समितीला दिलेला होता. तो विषय चुकीचा असतांनासुध्दा स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. ती मंजुरी देतांना त्यांनी त्याच्यामध्ये नमुद केलेले आहे की, डिझाईन असेल तर ती महापलिका म्हणजे महासभा त्यांनी डिझाईन केली पाहिजे. त्यांनी मंजुरी दिली पाहिजे तसे केलेले नाही. हा विषय पुन्हा त्याच्यावर येतो. साहेब, आपण निवेदन करतांना साहेब आम्हाला पण माहिती आहे की, ही सभा तहकुब सभा आहे. आपण गोषवाऱ्यामध्ये स्प्ष्टपणे लिहिलेले आहे की, त्यांची परवानगी रद्द करावी लागेल मग तुम्ही हा शब्द कसा टाकत नाही. तुम्ही हा शब्द टाकायला पाहिले होता तुम्ही गोषवारा लिहिलेला आहे. त्याच्यावर म्हणजे हे चुकीचे होते. ते तुम्ही सुधारायला पाहिजे धोरणात्मक निर्णय घेणे हा महासभेचा अधिकार आहे. हा चुकीचा निर्णय झाल्यामुळे हा रद्द करण्यांत यावा असा निर्देश द्यायला पाहिजे होता.

**मा. आयुक्त :-**

मी मघाशी निवेदन केले. मी निवेदनामध्ये स्पष्ट सांगितले की घ्या. संदर्भांत स्थायी समितीने प्रशासनाने निर्देश दिलेले नाहीत. आणि महासभेनेसुध्दा निर्देश दिलेल नाहीत हे मी तुम्हाला मघाशी सांगितले.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही मघाशी जे निवेदन केले त्याच्यामध्ये एक त्रुटी राहिलेली आहे असे मला वाटले की, तुम्ही एखाद्या ॲग्रीमेंटवर नॉमीनल मिनिमम रु. १००/- संगितले तर परत वसुल करायला अधिकार कुठे राहिले? तो अधिकार राहणार नाही. तुम्ही नवीन रिव्हाईस सांगाल तर होईल रिकव्हरी होउ शकत नाही. तुम्ही तुमच्या ॲग्रीमेंट प्रमाणे रु. १००/- सांगता. आपल्याला सगळ्यांना आजच्या घटकेला ते कमी आहे किंवा काय आहे? मग ते रिकव्हरी होणार नाही. रिकव्हरी कशी होईल? ते तुम्ही सांगा तुम्ही काहीतरी करता आणि अडचणीचे होते.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी सांगितले की ते रिकव्हरी होउ शकत नाही. परंतु, प्रशासनाने एक गोष्ट लक्षात घ्यावी की स्थायी समितीचा जो काही ठराव आहे. की दिशादर्शक कमानी उभ्या करण्यात याव्यात. त्याचा जो नकाशा आहे तो महानगरपालिकेने मंजुर केलेला असावा. म्हणजे मेन स्थायी समितीचा जो ठराव आहे तो ठराव तांत्रिक दृष्ट्या एकदम बरोबर आहे. आता भाडे ठरवतांना प्रशासनाने स्वतःच्या अखत्यारित ठरवले हे चुक आहे. दुसरी गोष्ट म्हणजे प्रशासनाने त्यांच्याबरोबर करार केला. त्यामुळे तो करार व्हॉलेड झाला. आत त्याच्यापर्यंत ते रु. १००/- भाडे देणार ही कायदेशिररीत्या बाब झाली. परंतु, दुसरी बाब अशी आहे की त्या ठिकाणी तुमचा असा मुद्दा उपस्थित होता की, तुम्हाला अशी बाजु मांडता येईल की, स्थायी समितीच्या ठरावानुसार आणि झालेल्या करारनाम्यानुसार दिशादर्शक कमान याचा अर्थ काय? फक्त दिशादर्शक असणारी कमान असावी. तसे न करता आपण करारनाम्याच्या अटीशर्तीचे उल्लघंन केलेले असुन दिशादर्शक कमान न उभारता आपण स्वतःचा जाहिरात फलक असणारी कमान उभारलेली आहे. म्हणजे तुमच्यावर रिकव्हरी काढण्यात येत आहे. आपण अशाप्रकारे बाजु घेउ शकतो आणि कायदेशीररित्या योग्य ठरेल.

**प्रभात पाटील :-**

मा. महपौर मॅडम, मला एक प्रश्न विचारावासा वाटतो प्रश्न असा आहे की, महासभा ही मिरा भाईंदर शहरातील अधिपत्य आहे. इथे होईल तो निर्णय फायनल असतो. जो निर्णय घ्यायचा अधिकार महासभेला आहे. तो स्थायी समितीचा नाही. तो निर्णय तिथे घेतला गेला. चुकीचा झाला. आपण ह्याच्यावर मघापासून खडांजगी करित आहोत. स्थायी समितीच्या निर्णयाचे तंतोतंत पालन केलेले नाही. तो महासभेत आणलेला नाही. महासभेत तो विषय असताना तो स्थायी समितीला जायला नको होता. ही चुक प्रशासनाची आहे की प्रशासनाने विषय तिकडे पाठवला. आपण एक चुक मान्य करायला पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे प्रशासनाने व्यवस्थित ठराव केलेला आहे. त्या ठरावानुसार तुमच्या खऱ्या म्हणजे अटीशर्ती बनल्या पाहिजे होत्या त्याच्या पलिकडे जाउन प्रशासनाने आपले एक हत्यार घातले की रु. १००/- नाही. इथे महासभा विचारात घेतली नाही. स्थायी समिती विचारात घेतली नाही. हा विषय एवढयासाठी घेतलेला आहे की, असे करण्याचा अधिकार तुम्हाला वैयक्तिकरित्या आहे का? हा माझा प्रश्न आहे. जर महासभा सर्वोच्च असेल, सुप्रिम असेल तर तुम्ही तुमचे स्वतःचे निर्णय त्याच्यामध्ये घालू शकता का? जर घातला तर त्याला शिक्षा तुम्हांला त्याच्यावर कार्यवाही व्हायला पाहिजे. तो सगळा भुर्दंड मिरा भाईंदरचे सन्मा. नगरसेवक किंवा पाठवलेले लोकप्रतिनिधी या नात्याने आमचा एक प्रतिनिधी आमच्या अंगावर घेणार नाही. पालिकेचे जे नुकसान झालेले आहे ती आमची जबाबदारी नाही. ती संपूर्ण जबाबदारी पालिका प्रशासनाने घ्यावी.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सुरुवातीला सभागृहात चर्चा चालू असताना सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी प्रश्न उपस्थित केला की सुचक आणि अनुमोदक यांच्याकडून ही आर्थिक वसूली करावी. मी तुमच्यावर टिका करतो अशातला भाग नाही. इथे प्रश्न महापालिकेच्या आर्थिक विषयाचा आहे. सन्मा. सदस्या प्रभात पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. नुसती परवानगी रद्द करुन हा विषय मिटत नाही. जर सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी आता सभागृहात अशी भुमिका मांडली की त्याला अशाप्रकारची नोटिस देउन त्यांच्याकडून ती वसूली करावी. तरी ते तुमचा करारनामा आणि तुमचा ठराव दोन्ही विसंगत आहेत. स्टॅण्डींग कमिटीने दिलेला ठराव आणि त्यांच्याबरोबर केलेला मूळ करारनामा ह्याच्यामध्ये विसंगती आहे. अशाप्रकारे ज्या अधिकाऱ्यांनी हे कृत्य केलेले आहे. आता सन्मा. सदस्या प्रभात पाटील मॅडमनी ह्या सभागृहात विषय उपस्थित केलेला आहे. ह्याच्यावर आपण चौकशी समिती स्थापन करावी आणि ह्याच्यावर सविस्तर अहवाल पुढच्या महासभेत सभागृहासमोर दयावा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभागृहनेत्यांनी जो ठराव मांडलेला आहे. त्याला माझे संपूर्ण अनूमोदन आहे. तुम्ही दोषारोष निश्चित करावा. कोण दोषी आहे? काय आहे? संपूर्ण चौकशी करुन अहवाल महासभेपुढे आणावा. खरोखर दोषी असेल तर त्यांच्यावर कार्यवाही करावी.

**मिलन पाटील :-**

समितीमधील सुचक किंवा अनुमोदक म्हणून एकाचे नांव घ्यावे.

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख, सभागृहनेत्यांनी जो ठराव मांडलेला आहे. त्याच्यावर ते बोलले नाहीत. तुम्ही सांगा की ठराव मांडायचा आहे. मग तुम्ही अनुमोदन दया. परंतु, तो ठराव मांडलेला नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

चौकशी समिती नेमावी असे मी सन्मा. सदस्य प्रभात पाटील यांच्या मुद्दयाला अनुसरुन तुमच्याकडे मागणी केलेली आहे.

**मिलन पाटील :-**

मॅडम, त्या चौकशी समितीमध्ये सुचक किंवा अनुमोदन दोन्हीपैकी कोणीतरी एक ठेवा. तर हे बरोबर होईल.

**आसिफ शेख :-**

मा. पिठासीन अधिकारी, तुम्ही या संदर्भात रुलिंग देउन टाका आणि जो खरोखर दोषी असेल त्याला शिक्षा झाली पाहिजे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आता सभागृहामध्ये एका विषयावर आपण दिड तास चर्चा केली. आपण चर्चेनंतर असे करतो की आपण हो हो करतो आपण सर्व उघडकीस आणतो आणि नंतर आपल्याला कपडे झाकायचे असतील तर आपली समिती असते. समिती नंतर भविष्यात काय करते? ते आपल्याला माहिती नाही. परंतु मॅडम, आपण ह्याच्यामध्ये पारदर्शक निर्णय पाच मिनिटात घेउ शकतो. ह्याच्यामध्ये समितीची काहीही गरज नाही. कारण ह्याच्यामध्ये जेव्हा एखादया स्थायी समितीने ठराव करुन दिला तर ह्याच्यामध्ये प्रशासनाने इम्प्लिनेन्टेशन करायला पाहिजे होते. त्या ठरावावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी ते ॲग्रीमेंट क्लॉजप्रमाणे बनवले. ॲग्रीमेंट तयार करुन घेतले त्याच्यामध्ये त्याची काउंन्टर साईन असेल. त्याच्यावर कमिशनर साहेबांची सिग्नेचर असेल. मग ज्या अधिकाऱ्यांनी ॲग्रीमेंट बनवून घेतलेली होती. तो अधिकारी आता बसलेला आहे का? तुम्ही त्याच्यामध्ये काय चौकशी करणार आहात? मॅडम, तुम्ही रुलिंग दया. त्या अधिकाऱ्याचे नावं घ्या की काय ॲग्रीमेंट बनवली आणि त्याच्यावर सही केलेली आहे.

**मा. महापौर सो. :-**

सन्मा. सभागृहापुढे सर्व सदस्यांनी चर्चा केली. प्रथमतः हा ठराव महासभेपुढे यायला पाहिजे होता. तो स्टॅण्डींगमध्ये हा ठराव होउन त्याप्रमाणे ठरावामध्ये ज्याप्रमाणे उल्लेख केलेले आहे की उघडलेल्या कमानी घ्या दिशादर्शक कमानी बांधण्यात याव्यात. ही मुख्य मागणी होती. आपण शहरामध्ये वावरत असताना आपण कमानी पाहिलेल्या आहेत. इतर कमानी ह्या दिशादर्शक दाखवलेल्या आहेत. परंतु छत्रपती शिवाजी महाराज मार्ग ही महामार्गावर छत्रपती शिवाजी महाराजाच्या पुतळ्याच्यामागे जी कमान उभी केलेली आहे. ती कमान दिशादर्शक नाही. त्यामुळे आपण ह्या अटीशर्ती पाहिल्या तर नियमांचे उल्लंघन म्हणून आपल्याला ती कमान रद्द करायचा अधिकार आहे आणि महासभेत चर्चा केलेल्या कमानी सर्व सदस्यांची व सर्व सभागृहाची मागणी आहे. तुम्ही प्रथमतः काशिमिरा येथील कमान रद्द करण्यांत यावी. इतर कमानी बरोबर आहेत. त्याबद्दल सदस्यांची हरकत नाही. ठरावाप्रमाणे पालन केले गेले नसल्यामुळे ही कमान रद्द करण्यास हरकत नाही. तसेच, ज्या कालावधीमध्ये हा ठराव केला गेलेला होता. त्यावेळेला जे नाममात्र भाडे ठरवले होते ते भाडे आतापर्यंत वसूल झालेले आहे का? ते वसूल झाले नसेल तर त्याच्यावर काय कार्यवाही करणार? परंतु, आपण जाहिरात विभागामार्फत जे नियम शहरामध्ये केलेले आहेत. प्रत्येक जाहिरात बोर्ड कमान आपण

याबाबत जी रक्कम लावलेली आहे. आपण त्या रक्कमेचा उल्लेख केलेला आहे. ती रक्कम त्यांनासुद्धा लावून आतापर्यंत जो कालावधी त्यांना कमान बनवल्या पासून आजच्या तारखेपर्यंत दिलेला आहे. जी रक्कम जाहिरात विभागाने ठरविल्याप्रमाणे होते किंवा दराप्रमाणे होते तो दर त्यांच्याकडून अधिकाऱ्यांनी वसुल करावा. कारण महानगरपालिकेचे भाडे हे कोणी रु. १००/- ठरविलेले आहे हे पुढच्या मा. महासभेमध्ये त्याचा नावाचा उल्लेख आणि त्यांना तसे अधिकार आहेत का? अधिकार जर नसतील तर त्याच्यावर कडक कार्यवाही झाली पाहिजे दुसरी गोष्ट म्हणजे आपण महानगरपालिका जेव्हा एखाद्या विषयाला परवानगी देतो तेव्हा आपल्या इंजिनियरने किंवा क्षेत्रिय अधिकाऱ्याचे काम आहे की, आपण दिलेल्या परवानगीनुसार काम त्या विभागात चालते का? मग तो कुठलाही विभाग असो. कमानीची तिथे देखरेख केली गेली का? आपण जेव्हा त्यांना दाखविले गेले की दिशादर्शक कमानी बांधल्या गेल्या पाहिजेत. तर त्यावेळेस त्यांना का विरोध केला गेला नाही. त्यावेळेस तसा रिपोर्ट मा. आयुक्तांकडे का दिला गेला नाही? त्यावेळेस कुठले क्षेत्रिय अधिकारी किंवा इंजिनियर किंवा या कुठल्या डिपार्टमेन्टकडून हे काम पाहण्यात येत होते? त्याच्यावर सुध्दा कार्यवाही करण्यात यायला पाहिजे. कारण आतापर्यंत जो भुर्दंड महानगरपालिकेला झालेला आहे तो दर किंवा विकासकर महानगरपालिकेत भरणा व्हायला पाहिजे होता. तो भरणा झालेला नाही. तरी हा त्यांच्याकडून ज्या कंपनीला आपण कमान बांधण्याची परवानगी दिली आहे त्या कंपनीची परवानगी रद्द करुन फक्त काशिमिरा नाक्यावरील आणि त्यांच्याकडून जे दर आपण ठरविलेले आहेत जे जाहिरात विभागाने नियम केलेले आहेत. ते दर वसुल करण्यात यावे असे मी प्रशासनाला सुचित करीत आहे आणि येत्या महासभेपुढे हा विषय आपण माहितीसाठी सर्व सदस्यांपुढे ठेवण्यांत यावा. ठराव मांडणाऱ्या सन्मा. सदस्या शुभांगी नाईक तसेच सन्मा. सदस्या प्रियंका करंबळे यांचा ठराव बहुमताने मंजुर होत आहे. सचिवांनी पुढील कामकाजास सुरुवात करावी.

**प्रकरण क्र. ०४ :-**

छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर काशिमिरा नाका येथे शिवाजी महाराज पुतळ्या मागे स्वागत कमान बांधणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ०६ :-**

वरील संदर्भात महानगरपालिकेने स्वागत कमानी बांधल्या जाव्यात असा मी ठराव मांडत आहे व आणलेला प्रशासकीय विषय रद्द करण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. शुभांगी नाईक. अनुमोदक :- श्रीम. प्रियांका करंबेळे.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**रिटा शाह :-**

कउंन्टर सहीने ह्या कमानीचे सर्व झाले. परंतु, ह्या अग्रीमेन्टवर नॉर्म्स आणि टर्म्स कन्डीशन्स सर्व ज्यांनी बनवले त्या अधिकाऱ्यांनी ह्याच्यावर कॉम्पेन्सेशन केले ते तुम्ही सांगा. त्या अधिकाऱ्याचे नांव सांगा. हे दोन मिनिटाचे काम आहे. त्याला महासभेची चर्चा आणि समितीची गरज नाही.

**मिलन पाटील :-**

कमिटीनेसुध्दा नावं डिक्लेअर करावे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, हा ठराव बहुमताने मंजुर नसून सर्वानुमते मंजुर आहे, असे रुलिंग द्या.

**मा. महापौर :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजुर आहे.

**रिटा शाह :-**

तो ठराव सर्वानुमते झाला. आपण तो ठराव रद्द केला. ते सर्व काही आहे. परंतु, आपल्याकडे अधिकाऱ्यांचा गैरवापर करतात.

**प्रभात पाटील :-**

त्यांनी ठरवले तर माहित नाही. त्यांनी काय ठराव मांडलेला आहे? याठिकाणी त्यांच्या ठरावाचे वाचन व्हावे.

**हॅरल बोर्जीस :-**

मॅडम, आज सभागृहासमोर हा विषय नाही. तुम्ही विषयपटलावरील विषय वाचा. तुम्ही या सभागृहात करित असलेला ठराव बघा. तुमचा ठराव कुठे चाललेला आहे? आणि तुमचा विषय कुठे चाललेला आहे. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी जरी भुमिका ह्या सभागृहात मांडलेली आहे. हा विषय स्टॅन्डीगकडून जेव्हा प्रशासनाकडे आला. प्रशासनाने प्रशासनाच्या लेव्हलवर ती परवानगी नाकारली. ह्या सभागृहाच्या त्या परवानगीशी काहीही संबंध नाही. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी जी भुमिका व्यक्त केली, ह्या

सभागृहासमोर जो विषय आलेला आहे तो कमान उभारण्याबाबत विचारविनिमय करुन निर्णय घेणे बाबतचा आहे. ठराव असा येतो की त्यांनी दिलेली परवानगी रद्द करणे. आजचा हा विषय नाही. प्रशासनाने परवानगी दिलेली आहे. मग प्रशासनाने ही परवानगी रद्द करावी. प्रशासनाकडून परवागनी स्टॅण्डींगच्या ठरावानुसार दिलेली आहे. त्याच्यामध्ये काय फेरबदल झाला? तो वेगळा भाग आहे. जर प्रशासनाने त्यांना परवानगी दिली तर प्रशासनाने प्रशासनाच्या लेव्हलवर परवानगी कॅन्सल करावी.

**रिटा शाह :-**

मॅडम, ठराव वाचा. त्या ठरावामधील एक कमेन्ट रद्द करा अशी आपली भुमिका नाही. आपण जेव्हा कमान दिलेली होती. तेव्हा त्याच्यावर रु. १००/- ते सर्व रद्द करा आणि महासभेचा नवीन ठराव घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

मॅडम ज्या कमानी दिलेल्या आहेत. त्या सर्व कमानी नाममात्र भाडयाने दिलेल्या असतील ना. मग एकच कमान रद्द का करायची? बाकीच्या कमानीसुद्धा रद्द कराव्यात तुम्ही त्यांनासुद्धा नाममात्र रु. १००/- भाडे लावलेले आहे.

**मा. महापौर सो. :-**

जाहिरात विभागाने दर ठरवलेले आहेत. त्या दराप्रमाणे वसूली करावी.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही एकाच कमानीचे बोलले. फक्त एस्सेल वर्ल्डला जी कमान दिलेली आहे. त्याबाबत बोलले. बाकीच्या कमानीबाबत बोलले नाही.

**मा. महापौर सो. :-**

ती कमान नियमानुसार बांधलेली नाही आणि त्याच्यामध्ये दिशादर्शक दाखवलेले नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्यांना त्याचा रेट दिलेला आहे रु. १००/- नाममात्र दिलेले आहेत.

**मा. महापौर सो. :-**

आपण ठरावामध्ये दराप्रमाणे वसूल करावेत अशी नोंद केलेली आहे. इतर ज्या कमानी आहेत. त्या दिशादर्शक आहेत. त्यांना जाहिरात विभागाने जे दर ठरवलेले आहेत त्या दराप्रमाणे वसूली केली जाईल. जेव्हापासून असतील ते आतापर्यंत म्हणजे चालू वर्षापर्यंत वसूली केली जाईल.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही ज्यावेळेला तुमच्यासमोर शांतपणे विषय ठेवतो. तुम्ही विषयांतर करुन तो विषय पुढे घेउन जाता आता जसे जाहिरात विभागाचे बोलता. आपल्याला सगळ्यांना ते दिसते नंतर कोणी असे बोलू शकत नाही की आम्ही बघितलेले नाही. अधिकारी बघतात. सर्व नगरसेवक बघतात रु. ९० कोटीचा गोल्डन नेस्टला रस्ता बनतो. ते इलेक्ट्रिसिटीचे टॉवर आहे. रु. ९० कोटीचे रस्ते लगेच जमिनीवर घातले. आपण त्याच्यासाठी करोडो रुपयांचा खर्च केला. निघणारी गाडी किती फूट निघते? अठरा फूटचा रस्ता राहिलेला आहे. फक्त १८ फूटच्या रस्त्यावर राहिला एवढे नाही. त्याला जे होर्डिंग लावलेले आहे. जाहिरात डिपार्टमेंट ते कुठे बघते? आपण परवानगी देतेवेळी खरोखर ते योग्य आहे की ते अयोग्य आहे. त्या ठिकाणी २०-२० फूटाचे होर्डिंग आहेत. ह्याच्यापुढे मोठे रस्ते दिसत नाहीत. आपली कमान कशा पद्धतीने झालेली आहे. आम्ही सतत नकारात्मक बोलत रहायचे का? सतत चुका दाखवायच्या का? दाखवायच्या तर उपयोग होत नाही. तो निर्णय घ्या आणि जसा तहकूब सभेमध्ये हा निर्णय होतो. तसा तो निर्णय घ्या. जुने होर्डिंग काढून टाका. कटिंग करुन कटरने काढा. तिथे होर्डिंग नसावीत. तिथे खड्डा आहे. तुम्ही तो बुजवत नाही कुठला टर्न मारत नाही. येणाऱ्या गाडया खूप जोरात येतात. एकतर कोणाला दिसत नाही. असे नाही हे सगळ्यांना दिसते. अधिकाऱ्यांना दिसते, पदाधिकाऱ्यांना दिसते, नगरसेवकांना दिसते. तर आपले तिकडे काहीही लक्ष नाही. आणि कोणती कृती नाही. हे स्टॅण्डींगमध्ये बोलून झाले. आज मी ह्या महासभेमध्ये चौथ्या वेळेला बोलतो. कोणते आहे ते? बघा. उशिरा अक्कल आल्याचा मुद्दा आहे.

**मा. महापौर सो. :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी केलेली सुचना गांभीर्यपूर्वक घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे ही सुचना प्रशासनाने कार्यवाही केली पाहिजे. तिथे क्षेत्रीय अधिकारी किंवा इंजिनियर पाठवून त्वरित कार्यवाही करावी.

**रिटा शाह :-**

मॅडम, महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, आपल्या दोन तासाचा टाईम वाया गेलेला आहे. मागे श्री. आसिफ शेख बोलले होते की मागे हा जो प्रकार ज्यांनी सत्तेचा गैरवापर केलेला आहे. ते अधिकारी कोण आहेत? ते तुम्ही प्रशासनाला सांगायला सांगा. आपण नेहमी नेहमी शासन करणारे लोक भांडायचे आपण चर्चा करायची आणि इकडून जायचे. एकाचे नांवे डायसवरून येउ दया.

**मा. महापौर सो. :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह यांनी सुचना केलेली आहे त्याचा प्रशासनाने खुलासा करावा.

**दिपक खांबित :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की सदरचा करारनामा हा दि. २/६/२००४ रोजी तत्कालीन शहर अभियंता श्री. शरदचंद्र वैरागडे यांच्या सहीने झालेला आहे. असे ह्या फाईलमध्ये नमुद केलेले आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. पिठासीन अधिकारी, विषय क्र. ४ व विषय क्र. ५ हा तहकुब सभेला आलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर काशिमिरा नाका येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावर स्वागत कमान बांधणेबाबत विचारविनिमय करुन निर्णय घेणे. एकदम स्पष्ट विषय विषयपटलावर आहे. स्थायी समितीचा संबंध नाही, महासभेचा संबंध नाही. आयुक्त महाशयांचा बिलकुल संबंध नाही. कारण त्यांनी खुलासा केलेला आहे. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील दोन, अडीच तासापासून बोलतात. फालतु विषयावर सभागृहात चर्चा चालू आहे. ह्या विषयाची महासभेत आवश्यकता नव्हती. तरीसुध्दा जाणूनबुजून हा विषय आणलेला आहे. अगोदर सुसंवाद झाला असेल त्यामुळे अडचणी निर्माण झाल्या असतील. म्हणून हा विषय या विषयपटलावर आला असे मला वाटते. तरी सुसंवाद कोणत्या प्रकारे झालेला आहे? बोलणी फिसकटल्या असतील तर सभागृहासमोर वेळ वाया घालवलेला आहे. नगरसेवकांनी आपल्या टॅक्सची बिले वेळेवर भरली नाही तर त्यास डिसक्वॉलीफाईड होतो. शासनाचे निर्देश आहेत की सन्मा. आयुक्तांनी प्रशासनावर चांगल्याप्रकारे वचक ठेवायला पाहिजे. जर महापालिकेचे आर्थिक नुकसान होत असेल तर एखाद्या करारामध्ये कोणाचा हितसंबंध असेल तर अशाला शास्ती झाली पाहिजे. तो विषय बाजुला राहिला. आपण भलत्या विषयावर बोलतो. वसुली कधी करणार? काय करणार? हे तर करायला पाहिजे. हे शासनाचे काम आहे. प्रशासन योग्य पध्दतीने आणि चांगल्याप्रकारे काम करते. इथे प्रशासन म्हणून आयुक्त साहेब आपण या ठिकाणी एक उत्तम प्रशासक म्हणून एक दाखवून दिले पाहिजे की, ज्या अधिकाऱ्यांनी हा संपूर्ण कायदा हातात घेवून स्थायी समितीची दिशाभूल केली, महासभेची दिशाभूल केली किंबहूना ह्यापूर्वी आपली सुध्दा दिशाभूल केलेली आहे. एवढी पॉवर कुठून आली? कोणाचा पाठींबा आहे? या सभागृहात काय चाललेले आहे? त्याचं कळेपर्यंत तो विषय जाणून घेउ इच्छित नाही. त्याबाबतसुध्दा इळी मिळी गुप चिळी असा प्रकार आहे का? मला असे वाटते की, मी जे बोलतो त्या मताशी संपूण सभागृह सहमत असेल. वसुली झाली पाहिजे. तुम्ही वसुली करा. तुम्ही ते करायला पाहिजे. ते आयुक्तांचे काम आहे. आयुक्त साहेब झालेल्या ठरावाच्या तारखेपासून संपूर्ण जाहिरात फी वसुल करणे हे अधिकार हातात घेउन आपण आयुक्तांचे अधिकारसुध्दा आपल्या हातात घेतलेले आहेत. असा त्याचा अर्थ झालेला आहे. श्री. शदरचंद्र वैरागडे साहेबांना काहीच माहित नव्हते. आम्ही स्थायी समितीच्या सदस्यांना बोललो की ते निष्पाप आणि निरागस आहेत. अशी त्यांची भुमिका होती. त्यांना काहीच माहित नसायचे. मग कोणी केले? आता चोर सोडून सन्याशाला फाशी देणार का? श्री. वैरागडे साहेब बोलतात की मला माहित नव्हते. दुसरा कोणीतरी होता. तो बोलेल क्लार्क होता. क्लार्क बोलणार शिपाई होता. मग शिपायावर कारवाई करणार का? जसे जबाबदार आहे त्याच्यावर कार्यवाही व्हायला पाहिजे. ही सभागृहाची मागणी आहे. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस तेच म्हणतात की चौकशी करुन जे दोषी आहेत त्यांच्यावर दोषारोप निश्चित करा. त्याची सी.आर.ला नोंद करा. शवेटची दोन महिने राहिलेली आहेत. त्या एक-दोन महिन्यात चांगला मॅसेज जाउ द्या. सन्मा. पिठासीन अधिकारी असताना आपण दोन-चार लोकांना प्रत्येकाची जागा दाखवायला ही संधी आहे. ही संधी वाया कशाला घालवता? आपण नुसते राजकीयदृष्ट्या काही करतो. हे एकदा करण्याची वेळ आलेली आहे. इथे करुन दाखवा.

**मिलन पाटील :-**

आता सुपारी कोणी फोडली. हे माहित पडलेले आहे ना. आता नक्की झाले सुपारी कोणी फोडली. ते क्लिअर झालेले आहे. एवढ्या सर्व चर्चेनंतर सुपारी कोणी फोडली ते सगळ्यांना माहिती झाले.

**आसिफ शेख :-**

खरं म्हणजे प्रत्येक जण आपल्या सदसद्विवेक बुध्दीला जागून या ठिकाणी या विषयावर सन्मा. पिठासीन अधिकारी आपण निर्णय द्या. मा. आयुक्त साहेब, आपण या संदर्भात कठोर निर्णय घेतला पाहिजे. नाहीतर काय उपयोग आहे? झाले गेले गंगेला मिळाले असे होते का? आता विद्यमान आयुक्त आहेत. त्यांच्यावर साईबाबांची भरपूर कृपा आहे. ते कोणाला घाबरत नाहीत. एवढा मला आत्मविश्वास आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम आता सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी जे सांगितले की या सभागृहामध्ये अनेक निर्णय झालेले आहेत. महापालिकेचे ११६ गाळे भुईभाड्याने दिलेले आहेत. महापालिका रु. ५००/- भुईभाड्याचे ठरवले. आजपर्यंत भुईभाड्याचा एकही पैसा वसुल झालेला नाही. तीन वेळा महासभेत लक्षवेधी आलेली होती. परंतु, कोणाला पडलेले नाही. आल्या आल्या गंगेत घातले. कुत्र्यासारखे बोलले आणि गेले अशी परिस्थिती झालेली आहे. एक पैसा वसुल झालेला नाही आणि आता बोलतात की हा नगरसेवक दोषी, तो दोषी आणि ह्या ११६ गाळ्यांमध्ये स्थानिक नगरसेवकांचासुध्दा सहभाग आहे. परंतु, अधिकारी त्यांच्याकडून पैसे वसुल करीत नाहीत.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, करारनाम्यावर अंतिम स्थायी समितीच्या सदस्यांच्या सह्या आहेत का? किंवा त्याच्यावर कोणाच्या सह्या आहेत ते सांगा.

**रिटा शाह :-**

साहेब, कोणाचेही नांव असु द्या. परंतु, तुम्ही सगळ्यांची नावे सांगा.

**प्रफुल्ल पाटील :-**

करारनाम्यावर कोणाची सही आहे? कारण स्थायी समितीच्या सदस्यांनी जो ठराव केला त्या अनुषंगाने करारनामा नाही. मग करारनाम्यावर स्थायी समितीच्या सदस्यांच्या सह्या घेतलेल्या आहेत का? त्या करारनाम्यावर कोणाच्या सह्या आहेत?

**मिलन पाटील :-**

एक फर्मलिटी असते.

**दिपक खांबित :-**

त्या करारनाम्यावर श्री. दिनेश नलावडे आणि श्री. आसिफ शेख यांच्या सह्या आहेत.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, ही सभागृहाची १०० टक्के दिशाभूल आहे. आम्ही स्थायी समितीचे सदस्य असताना या शहराच्या विकासासाठी सह्या देत असतो. या ठरावाप्रमाणे तसा कार्यभार झालेला नाही. स्थायी समितीमध्ये जे सदस्य आहेत. तर ह्या करारनाम्यावर आमच्या सह्या झालेल्या नाहीत.

**रतन पाटील :-**

श्री. दिनेश नलावडे साहेब, तुम्ही असे एक प्रतिज्ञापत्र करा.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, करारनामेमे ऐसा लिखा है क्या? की श्री. दिनेश नलावडे और श्री. आसिफ शेखने जो अनुमोदन और सुचक दिया उसमे उन्होने रु. १००/- भाडा लेना चाहिए, ऐसा लिखा है क्या?

**शरद पाटील :-**

श्री. आसिफ शेख, वह मै नही।

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, चोर सोडून संन्याशाला फाशी अशी परिस्थिती झालेली आहे. रु. १००/- नाममात्र भाडे कोणी लावले हा वेगळा विषय झाला आणि सह्या कोणी केल्या? हा वेगळा विषय झाला.

**आसिफ शेख :-**

माजी नगराध्यक्ष आणि आमचे परममित्र श्री. प्रफुल्ल पाटील अत्यंत हुषार आहेत. त्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत हुषार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, आम्हाला करारनाम्याची झेरॉक्स मिळेल का?

**आसिफ शेख :-**

जर त्या करारनाम्यावर आमच्या सह्या असतील किंवा श्री. दिनेश नलावडे यांची सही असेल ........

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, स्टॅन्डीग कमिटीच्या सदस्यांनी सह्या केल्यानंतर असे आरोप होत असतील तर सभागृहातील कुठलाही सदस्य कुठल्याही करानाम्यावर सही करणार नाही. कारण हे आरोप होत आहेत.

**आसिफ शेख :-**

साहेब, व्यक्तीशः सह्या केलेल्या आहेत.

**दिनेश नलावडे :-**

आम्ही पापाचे भागीदार नाही. त्यामुळे याची रितसर चौकशी व्हावी. आम्ही रु. १००/- नाममात्र भाडे घ्यावे असे नमुद केलेले नाही.

**आसिफ शेख :-**

आम्ही काही घाबरत नाही. आपण कसे आहात ते आम्हाला माहित आहे.

**दिनेश नलावडे :-**

स्थायी समितीच्या सदस्यांची सही लागते. आम्ही सत्ताधारी आहोत. त्यामुळे त्याठिकाणी राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्या सदस्याची सही असते. आम्हाला सही करणे भाग पडते.

**आसिफ शेख :-**

तुम्ही करारनामा वाचला नाही का? हत्ती गेला आणि शेपुट राहीली असा प्रकार झालेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, या सभेनंतर पुढच्या महासभेत आम्ही मोठा गौप्यस्फोट करणार आहोत. या पध्दतीने आणखी एक करारनामा झालेला आहे. त्या करारनाम्यामध्ये महनगरपालिकेचे लाखो रुपयांचे नुकसान केलेले आहे. तुम्ही पुढच्या महासभेत तयारी ठेवा हे सभेचे चॅलेन्ज आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. पिठासीन आधिकारी, ह्या ठिकाणी महत्वाचा विषय आलेला आहे. आपण वेगळ्या विषयावर पुन्हा विषय टर्न करित चाललेलो आहोत. आम्ही सांगितलेले होते. आम्ही सौ. प्रभात पाटील आणि सगळ्यांनी मागणी केलेली आहे की, ह्याच्यामध्ये जे कोणी जबाबदार असेल त्याच्यावर कार्यवाही केली पाहिजे. ते सोडून सन्मा. हुषार व माजी नगराध्यक्ष बोलतात की ठरावावर सह्या कोणाच्या आहेत? जर सदस्यांची सही असेल तर सदस्य सक्षम आहे. सगळ्यांना कायदा माहित आहे. इथे कोणी कायद्याबाबत अज्ञान नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

श्री. आसिफ शेख आपको श्री. प्रफुल्ल पाटीलजीसे क्या चाहिए? वह उधर बताईए।

**आसिफ शेख :-**

आम्ही आमची जबाबदारी स्विकारायला तयार आहोत. जर आम्ही दोषी असलो तर आम्हाला निलंबित करा. आमचे सदस्यत्व रद्द करा. आम्ही हाउसमध्ये ओपन चॅलेन्ज देतो. त्याच्यामध्ये कुठे रस असेल. एक नव्या पैशाचा इंटरेस्ट असेल. कारण या ठिकाणी कायद्याप्रमाणे असे म्हटलेले आहे. मग कुठे निविदेमध्ये हस्तक्षेप असेल तर, कुठे हितसंबंध असेल तर ते सदस्यत्व रद्द करु शकतात. आम्ही तयार आहोत.

**मिलन पाटील :-**

ठराव मांडणे ही फॉर्मालिटी आहे.

**प्रभात पाटील :-**

जर एखाद्या टेन्डर होल्डरचे बिल काढायचे असेल तर तो करारनाम्याप्रमाणे कोणत्याही स्टॅन्डीग मेंबरला शोधत येतो की, मॅडम जरा सही करा. जर उद्या तुमच्या स्टॅन्डीग मेंबरने सह्या केल्या नाहीत तर तुमची कामे होउ शकत नाहीत. सही करणे हा गुन्हा झालेला नाही. तो टेन्डर होल्डर कुठे-कुठे शोधत राहणार?

**आसिफ शेख :-**

तुम्ही ब्लॅकमेलींगचा प्रकार चालू केलेला आहे का? सदस्यांना घाबरवायचे आणि ब्लॅकमेलींग करायचे असाप्रकार महासभेमध्ये चालला आहे का? चोर सोडून संन्याशाला फाशी देणार आहात का? मा. पिठासीन अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला घटना दिलेली आहे. तुम्ही त्या घटनेचा वापर करा. मा. पिठासीन अधिकारी तुम्ही या ठिकाणी तुमचे कर्तृत्व दाखवा.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आता डायसवरुन डिक्लेअर झाले की, सदर ॲग्रीमेन्टवर स्थायी समितीच्या दोन सदस्यांची सही आहे. परंतु, आपल्याकडे अशी प्रथा आहे की, कोणतेही टेन्डर कॉल झाले आणि नंतर ॲग्रीमेन्ट झाले की त्याच्यावर स्थायी समितीच्या दोन सदस्यांची सही असते. ते सही करण्यापूर्वी त्याच्यावर काउंटर साईन असते. शहर अभियंता आणि कमिशनरची साईन असते. ती सही झाल्यानंतर स्थायी समितीचे सदस्य विश्वासाने सही करतात. मग आता हा मुद्दा दोघांनी सही केली म्हणून ॲग्रीमेन्टचा फॉरमॅट त्यांनी बनवला असे साबीत होत नाही. कारण ही जरी ॲग्रीमेन्ट बनवलेली आहे. त्याचा फॉरमॅट अधिकाऱ्यांनी बनवलेला आहे. त्याच्यावर काउंटर साईन कोणाची आहे? आता श्री. आसिफ शेख संन्याशाबाबत बोलले. परंतु, ते कसा संन्यास घेउन गेले? ते आपल्याला आता समजते. त्यांनी कसा संन्यास घेतला? आणि त्यांनी देवपुजा कशी केली? ते आता आपल्यासमोर आलेले आहे. इकडे कोणी संन्याशी नव्हते. त्यांनी काहीतरी काळे करारनामे केलेले आहेत आणि ते आपल्यासमोर आलेले आहे. परंतु, ह्याच्यामध्ये काउंटर साईन करणाऱ्या शहर अभियंत्याचे नांव आपल्यासमोर आलेले आहे. परंतु, स्थायी समितीच्या सदस्यांनी सही केली म्हणून त्या ॲग्रीमेन्टचा फॉरमॅट त्यांनी बनवलेला नाही. तो फॉरमॅट प्रशासनाने बनवलेला आहे. म्हणजे प्रशासनाने आपल्या सदस्यांची दिशाभूल केलेली आहे. आपल्याकडे आणखी एक नवीन गुन्हा सादर झालेला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

या ठिकाणी काय विषय आहे? हे जबाबदार आहेत किंवा नाही हे आम्ही म्हणत नाही. ह्यांनी पहिल्यांदा सांगितले की आम्ही स्थायी समितीमध्ये ठराव केला तेव्हा आम्ही त्याच्यामध्ये रु. १००/- प्रमाणे द्या किंवा नाममात्र द्या असे काही म्हटलेले नाही. आम्ही त्याला मान्यता देतो. तुम्ही सुचक, अनुमोदक म्हणून सह्या केल्या. स्थायी समितीचा ठराव केला. तुम्ही तुमची जबाबदारी पार पाडली. परंतु, तुम्ही ज्यावेळेला करारनाम्यावर सह्या करता, तेव्हा तुम्ही करारनामा वाचून सह्या करता. जेव्हा करारनाम्यामध्ये अशा अटी आल्या तुम्ही त्या अटीवर महानगरपालिकेला बंधनकारक ठेवलेले आहे ना. तेव्हा तुमच्या लक्षात यायला पाहिजे होते की, आमचा जो ठराव आहे त्या ठरावानुसार ह्या अटी नाहीत. ह्या अटी नसल्यामुळे आम्ही ह्या करारनाम्यावर सही करणार नाही. ते सह्या केल्यामुळे बांधील होतात असे माझे म्हणणे नाही. परंतु, सह्या करतात तेव्हा ते वीटनेस असतात. दे आर दी वीटनेस. ते साक्षीदार आहेत. तो करारनामा त्यांच्या उपस्थितीत दोन्ही पक्षांमध्ये त्या करारनाम्याची अंमलबजावणी करण्यांत यावी. हे सांक्षांकित झाले. मघाशी श्री. आसिफ शेख यांनी हुषार नगराध्यक्ष म्हणून माझी जी तारीफ केली. पूर्वीसुध्दा करायचे. मी या ठिकाणी एकच विषय मांडतो. मा. आयुक्त साहेब तुम्हाला माहित आहे की, कुठलाही करार कुठल्याही मालमत्ते संदर्भात कुठलीही संविधा करायची असेल तर भुसंपादन करणे किंवा भाड्याने देणे, भाड्याने घेणे असा कुठलाही करार करायचा

असेल तर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण क्र. ७ व कलम ७३ नुसार हे अधिकार कोणाला आहेत? म्हणजे करारनामा कोणी करायचा? ह्याचे अधिकार कोणाला आहेत? ह्याचे सोयीस्कर उत्तर दिले तर ही सभा संपून जाईल असे मला वाटते. म्हणून मी ह्यांना असे विचारले की करारनामा करण्याचे अधिकार कोणाचे आहेत?

**आसिफ शेख :-**

सन्मा. पिठासीन अधिकारी, जर एखादा अत्यंत गंभीर विषय असेल तर त्या विषयाला कशी कलाटणी द्यायची आणि दुसरा एखादा गंभीर विषय कसा तयार करायचा यामध्ये आपली लोक हुषार आहेत. आता विषय आहे तर अधिकारी कचाट्यात सापडला आहे. त्याला सोडवण्यासाठी हा संपूर्ण प्रकार चाललेला आहे का? कलम ७३ मध्ये म्हटलेले आहे की, संविधान करण्याचा अधिकार कोणाचा आहे? हे सगळ्यांना माहित आहे. तो विषय नाही. असा विषय आहे की आपल्या अधिकारांचा दुरुपयोग करुन स्थायी समिती, महासभा आणि मा. आयुक्त आपल्या खिशात अशाप्रकारे वावरणे, अशाप्रकारे स्वतःला याप्रकारे संपूर्ण वागणूक करुन घेणे आणि आपल्या अधिकारांचा दुरुपयोग करुन घेणे हा खुप मोठा गंभीर गुन्हा आहे. त्याबाबतीत कोणी बालत नाही. आपण विषयाला कलाटणी देण्यामध्ये धन्यता मानतो. काय चाललेले आहे? प्रत्येकाने या सभागृहात किंवा सभागृहाच्या बाहेर सन्मा. जनता, पत्रकार उपस्थित आहेत. सगळ्यांना माहित आहे. प्रत्येकाने आपआपले आत्मचिंतन करावे. आम्ही काय चुकीचे बोललो का? आमच्या अग्रीमेनटवर सह्या आहेत. आम्ही विटनेस म्हणून सह्या केलेल्या आहेत. आम्हाला माहित आहे. आम्हाला जर फासावर लटकवायचे असेल तर तुम्ही चौकशी करा आणि आम्हाला फासावर लटकवा. आमची त्यासाठी संपूर्ण तयारी आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला फासावर लटकवले तरी काहीही फरक पडणार नाही.

**आसिफ शेख :-**

श्री. रोहिदास पाटील, तुम्ही विषयांतर करु नका.

**रोहिदास पाटील :-**

मी विषयांतर करीत नाही. जो विषय बरोबर चाललेला आहे तो नीट घ्या.

**आसिफ शेख :-**

मी नीट विषय घेत आहे. आम्ही ट्रॅकवर आहोत. तुम्ही ट्रॅक सोडून दुसरीकडे विषयांतर करु नका. आमची विनंती आहे. श्री. रोहिदास पाटील तुम्ही जेष्ठ आहात, तुम्ही शिक्षण महर्षी आहात. आम्ही बोलतो विद्‌वान आहेत तर विद्‌वान आहे. हुषार आहेत तर हुषार आहेत. चाणक्य बुध्दी आहे म्हणजे विषय कसा कलाटणी करायचा त्याच्यामध्ये माहिर आहेत. जे गुण आहेत ते सांगायला पाहिजे. आम्हाला आनंद आहे. आम्ही मनापासून तुमच्यावर प्रेम करतो की आमचा एक सहकारी माजी विद्वान नगराध्यक्ष होता. आम्ही त्याच्याबरोबर काम केलेले आहे. आम्ही त्यांच्याकडून काही चांगले गुण घेतलेले आहेत. जे चांगले गुण आहेत ते घ्यायला पाहिजेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी जे काही बोलतो ते तुमच्या हितासाठी बोलतो की करारनामा करण्याचे अधिकार कोणाला आहेत? हे कायद्यामध्ये स्पष्ट आहे. तेव्हा केलेला करारनामा हा आयुक्तांनी केलेला नसल्यामुळे तो बंधनकारक राहत नाही. मग तुम्ही साक्षीदार म्हणून सह्या करा किंवा तो करारनामा अंतिम करा किंवा काहीही करा.

**आसिफ शेख :-**

आम्ही त्या ॲग्रीमेन्टवर बऱ्याच सह्या केलेल्या होत्या. आम्ही स्थायी समितीचे सदस्य आणि नगरपरिषद असताना सह्या केलेल्या होत्या आणि महापालिकेचे सदस्य असताना सह्या केलेल्या होत्या. जिथे नाही पटले तिथे आम्ही नाही पटले असे सांगितले आहे. परंतु, आता ट्रॅकवर विषय आलेला आहे. आपण संपूर्ण सारांशवर पोहचलेलो आहोत. आपण एका कन्क्ल्युजनमध्ये आलेले आहेत.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. पिठासीन अधिकारी, अभी ऐसा लगता है की जहॉ कोई भी भ्रष्टाचारी अधिकारी होता है उसको बचनेकी हमेशा कोशिश करते है। पिछले एक हप्ते से लगातार पेपरमे एक अधिकारीके बारेमे आयुक्त महोदय को जिसकी सुचना दी गई थी। वह सुचना वृक्षप्राधिकरण डिपार्टमेन्टमे दी गई थी। वह मॅटर एकदम खतम कर दिया। ऐसे कई अधिकारीयोंके खिलाफ कार्यवाही की जाएगी तो यह मॅटर खतम हो जाएगा। आपको कितने अधिकार है। हमारा हाउस आपको अधिकार देगा ऐसा नही है। आपको पुरे अधिकार है। आपको पुरे अधिकार का ज्ञान है। वृक्षप्राधिकरण डिपार्टमन्टका डेली पेपरमे कुछ ना कुछ आ रहा है। जिसका मैने मेरे ऑखोसे प्रत्यक्ष विवरण दिया है की, उसने क्या क्या किया है? लेकिन आपने किसीनेभी जरासा भी उसके विरोध मे एक शब्द नही बोला। अभी ठिक है, पहिली बार था हो गया। ७ लाख का अभी रु. १६ लाख खर्चा करना यह अधिकारीयोंकी गलती नही है क्या? पेपरमे जो माहिती का अधिकार है उस अधिकारी की पुरी की पुरी कृतीयॉं पेपरवालोंके पास है। आपने अधिकारीके बारेमे एक शब्द भी नही बोला। अगर आपका अधिकारी है तो आप बोलीए। उसके खिलाफ कुछ ना कुछ कार्यवाही किजीए। अभी डॉ. रुंदन राठोड दुबारा ऑफिसमे आ गया। यह कैसा काम यहॉ पर चलता है। यह तो नही है की चुप बैठनेसे चलता है। हम लोगोको इतना

बडा विश्वास जरासी देरमे खतम हो जाता है। स्टॅन्डीग कमिटीके मेंबर सारे कॉन्ट्रॅक्टर सिग्नेचर करनेके लिए खडे रहते है। हम लोग सब पेपर देखते है क्या? हम लोगो का काम क्या है? हमारा उद्देश काम ढंगसे चलना चाहिए यह है। उसके लिए स्टॅन्डीग कमिटीका जो भी सदस्य है वह सिग्नेचर करता है। इसका पुरा पोस्टमार्टम हो रहा है की स्टॅन्डीग कमिटीमे ठराव कैसे पास हुआ? और बादमे उसमे कैसा लिखा गया? वह लिखनेके बाद कैसे किया? अभी प्रभाग अध्यक्ष श्री. दिनेश नलावडे सिग्नेचर करते टाईम ठराव पढा नही होगा और सिग्नेचर कर दिया। श्री. आसिफ शेख इतने हुषार है की उन्होने यह भी नही देखा की क्या ठराव है? आप देखिए की यह ठराव किसकी वजहसे ठराव आया वह अधिकारी चला गया और आप फसते है।

**आसिफ शेख :-**

यहॉपर फसनेका सवाल नही है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आपके विश्वास को धक्का लगता है।

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी सभागृहात जी चर्चा होते आणि जे ठराव आहेत. त्यापैकी ज्या ठरावांवर ज्या सदस्यांच्या सह्या झालेल्या आहेत. तुम्ही ते सगळे ठराव सभागृहामध्ये आणा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

वृक्षप्राधिकरण अधिकारीको काई ध्यान नही है। उसके अगेन्स्ट कोई भी कारवाई करनेका आपकी तरफसे एक भी पत्र नही मिला। मेरा खुदका लेटर था। आप इसी अधिकारी के विरुध्द एक शब्द भी नही बोलते है।

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, विषय कुठे आहे? आणि आपण चर्चा कशी करतो?

**प्रफुल्ल पाटील :-**

हा करारनामा करण्याचे अधिकार कोणाकडे होते ते स्पष्ट करा म्हणजे विषय संपून जाईल.

**आसिफ शेख :-**

स्थायी समितीमध्ये असे बरेच विषय झालेले आहेत. आपण बऱ्याच संस्थांना काय-काय दिलेले आहे, प्रत्येकाला प्रत्येकाचा अंतरंग माहित आहे. कलम ७३ सगळ्यांना माहित आहे. स्थायी समितीमध्ये कोणकोणते विषय झालेले आहेत? त्याच्यामध्ये पुन्हा फेरबदल कसे झाले? हे प्रत्येकाला प्रत्येकाचे अंतरंग चांगल्या पध्दतीने माहित आहे. आता याठिकाणी विषय असा आलेला आहे की आपली गाडी ट्रॅकवर आलेली आहे. आपण कनक्ल्युजनवर आलेले आहोत की तो अधिकारी कोण आहे? आपण त्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार?

**रिटा शहा :-**

मॅडम, काय कारवाई करणार? ते फक्त क्लिअर करा आपल्याकडे श्री. शरदचंद्र वैरागडे यांचे नाव आलेले आहे. आपण त्यांच्यावर काय कारवाई करणार? ते स्पष्ट करा. ते नियमामध्ये असेल. कमिशनर साहेबांना नियम सांगण्याची काहीही गरज नाही.

**रोहिदास पाटील :-**

ही ट्रॅकवरची गाडी आहे. ही ट्रॅकवरची गाडी उतरवू नका.

**आसिफ शेख :-**

आपण इंजिनच्या मागे व्यवस्थित धावा. मग गाडी ट्रॅकवर जाईल. तुम्ही ट्रॅकवरुन उतरवू नका.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही तुमच्या बरोबर यायला तयार आहोत. परंतु, तुम्ही आम्हाला बरोबर घेत नाहीत.

**आसिफ शेख :-**

आम्ही बरोबर आहोत.

**रोहिदास पाटील :-**

जेव्हा तुम्हाला घाई होती. तेव्हा तुम्ही मागे बघितले नाही आणि आता वेळ संपत चालली तेव्हा तुम्ही मागे बघता.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, करारनामा बनवण्यासाठी कोणाची परवानगी होती? आपल्या बायलॉजमध्ये त्याचा शोध चालू आहे. तिथे करारनामेसुद्धा होतात आणि स्टॅंडींग समितीच्या सदस्यांच्या सह्या घेतात.

**आसिफ शेख :-**

सभागृहात त्याची आवश्यकता नाही. सभागृहात अशी आवश्यकता आहे की अधिकाऱ्यांनी संपुर्ण महापालिकेला संपूर्ण स्थायी समितीला आयुक्त महोदयांना सगळ्यांची दिशाभुल करून आपल्या खिशात ठेवले आणि सगळ्यांना उल्लु बनविले. श्री. रतन पाटील यांनी योग्य शब्द प्रयोग केलेले आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, ॲक्च्युली आयुक्त हा करारनामा बनवतात. नियमानुसार आयुक्तांची परवानगी लागते ते करार बनवतात. हा करार कोणी बनवलेला आहे? हा करारनामा आयुक्तांनी बनवलेला आहे का?

**मिलन पाटील :-**

याबाबत सचिव सांगतील. सचिव, तुम्हीच करारनामा बनवलेला आहे का? ते सांगा. तुमच्याकडून करारनामा येतो ना.

**नगरसचिव :-**

आमचा काहीही संबंध नसतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

आता श्री. खांबितसाहेबांनी सांगितले की श्री. आसिफ शेख आणि श्री. दिनेश नलावडे यांची करारनाम्यावर सही झालेली आहे. ह्या दोघांच्या सह्या झाल्यावर सचिवसाहेबांची सही लागते. मग सचिव साहेबांनी ह्या करारनाम्याचा वापर केलेला आहे का?

**नगरसचिव :-**

सचिव फक्त सिलसाठी असतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

आता श्री. आसिफ शेख आणि श्री. दिनेश नलावडे यांनी सही केलेली आहे. त्यांच्यानंतर आपली सही लागते. मग ते सुद्धा त्याच्यामध्ये गुन्हेगार आहेत.

**आसिफ शेख :-**

गुंन्हेगारीचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

**दिपक खांबित :-**

या ठिकाणी कॉन्ट्रॅक्ट नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग करारनामा कोण बनवतो? आपण करारनामा बनवतो का?

**दिपक खांबित :-**

प्रत्येक कॉन्ट्रॅक्ट मध्ये कलम ७३ नुसार आयुक्त साहेबांनी करारनामा करायला पाहिजे आणि त्याच्यावर स्टँडिंगच्या प्रकरण ५ अनुसुची "ड" नुसार स्टँडींगच्या दोन मेंबरच्या सह्या पाहिजेत. त्यानुसार केलेले आहे. आयुक्त साहेबांनी पॉवर डेलिगेट केलेल्या आहेत. त्या अधिकाराचा वापर करून त्यांनी त्या ॲग्रीमेंटवर सही केलेली आहे. कलम ६८ आणि कलम ६९ नुसार त्यांनाच पॉवर देता येते असे नाही.

**रिटा शाह :-**

कोणाला अधिकार आहेत किंवा कोणाल अधिकार नाहीत हा महत्वाचा प्रश्न नाही. ह्याच्यामध्ये रू. १००/- नॉन शेंडींगसाठी टाकलेले आहे तर त्या अधिकाऱ्याचे नाव समोर आलेले आहे. आपण त्याच्यावर प्रशासन म्हणून काय कारवाई करणार आहात? ते सांगा.

**आसिफ शेख :-**

मा. आयुक्त साहेब, महोदय डायरेक्ट परस्पर सही करित नाहीत. त्यासाठी टिपणी सादर करावी लागते. टिपणीमध्ये संबंधित क्लार्क साईन करेल नंतर ज्युनियर इंजिनियर साईन करेल आणि नंतर तुमचा उप-अभियंता साईन करेल, त्याच्यानंतर कार्यकारी अभियंता साईन करेल. त्याच्यानंतर उपआयुक्त (मु.) साईन करेल. त्याच्यानंतर आयुक्त साहेब सही करतील. जर आयुक्त साहेबांना बरोबर वाटले नाही तर ते इंटरनल ऑडिटरला पाठवतील. या ठिकाणी इंटरनल ऑडिटर आहेत. बजेटमध्ये बऱ्याच ठिकाणी आक्षेप घेतलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

आम्हांला जे काही चाललेले आहे. त्याची भीती वाटायला लागलेली आहे. साडेचार वर्षानंतर तुम्ही एवढी शोधाशोध करायला लागलेले आहात . तुमचे काम चांगले आहे.

**आसिफ शेख :**

हा विषय विषयाला धरून आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला आता शोध घ्यायची वेळ आली तेव्हा तुम्ही साडेचार वर्षानंतर की शोधता? ह्याचा शोध घ्यायची वेळ आलेली आहे.

**आसिफ शेख :-**

तुम्ही आम्हाला सभागृहात विचारले म्हणून बोलतो आणि तुम्हीसुद्धा स्थायी समितीमध्ये आहात.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही श्री. स्टिवन शेठना सांगा. श्री. स्टिवन शेठ तुमच्यासारखे चुकवणार नाहीत. ते फार सावध आहेत.

**आसिफ शेख :-**

श्री. स्टिवन शेठ स्थायी समिती चांगल्या पद्धतीने हाताळतात.

**शशिकांत भोईर :-**

आता श्री. खांबित साहेबांनी जे निवेदन केले. ज्यावेळेला आयुक्तांनी आपले अधिकार शहर अभियंत्यांना दिले त्यावेळेस कलम ६८ आणि कलम ६९ या कलमांखाली त्यांना जेव्हा अधिकार दिले तेव्हा स्थायी समितीची मंजूरी घेतलेली होती का? याचा प्रथम खुलासा करावा.

**दिपक खांबित :-**

स्थायी समितीची मंजूरी दिलेली होती.

**शशिकांत भोईर :-**

कधी मंजूरी दिलेली होती? त्या ठरावाची प्रत दाखवा.

**दिपक खांबित :-**

आता ठरावाची प्रत उपलब्ध नाही.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही ठरावाची प्रत उपलब्ध करुन दाखवा. कारण स्टॅण्डींगचे सदस्य म्हणून आमच्यासुद्धा सह्या जातात.

**दिपक खांबित :-**

सन २००४ मध्ये ठराव केलेला होता. त्यावेळेला अधिकार दिलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

माझ्या माहितीनुसार कलम ६८ आणि कलम ६९ चे अधिकार अदयापपर्यंत कोणाला दिले माहिती नाही. फक्त विधी सल्लागारांना अधिकार दिलेले होते.

**दिपक खांबित :-**

सन २००४-०५ रोजी अधिकार दिलेले होते. मी दहा मिनिटांत त्याच्या ठरावाची कॉपी आणतो.

**शशिकांत भोईर :-**

आम्ही दहा मिनिटे थांबतो.

**मा. महापौर सो. :-**

सन्मा. सदस्यांनी अधिकाऱ्यांचे नांव सुचवल्यानंतर प्रशासन त्याच्याविरुद्ध काय कारवाई करेल? याबाबत आयुक्त स्वतः खुलासा करतील.

**मा. आयुक्त सो. :-**

लेखा परिक्षण केले जाईल आणि लेखा परिक्षणामध्ये जे मुददे उपस्थित करतील त्याची पुर्तता प्रशासनाकडून केली जाईल. जे कोणी संबंधित असतील त्यांच्याकडून ती रक्कम वसुल केली जाईल.

**प्रभात पाटील :-**

मा. आयुक्तसाहेब, मला या ठिकाणी एकच बोलायचे आहे. कदाचित, तुम्हाला विषयांतर वाटेल. श्री. महेन्द्रसिंग चौहाण यांनी जो प्रश्न उपस्थित केला मी त्याला धरुनच सांगते की आपली भुमिका फार चांगली आहे. आपण आपल्या प्रशासनाला हर घडीला वाचवता आणि वाचवा. तुमचे प्रशासन व्यवस्थित चालले पाहिजे. त्याच्यावर पांघरुण घाला. सर्व गोष्टी करा. परंतु, असे होत असताना कोणत्याही नागरिकांवर त्याचा अन्याय होता कामा नये. मी एक महिन्यापासून प्रकरण तुमच्याकडे दिलेले आहे. ते आजच्या घडीपर्यंत पेन्डिंग आहे आणि आपले अधिकारी त्याला उलटसुलट रंग देतात. असेसुध्दा मी एका अधिका-याशी बोलली. काय प्रकार आहे? तो तुम्हाला निश्चितपणे माहिती आहे. मला या सभागृहाला हया गोष्टी सांगाव्याशा वाटत नव्हत्या. परंतु, आपले अधिकारी आजसुध्दा त्या पध्दतीने चालतात. आपण त्यांना कितपत वाचवावे हा विचार आपण जरुर करावा.

**रिटा शाह :-**

मॅडम, आता आयुक्तसाहेबांनी खुलासा केला की महानगरपालिकेचा जे काही महानगरपालिकेचे नुकसान आहे. आपण या ना त्याप्रकारे कसेही वसुल करुन घेउ. आपण प्रशासनाच्या अटीशर्ती आणि नियमामध्ये बसुन करुन घेउ ते आम्हाला मान्य आहे. त्यांनी अगोदरसुध्दा हेच सांगितले. हयापूर्वीच्या महासभेमध्येसुध्दा तेच बोलले की ज्या माणसाने गुन्हा केलेला आहे. तुम्ही त्याच्यावर काय कायदेशीर कारवाई करणार आहात? ते अधिकारी आपल्याकडे डेप्युटेशनवर होते. आपल्याकडे लाखो रुपयांचे नुकसान केले. स्वतःच्या सत्तेचा गैरवापर केलेला आहे. आपण त्याच्याबददल शासनाकडे काय पाठवणार? आणि त्यांना पर्सनली काय शिक्षा करायची? पर्सनली काय शिक्षा होणार आहे? आपले पैसे वाया गेलेले आहेत. आपण ते पैसे त्या कंपनीकडून वसुल करुन घेउ. आपल्याकडे त्याच्यासाठी काहीतरी वेळ आहे आणि बायलॉजमध्ये काहीतरी नियम आहेत. परंतु, आपण त्या माणसाला पर्सनली काय कारवाई करणार आहोत? आपण महाराष्ट्र शासनाला काय कळवणार आहोत? आणि त्याच्यावर काय कारवाई करायची आहे? आपण याचा आदेश देणार आहोत आणि रिपोर्ट पाठवणार आहोत त्याचा खुलासा करावा.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते, तुम्ही आम्हाला त्या करारनाम्याची तारिख सांगा.

**दिपक खांबित :-**

स्थायी समितीचा ठराव दि. ०८/११/२००४ रोजी झालेला होता. त्याचा ठराव क्र. ११५ आहे. आयुक्तांनी जे अधिकार दिलेले होते. त्यांना स्थायी समितीने अंतिम मान्यता दिलेली आहे.

**आसिफ शेख :-**

मा. आयुक्तांना पॉवर्स डेलिगेट करण्याचे अधिकार आहेत. आपण ते पॉवर्स डेलिगेट करतो. ते स्थायी समितीला नियमानुसार कळवायला पाहिजे. ती सगळी प्रशासकीय बाब झाली. तो आता मुददा नाही. तो विषय नाही. एवढाच विषय आहे की आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन हे संपूर्ण प्रकरण केलेले आहे. त्यामध्ये जो दोषी असेल त्याच्यावर कारवाई करायला पाहिजे. पॉवर्स डेलिगेट करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना आहेत आणि त्याचे इन्टिमेशन स्थायी समितीला देण्याची कायदयामध्ये तरतुद आहे. त्यांनी त्याप्रमाणे ते केले असेल. आम्ही ते नाही म्हणत नाही. या ठिकाणी तो मुददा नाही. या ठिकाणी असा मुददा आहे की एका अधिका-याने आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन संपूर्ण स्थायी समिती, आयुक्त आपल्या खिशात आहेत याप्रमाणे कारभार केलेला आहे. त्याच्यावर कुठेतरी अंकुश बसला पाहिजे. त्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. हा विषय आहे. आपण या ठिकाणी लॉ-ऑफिसर नेमलेले आहेत. या ठिकाणी लेखापरिक्षक आहेत. ते बी.ई. सिव्हिल आहेत. त्यांनी महासभेपुढे लेखापरिक्षकांचा अहवाल दिलेला आहे. त्यांनी ब-याच ठिकाणी आक्षेप नोंदवलेले आहेत. त्यांनी त्या आक्षेपाची पुर्तता करुन घेण्याची जबाबदारी त्यांचीच आहे. नुसते आक्षेप काढले आणि त्याची पुर्तता करुन दयायची असे होणार नाही. त्याचे पुन्हा रेक्टिफिकेशन रिपोर्ट महासभेत ठेवला पाहिजे.

**मुक्ता रांजणकर :-**

हया कराराची तारिख काय आहे? ते बघुन घ्या. त्याचासुध्दा उल्लेख करा.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आपण आता जो दि. ०८/११/२००४ चा ठराव क्र. ११५ आणला. त्या ठरावाचे वाचन केले तर कोणकोणत्या पॉवर्स डेलिगेट केलेल्या होत्या ते माहिती पडेल.

**दिपक खांबित :-**

हा ठराव फक्त बांधकाम विभागाशी संबंधित आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तुम्ही ठराव वाचा.

**दिपक खांबित :-**

हा ठराव फार मोठा आहे. त्यामुळे वाचता येणार नाही. हा ठराव तत्कालीन आयुक्त श्री. आर.डी. शिंदेसाहेब असतानाचा आहे.

**शशिकांत भोईर :-**

हा ठराव मोठा असला तरी सचिवसाहेब वाचुन दाखवतील. मग आपल्याला कोणत्या पॉवर्स डेलिगेट केलेल्या होत्या ते समजेल.

**दिपक खांबित :-**

मी तुम्हाला हया ठरावाची झेरॉक्स कॉपी देतो.

**शशिकांत भोईर :-**

मुख्य म्हणजे आयुक्तांनी कोणत्या पॉवर्स डेलिगेट केलेल्या होत्या त्याची आम्हाला माहिती मिळेल. नंतर आम्हाला त्या नगरसेवकांना हया पॉवर्स खरोखर दिलेल्या आहेत का? हे पाहण्यासाठी त्यांना धारेवर धरायला नको. सचिवसाहेबांनी ठरावाचे वाचन करावे.

**मुक्ता रांजणकर :-**

तुम्ही आम्हाला कराराची तारिख दया.

**दिपक खांबित :-**

ती तारिख ०८/११/२००४ आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

आम्हाला हया ठरावाची तारिख नको आहे. तुमचा जो कमानी नाममात्र भाडयाने देण्याचा ठराव झालेला आहे त्या ठरावाची तारिख सांगा.

**शुभांगी नाईक :-**

तो स्थायी समितीचा ठराव आहे त्या ठरावाची तारिख आणि करारनाम्याची तारिख सांगा.

**दिपक खांबित :-**

त्या ठरावाची तारिख २१/०५/२००४ आहे.

**रिटा शाह :-**

दि. २१/०५/२००४ च्या ठरावाबाबत आम्हाला बोलायचे नाही. परंतु, दि. ०८/११/२००४ चा कोणाचा ठराव आहे?

**दिपक खांबित :-**

मा. आयुक्तानी शहर अभियंत्यांना ज्या पॉवर्स दिलेल्या आहेत. त्याला स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

**रिटा शाह :-**

तुमच्या म्हणण्यानुसार मा. आयुक्तसाहेबांनी दि. ०८/११/२००४ रोजी शहर अभियंत्यांना पॉवर्स दिलेल्या होत्या आणि सदर गोष्टीवर दि. ०२/०५/२००५ रोजी सदर गोष्टीवर ठराव झाला आणि नंतर ०२/०६/२००५ म्हणजे एक महिन्यानंतर आपण ॲग्रीमेन्ट केली.

**शशिकांत भोईर :-**

करारनाम्याची तारिख आणि पॉवर्स डेलिगेट केल्याची तारिख वाचा.

**नगरसचिव :-**

ठरावाची तारिख ०८/११/२००४ आहे. त्याचे प्रकरण क्र. १०६ आहे आणि ठराव क्र. ११५ आहे.

**रिटा शाह :-**

सचिवसाहेब, हा ठराव आहे का?

**नगरसचिव :-**

होय. हा ठराव आहे.

**रिटा शाह :-**

हा ठराव नाही. मा. आयुक्तांनी शहर अभियंत्यांना पॉवर्स डेलिगेट केल्या ते आहे.

**नगरसचिव :-**

तेच आहे.

**शशिकांत भोईर :-**

हयाच्यामध्ये असे निष्पन्न होते की जो करारनामा आहे. तो करारनामा दि. २१/०५/२००४ रोजी केलेला आहे आणि मा. आयुक्तांनी दि. ०८/११/२००४ रोजी पॉवर्स डेलिगेट केलेल्या आहेत. म्हणजेच मा. आयुक्तांनी उशीरा पॉवर्स डेलिगेट केलेल्या आहेत.

**दिपक खांबित :-**

सदर ठरावामध्ये ज्या काही अटी आहेत त्याप्रमाणे आयुक्तांनी पॉवर्स डेलिगेट केलेल्या आहेत.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही प्रथम हे स्पष्ट करा. हयाच्यामध्ये करारनामा दि. २१/०५/२००४ रोजीचा आहे. त्याच्यानंतर मा. आयुक्तांनी शहर अभियंत्यांना दि. ०८/११/२००४ रोजी पॉवर्स डेलिगेट केलेल्या आहेत. स्थायी समितीचा ठराव क्र. ११५ सुध्दा आहे. म्हणजे स्थायी समितीने उशीरा पॉवर्स डेलिगेट केलेल्या आहेत.

**दिपक खांबित :-**

हा ठराव झाल्यानंतर स्थायी समितीने पॉवर्स डेलिगेट केलेल्या आहेत. तुम्हाला त्याच्या ऑर्डरची कॉपी बघावी लागेल.

**शशिकांत भोईर :-**

प्रथम प्रशासनाने हयाचा खुलासा करावा. आम्हाला ताळतंत्र जमत नाही.

**दिपक खांबित :-**

स्थायी समितीच्या ठरावाची कॉपी बघावी लागेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी मघाशी तेच बोललो की आपण काही गोष्टी करतो ते ठिक आहे. कोणाच्याफायदयासाठी असेल किंवा महापालिकेच्या फायदयासाठी असेल तरी त्याच्यामध्ये स्थायी समितीच्या सदस्यांना अनभिज्ञ ठेवून आपण काही गोष्टी करतो. आता तुम्हाला माहिती आहे की काही गोष्टी नियमाकुल करायच्या. आपण पहिली गोष्ट गैरनियमाने करायची आणि आपण दुसरी गोष्ट पूर्ण नियमाकेलाने करायची. म्हणजे बेकायदेशीर काम कायदेशीररित्या करुन घ्यायचे. या ठिकाणी जो स्थायी समितीचा ठराव झालेला आहे. तो ठराव दि. ०८/११/२००४ रोजी झालेला आहे. स्थायी समितीचा ठराव झाल्यानंतर तुमचा त्या ठरावानुसार करारनामा झालेला आहे. करारनाम्यावर श्री. वैरागडे यांची सही आहे. आता श्री. वैरागडे यांना दि. ०८/११/२००४ रोजी पॉवर्स डेलिगेट केलेल्या नव्हत्या. तुमच्या पॉवर्स दि. ०८/११/२००४ रोजी डेलिगेट केलेल्या आहेत. दि. ०८/११/२००४ रोजी ठराव क्र. ११५ झालेला आहे आणि करारनामा अगोदर झालेला आहे. मग पॉवर्स डेलिगेट करण्यापूर्वी श्री. वैरागडे यांनी स्वाक्षरी केलेली आहे. मग हयाच्यामध्ये स्थायी समितीच्या सदस्यांची काय चुक आहे? करारनामा करणा-या व्यक्तीने त्यांना पॉवर्स डेलिगेट केलेल्या नसतानासुध्दा त्या करारनाम्यावर स्वाक्षरी केलेली आहे हे या ठिकाणी स्पष्ट होते. श्री. वैरागडे यांनी ही चुक केलेली आहे.

**दिपक खांबित :-**

स्थायी समितीने मा. आयुक्तसाहेबांनी जे आदेश दिलेले आहेत. ते नियमाकुल केलेले आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. आयुक्तांनी स्थायी समितीच्या मान्यतेने आदेश दिलेले असतात. कलम ६८ आणि कलम ६९ वाचा आणि ते कलम काय सांगतात? ते बघा. मी कलम ६८ चा २ वाचतो. त्याच्यामध्ये असे लिहिलेले आहे की आयुक्तांस स्थायी समितीच्या मान्यतेने लेखी आदेशाद्वारे म्हणजे प्रथम स्थायी समितीची मान्यता लागते आणि नंतर लेखी आदेश लागतो. या कलमाद्वारे असे सुचित केलेले आहे की कोणत्याही नगरपालिकेच्या अधिका-यास आयुक्तांच्या नियंत्रणाखाली व त्यांच्या पुर्नरिक्षणाच्या व त्यास विहीत करणे योग्य वाटेल अशा कोणत्याही शर्तीच्या व मर्यादेच्या अधीन असा कोणत्याही अधिकाराचा वापर करण्यास कर्तव्य किंवा काम बजावण्यास किंवा काम करण्यास अधिकार देता येतील. म्हणजे पहिल्यांदा स्थायी समितीची मान्यता नंतर आयुक्तांच्या लेखी ऑर्डर्स नंतर श्री. वैरागडे हे अधिकार पात्र ठरतात. परंतु, आपल्याकडे स्थायी समितीची मान्यता नंतर आणि अधिकारांचा वापर अगोदर म्हणजेच तो गैरवापर झाला.

**दिपक खांबित :-**

साहेब, कलम ६८ (१) मध्ये नमुद केलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

कलम ६८ (१) आणि कलम ६८ (२) मध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की अशापध्दतीने स्थायी समितीची मान्यता नसतानासुध्दा श्री. वैरागडे यांच्याकडून त्या करारनाम्यामध्ये स्वाक्ष-या घेतलेल्या आहेत.

**आसिफ शेख :-**

सन्मा. ज्येष्ठ सदस्य प्रफुल्ल पाटील हे आता बरोबर ट्रॅकवर आलेले आहे. मी त्याबददल त्यांचे एकदम मनःपूर्वक अभिनंदन करतो. त्यांनी आता अधिकाराचा दुरुपयोग झालेला आहे असे सांगितलेले आहे. आपल्याला असे चालणार नाही. आपल्याला त्याच्यावर रुलिंग दयावे लागेल. झाले गेले गंगेला मिळाले का? तुम्ही रुलिंग दया. तुमच्याकडून रुलिंगची अपेक्षा आहे. सगळी लोक बाहेरुन तुम्ही काय रुलिंग देणार आहात? ते बघत आहेत. आम्ही आमचेच बोलतो. आम्ही ट्रॅकवर आहोत. तुम्ही त्या अधिका-याच्या संदर्भात काय करणार आहात? त्याचे रुलिंग दया. आम्हाला तुमच्याकडून रुलिंग पाहिजे.

**रिटा शाह :-**

मॅडम, श्री. आसिफ शेख ट्रॅक आणि हे करुन स्वतःहून डायव्हर्ट होत चाललेले आहेत असे मला वाटते. स्वतःहून ट्रॅकवरुन बाहेर चालायला लागलेले आहेत. मुख्य गोष्ट अशी आहे की आम्हाला गंमत बघायची आहे की दि. २१/०५/२००४ रोजी सदर कमान बांधण्याचे रेझ्युलेशन झाले. आपली ॲग्रीमेन्ट दि. ०२/०६/२००४ रोजी झाली. दि. ०२/०६/२००४ रोजी ॲग्रीमेन्ट झाल्यानंतर श्री. शरदचंद्र वैरागडेसाहेबांना समजले की आपण काहीतरी चुकीचे केलेले आहे आणि आपण जे काही चुकीचे केलेले आहे ते उघडकीस येणार आहे. म्हणून त्यांना सावरायला कमिशनरसाहेबांनी स्वतः गुन्हा केलेला आहे. त्यांनी त्यांना दि. ०८/११/२००४ रोजी पॉवर्स डायव्हर्ट करुन दिलेल्या आहेत. सर्व काम झाल्यानंतर दि. ०८/११/२००४ रोजी स्थायी समितीमध्ये पॉवर्स डायव्हर्ट करण्याचे रेझ्युलेशन आले आणि त्यांनी ते पास करुन दिले. म्हणजे प्रशासनाची अशी गंमत आहे की आपण अडीच तास शासन सांभाळणारी लोक आपसातच एकमेकांवर ट्रॅक आणि विदाउट ट्रॅक करतो. परंतु, तत्कालीन कमिशनरसाहेबांनी सर्व झाल्यानंतर ते गुंडाळायचे कसे? म्हणून त्यांनी नंतरच्या तारखेला तोही विचार केला नाही की आपण हया तारखेला पॉवर्स डायव्हर्ट करित आहोत आणि ते काम अगोदर झालेले आहे. म्हणजे त्यांनीसुध्दा स्वतःच्या अधिकाराचा गैरवापर केलेला आहे. मॅडम, ही गोष्ट खूप सिरियस आहे, ही साधी गोष्ट नाही. कमान लावण्याची किरकोळ गोष्ट आहे. परंतु, स्वतःच्या अधिकाराचा गैरवापर करणे गुन्हा आहे. त्यांनी स्वतःच्या पैशाचा खिळवाड केलेली आहे. तुम्ही त्याच्यावर जातीने लक्ष दया आणि त्याच्यावर सिरियस रुलिंग दया अशी संपूर्ण सभागृहाची अपेक्षा आहे.

**हॅरल बोर्जीस (सभागृहनेता) :-**

मा. आयुक्तसाहेबांनी महासभेला असे आश्वासित केले की त्यांना नोटिस काढून त्यांच्याकडून आर्थिक वसुली करु. इथे दोन प्रश्न उपस्थित झालेले आहेत की जर त्यांनी नंतर वसुली करण्यास मनाई केली तर काय करायचे? हा एक विषय आहे. दुसरा विषय असा आहे की वसुली करुन प्रश्न मिटत नाही. सन्मा. सदस्य आसिफ शेख, सन्मा. सदस्या रिटा शाह यांनी या सभागृहात जी चर्चा केली. त्याबाबत मा. आयुक्तांकडून प्रशासनामार्फत एवढेच आश्वासित पाहिजे की जर लेखा परिक्षण अहवालानंतर संबंधित अधिकारी दोषी आढळला तर त्याच्यावर काय कारवाई करणार? हे सांगून हा विषय मिटून जाउ दे. यासाठी तुम्ही रुलिंग दया.

**मा. महापौर सो. :-**

सन्मा. सदस्य यांनी जो हा करारनामा तसेच स्टॅंडिंगने आयुक्तांकडून इतर अधिका-यांना पॉवर्स देण्यासाठी केलेला जो ठराव आहे सभागृहामध्ये त्याच्या तारखांमध्ये बरीच तफावत आढळून आलेली आहे. यानंतर प्रशासनामार्फत कमानीबददल जो ठराव झाला. त्या ठरावामध्ये आतापर्यंत जो जाहिरात दर आहे. तो दर त्या विभागामार्फत म्हणजेच एस्सेल वर्ल्डमार्फत वसुल करण्यांत यावा. जर त्यांनी हा दर महानगरपालिकेच्या हयाच्यात भरला नाही तर त्याच्यावर काय कारवाई केली जाईल? आणि त्यावेळेला जे संबंधित अधिकारी होते. आपण त्यांच्यावर आता काय कायदयानुसार कारवाई करु शकतो? या संदर्भात मा.

आयुक्तांनी खुलासा केलेला आहे. त्याप्रमाणे कायदयाच्या नियमानुसार त्याच्यावर कार्यवाही केली जाईल आणि संबंधित विभागाने महानगरपालिकेचा कर बुडवलेला आहे. त्याच्याकडून कर वसुल करण्यासाठी आयुक्त आणि प्रशासन गांभीर्यपूर्वक विचार करुन त्यांच्याकडून वसुली केली जाईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही कर वसुली करण्यासाठी किती अवधी देणार आहात? नाहीतर आपले इलेक्शन झाल्यानंतर दुसरे इलेक्शन आले तर त्याचे कलेक्शन होणार नाही.

**मा. महापौर सो. :-**

करारनाम्यामध्ये परवानगी रदद करण्यासाठी एक महिन्याची मुदत दिलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्या कालावधीमध्ये त्याच्याकडून वसुल करुन घेणार आहात का?

**मा. महापौर सो. :-**

एक ते दिड महिन्यामध्ये वसुली केली जाईल.

**रिटा शाह :-**

मॅडम, आपले रुलिंग बरोबर आहे. आता पैशाचा मुददा राहिलेला नाही. आपण प्रशासन चालवतो. म्हणून आपले पैसे कुठे राहिले असतील तर आपण कसेही वसुल करु शकतो. तो मुददा उपस्थित राहिलेला नाही. हे डायस, हे प्रशासन आणि ही महानगरपालिका त्याच्यावर बसणारे कमिशनर असु दे, महापौर असु दे, उपमहापौर असु दे किंवा सभागृहातील सदस्य असु दे. कोणी आपल्या अधिकाराचा गैरवापर केला तर त्याला काय शिक्षा करायची? ते आपल्या बायलॉजमध्ये क्लिअर-कट लिहिलेले आहे. आम्हाला डायसवरुन एवढेच पाहिजे की श्री. शरदचंद्र वैरागडे यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर केलेला आहे. तुम्ही त्याच्याबाबत शासनाला काय रिपोर्ट पाठवणार आहात? त्यांच्या सस्पेन्शिअलचा रिपोर्ट पाठवणार आहात की तुम्ही त्यांचा काय रिपोर्ट पाठवणार आहात? त्यांनी इथे काय केलेले आहे? तुम्ही कायदेशीर कार्यवाही करणार आहात. मग तुम्ही ठामपणे काय करणार आहात ते सांगा.

**रतन पाटील :-**

ते रिटायर्ड झालेले आहेत.

**रिटा शाह :-**

त्यांची चुक असेल असे नाही. ती चुक समोर आलेली आहे. आपण त्यांच्यावर आता काय रिपोर्टिंग करुन काय सजा करायला पाहिजे? ते तुम्ही रिपोर्टिंग पाठवा आणि काय पाठवणार आहात? ते क्लिअर करा. तुम्ही कायदयाप्रमाणे करणार आहात तर कायदयाप्रमाणे करु शकता. आपण कायदयाच्या बाहेर जाउन काहीही करु शकत नाही. आता हया तारखा समोर आलेल्या आहेत. हयाच्यामध्ये श्री. आर.डी. शिंदे, कमिशनर यांनी दि. ०८/११/२००४ रोजी सर्व काही घडल्यानंतर पॉवर्स डायव्हर्ट केलेल्या आहेत. आपण हा सर्व सविस्तर रिपोर्ट महाराष्ट्र शासनाला पाठवणार आहात का? ते सांगा.

**मा. आयुक्त सो. :-**

पहिल्यांदा त्यांचा अहवाल यायला पाहिजे. आपण अहवाल येण्यापूर्वी रिपोर्ट पाठवणार का?

**रिटा शाह :-**

कोणता अहवाल?

**मा. आयुक्त सो. :-**

आपण जे लेखा परिक्षण करणार आहोत. त्यांच्याकडून अहवाल आल्यानंतर आपण रिपोर्ट पाठवु.

**रिटा शाह :-**

लेखा परिक्षण काय अहवाल करणार आहे? ती गोष्ट वेगळी आहे. आज सभागृहात काय घडलेले आहे? सभागृहात सर्व पारदर्शक समोर आलेले आहे. आपल्याला रिपोर्टची गरज नाही. सर्व काही तुमच्यासमोर झालेले आहे. आम्ही काही लपवुन करित नाही आणि तुम्हीसुध्दा लपवुन करित नाहीत. जे काही झालेले आहे ते समोर झालेले आहे. त्यामुळे आपल्याला आता कोणाच्या अहवालाची गरज नाही.

**मा. आयुक्त सो. :-**

या संदर्भात जे लेखा परिक्षण होईल. त्या लेखा परिक्षणामध्ये सगळया त्रुटी निघतील. हयाच्यामध्ये जर आर्थिक नुकसान झालेले असेल तेही निघेल किंवा प्रशासन यंत्रणेमध्ये कोण कुठे कमी पडला? तेसुध्दा निघेल.

**रिटा शाह :-**

साहेब, मी काय बोलु इच्छिते? ते तुम्हाला अजुनही समजत नाही. आपल्याला कमी पडले तर चालेल. जर एक महिन्यात काम करायचे होते तर ते काम त्यांनी सहा महिन्यात केले म्हणजेच तो अधिकारी कमी पडला. परंतु, ही कमी पडल्याची गोष्ट नाही. तो महानगरपालिकेला खूप भारी आणि वजनदार पडलेला आहे. ते श्री. शरदचंद्र वैरागडे आहेत. आताच श्री. आसिफ शेख यांनी सांगितले की त्यांचे खूप चांगले व्यक्तिमत्व आहे म्हणजेच संन्यासी आणि मृदु भाषी असे आहे. परंतु, आपल्या महापालिकेला ते खूप भारी पडलेले आहेत. त्यांनी सत्तेचा गैरवापर केलेला आहे. ते आपल्याला कमी पडलेले नाहीत.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह, माझे म्हणणे असे आहे की चोर सोडून संन्याशाला फाशी देउ नका. तुम्ही मनाने व्यवस्थित समजावुन घ्या.

**रिटा शाह :-**

चोर कोण आहे? आणि सावकार कोण आहे? हे मला माहिती आहे.

**आसिफ शेख :-**

सभागृहामध्ये चौकशी अंती ते निष्पन्न होणार आहे.

**हॅरल बोर्जीस (सभागृहनेता) :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह सभागृहात मागणी करित असल्या तरी मा. आयुक्तांनी नियमाप्रमाणे कार्यवाही करणे उचित राहिल. मा. आयुक्तांनी लेखा परिक्षणाचा अहवाल आल्यानंतर जे दोषी असतील त्यांच्यावर जी नियमाप्रमाणे कार्यवाही करता येईल ती करावी आणि हा विषय संपवावा.

**(लंच टाईम)**

**मा. महापौर सो. :-**

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५ चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याच्यामध्ये बंदरवाडीची लायब्ररीसुध्दा आहे.

**नगरसचिव :-**

फक्त खारीगावची लायब्ररी आहे.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही विषय घेतेवेळी आमच्याकडे प्रशासनाची अनेक पत्रं असुनसुध्दा हयाच्यामध्ये बंदरवाडीची शाळा का नाही?

**प्रेमनाथ पाटील :-**

गोषवा-यामध्ये उल्लेख केलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही विषयपत्रिकेवर घ्यायला पाहिजे होते.

**दिपक खांबित :-**

बंदरवाडीच्या शाळेचा उल्लेख आहे. तुम्ही टिपणी किंवा गोषवारा बघा. गोषवा-यामध्ये नांव आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही तसा ठराव करुन घ्या.

**दिपक खांबित :-**

आम्ही तसा ठराव मांडतो.

**रोहिदास पाटील :-**

मग तसा ठराव मांडा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, माझी तुम्हाला सुचना आहे की भाईंदर (पू.)ची लोकसंख्या ही १ लाख ८७ हजारच्या आसपास आहे. भाईंदर (पू.)ला लायब्ररी नाही. आता आमचे प्रभाग समिती क्र. ३ चे जे ऑफिस ओपन झालेले आहे. त्याच्या पहिल्या मजल्यावर आणि जे बंदरवाडीला जुने प्रभाग कार्यालय होते तिथे असे आपण या दोन ठिकाणी नवीन लायब्ररी खोलाव्यात अशी आमची मागणी आहे.

**दिपक खांबित :-**

तसाच ठराव आहे.

**प्रभात पाटील :-**

सन २००१ मध्ये भाईंदर (पू.) मराठी शाळा क्र. १३ येथे लायब्ररी होती. ती लायब्ररी आजही आहे. परंतु, ती लायब्ररी शहराच्या आणि रस्त्याच्या एका बाजुला पडत असल्यामुळे तिथे जास्तीचा वाचक वर्ग नाही. मी दि. १५/०९/२००६ रोजी एक पत्र दिलेले होते की ते वाचनालय तिथुन नवीन प्रभाग कार्यालयामध्ये शिफ्ट करण्यांत यावे असे होते. मी ते पत्र दिलेले आहे. तिथे एक ॲडिशनल खोली वाढेल. तुम्हाला ती खोली शाळेकरिता किंवा इतर कोणत्याही कामाकरिता वापरता येईल.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही बंदरवाडीसाठी पत्र दया. तेथील लोक इकडेतिकडे फिरतात. नवघरची जी शाळा आहे. त्या शाळेची लायब्ररी बंद करुन ती जागा अंगणवाडीची लहान मुले बसतात त्यांना दया. त्यांचे सामान बंदरवाडीच्या शाळेमध्ये येउ दया. बंदरवाडीच्या शाळेमध्ये नीटनेटकी, चांगली अद्ययावत लायब्ररी लवकरात लवकर विकसित करावी. कारण आता जागा रिकामी झालेली आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

बंदरवाडीच्या शाळेबरोबर खारीगावच्यासुध्दा शाळा आहेत.

**प्रभात पाटील :-**

ही लायब्ररी खारीगावामध्ये शिफ्ट करण्यांत यावी. खारीगाव प्रभाग कार्यालय हे सेन्ट्रलाईज ठिकाण आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, नवीन लायब्ररी चालु करण्याबाबतचा जो विषय आलेला आहे. त्या विषयावर माझी एक सुचना आहे की आपण खारीगाव प्रभाग कार्यालय येथे नवीन लायब्ररी सुरु करण्याचा जो उपक्रम करणार आहोत त्याचा एक अभिनंदन पात्र असा ठराव करित आहोत. परंतु, त्याच्यामध्ये अभ्यासिका करणे आवश्यक आहे. कारण भाईंदर (पू.) ची बरीच मुले जी उच्च शिक्षण घेत आहेत. ती मुले नगरभवन येथील अभ्यासिकेमध्ये येतात. तुम्ही अभ्यासिका ताबडतोब सुरु करावी. जिथे बांधकाम करायचे असेल ते पूर्ण करुन ताबडतोब अभ्यासिकेला सुरुवात करावी. ती अभ्यासिका अशी करावी की त्याच्या फर्निचरमुळे बाजुच्या विद्यार्थ्यांना डिस्टर्ब होता कामा नये असे त्याचे अद्ययावत फर्निचर करुन दयावे ही सुचना ठरावामध्ये नमुद करावी.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की आपण खारीगाव शाळेमध्ये लायब्ररी करण्याचा जो विषय आणलेला आहे. तो विषय खरोखरच अभिमानास्पद आहे. साहेब, मी मागच्यावेळेला तुमच्याबरोबर चर्चा केलेली असताना आपण तिकडे प्रभाग कार्यालय तिस-या मजल्यावर बनवलेले आहे. तिस-या मजल्यावर वयोवृध्द लोकांना, गरोदर महिलांना बिल भरण्यासाठी तिसरा मजला चढावा लागतो. त्यांचासुध्दा विचार करुन त्याच्यामध्ये काहीतरी बदल करुन घ्यावा. बिले जमा करण्याची खाली तळ मजल्यावर व्यवस्था करावी.

**दिपक खांबित :-**

आपण पहिल्या मजल्यावर व्यवस्था केलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. खांबितसाहेब, आपण आता जे नवीन प्रभाग कार्यालय सुरु केलेले आहे. त्याचा पॅसेज फार मोठा आहे तर माझे या ठिकाणी असे म्हणणे आहे की आपण तेथील भिंतीकडून काउन्टर बनवले तर त्याला आतमध्ये कोणाला यायला लागणार नाही. ती लोक बाहेरच्या बाहेर पैसे देउन निघुन जातील.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की माझे मित्र श्री. प्रेमनाथ पाटील यांनी जी सुचना मांडलेली आहे ती योग्य आहे. कारण प्रभाग कार्यालयामध्ये खूप समस्या आहेत. आपण प्रभाग कार्यालय शिफ्ट केलेले आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु, त्यांना तिथे बसण्याची अजुनपर्यंत ठामपत्ता नाही. कुठल्या-कुठल्या डिपार्टमेन्टमध्ये कुठले-कुठले अधिकारी बसलेले आहेत. त्यांना व्यवस्थित बसण्याची सिस्टिम नाही. आपल्या बांधकाम विभागाकडून त्यांना चांगल्या पध्दतीने व्यवस्था करावी. आपण येणा-या लोकांकडून जे पैसे वसुल करतो, कर घेतो. तिथे कुठल्याही पध्दतीने सोय केलेली नाही. तिथे नागरिकांना बसण्याचीसुध्दा सोय नाही. तिथे मोठी भिंत आहे. आपण ती भिंत तोडून तिथे विन्डो काढून काउन्टर सिस्टिमवर कर भरणा-या नागरिकांसाठी तशी सोय करावी. त्याचबरोबर तिथे टेबल, खुर्च्या आणि बरीचशी जी काही असुविधा आहे. ती असुविधा त्वरित दूर करावी. आपण नागरिकांना चांगल्या पध्दतीने प्रभाग कार्यालय दिलेले आहे. त्याचबरोबर तिकडच्या वरच्या मजल्यावर आपण वारंवार पत्रव्यवहार करुन लायब्ररीचा अत्यंत चांगला निर्णय घेतलेला आहे. हा चांगला निर्णय घेतल्याबददल मी सर्व मा. महापौर आणि उपस्थितांचे आभार व्यक्त करतो. मिरा भाईंदरमध्ये चांगल्या पध्दतीने एक लायब्ररी व्हायला पाहिजे. ज्या पध्दतीने भाईदर (प.) च्या नगरभवनमध्ये अभ्यासिका आणि त्याचबरोबर ज्या विद्यार्थ्यांना जी पुस्तके मिळत नाहीत ती पुस्तके ॲव्हेलेबल करुन विद्यार्थ्यांना आपल्या महापालिकेच्या माध्यमातून या ग्रंथालयातून चांगल्या पध्दतीने लाभ घेता आला पाहिजे. म्हणून एक अद्ययावत, सुसज्ज अशी लायब्ररी तिथे करावी अशी मी आपणांस विनंती प्लस सुचना मांडतो.

(मा. सभागृहनेते श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ५ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**हंसुकुमार पांडे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शशिकांत भोईर :-**

अभ्यासिकेचासुध्दा विचार करावा अशी सुचना या ठरावामध्ये नमुद करुन घ्या.

**हॅरल बोर्जीस :-**

या ठरावासाठी सन्मा. सदस्या शशिकांत भोईर यांनी अभ्यासिकेबाबत जी सुचना मांडलेली आहे ती सुचना ठरावामध्ये अंर्तभूत करावी.

**मा. महापौर सो. :-**

नवीन लायब्ररी सुरु करण्याबाबत सन्मा. सदस्यांनी सुचना मांडलेली आहे. मिरा भाईंदर शहर जवळजवळ आठ लाख लोकसंख्या असलेले हे शहर आहे. या शहरातील नगरभवन येथे संपूर्ण शहरात एकच

लायब्ररी आहे. सर्व सन्मा. सदस्यांची अशी मागणी आहे की पुढची पिढी ही बुध्दिजीवी पिढी व्हावी आणि सर्वसामान्य लोकांना जी पुस्तके विकत घेता येत नाहीत. ती पुस्तके ग्रंथालयाच्या माध्यमातून ज्ञानाचा भांडार मुलांपर्यंत, ज्येष्ठ मंडळींपर्यंत सर्वप्रकारचे वाचनसाहित्य त्यांच्यापर्यंत उपलब्ध व्हावे म्हणून महासभेमध्ये हा विषय घेण्यात आलेला आहे. प्रत्येक सदस्यांनी आपापल्या विभागात लायब्ररी व्हावी म्हणून मागणी केलेली आहे. असंख्य कानाकोप-यात वसलेला जो वर्ग आहे, जी वस्ती आहे ती तिथपर्यंत पोहोचु शकत नाही. म्हणून तीन ठिकाणी ही मागणी केलेली आहे. सन्मा. सभागृहनेता यांनी हा ठराव वाचून दाखवलेला आहे. त्या ठरावानुसार सर्व सन्मा. सदस्यांची सुचना नोंदवून घेण्यात येत आहे आणि त्याप्रकारे ठराव पारित करण्यांत येत आहे. हा ठराव सर्वानुमते मंजुर झाला असे मी जाहिर करते. लायब्ररी ही अद्ययावत असावी. पुस्तकांबरोबर तिथे बसण्याची व्यवस्था असावी, टेबल, खुर्च्या असाव्यात. विद्यार्थ्यांची मानसिकता पाहता सर्व प्रकारची पुस्तके असावीत. ज्येष्ठ मंडळींसाठीसुध्दा विविध उपयोगी माहिती देणारी पुस्तके तिथे असावीत. लहान मुलांसाठी आवश्यक असणारी म्हणजेच वयोवर्ष १ ते १५ वयोगटातील मुलांसाठी आवश्यक असणारी शालेय पुस्तके त्याच्याबरोबर ग्रंथ, बालसाहित्य, प्रबोधनसाहित्य हया लायब्ररीमध्ये असावीत. त्याचबरोबर बसण्याची व्यवस्था खुर्च्या, टेबल इत्यादी व्यवस्थासहित हा ठराव मांडण्यात आलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

हया ठरावामध्ये फीचा उल्लेख करा. कारण कधी-कधी वाचकांच्या डोक्याच्या वर फी असते. त्या वाचकांकडून माफक दराने नाममात्र फी आकारावी.

**मा. महापौर सो. :-**

आपण फी घेत नाही. दरवर्षी सदस्यत्व दिले जाते.

**प्रभात पाटील :-**

तिच सदस्य फी आहे. तीसुध्दा नाममात्र असावी. कारण आपण मोठया कंपन्यांना नाममात्र फी घेतो. आपली पिढी घडते. म्हणून आपण नाममात्र फी ठेवण्यात यावी.

**मा. महापौर सो. :-**

सौ. प्रभात पाटील, आपली सुचना ठरावामध्ये इन्क्ल्युड करण्यांत येईल.

**प्रकरण क्र. ०५ :-**

खारीगांव व घोडबंदर येथील इमारतीमध्ये नविन लायब्ररी चालु करण्याबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. ०७ :-**

भाईंदर (पुर्व) खारीगांव शाळा गृह इमारती वरील मजल्यावर तसेच घोडबंदर येथील समाज मंदिरात, बंदरवाडी शाळेत अभ्यासिका/लायब्ररी सुरू करण्यास व त्याकामी फर्निचर, पुस्तक खरेदी इ. येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदक :- श्री. हंसुकुमार पांडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य शशिकांत भोईर ह्यांनी प्रकरण क्र. ६ च्या ठरावाचे वाचन सभागृहासमोर केले.)

**सुनिता पाटील :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

हा ठराव मंजुर होतेवेळी या ठरावाला विरोध करण्याचा प्रश्न येत नाही. परंतु, हयाच्यामध्ये एक नक्की आहे की शिवार तलावाजवळ जे दोन सिग्नल आहेत. त्या ठिकाणी रोज अनेक अपघात होत असतात. त्या ठिकाणी आठवडयाला अपघात होतात. तिकडे चार माणसे मेली. आपण तिकडे दोन सिग्नल ठेवले. त्यापैकी एक सिग्नल चालु झाला तर मागच्या सिग्नलला वाटते की आपल्याला सिग्नल मिळाला आणि त्याची गाडी जोरात येते. पहिला उभा राहतो तर त्याला गाडी ठोकली जाते. याबाबत अनेकवेळा तक्रारी केलेल्या होत्या आणि अनेकवेळा चर्चा झालेल्या आहेत. तुम्ही हयाबाबत एक निर्णय घ्यावा की कोणतातरी एक सिग्नल बंद करणे आवश्यक आहे. तुम्ही त्याबाबत वाहतुक अधिका-यांचा अभिप्राय घेउन निर्णय घ्या. तुम्ही होय म्हटले तरी होत नाही. पहिली दोन माणसे मेलेली आहेत.

**एस.ए.खान :-**

जो सिग्नल बंद होता तो चालु केला. आता जो सिग्नल चालु आहे तो बंद करण्याची काहीही गरज नाही. जे ॲक्सिडन्ट होतात ते त्या वाहतुकीच्या लोकांना कळवायला पाहिजे. त्यामुळे तुम्ही तिथे सिग्नल चालु ठेवा बंद करु नका. तुम्ही तो सिग्नल चालु होता तर बंद केला. परंतु, आम्ही काहीही हरकत घेतलेली नव्हती.

**हॅरल बोर्जीस (सभागृहनेता) :-**

मा. महापौर मॅडम, साई सर्व्हिस सेन्टर उघडण्याचा जो विषय आहे. आम्ही तर सांगतो की काशिमिरा रोडचे सर्व प्रस्ताव एकत्र मान्य करा. ज्यावेळेला गोल्डन नेस्टचा दुभाजक बंद करण्याचे काम घेतले, ज्यावेळेला श्री. खांबित साहेबांच्यामार्फत ते काम सुरु झाले मी त्यावेळेला मा. आयुक्तसाहेबांना पत्र दिलेले होते. त्याच्यानंतर पुढे गेल्यावर सिल्व्हर पार्कच्या अलिकडे म्हणजे एस.के.स्टोन आणि सिल्व्हर पार्क यांच्या मध्ये जवळजवळ एक किलोमीटर फिरुन वळसा घालुन परत यावे लागते. जर तुम्हाला राईट टर्न ओपन करायचा असेल तर सरसकट सगळया बाजुंनी ओपन करा. तुम्ही हा एक प्रस्ताव घ्या आणि हयाला मान्यता दया.

**एस.ए.खान :-**

जे सिग्नल बंद झालेले आहेत ते ओपन कशाला करायचे? आम्ही याबाबत ऑब्जेक्शन घेणार होतो.

**हॅरल बोर्जीस (सभागृहनेता) :-**

एस.के.स्टोन ते सिल्व्हर पार्क हे एक किलोमीटर अंतर आहे.

**एस.ए.खान :-**

तिथे एक किलोमीटरचा फरक आहे.

**हॅरल बोर्जीस (सभागृहनेता) :-**

जर तुम्हाला करायचे असेल तर तुम्ही सगळीकडचे अभिप्राय मागवा आणि सगळे प्रस्ताव एकत्र करा.

**एस.ए.खान :-**

आम्ही हा सिग्नल चालु झाला तरी काहीही बोललो नव्हतो. तरी दुसरा सिग्नल चालु झाला तर बंद करायचे बोललो होतो. तुम्हाला तो सिग्नल बंद करण्याची काहीही गरज नाही. जर ॲक्सिडन्ट होत असतील तर ड्रायव्हरने कशी गाडी चालवायची ते बघायला पाहिजे. तुम्ही ड्रायव्हरला सांगा. ते काम लोकांचे नाही. मुंबईमध्येसुध्दा असे जवळ-जवळ सिग्नल आहेत. ते सिग्नल बंद करण्याची गरज नाही. मग हे सिग्नलसुध्दा बंद करा, चालु ठेवु नका.

**दिपक खांबित :-**

आपल्याला साई सर्व्हिसबाबत पोलिस अधिक्षकांचे पत्र आलेले आहे. त्यांनी सिग्नल ओपन करायला मंजुरी दिलेली आहे.

**एस.ए.खान :-**

आपण आपलीसुध्दा मंजुरी आणुया. आम्हीसुध्दा सगळे सिग्नल ओपन करण्याची मंजुरी आणू. आम्ही दोन दिवसांत मंजुरी आणू का?

**हॅरल बोर्जीस (सभागृहनेता) :-**

तुम्ही बाकीच्या मागण्यांचा परिपूर्ण प्रस्ताव पाठवा आणि त्याबाबत त्यांचा अभिप्राय मागवा.

**दिपक खांबित :-**

आपण प्रस्ताव पाठवलेला आहे आणि गेल्या आठवडयामध्ये मा. उप-महापौरांच्या दालनामध्ये सगळया अधिका-यांची बैठक झालेली होती.

**एस.ए.खान :-**

आम्हीसुध्दा बैठक घेउ. आम्ही का बैठक घेउ शकत नाही?

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

शिवार गार्डनके आगे ट्रॅफिक पोलिसने दो का प्रस्ताव पास किया है । शिवार गार्डनके सामने दो क्रॉसिंग है । वह ठराव मिला है क्या?

**एस.ए.खान :-**

आर.टी.ओ.चा ठराव पास झालेला आहे. तिथे सिग्नल लावलेला आहे.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

वहाँपर सबसे ज्यादा ॲक्सिडन्ट होते है ।

**एस.ए.खान :-**

तिथे सिग्नल बसवण्यात आलेला आहे.

**दिपक खांबित :-**

वहाँपर और एकबार सर्व्हे करो ऐसे हम लोगोंने लेटर दिया है और हम लोगोंको एक प्लॅनिंग दो ।

**शशिकांत भोईर :-**

आम्ही तुम्हाला तिच विनंती करतो की पर्टिक्युलर एका राईट टर्नसाठी हा विषय घेउ नका. काशिमिरा रोडवर सरसकट जेवढे दुभाजक आहेत त्याबाबतीत खात्याचे पत्र मागवा, त्यांचा अभिप्राय मागवा आणि त्याच्यानंतर हयाच्यावर निर्णय घ्या.

**आसिफ शेख :-**

सन्मा. पीठासीन अधिकारीसाहेब, एक कहावत आहे की आपके बहाने सबका भला । हा विषय जो आलेला आहे. हा विषय एका पर्टिक्युलर विषया संदर्भात, एका स्थळा संदर्भात आहे. सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस, सन्मा. सदस्य महेन्द्रसिंग चौहाण, सन्मा. सदस्य एस.ए.खान हयांनी या ठिकाणी दोन-तीन प्रस्ताव दिलेले आहेत. हयाच्यामध्ये ते प्रस्तावसुध्दा समाविष्ट करुन तो नियम सर्वांसाठी लावावा. म्हणजे आपके बहाने सबका भला। त्यांच्या पाठीमागे सगळयांचा फायदा होईल. म्हणजे आपण सगळयांना समान न्याय देतो.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, माझा एक प्रश्न आहे. आता या ठिकाणी जो विषय आलेला आहे. आपल्याला ते दुभाजक उघडे करायचे आहे. आता श्री. खांबित साहेबांनी त्याला पोलिस परवानगी आहे असे सांगितलेले आहे. श्री. खांबितसाहेब, आपण त्याला पोलिस परवानगी घेतलेली आहे. परंतु, आपण ज्यावेळेला हा दुभाजक बंद केला त्यावेळेला आपण कोणाच्या बोलण्यावरुन दुभाजक बंद केला? तुम्हाला त्यावेळेला पोलिसांनी हा दुभाजक बंद करायला नको असे का सांगितले नाही? त्यावेळेला पोलिसांचा व्हयु काय होता? आणि आता पोलिसांचा व्हयु कसा बदलला?

**दिपक खांबित :-**

मॅडम, आपण सुरुवातीला शिवाजी महाराजांच्या पुतळयामागे दोन प्रवेश त्याच्यानंतर सिल्व्हर पार्क, एस.के.स्टोन, कनाकिया पोलिस स्टेशन आणि शिवार गार्डन या पाच ठिकाणचे सिग्नल ओपन करण्याची महासभेने परवानगी दिलेली होती. त्यानंतर पुन्हा दिपक हॉस्पिटल आणि हटकेश उद्योगनगर असे एकूण सात प्रवेश ओपन करण्याची परमिशन दिलेली होती. त्यानंतर रिक्षा असोसिएशनने पत्र दिलेले होते. आपण यांना पुन्हा पत्र लिहिले की असोसिएशनने अशी-अशी मागणी केलेली आहे. मग त्यांनी त्याच्यावर असे कळवले की तुम्ही तिकडे सिग्नल वगैरे देउन हे ओपन करा. आम्ही त्याप्रमाणे हा विषय महासभेपुढे ठेवलेला आहे.

**रिटा शाह :-**

बरोबर आहे. मला असे वाटते की हा विषय पूर्वी आलेला होता आणि त्या जागेवर सिग्नल बंद करताना प्रॉब्लेम क्रिएट झालेला होता. हा विषय मागच्या महासभेत चर्चेला आलेला होता. मग तुम्ही तेव्हाच निर्णय घ्यायला पाहिजे होता. आपला रस्ता बनुन तयार आहे, त्या रस्त्याचे सुशोभिकरण झालेले आहे, सर्व काही झालेले आहे. आता हे बोलले की एकाचे भले मग सर्वांचे भले आहे. मला असे वाटते की तुमच्याकडे कुठली ना कुठली तरी असोसिएशन येउन इकडचा दुभाजक ओपन करा, तिकडचा दुभाजक ओपन करा असे सांगणार. मग तुम्ही संपूर्ण काशिमिरा रोड साईड-साईडला दुभाजक ओपन करणार आहात का?

**जेन्वी आल्मेडा :-**

मग हा दुभाजक आहे तसाच राहु दे.

**एस.ए.खान :-**

आपण मागच्या महासभेला जसे पास केलेले होते. ते आहे ते तसेच राहू दे. हासुध्दा दुभाजक उघडा करु नका.

**सुधा गोयंका :-**

यह सही बोल रहे है। पहली महासभामे जो नक्की किया था वही रखो। फिर वह जो बादमे दुभाजक खोला है वहा भी मत रखो। वह भी बंद करो।

**एस.ए.खान :-**

मागच्या महासभेमध्ये जे झालेले होते. तसेच ठेवा.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, ज्यावेळेला दुभाजक बंद करण्याचा विषय आलेला होता. त्यावेळेला मी माझे वक्तव्य केलेले होते की साई सर्व्हिस सेन्टरचा दुभाजक उघडा राहु दया. कारण तिकडे ब-याचशा रिक्षा पेट्रोल वगैरे भरायला जातात. त्यांनी नमुद केलेले नव्हते. पुन्हा जेव्हा ठराव आला. त्यावेळेला आपण इतिवृत्तांत मंजुर करताना सुचवलेले होते. परंतु, त्यांनी सुचना नमुद केलेली नव्हती. त्याच्या अगोदर प्रशासनाने जेव्हा रिक्षा संघटनेचा मोर्चा आला त्यानंतर प्रशासनाने पोलिसांकडे अर्ज करुन त्याची पाहणी केली. ती पाहणी केल्यानंतर ते दुभाजक उघडावे असे त्यांनी पत्र दिलेले आहे. तदनंतर हा खाललेला आहे. तरी आपण हयाच्यावर कार्यवाही करावी.

**हॅरल बोर्जीस (सभागृहनेता) :-**

साई सर्व्हिस सेन्टरचे दुभाजक उघडु नये अशी सभागृहाची भावना नाही. सभागृहाची भावना अशी आहे की अशाप्रकारच्या दुभाजकाचे इतर ठिकाणीसुध्दा पेन्डिंग प्रस्ताव पडलेले आहेत. तुम्ही त्या

दुभाजकावरसुध्दा निर्णय घ्यावा. गोल्डन नेस्टच्या सिग्नलला दुभाजक आहे. त्याच्यानंतर एस.के.स्टोन आणि सिल्व्हर पार्कच्या मधला जो टर्न आहे. त्याबाबतीत सुध्दा निर्णय घ्या.

**रिटा शाह :-**

आम्ही सुध्दा दोन-चार प्रस्ताव आणून देउ. तुम्ही सरसकट निर्णय घ्या की काशिमिरा रोडवर आपण जे सुशोभिकरण केलेले आहे. त्या सगळयाची राईट साईड मोकळी करा. आज ही संघटना येणार, उदया ती संघटना येणार, परवा तो येणार याचा अर्थ तुम्ही केलेले प्लॅनिंग चुकीचे झालेले आहे.

**हॅरल बोर्जीस (सभागृहनेता) :-**

तुमच्याकडे तिकडच्या स्थानिक लोकांनी पत्रव्यवहार केलेला आहे. तुम्हाला गोल्डन नेस्टच्या दुभाजकाची कल्पना असेल की तो दुभाजक बंद करायला घेतलेला होता त्यावेळेला मी स्वतः तुमच्याशी बोललो होतो. मी तुम्हाला पत्रसुध्दा दिलेले होते. तुम्ही मला त्यावेळेला सांगितले की महासभेने जे पाच दुभाजक ओपन करायला सांगितलेले होते. त्याप्रमाणे आपला निर्णय आहे. आज लोकांना जवळजवळ एक किलोमीटर वरुन लोकांना यावे लागते.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्तसाहेब, आमची तुम्हाला अशी विनंती आहे की तुम्ही निर्णय घेणे गरजेचे आहे. इथे प्रत्येक सदस्य आपापल्या सोयीने आग्रह करतील हे खरे आहे. परंतु, साधारणतः अनेक सदस्य बाहेरगावी जाउन फिरुन येतात. काय बघुन येतात? कोणास ठाउक. जरी ते परदेशामध्ये गेले तरी परदेशामध्ये दहा-दहा किलोमीटरपर्यंत राईट टर्न मिळत नाही. आपण पावलोपावली राईट टर्न मारतो का? एखादे गरजेचे असेल तर पुन्हा-पुन्हा विषय वाढवण्यात काहीही अर्थ नाही. हा पम्पाचा विषय आहे. पम्पाचा विषय बघा आणि अन्य ठिकाणी मी जसे बंद करा सांगितले तर बंद करण्याचे काय कारण आहे? आपणच तांत्रिक बिघाड केलेला आहे. दोन, सिग्नल बसवतेवेळी ते फिजीबल नाही. ठेकेदाराला ते काम दिले. त्याने ते बनवले. दोन्ही सिग्नल इतके सुंदर आहेत की प्रश्न येत नाही. तिथे कोणताही माणुस फसतो. आपल्यापैकी कोणत्याही नगरसेवकाची गाडी तिथे फसली असेल. शिवार गार्डनकडे येते-जाते असे दोन्ही वेळी हे लक्षात येत नाही. पुढचा सिग्नल दिसतो तेव्हा आपल्याला ग्रीन सिग्नल मिळाला असे वाटते. आपण येताना जोरात येतो. तुम्ही ते बघा. आर.टी.ओ.चे असे म्हणणे आहे की आम्ही आमची भुमिका मांडलेली आहे.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर मॅडम, तिथे दोन दुभाजक आहेत. तिथे एस.के.स्टोन आहे, तिथे नयानगरमध्ये जाणारा रस्ता आहे, आतमध्ये मोठी वस्ती आहे, पुढे जाउन रामदेव पार्कसारखे मोठे-मोठे कॉम्प्लेक्स आहेत, सरदार वल्लभभाई पटेल शाळा आहे, तिथेसुध्दा मोठे-मोठे कॉम्प्लेक्स आहेत. तिथे जायला एकच रस्ता आहे. आपण तिथे दुभाजक ठेवला तर बरे आहे. आपल्याला तो दुभाजक बंद करण्याची गरज नाही. एस.के.स्टोन, नयानगर वगैरेसारखी मोठी-मोठी वस्ती आहे. नयानगरच्या साईडला पुढे गेल्यानंतर मोठे-मोठे कॉम्प्लेक्स आहेत. तिथे सरदार वल्लभभाई पटेल शाळा आहे, रामदेव पार्क आहे, वागळे नगर आहे असे मोठे-मोठे कॉम्प्लेक्स आहेत. तिथे दुभाजक ठेवणे व्यवस्थित आहे. तिथे काहीही प्रॉब्लेम नाही. तिथे दुभाजक करण्याची काहीही गरज नाही.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण दुभाजक बंद करताना आर.टी.ओ.ची मिटिंग घेतलेली होती. ते सगळे दुभाजक आर.टी.ओ.ने बंद केलेले आहेत. एखादयाला काहीतरी अडचण असेल तर ती निराळी गोष्ट झाली. मी शिवार गार्डनकडे रोज जातो. प्रत्येक सकाळी दुस-या दिवशी तिकडे ॲक्सिडन्ट होते. तिकडचे दुभाजक बंद केले पाहिजे. मी तिकडे रोज प्रॅक्टिकली बघतो. बाकीच्यांना अडचण आहे म्हणजे जशी पेट्रोलपंपची अडचण आहे त्यांना एक दुभाजक खुला करुन दया. हयांना खुला करुन दिला म्हणून सगळयांना खुला करुन दया आणि पुन्हा ॲक्सिडन्ट होउ दया हे बरोबर नाही.

**आसिफ शेख :-**

सन्मा. पीठासीन अधिकारी, जेव्हापासून आपला फ्लाय-ओव्हर ब्रीज तयार झालेला आहे तेव्हापासून ते आतापर्यंत त्या ठिकाणी कमीतकमी पंधरा ते वीस ॲक्सिडन्ट झालेले आहेत. तरुण मंडळी मोटारसायकल चालवताना अपघातात मरण पावलेली आहेत. आपल्याला त्या विषयावरसुध्दा गांभीर्याने विचार केला पाहिजे. त्या ठिकाणी माणुसकी किंवा प्रेमाच्या दृष्टिकोनातून डिव्हायडर बसवायला पाहिजे. आपल्याकडे मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत. आपण आमच्या प्रभागामध्ये काही ठिकाणी डिव्हायडर बसवलेले आहेत. आपल्याला फ्लाय-ओव्हरच्या ठिकाणी स्पीड-ब्रेकर बसवणे आवश्यक आहे. कारण त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर अपघात झालेले आहेत. इथुन पुढे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून ६० फुट रोडवरुन ९० फुट रोडला लोक मधुन गाडया वगैरे घुसवतात. आपल्याला तिथे काहीतरी प्रतिबंध करता आला पाहिजे. आपण त्या दृष्टिकोनातून पावले उचलली पाहिजेत. धन्यवाद.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर महोदया, आर.टी.ओ.ने एस.टी.साठी काहीतरी डिझाईन दिलेली आहे. तुम्ही ती डिझाईन मागवुन घ्या आणि त्याप्रमाणे करुन घ्या. आताच सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी बरेच ॲक्सिडन्ट झालेले होते असे सांगितले. त्याच्यामध्ये तरुण मुले मरण पावली असेसुध्दा सांगितले. प्रत्येक ठिकाणी दुभाजक

पाहण्याची गरज आहे का? आमच्याकडे जेवढे दुभाजक होते ते काढून घेतले. मी पुन्हा पत्रसुध्दा लिहिलेले होते. आम्हाला असे उत्तर मिळाले की त्याची एक स्पेसिफिक डिझाईन आहे. तुम्ही त्या स्पेसिफिक डिझाईनप्रमाणे बनवुन घ्या.

**मा. महापौर सो. :-**

प्रत्येक सदस्यांनी अशी मागणी ठेवलेली आहे की आपल्या सोयीनुसार वेगवेगळे डिव्हायडर ओपन करण्याचा प्रत्येकाने प्रस्ताव ठेवलेला आहे. महासभेपुढे आलेल्या विषयानुसार छत्रपती शिवाजी महाराज मार्ग साई सर्व्हिस सेन्टरसमोरिल दुभाजक बंद केलेला प्रवेश पुन्हा सुरु करणे. पोलिस अधिक्षक यांच्याकडिल आदेश दि. ०५/०८/२००६ नुसार आलेले पत्र यावर निर्णय घेण्यासाठी हा विषय इथे घेतलेला आहे. आपल्याला इतरही डिव्हायडर ओपन करायचे असतील तर संबंधित विभागाने तशी त्याची नोंद घेउन इतर डिव्हायडर ओपन करण्यासाठी त्या डिव्हायडरचा विषय महासभेपुढे आणावा त्या पध्दतीने जसा आजचा निर्णय घेतलेला आहे तसा तोही डिव्हायडर ओपन करण्याचा विषय घेउन निर्णय घेतला जाईल.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आज हा विषय साई सर्व्हिस सेन्टरसाठी आलेला आहे. हया एका विषयासाठी बाकीचे नंतर डिव्हायडर खोलण्यासाठी आलेली आहेत. मा. महापौर मॅडम, हा चुकीचा विषय आहे. एकाने मागणी केली म्हणून सर्वांनी मागणी करणे चुकीचे आहे. आताच श्री. धनराज अग्रवाल यांनी सांगितलेले आहे की आपल्याकडे एक डिव्हायडर ओपन करण्यासाठी प्रस्ताव आलेला आहे. आपल्यासमोर तो विषय आलेला आहे. आपल्याकडे इतर डिव्हायडर ओपन करण्याचा प्रस्ताव आलेला नाही. आपण एकाच विषयावर विचार करुया. आपण एक डिव्हायडर ओपन करणार मग बाकीचेसुध्दा मागतात म्हणून आपण ते डिव्हायडर ओपन करायचे हयाचा अर्थ असा आहे की आपण हया डिव्हायडरला किंवा हया विषयाला विरोध करतो असे निश्चितपणे होते. आपण हा डिव्हायडर ओपन करुया. त्यांची अशी मागणी आहे. सभागृहामध्ये विषय आलेला आहे. त्यामुळे आपण सगळेच डिव्हायडर ओपन केले पाहिजेत हे चुकीचे आहे. हया सभागृहामध्ये तो विषय पुन्हा आणून हया सभागृहाचा वेळ घ्यायचा हे छोटेसे काम आहे. हयाच्यामध्ये मुदत दयायला हरकत नाही. आपण बाकीचे डिव्हायडर उघडले पाहिजेत असा त्याचा अर्थ होत नाही.

**मा. महापौर सो. :-**

सदरचा विषय मंजुर करण्यात येत आहे. सचिवांनी पुढिल विषयाला सुरुवात करावी.

**प्रकरण क्र. ०६ :-**

छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर साई सर्विस सेंटर समोरील दुभाजकात बंद केलेला प्रवेश सुरु करणेबाबत पोलिस अधिक्षक यांचेकडील दि. ०५/०८/२००६ च्या पत्रावर निर्णय धेणे.

**ठराव क्र. ०८:-**

छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर साई सर्व्हिस सेंटर समोरील दुभाजकातील बंद केलेला प्रवेश सुरू करणे व आवश्यक उपाययोजना करणेस येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर मोठ्या प्रमाणावर अपघात होत आहेत. तसेच विविध ठिकाणातील प्रवेश सुरू करण्याबाबत मागण्या येत असल्याने प्रशासनाने वाहतुक शाखा, ठाणे, ग्रामिण पोलिस यांच्या समवेत संयुक्त पहाणी करून प्रस्ताव तयार करून घ्यावा व सदर प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा.

**सुचक :- श्री. शशिकांत ज. भोईर.** **अनुमोदक :- श्रीम. लिला गु. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ७ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की शिक्षण मंडळांना मानधन व सभावेतन भत्ता लागु करण्याबाबत जो ठराव आज सभागृहात आलेला आहे. सभागृहामध्ये ठराव आल्यानंतर इथे त्याचा गोषवारासुध्दा आलेला आहे. ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळ सदस्यांना रु. ४०००/- प्रति मासिक देते. नवि मुंबई महानगरपालिका रु. ४०००/- प्रति मासिक देते. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका शिक्षण मंडळाला रु. २५००/- देते. ठाणे महानगरपालिका ही रु. १२०० कोटीची महानगरपालिका आहे. नवि मुंबई महानगरपालिकेचे बजेट रु. १५०० कोटी आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे बजेट रु. ६०० कोटीचे आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका सगळया बाजुने ओढून-ताणून आणि फुगवून रु. ३५० कोटीच्या आसपास बजेट आहे. ते बजेट फुगवून केलेले आहे. जर निव्वळ बजेट असेल तर ते रु. २०० कोटीच्या आतमध्ये आम्ही केलेले आहे. हे बजेट फुगवुन केलेले आहे. आम्ही तरीसुध्दा आज सांगतो की रु. ४ हजार त्यांना......

**रतन पाटील :-**

सुधारण्यासाठी जर त्यांनी खरोखरच घेतला असेल तर त्यांना मानधनाची काय गरज आहे? त्यांना प्रवास भत्ता मिळावा या मताशी मी मंजूर आहे. त्यांना प्रवास भत्ता मिळावा पण त्यांना मानधन कशाला पाहिजे? मानधन आपल्याला दिलेला आहे. हे कायद्यामध्ये आहे. हे बॉयोलॉजी मध्ये आहे. आम्ही कशाला म्हणतो? नको ना आताच ठराव करा. मग, आम्ही तुम्हाला अनुमोदन देतो. तर अशा पद्धतीने आपण जर त्यांना एवढी छोटी महानगरपालिका मानधन देणार आणि त्यांच्यावर जनतेचा पैसा कशाला करायचा? सभागृहाने ह्याचा निश्चित विचार करावा? कारण शिक्षण मंडळाचे सदरच फार सुशिक्षित, ज्ञानी आणि विचारवंत आहेत. मला वाटते की, ते मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मानधन घेणार नाही. मला वाटते. कारण आपण त्यांना त्यांच्या प्रवासापुरता भत्ता देण्यात यावा अशी मी सुचना करतो. निस्वार्थ सेवेने करा. आज निस्वार्थ सेवेने जर तिथे सदस्य होत असेल तर निर्स्वार्थ सेवेने तिथे सदस्य म्हणून सेवा द्यावी.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौरांना विनंती करतो की,......

**रतन पाटील :-**

तो विषय सोडा ठराव करा.

**रोहीदास पाटील :-**

हा विषय सोडायचा, घ्यायचा नाही. सभागृहात काम करतात म्हणून मानधन स्विकारले जाते. साडे चार वर्षाच्या कारकीर्दिमध्ये कोणत्याही सदस्याने अनेक प्रसंग आले द्यायचे असते तर स्वतःकडून देउ शकले असते. अनेक फंड चालतात. ज्या ज्या सन्मा. सदस्यांपैकी कोणाला नको असेल तर त्यांना मानधन देता येईल. त्यांना परंतु एखाद्या समितीच्या सदस्यांना मानधन देउच नये असे जर विषय सभागृहात येत असेल तर चूक आहे. किती प्रमाणात द्यायचा आहे त्याचा निट निर्णय द्यावा. पण त्याने देउ नये ते निःस्वार्थी काम करतात. आपण का स्वार्थासाठी आहोत का? या सभागृहात आलेली ८४ लोक स्वार्थापोटी आलेली नाहीत आणि मजुरी पोटीही आलेली नाहीत. हेही आपण निष्पाप पणे काम करतील, हेही काम करतील. महापालिकेच्या ऐपतीनुसार किंवा हे योग्य आहे, असे जर असेल तर असा ठराव होउन समितीच्या सदस्यांना देणे गरजेचे आहे. तो पायंज आहे. अन्य महापालिकेला आपणही देतो. नाही देउन कसे चालणार?

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ७ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**हंसुकुमार पांडे :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रोहीदास पाटील :-**

ह्यामध्ये असे येईल की, हे सदरच अन्य मानधन घेत असतील तर त्यांना मिळणार नाही. म्हणजे डब्बल घेता येत नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

एखादा जर या सभागृहाचा सदस्य असेल व डब्बल मानधन त्यामधून त्योचे नाव कपात करा. सभापती २५०० रू., उपसभापती २००० व सदस्य १५०० रू. मग सभापती व सर्व सदस्यांना २००० रू. द्या शिक्षण मंडळ अध्यक्ष सभापती ह्यांना २५०० रू. उपसभापती व सर्व सन्मा. सदस्यांना रू. २००० आणि बैठक भत्ता १०० रू.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. सभागृह नेते साहेब, सर्वांना समान ठेवा ना. मा. महापौर साहेबा यांना पण तेवढेच आहे. आपल्याला पण तेवढाच आहे ना. महापौरांचे जे मानधन आहे. तेच आपले मानधन आहे. एकच समान ठेवा. त्यामध्ये कॅटेगरी करू नका. एकसमान करा. त्याच्यामध्ये वेगळे करू नका.

**हॅरल बोर्जीस :-**

मॅडम, मग २००० रू. ठेवा मा. सभापती मा. उपसभापती आणि सन्मा. सदस्य सगळ्यांना सरसकट २००० रू. आणि बैठक भत्ता १०० रू.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०७ :-**

शिक्षण मंडळ सदस्यांना मानधन व सभा (बैठक) भत्ता लागू करणे बाबत.

**ठराव क्र. ०९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील कलम – ४ व मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ चे प्रकरण – दोन अन्वये मा. महासभा दि. ३१/०१/२००६ ने मंजुरी दिल्याप्रामणे दि. ०४/०५/२००६ पासुन सभापती व उपसभापती या पदाधिकाऱ्यांची प्रत्यक्ष निवड होउन शिक्षण मंडळाचा कार्यभार अन्य दहा सदस्यांसह त्यात एक शासकिय व एक अशासकिय सदस्य अशाप्रकारे दहा सदस्य व दोन पदाधिकारी मिळून १२ जणांचे शिक्षण मंडळ कार्यरत आहे. त्यांच्या मासिक सभा वेळोवेळी

नियमानुसार सुरू आहेत. परंतु, सद्यस्थितीत शिक्षण मंडळाचे सदस्यांना सभा (बैठक) भत्ता व मासिक मानधन देण्यात येत नाही त्यामुळे शिक्षण मंडळाचे सदस्य वारंवार विचारणा करीत असतात म्हणून या महानगरपालिकेच्या शेजारील महानगरपालिकेत अस्तित्वात असलेल्या शिक्षण मंडळाचे सदस्यांना प्रदान करण्यात येत असलेल्या शिक्षण मंडळाचे सदस्यांना प्रदान करण्यात येत असलेल्या मासिक मानधन व सभा (बैठक) भत्त्यांचे माहितीचा तपशिल खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळ | रू. ४०००/- प्रती मासिक मानधन | रू. १००/- प्रती बैठक भत्ता |
| २) | नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण मंडळ | रू. ४०००/- प्रती मासिक मानधन | रू. १००/- प्रती बैठक भत्ता |
| ३) | कल्याण डोंबिवली महानगरपालिका शिक्षण मंडळ | सभापती - रू. २५००/- उपसभापती - रू. २०००/- सदस्य - रू. १५००/- प्रती मासिक मानधन | रू. ७५/- प्रती बैठक भत्ता |

उक्त तपशिलाप्रमाणे ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिका शिक्षण मंडळात सदस्यांना सभा (बैठक) भत्ता व मासिक मानधन देण्यात येते या माहितीच्या आधारे महानगरपालिका शिक्षण मंडळाचे पदाधिकारी व सदस्य यांना मानधन व सभा (बैठक) भत्ता देण्याबाबत शासन निर्णय क्र. संकिर्ण – २००४/४६८/प्र.क्र. ८४/०४/नवि-२० दि. २४/०१/२००५ व शालेय शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. एसएसबी-२००१/१३०/०४/प्राशी-२ दि. २३/०६/०४ अंतर्गत तरतुदीनुसार मानधन रू. ४०००/- द.म. (दुरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल खर्च या बाबीवरील खर्च लक्षात घेउन) व बैठक भत्ता रू. १००/- (कमाल मर्यादा रू. ४००/- द.म.) अशी कमाल तरतुद असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९-अ अंतर्गत तरतुदीस अनुसरून मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाचे पदाधिकारी व सदस्य यांना मानधन व उपस्थिती (बैठक) भत्ता हा महानगरपालिका नगरसेवकाचे मानधन व सभाभत्त्यापेक्षा अधिक होणार नाही तसेच या मानधनासाठी होणाऱ्या खर्चास शासनाकडून कोणतेही अनुदान मिळणार नाही तर मानधन व बैठक भत्त्यासाठी येणारा सर्व खर्च हा महानगरपालिका निधितून करावा लागणार आहे. त्यामुळे सदर प्रकरणी शासन निर्णयानुसार व अन्य महानगरपालिकेतील देण्यात येत असलेल्या मानधन व बैठक भत्त्याच्या तुलनेत शिक्षण मंडळ, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पदाधिकारी व सदस्य यांना मासिक मानधन रू. २०००/- व सभा (बैठक) भत्ता रू. १००/- या दराने महानगरपालिका शिक्षण मंडळाची रितसर स्थापना झाल्या दिनांकापासुन लागू करणेस मंजुरी देण्यात येत असून या बाबत लेखा विभागाने अर्थसंकल्पात स्वतंत्र लेखा शिर्षका अंतर्गत मानधन व सभा भत्त्याची आर्थिक तरतूद करावी.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदक :- श्री. हंसुकुमार पांडे.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ८ चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. ८ मध्ये विक्री/साठा/उत्पादन करणाऱ्या आस्थापनेस आरोग्य लायसन्स (हेल्थ लायसन्स) देणेसाठी दर निश्चित करणे. तर ह्याच्यामध्ये अनुक्रमांक १ दिलेला आहे. लॉजिंग बोर्डीग ह्यामध्ये काय उत्पादन होणार? काय साठा होणार आणि काय विक्री होणार? हे आरोग्यामध्ये येते का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, ही टीप्पणी देताना........

**प्रेमनाथ पाटील :-**

तेच विचारत आहे. हे आरोग्यामध्ये येते का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमचे बरोबर आहे........

**प्रेमनाथ पाटील :-**

मग तुम्ही ह्याच्यावर बोर्डीग लॉजिंगसाठी १५००० रू. आणि नुतनी करणासाठी साडे सात हजार रूपये दिलेले आहे. आपल्याला बोर्डीग लॉजिंग बंद करता येत नाही का? आपल्याला बोर्डीग लॉजिंग बंद करण्याचा अधिकार आहे का?

**प्रभात पाटील :-**

ते पाहिजेतच कशाला? हा महत्वाचा प्रश्न आहे. आपल्याकडे ते पाहिजेतच कशाला?

**मुक्ता रांजणकर :-**

बोर्डीग लॉजिंग कुठे असाव्यात त्याचे काहीतरी धोरण आहे का?

**प्रभात पाटील :-**

शहराचे काय करायचे ठरवले आहे की, बोर्डीग लायसन्सला परवानगी देउन त्यांच्याकडून फि आकारून आपण हे बोर्डिंग आणि लॉजिंगचे शहर करणार आहोत का?

**मुक्ता रांजणकर :-**

इकडे अजून साध्या त्या बायका मुलांना रस्त्यावर जाउन आणि भाजी खरेदी करणे मुश्कील झालेले आहे. तिथे एकेक नाक्या नाक्यावर लॉजिंग आणि बोर्डीग आहेत.

**एस. ए. खान :-**

तिथे कारखाने आणि फॅक्टरी आहेत.

**शिवप्रकाश भुदेका :-**

यह बोर्डीग लॉजींग मे पुरा कॉंग्रेस पडा हुआ है।

**हंसुकुमार पांडे :-**

बरोबर है ना. वह गंदगी हटाने का कॉंग्रेस का काम है। गंदगी हटाने का तुम्हारा काम नही है। तुम लोग गंदगी पैदा कर सकते हो। बोलो मत। तुम्हारे एरिआ मे चालू होता है वहाँ से लेकर लास्ट तक होता है वह देखो।

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, सध्या आपल्या मिरा भाईंदर महापालिकेची अवस्था अशी आहे की, ह्या मिरा भाईंदर शहरामध्ये जेवढे लॉज, बोर्डीग आणि बार आहेत. तेवढे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये, कुठल्याही महानगरपालिका इव्हन मुंबईच्या महानगरपालिकेत तेवढे नाही. आपला दहिसर हायवे पासून सुरूवात केली की, आपल्याला बार, रेस्टॉरेंट, हवेली वगैरे अशी जी काही नावे रेड हॉर्स वगैरे की आपण आपल्या मिरा भाईंदर शहराचे आज एवढे सुंदरीकरण करतोय. परंतु, लॉजिंग बोर्डीग आणि या बीयरबारच्या मालकांच्यामुळे खरोखरच आपल्या मिरा भाईंदर शहराचे नाव अतिशय खराब होत चालले आहे. ह्यात पुढे देखील मी सांगेन की, आपला अगोदर एक ठराव झालेला आहे की, लॉजिंगला आणि बारना आपण परमिशन देताना त्याच्यावरती ह्या सभागृहाने निर्णय घेतलेला आहे की, कुणालाही परमिशन द्यायचे नाही. सध्या जे बार आहेत, लॉजिंग आहेत त्याच्यावरती आपण जरी दुप्पट तिप्पट फि आकारली तरी चालू शकेल. पण नवीन कुठलाही परमिशन मिळू नये ह्या मताचे आम्ही आहोत.

**मुक्ता रांजणकर :-**

आपण जर त्यांना नवीन फि आकारली तर आपण त्यांना मुक्तपणे पाठिंबा देतोय की, तुम्ही तो व्यवसाय करा. त्यापेक्षा त्यांनी परवानगी द्यायचीच नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

मॅडम, यह जो भी लॉजिंग बोर्डीग है वह सब कॉलेजेस के बाजू मे ही है। अभी नवघर रोडपर एस.एन. कॉलेज उसके वहाँ नालंदा लॉजिंग, फिर अभिनव कॉलेज के बाजू मे लॉजिंग यह सब अपने मेन मेन एरिया मे लॉजिंग चालू हूआ है। और उन्हे परमिशन देते समय आप लोगोका कर्तव्य बनता है की वह देखना चाहिए की, कहाँ लॉजिंगको परमिशन देते है? शहर को छोडो बाहर किधर भी दिजिए। जहाँ पॉप्युलेशन ज्यादा है उसी एरिया मे सब गंदगी है। आज बी.पी. रोड पर.......

**मुक्ता रांजणकर :-**

मॅडम, रेसिडेंन्शीअल एरिया मध्ये बारला लायसन्स दिलेले आहे. लायसन्स दिले की दुसऱ्याकडून आणतात. मग, निदान आपल्या महानगरपालिका हद्दीत आपल्या हातात जेवढे आहे. तेवढे तरी आपण करु शकतो. त्यांना रेजिडेन्शियल एरियामध्ये कशी परवानगी दयायची?

**हंसुकूमार पांडे :-**

आप यह मेन रोड पर देखिए ना। काशिमिरा रोडपर कितने नए लॉज खुले है। कैसे भूलते है? इसको परमिशन क्यू दिया जाता है? क्या उधर जरुरी है? उधर वेश्या होना जरुरी है। बी. पी. रोड पर देखिए ना। बी.पी.रोड मे कमसे कम १५०-२०० लेडिज खडी होती है।

**मुक्ता रांजणकर :-**

तो एरिया पूर्ण रेड लाईट सारखा झालेला आहे. पूर्ण त्याला रेड लाईट एरिया म्हणतात. पूर्णपणे झालेले आहे. स्टेशन रोडच्या टोकापासून ते गोडदेवच्या टोकापर्यंत पूर्ण रेड लाईट एरिया झालेला आहे.

**प्रभात पाटील :-**

आजचा नवशक्ती आहे. कदाचित ही बातमी कोणाच्या वाचनात आली नसेल कारण जनमताचा कानोसा म्हणन एक नवशक्तीचा सदर असते. आणि त्याच्यामध्ये एक त्रस्त नागरिक दहिसर (पूर्व) तो दहिसरला राहतो. पण त्याने काय विचार मांडले् आहेत मी तुम्हांला वाचून दाखवते. कदाचित कोणी वाचले असेल. आजचाच पेपर आहे. नवशक्ती पेपर तुम्ही पाहू शकता. हेडिंग आहे. बार परमिट रुम लॉजिंग चे शहर, मिरा भाईंदर तो माणूस दहिसरला राहणारा आहे. दहिसर चेकनाका ओलांडला की, दुर्तफा सुरु होतो. तो बियर बार, परमिट रुम आणि लॉजेसची मालिका. दहिसर चेकनाका ते घोडबंदर पर्यंतच्या परिसरात किमान १०० ते १५० बार परमिट रुम असाव्यात. आणि जवळपास ५० एक लॉजेस आहेत. रगेल कामसू कस्टमर्सना समाधान देणारी सर्विस हे बार परमिट रुमचे वैशिष्टय आहे. डान्स बारला बंदी असली तरी लाइव्ह ऑर्केस्ट्राच्या नावाखाली खुलेआम देहविक्रेताचा धंदा चालू आहे. मिरा गाव येथे अमर पॅलेस दहिसर चेकनाका या परिसरात हा उच्छांद एवढा वाढला आहे की, सर्वसामान्य नागरिकांना रस्त्यावरून चालणे कठिण झाले आहे. रस्त्याच्या बाजूला लावलेले लाइव्ह ऑर्केस्ट्राचे हे फलक रंगेल मंडळींना भूरळ पाडतात. राजकीय नेते मंडळी संबंधित पोलिस अधिकारी आणि बार परमिट रुमचे तसेच, लॉजेसचे चालक मालक यांच्यातील अर्थपूर्ण व्यवहारामुळे या सर्व समाज विघातक घटकांपुढे हेतू पुरस्कार दुर्लक्ष होत आहे. तर त्रस्त नागरिक दहिसरमधला आहे. त्याला आपल्या मिरा-भाईंदरची चिंता आहे आणि आम्ही मिरा-भाईंदरवाले त्यांना आकारणी करतो. आणि त्यांना परवानगी देत सुटतो. आम्हाला ह्याचे काहीच पडलेले नाही?

**हंसुकूमार पांडे :-**

हम लोगांको मालूम भी नही पडता है। यह लोग कभी क्या परमिशन देते है। इनको समझना चाहिए की इतना लॉजिंग अपने मिरा भाईंदर पहलेसे है। वह कम करनेके बजाय वह लोग दिन बे दिन और बढाते जाते है। कैसे परमिशन दिया जाता है इसका कुछ हिसाब नही है। क्या हिसाबसे परमिशन दिया जाता है। उसकी कुछ इन्क्वायरी होती है की, कौनसे एरियामें लॉजिंग डालने वाले है?

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांनी या स्टेटमेंटवर खुलासा करावा की, त्यावेळी किती लॉजिंग आणि किती परवानगी घेउन किती लोकांनी चालू केले आहे? याबाबतीत खुलासा करावा.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम्, आज मी या ठिकाणी सुचना करतो की, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये किती लॉजिंग आहेत? किती बोर्डिंग आहेत? आणि बियरबारचे किती हॉटेल आहेत? आणि त्या ठिकाणी कुठला व्यवसाय चालतो? आज हे सर्व संगनमताने पोलिस स्टेशन वगैरे चालू आहे आणि दिवसाढवळ्या याठिकाणी मोठया प्रमाणात धंदा चालू आहे. मा. महापौर मॅडम, मी आपल्याला एवढेच सांगेन की, बी.पी.रोड, नवघर रोडला जे नालंदा गेस्ट हाउस आहे. दिवसाढवळया तेथे कॉलेजची मुले-मुली आतमध्ये येतात जातात. त्याठिकाणी सगळे नागरिक बघत असतात. बी.पी.रोडला हिच परिस्थिती आहे आणि त्या ठिकाणी नागरीक वस्ती आहे. त्याठिकाणी हे व्यवहार चालू आहे ही अतिशय शरमेची गोष्ट आहे. आपण तसे पूर्ण मिरा भाईंदर शहरामध्ये संपूर्ण माहिती घ्या. कारण, माझ्यामते पोलिस स्टेशनला देखील काही होतं त्याची नोंद नाही. बोर्डीग आणि बारची, लॉजिंगची अशा तऱ्हेची अनलिगल हॉटेल आणि बार देखील चालू आहे, लॉजिंग चालू आहे. तेथे संपूर्ण आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत चौकशी करुन त्यांच्यावर योग्य कारवाई करावी आणि दुसरी गोष्ट म्हणजे, आज सभागृहाची जी तीव्र भावना आहे की, मिरा भाईंदर शहरात जेवढे असे काही झालेले आहे. तेवढे आपण कसेतरी सहन करतोय. परंतु, यापुढे मात्र नागरी वस्तीमध्ये आणि कुठल्याही वस्तीमध्ये बार परमिशन लॉजिंग, बोर्डिंगचे परमिशन महानगरपालिकेने देउ नये. हे आम्ही सर्व या मताशी सहमत आहेत.

**प्रभात पाटील :-**

आपल्या मतानुसार तिथे काय चालते? तरी आपण त्यांना परमिशन देतोय, याचा अर्थ आपण व्यापाराला आणि त्यांना चालना देतो ना. असे आपल्याकडून होउ नये हीच आम्ही इच्छा आहे की, आपण त्यांना परमिशन दिल्यावर तुम्ही २ लाख रु. आकारत आहात तर ४ लाख रु. आकारा तर ते धंदा करायला मोकळे झाले ना. आपल्याकडून हे होउ नये.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा.महापौर मॅडम, अभी सदर में जो नॅशनल पार्टी के अध्यक्ष है। वह अभी सदन मे उपस्थित नही है। उन्होंने अभिनव स्कूल के बाजू में लॉजिंग और बोर्डीग खोला है। और मेरे घर के नीचे उस एरिया के तीन नगरसेवकोंने पहले विरोध किया। फिर उनको क्या मिला उसके बादमें उन्होंने फिर परमिशन के लिए पत्र दिया और यह अधिकारी मतलब बिना अटीशर्ती के पालन किये हूए उनको लायसन्स देते है। भले उनको अधिकारीयोंको कायदे कानून का कोई मतलब नही है। भले कोई सदस्य का परिवार मर जाए या कुछ भी हो। पर कोई भी मरेगा तो लायसन्स देने में इन्हें शरम नाम की चीज भी नहीं है।

**रोहिदास पाटील :-**

मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की जेव्हा नगरसेवक आणि सात-सात, आठ-आठ नगरसेवकांची शिष्टमंडळ मा. आयुक्त साहेबांना भेटते किंवा बेकायदेशीर काम सुरु झालेले आहे. त्यावर तीन-तीन महिने कारवाई होत नाही. ह्याच्याही पलिकडे सांगतो की जेव्हा प्रिन्सिपल लिहिता. पोलिस स्टेशनला लिहिले आहे, महापालिकेला लिहिले आहे की आपण प्रिन्सिपलला लिहिलेल्या पत्राची झेरॉक्स संबंधिताच्या हातात पोहचते. प्रिन्सिपल चे काय रोल राहणार आहे? शाळेच्या बाजूला अशी घटना असा व्यवसाय सुरु होउ नये, हा प्रामाणिक रोल असतो. प्रिन्सिपलला मग धमकीचे फोन जाणार ही किती गंभीर बाब आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

एक मटनवाले का दुकान खोलने का मुर्हुर्त करने के लिए स्टॅण्डींग कमिटी के सभासद सन्मा. सदस्य तूळशीदास म्हात्रे साहेब वह शिक्षण समिती के सभापती रनिंग है। मटनवाले के दुकान का ओपनिंग के लिए जाते है। यह शरम की बात है।

(सभागृहात गोंधळ)

**शिवप्रकाश भुदेका :-**

वह लोग बिना लायसन्स के दुकान का मुहुर्त करते है।

**हंसुकूमार पांडे :-**

लॉजिंग, बोर्डिंग का विषय चल रहा है। लॉजिंग, बोर्डिंग के विषय पर बात करो।

**लिला पाटील :-**

आप लोग खाते नही है इसलिए वहॉंपर ओपनिंग के लिए जाना नहीं चाहिए क्या? लॉजिंग, बोर्डिंग के लिए गए क्या? मटन के दुकान के लिए गए ना।-

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

मॅडम, सन्मा. सदस्य भुदेका साहेब का यह बात है। वह सरकार की दादागिरी दिखाके उन्हें नियम की पडी नही है। नियम तोडके उन्हें लायसन्स दिलाने की इनकी कॅपिसिटी है। अरे, नालायक सालों आज कितने परसेन्टेज हो। सन्मा. सदस्य शिवप्रकाश भुदेका साहब आप वहीं बात करते हो।

(सभागृहात गोंधळ )

**शानु गोहिल :-**

मा. महापौर मॅडम, यह विषय लॉजिंग और बोर्डिंग का चल रहा है। तो यह दिशाभूल कर रहे है। मा. महासभा का टाईम वेस्ट कर रहे है। जो विषय है उस बारेमे चर्चा करने के लिए बोलिए।

**एस. ए. खान :-**

लॉजिंग और बोर्डींग का उद्‌घाटन करनेके लिए सन्मा. सदस्य शिवप्रकाश भुदेका साहब जी जाएगें।

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य शिवप्रकाश भुदेकाजींनी ते शब्द मागे घ्यायला पाहिजे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आपला विषय लॉजिंगचा चालला है आणि आपण त्याच्यात उद्‌घाटनचा सोहळा मध्ये आणला. कुठलीही व्यक्ती कुठे जाउन कुठल्या प्रकारचा उद्‌घाटन करते. हा मा. महासभेचा आणि आपल्या सभागृहाचा विषय कधीही होउ शकत नाही आणि कोणी कुठे जाउन उद्‌घाटन केले तो आपला विषय नाहीच आहे. तर आपला हा विषय मेन लॉजिंगचा आहे. मॅडम, काशिमिरा रोडवरून आपण पण येतात, मी पण येते आणि मा. आयुक्त साहेब पण येतात आणि सर्व अधिकारी वर्ग सुद्धा येतात. आपला सर्विस रोडवरचा आपण सोडला होता. त्या सर्विस रोडवर बांधकाम झालेले आहे. त्याच्याबरोबर जास्त्‌ीत जास्त लॉजिंग झालेले आहे. आपण ते बघा. ते बंद करायला पाहिजे. त्याच्यामध्ये जास्त जास्त लॉजिंग निर्माण झालेले आहे. तेव्हा आपल्याला काय उत्तर मिळाले होते की, आपण सर्विस रोडवर त्यांच्या गावाला वगैरे गेलो म्हणून आपण त्यांना नुतनीकरणाचा दाखला दिलेला आहे. मॅडम, त्या नुतनीकरणाच्या दाखलाचा त्यांनी कसा गैरवापर केलेला आहे. त्याच्याबद्दल बोला. तुम्ही सर्विस रोडवर जाउन येताना जाताना बघा ते सगळे लॉजिंग झालेले आहे. आणि तिथे काय व्यवस्था होते ते सर्वांना माहित आहे. मिरा-भाईंदर हे काही पर्यटनाचे स्थळ नाही की, बाहेरुन लोक येणार आणि लॉजिंगमध्ये जाणार सर्विस रोडवर घाणेरडा विषय चालू झालेला आहे. मॅडम, ते सर्व बंद करायला लावा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. पिठासिन अधिकारी, ह्या ठिकाणी विषय असा आहे...

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, हे मिरा-भाईंदर शहर हे मच्छिमार्केचे शहर कोळी म्हणून या ठिकाणी समजले जाते. इथला व्यवसाय मेन मच्छिमार्केटचा आहे. त्याच्यावरती व्यवहार आहे. त्याच्यावरती धंदे करतात आणि सन्मा. सदस्य शिवप्रकाश भुदेकाजी हमेशा मच्छिमार्केट बंद करो, मटन का दुकान बंद करो, फिर हम लोग क्या डाल-भाजी खाने के लिए बैठे है क्या? सभागृह तो हमेश बोलते है की, हमें नॉनव्हेज चाहिए।

**रोहिदास पाटील :-**

सगळे विषय मस्करीवर जाउ शकत नाही. सन्मा. सदस्य दिनेश नलावडे साहेब, तुम्ही प्रभाग समितीचे अध्यक्ष आहात याचे भान ठेवून बोला की,जेव्हा ती सोसायटी सांगते सोसायटी जेव्हा पूर्ण शाकाहारी आहे. त्या सोसायटीची एन.ओ.सी. नाही आणि जाउन जबरदस्तीने करणार. आणि मग कोणीतरी सांगू दे. तुम्हाला भाषण करायचे असेल तर भाषण करा. बहस नाही करायचे त्या ठिकाणी....

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब (काका) या मिरा भाईंदर शहरात एवढेतरी अजून त्या पद्धतीने झालेले नाही की, आज बिल्डिंगमध्ये जाउन तुम्ही जर पाहिलेत ना तर प्रत्येक बिल्डिंगमध्ये खाली दुकानामध्ये चिकन लटकवलेले आहे, तंदुरी चिकन हे मिरा भाईंदर महानगरपालिकेत नाही.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही हे लटकवायचे काम ठेवलेच नाही. मी तुम्हाला सांगतो ना. जैन मंदिरच्या...

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब (काका) बोलतात की, सोसायटीचे लेटर नाही परमिशन नाही, मा. महापौर मॅडम, त्या ठिकाणी एखादा जैन रहात असेल एखादा मारवाडी राहत असेल त्याने विरोध केला सांगू नका.

**रोहिदास पाटील :-**

जैन मंदिराच्यासमोर मटनाचे दुकान उघडे ठेवलेले आहे...

**दिनेश नलावडे :-**

सोसायटीमध्ये कुठला असा प्रकार नाही. त्याठिकाणी देखील अधिकारी लोक आहेत. एक जर एका व्यक्तीने विरोध केला म्हणजे त्याला विरोध मानता येत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

जैन मंदिरच्या बाजूला अंबा माताच्या बाजूला प्रभाग समितीच्या अध्यक्षाच्या कृपेने जर मटनाचे दुकान चालू आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

और बिल्डिंगमें आपकी हालत क्या हुई मटन का दुकान जैसे आप की भी सरकार लटक गई।

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब (काका) मिरा भाईंदर शहरात माझ्या कृपेने एकपण दुकान उघडे नाही. मी त्याच्या विरोधात नाही. तुम्ही जे विषय या ठिकाणी आणलेले आहे. त्याच्यामध्ये मी आहे. आम्ही कुणालाही परमिशन दिलेले नाही किंवा माझी कुठे सही नाही किंवा मी कुठे शिफारस केलेले नाही.

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

फक्त ज्या ठिकाणी सन्मा. सदस्य शिवप्रकाश भुदेका साहेब जी राहतात. तिथे खाली खोलले की तुम्ही नगरसेवक ३ जण आहेत. आम्हांला लेटर दया. आमचा विरोध आहे. आमच्या इथे वडीलांची तब्येत बरोबर नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

पण तुम्हाला तुमच्या शिफारशी विरोध आहे. तुम्ही विरोध केला म्हणजे पैसे मिळाले तर त्याला परत शिफारस पत्र दिले विरोध करुन तुम्हाला शिफारस पत्र देउ का?

**दिनेश नलावडे :-**

तरीपण आम्ही त्याला विरोध केला. चला, ठिक आहे. नको.

**प्रभात पाटील :-**

लॉजिंग, बोर्डिंगला या महापालिका क्षेत्रात परवानगी देउ नये. तुम्हाला कितीही उत्पन्न मिळत असेल तरी आपल्याकडे उत्पन्नाची खूप चांगली साधने आहेत. सध्या आपल्याकडे ती उपस्थित साधने आहेत. सध्या ज्या उत्पन्नाची साधने आहेत. त्याच्यातच जर लक्ष घातले तर आपले १० टक्के उत्पन्न वाढू शकते. परंतु, हे नासके व्यवसाय आहेत. हे सर्व नासके व्यवसाय आहेत. ह्यांना कृपया आपल्याकडे परवानगी देउ नये असा मी फक्त लॉजिंग आणि बोर्डिंगच्या बाबतीत ठराव मांडत आहे. पुढे सुरुवात करण्यात यावी.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मटन-मच्छिचा विषय झाला. मटन-मच्छि खाणारे लोक इथे आहेत. पण नियमानुसार कुठलेही दुकान चालत नाही. नियमानुसार आपण ज्या अटीशर्ती दिलेले आहे. त्या अटीशर्तीप्रमाणे कुठलेही मच्छिमटनाचे दुकान चालत नाही. त्यांना पडदे लावण्याचे बंधन घातले आहे. कोणत्याही दुकानाला पडदे नाहीत. ही गोष्ट आपले अधिकारी करताहेत का? का करत नाहीत? ती त्याने करायला पाहिजे. त्यांच्यावर कारवाई करायला पाहिजे का करत नाही? आणि बी.पी.रोडला भाजी मार्केट गल्लीमध्ये जे पोस्टर्स

लागलेले आहेत. त्या पोस्टरवरसुद्धा कारवाई होत नाही. पोलिसांना पत्र दिले, महापालिकेला पत्र दिलेले आहे. वेश्याव्यवसाय आमच्या बी.पी.रोडला चाललेले आहे. वारंवार त्याच्या तक्रारी केल्या जात असतानाही त्याच्यावर कुठलीही कारवाई होत नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, उसके लिए युथ कॉंग्रेस के माध्यम से हम लोगों ने पोस्टर निकालने के लिए बोला।

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ह्याच्यावर कारवाई व्हावी.

**हंसुकूमार पांडे :-**

युथ कॉंग्रेस के माध्यम से भाजीमार्केट से पोस्टर निकाल के, फाडके, उनके बोर्ड तोडनेवाले हम भी है। उसमे मम्मी भी शामिल थी। सन्मा. सदस्य खान साहब भी शामिल थे। और सब कॉंग्रेस के नगरसेवक मिलके और युथ कॉंग्रेस के सब पदाधिकारी भी मिले थे। हम लोगो ने ऐसा वह बोर्ड तोडा था। हमने ही बंद करवाया था।

**शरद पाटील :-**

आता तिथे एक गेस्ट हाउस आहे. त्या गेस्ट हाउसमध्ये संपुर्ण त्या पद्धतीचेच गेस्ट हाउस आहे. एक वेळेला त्याच गेस्ट हाउसमधील सगळे पुरूष महिला काढून आम्ही टेम्पो भरून पोलिस स्टेशनला नेल्यानंतर आता परत ते चालू आहे. कोणाच्या आश्वासनाने ते चालू होते आणि का होते? ह्याच्यावर कारवाई झाली पाहिजे.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, बरेचसे लॉजिंग आणि बोर्डींगविषयी निश्चितच लॉजिंग आणि बोर्डींग किंवा बार दारूची दुकाने ही कुठे असावीत ह्याचे काही कायदे आणि नियम आपल्याकडे आहेत. पण सगळे नियम धाब्यावर बसवून मिरा भाईंदर महानगरपालिका सर्वांना सरसकट परवानगी देत चाललेली आहे. शाळेच्या बाजुला, मंदिराच्या बाजूला, लॉजिंग आणि बोर्डींग उघडली जाते. मेन रस्त्यावर जिथे रहदारीचा रस्ता आहे, मार्केट आहे अशा रस्त्यांवर सुद्धा लॉजिंग आणि बोर्डिंगना तुम्ही परवानगी दिली जाते. आपण जो आता सर्व्हिस रोड ठेवलेला आहे. त्या सर्व्हिस रोडवरसुद्धा अतिक्रमण होउन तिथे लॉजिंग आणि बोर्डींग सुरू झालेले आहे. म्हणजे मिरा भाईंदर मानगरपालिका सगळे नियम धाब्यावर बसवुन आपण ज्या परवानग्या देत आहात. या मिरा भाईंदर महानगरपालिका एक लॉजिंग बोर्डींग म्हणून आता आपण हे करू या ना. की, सगळ्यांना जो येतो जातो त्यांना पण सगळ्यांना परवानगी दिली जाते. अभिनव शाळा आहे. त्याच्या बाजूला एक लॉजिंग बोर्डींग आताच उघडलेली आहे. त्या नवघर रोडवर एक नालंदा लॉज आहे. इण्डस्ट्री एरियामध्ये साई लॉज आहे. बी.पी. रोडवर काही आणखी बार आहे. त्याच्यामध्ये सुद्धा अशा प्रकारे लॉजिंग आणि बोर्डींग चालू राहते. भाजी मार्केटमध्ये लॉजिंग आणि बोर्डींग आहे. हे काय चाललय काय? सरळ मिरा भाईंदर लॉजिंग बोर्डींग असे म्हणा ना. कशाला परवानगी देता? आपल्याला हे पाहिजे पण सगळ्यांना सरसकट कुठे परवानग्या द्यायच्या? हे ठरवायला नको का? मिरा भाईंदरला आपण वाटेल तसे व्यवसाय उघड्यावर चालवून देतात. हे काय चालवले आहे? हे अंधाधुंदी चालत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेत सत्ताधाऱ्यांचे प्रशासनावर जरा सुद्धा अशा पद्धतीने लक्ष नाही. म्हणून हे दिले जाते.

**आसिफ शेख :-**

सत्ताधारी तुम्ही पण आहे ना. स्टँडींग कमिटीचे मेम्बर आहात.

**रतन पाटील :-**

साहेब, ह्या परवानग्या दिल्या कशा जातात? परवानग्या कशा दिल्या जातात?

**आसिफ शेख :-**

सन्मा. पिठासिन अधिकारी साहेबा, ह्या ठिकाणी विषय आहे आपण लॉजिंग बोर्डींगला परवानग्या देण्या संदर्भात किंवा त्यांचे दर निश्चित करण्यासंदर्भात याठिकाणी कोण काय खातो, कोण काय पितो, कोणाला काय आवडते हा प्रत्येकाचा आपपला वैयक्तीक विषय आहे. कोण पडद्याचा आड आहे. कोण पडद्याचा मागे आहे असे प्रकार करतात याठिकाणी लॉजिंग बोर्डींग जे आहेत. शासनाचे काही निकष आहेत. त्या निकषाप्रमाणे जर समजा मंदिर आहे मस्जिद आहे, चर्च आहे, शाळा आहे, पब्लिक स्कुल आहे, मार्केट आहे. अशा ठिकाणी परमिशन देताना आपण दक्षता घेतली पाहिजे आणि जिथे रहिवास भाग आहे. ज्याठिकाणी लोक राहतात. सोसायट्या आहेत, अशा ठिकाणी परवानगी देउच नये कारण लोकांमध्ये चुकीचा संदेश जातो. तर हे सगळे ज्या लॉजिंग बोर्डिंगमध्ये जे प्रकार होतात. ते शहराबाहेरच पाहिजेत. शहराच्या आत असे प्रकारचे म्हणजे विशेषतः म्हणजे शाळा आहेत, कॉलेजेस आहेत आणि मार्केट प्लेस आहेत किंवा जिथे रहिवास भाग आहेत त्या ठिकाणी आपल्याला देताना दक्षता घेणे अत्यंत आवश्यक आहे. तर तेच सगळे वगळून अन्यठिकाणी परवानगी देताना आपले जे नियम आहेत. त्या नियमाला अनुसरून सरकारचे जे निकष आहेत. त्या निकषाप्रमाणे परवानगी घ्यायला मला वाटते हरकत कुणाची असणार नाही. फक्त हे जे आपण सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेउन आपण त्याप्रमाणे निर्णय घ्यावा.

**रतन पाटील :-**

आता जे आहेत त्यांच्या परवानग्या कॅन्सल करणार आहेत का? रद्द करणार आहेत का?

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. पिठासिन अधिकारी, त्याठिकाणी महत्वाचा मुद्दा असा उपस्थित होतो की, लॉजिंग बोर्डींगला सर्व नगरसेवकांच्या जर अशा प्रकारच्या जी मते आपण विचारात घेतली तर सर्वप्रथम लॉजिंग बोर्डींगला आपण परवानगी देतो काय? किंवा कुठली ऑथेरीटी ती परवानगी देते? आणि अशी परवानगी देताना आपले मत विचारात घेतले जाते का? अशा प्रकारे आपण याठिकाणी पहिले प्रशासनाने स्पष्टीकरण करावे.

**हंसुकूमार पांडे :-**

शहर मे ऐसे कितने हॉटेल्स बने है। जिसका परमिशन लॉजिंग बोर्डींग का नही है। खाली बिल्डींग बनाया है। उसके बाद मे बिल्डिंग कम्प्लीट होने के बाद मे उसको लॉजिंग बोर्डींग का बोर्ड लगाया। आप उस बारे मे स्पष्टीकरण दिजीए।

**शिवप्रकाश भुदेका :-**

सन्मा. सदस्य हंसुकुमार पांडे साहेब, उधर मोर्चा लेके गए थे और उन्होने अच्छा काम किया। पर वह ग्राहक बनके गये थे। पहला ग्राहक बनके गए थे।

**हंसुकूमार पांडे :-**

हंसुकुमार पांडे यह सब लाईन मे नही है। जो लाईन मे है उसे सब मालू है। यह पुरी मिरा भाईंदर १० लाख लोकसंख्या है ना वह जानती है की, हंसुकुमार पांडे केसा इन्सान है वह पुरी लोकसंख्या जानती है। आपको जितना जानती है उससे ज्यादा मुझे जानती है। चूपचूपके जानेवालेमे से आप है। आप को तो अनुभव है की, आप कहाँ कहाँ जाते हो। आप बोलिए, मै ये बात साबित भी कर सकता हूँ।

**शिवप्रकाश भुदेका :-**

मेरा ही मुझको साबीत कर रहे है।

**हंसुकूमार पांडे :-**

मुझे बस इतनी परमिशन दिजिए। यह टिकेवाले है ना यह टिकेवाले सब पहूचे हुए लगते है। दिखने मे छोटे होते है। यह बी.जे.पी. का खोटा सिक्का है। लेकीन सन्मा. रोहिदास पाटील, (काका) इन्होने अभी तक पहचाना नही है।

**शिवप्रकाश भुदेका :-**

पर यह ग्राहक बनके गए यह बात पक्की है।

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य हंसुकुमार पांडे साहेब, और सन्मा. सदस्य शिवप्रकाश भुदेका साहब, यह जो वक्त है वह अंदर की बात है। परदे मे रहने दो परदा ना उठाओ। परदा जो उठ गया तो फिर सबकुछ उठ गया। इसलिए वह बाते अंदर की है अंदरही रहने दिजिए।

**मा. आयुक्त :-**

प्रकरण क्र. ८ वर सभागृहामध्ये जी चर्चा सुरु आहे तो विषय आहे, विक्री/साठा/उत्पादन करणाऱ्या आस्थापनेस आरोग्य लायसन्स (हेल्थ लायसन्स) चे दर निश्चित करणेबद्दल आहे. त्यामध्ये सभागृहामध्ये मगास पासून जी काही चर्चा चालू आहे ती लॉजिंग बोर्डींग विषयावरती चर्चा सुरु आहे. मी लॉजिंग बोर्डींच्या बाबतीमध्ये संबंधित विभागाकडून माहिती घेतलेली आहे. परंतु, त्या ठिकाणी असे आढळले आहे की, एखादी इमारतीस रहिवास उभारण्यासाठी परवानगी देण्यांत येते आणि हा कमर्शियल वापर केला जातो आणि हा कमर्शियल वापर करण्यासाठी त्यांची स्वतःची अर्ज असतात की आम्ही ह्या ठिकाणी कमर्शियल दराने द्यायला तयार आहोत. त्याप्रमाणे आपण काही ठिकाणी लॉजेसना वगैरे अशा प्रकारच्या लायसन्य इश्यु केल्या असतील किंवा त्याला टॅक्स लावला असेल. परंतु, सभागृहामध्ये जी रंगरुप चर्चा ह्या ठिकाणी सुरु आहे. त्या गांभीर्य पूर्वक चर्चेचा सुर लक्षात घेता मी आपल्याला, सभागृहाला एक आश्वासन देउ इच्छीतो की, ज्या ज्या ठिकाणी अशाप्रकारे रहिवास विभागामध्ये लॉजिंग बोर्डींग ज्यांनी ज्यांनी सुरु केलेले असेल त्यांच्यावरती ताबडतोब एम.आर.टी.पी ॲक्टखाली न्युजअप चेंज म्हणून वापर जो केला जातो. त्यांचा त्या बाबतीमध्ये त्यांच्यावरती गुन्हे दाखल केले जातील आणि त्यांना जो काही लायसन्स महापालिकेने दिलेले असतील ते साधारण दोन दिवसामध्ये मी अशा प्रकारचे सगळे लायसन्स रद्द करुन टाकतो.

**रतन पाटील :-**

त्याच बरोबर शाळा, कॉलेज आणि मार्केट .........

**प्रभात पाटील :-**

एक सेकंद मी एवढ्यासाठी बोलते की, मगासपासून जो उल्लेख होतो. माझ्या प्रभागात असलेल्या नालंदा गेस्ट हाउस ह्या लॉजिंग बोर्डींचा जो उल्लेख होतो. ते अगदीच माझ्या बाजूला आहे. तर तिथे बऱ्याच वर्षापासून आहे. अगदी सगळ्यांचे दरवाजे ठोकून झाले. आपल्याकडून झाले ना तर निश्चित प्रमाणे प्रभागतल्या सगळ्या लोकांकडून ............

**मा. आयुक्त :-**

मॅडम, आपण जो प्रयत्न करणार आहोत. हा वैयक्तिक स्वतःला कुठेतरी एक वेगळेपणा प्राप्त व्हावा यासाठी आपण करत नाही. आपण करतो ते शहरासाठी करतो.

**प्रभात पाटील :-**

पण, मी तुम्हाला एक मुद्दा सांगतो की, तुम्ही त्यांना लायसन्स इश्यु केले की, नाही हे मला माहित नाही. पण, निश्चितपणे आपली तिथे पहीली कारवाई व्हायला पाहिजे. कारण अगदी .......

**मा. आयुक्त :-**

सभागृहामध्ये जी मगासपासून चर्चा सुरु आहे. त्या चर्चेच्या अनुषंगाने मी आपल्याला सांगू इच्छितो की, ज्या ज्या ठिकाणी रहिवासी भागामध्ये अशाप्रकारे जर लॉजिंग - बोर्डींग सुरु केलेले असतील त्यांच्यावरती तातडीने कारवाई करण्यांत येईल आणि त्यांना कुठल्याही प्रकारचे लायसन्स दिले जाणार नाही. हा पहिला मुद्दा आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, साधारणतः शहरामध्ये जेवढे जवढे ज्याठिकाणी लॉजिंग - बोर्डींग सुरु आहेत तर त्यांना कुठल्या प्रकारच्या परवानग्या दिलेल्या आहेत ह्याचा हिशोब घेण्यात येईल. त्यांना जर समजा रिपेरींगच्या नावाखाली जर समजा ज्यांनी त्या ठिकाणी वेगळ्या प्रकारचे हॉटेल बांधले असेल किंवा लॉजिंग - बोर्डींग चालू केले असेल तर त्यांचे लायसन्स ताबडतोब रद्द करण्यांत येतील.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आता आपल्याला ह्याबद्दल ..........

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, प्रभाग क्र.६ मध्ये चाललेल्या ब्ल्यु फिल्मचे पोस्टर्स नागडे - उघडे लागलेले असतात. त्याच्यावर तुम्ही का बोलले नाहीत? होर्डींग्ज लावलेले असतात. पोस्टर्स लागलेले असतात. व्हिडीओ टॉकीज ते उचलायचे आदेश दिले का?

**मा. आयुक्त :-**

आपण सांगितल्या प्रमाणे अनावधाने राहीले असेल. त्यांच्याबद्दल खुलासा करु इच्छितो की, आपण जाहिरातीच्या बोर्डला परवानगी देतो. आपण जाहिरातीसाठी परवानगी देतो. जे कोणी जाहिरातदार असतील किंवा ते स्वतःचे बोर्ड लावण्यासाठी उत्सुक असतील ते महापालिकेमध्ये फी भरतात आणि त्याप्रमाणे त्यांना परवानगी दिली जाते. परंतु, असे जर समजा बिगर परवानगीचे बोर्ड बरेच ठिकाणी आहेत. आपण सांगतात त्याप्रमाणे लगेच उद्याच्या उद्या शोध घेण्यात येईल आणि अशाप्रकारचे जे जे असतील ते ताबडतोब काढण्यात येईल. आणि त्यांच्यावरती कारवाई केली जाईल.

**प्रभात पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, मी ह्याबद्दल आपले आभार मानते. कारण अशा प्रकारच्या ह्यांना कारवाईचे निर्देश दिले. आमचे समाधान होईल. इतक्यात कारवाई तुमच्याकडे नक्कीच होईल अशी आम्ही अपेक्षा करतो. एकंदर तुमच्या अशा सल्ल्याने निश्चितपणे मनाला थंडावा मिळालेला आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

ज्यांनी परवानगी घेउन बोर्ड लावलेले आहेत ते अश्लील बोर्ड आहे. ते घाणेरडे चित्र आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, अशागृहामध्ये हा विषय आलेला आहे. आणि त्यांच्यावरती मा. कमिशनर साहेबांना खुलासा केला. त्या खुलाशावरती आम्ही संपूर्ण सभागृह अतिशय खुश आहेत. मा. कमिशनर साहेब आगे बढो, हम तुमारे साथ है। हे भयंकर चांगले काम आहे. हे तुमच्या कारकीर्दमध्ये झाले तर निश्चित या मिरा भाईंदरची जनता अभिनंदन करेल व आपल्याला धन्यवाद देईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा विषय एकदम महत्वाचा विषय आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आपण आज आम्हाला सभागृहाला अश्वासन दिलेले आहे. हे जर आपल्या हातून घडले तर निश्चित इथली जनता आपल्याला खरोखर धन्यवाद देईल. मा. महापौर मॅडम, आपल्या काँग्रेस पक्षाच्या गटनेत्यांनी सांगितले की हे जर काम आपल्या हातून घडले तर आम्ही निश्चितपणे काँग्रेस पक्षातर्फे आपले स्वागत करतो.

**आसिफ शेख :-**

काँग्रेस पक्षानी केले नाही हे सर्वांसाठी केले आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

यहॉ बहुत लोग आए और बोल के गए। लेकीन मा. कमिशनर साहब ने जो आश्वासन दिया की, वह काम करेंगे। इसलिए हम बोले की, वह काम करके दिखाए। हम जाहिरपणे उनका सत्कार करेंगे। पुरा सभागृह मिलके करेंगे।

**मुक्ता रांजणकर :-**

बी.पी. रोडवरती वेश्या व्यवसाय चालू आहे. बी.पी. रोडवरती संध्याकाळच्या वेळेस जे धंदा करतात. साहेब, तुम्ही ह्यावर सुध्दा काही करु शकता ना.

**मा. आयुक्त :-**

ह्या संदर्भामध्ये पुन्हा एकदा सभागृहाला सांगू इच्छितो की, ज्यांना ज्यांना लायसन्स दिले गेलेले आहेत. लॉजींगचे लायसन्स दिलेले असतील, बोर्डीगचे लायसन्स दिलेले असतील तर ते तातडीने रद्द करण्यात येतील आणि सभागृहाला माझी विनंती अशी राहील की, अशाप्रकारची कारवाई जर आपण हाती घेतलेले असेल तर थोडेसे कटूता आहे. परंतु, हे कटूता आम्ही स्विकारायला तयार आहोत. कृपया आपण साथ द्यावी. कारण काय होते की, शेवटी कोणीतरी येतो आणि सांगतो की, हे माझे आहे हे जरा बघा. कृपया आपल्याला माझी विनंती आहे की, अशाप्रकारच्या शिफारशी आपणही करु नका.

**मुक्ता रांजणकर :-**

करताना जर एखाद्या नगरसेवकाची शिफारस आली तर तुम्ही काही करु नका.

**हॅरल बोर्जीस :-**

सभागृहाला मी सांगतो की, अशा सन्मा. सदस्यांचे शिफारस पत्र आले तर सरळ फाडून फेकून टाका.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, अपने दो सदस्य लॉजिंग - बोर्डीगवाले आज आए नही है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, हा विषय महत्वाचा विषय आहे. लॉजिंग - बोर्डीग आणि सगळे विषय झालेले आहे. हा विषय जो आपण मा. आयुक्त साहेबांनी घेतलेला आहे. महत्वाचा विषय आहे. आपण एक तासापूर्वी एस्सलवर्डच्या गेटवर आपण डिसीजन करत होतो. आणि महापालिकेचे उत्पन्न जात आहे आणि उत्पन्न वाढवायचे हा विषय ह्या शहराच्या दृष्टीने, उत्पन्नाच्या दृष्टीने फार महत्वाचा आहे. म्हणून ह्याच्यावर थोडी चर्चा होणे गांभीर्याने चर्चा होण्याची गरज आहे. मा. आयुक्त साहेब सर्वप्रथम आपल्याला हा जो प्रस्ताव आणलेला आहे. आपण नेहमी अधिकाऱ्यांना जेव्हा काही गोष्टी आणायची असेल तर ठाणे, कल्याण, डोंबिवली महापालिकेचे आपण उदाहरण देउन या महापालिकेमध्ये प्रस्ताव आणतो. ठाणे महापालिका, कल्याण महानगरपालिका, अंबरनाथ महानगरपालिका ह्या आपल्या महानगरपालिकेच्या आधी ५-५, १०-१० वर्षापूर्वीची महानगरपालिका आहे आणि आपले बजेट ३०० कोटी रु. च्या वर आहे आणि त्यांचे कुणाच्या २५ हजार, ४० हजार कोटी रु. चे बजेट आहे. अशा वेळी फक्त मुंबई महापालिका किंवा अंबरनाथ महापालिका किंवा ठाणे महापालिकेतला एक तक्ता आपल्या मा. महासभेत ठेवायचा आणि व्यापारावर अन्याय करण्याचा जो प्रकार आहे तो पहिला थांबला पाहिजे. आपल्या सबुद्धीने ज्या अधिकारी यांनी ठराव आणलेला आहे. त्यांनी आपल्या सुबुद्धीने हा ठराव आणायला पाहिजे होता. सर्वप्रथम मा. आयुक्त साहेब आपण खुलासा करावा ह्या महापालिकेला किती कोणत्या कोणत्या प्रकारचे लायसन्स देण्याचे अधिकार आहे. कारण या ठरावामध्ये जी विसंगता आलेली आहे. लॉजिंग-बोर्डीग, बिअर-बार म्हणजे शेवटी आपण लायसन्स कोणाला देणार आहे. कारण, आपल्याला मी आधीही सांगितले आपल्याकडे २ डिपार्टमेंट काम करतात. एक डिपार्टमेंट आरोग्य खाते त्याला जे खादय पदार्थ आहे. त्या खादय पदार्थांवर त्याची देखरेख त्याचा लायसन्स देण्याचा अधिकार आहे. तेच अधिकार फूड ॲण्ड ट्रस्ट ठाणे त्यांनाही अधिकार आहे. ते आज त्यांचे अधिकार घेउन काढण्यात आलेले नाही. त्या अधिकाराचा वापर अजूनही करतात. दुसरा लायसन्स जे खादयपदार्थ विकत नाही. जसे एक इंडस्ट्री आहे किंवा एक दुकान आहे, लायब्ररी आहे. दुकानात एक व्हिडीओ गेमचा पार्लर आहे. जे हलके अशांना लायसन्स कोण देणार? कारण, आपण डिपार्टमेंटकडून टोटल व्यापारांना दोन-दोन नोटीस गेलेली आहे. एक नोटीस माझे लायसन्स घ्या आणि आरोग्य खात्याचे गेले आमचे लायसन्स घ्या आणि लोकांना हरेसमेंट झालेले आहे. आणि ह्याची चर्चा मा. स्थायी समितीमध्ये काकांनी केलेली आहे. श्री. धनराज अग्रवाल यांनी प्रत्यक्षात तुमच्या केबिनमध्ये येउन केलेली आहे. ज्या दुकानामध्ये दुकान चालत नाही. एकाने दुकानामध्ये न्यू इनव्हेटमेंट करुन ठेवली की दुकानामध्ये हे दुकान भविष्यकाळामध्ये माझ्या कधी कामाला येईल. कारण, तो बंद आहे, लॉक आहे. फक्त शॉप म्हणून त्या शॉप ऑफ सर्विस म्हणून टॅक्स भरतो. त्यालाही आपण नोटीस पाठवली. जर आपण एन.ओ.सी. घेतली नाही आपण कायदयाच्या दृष्टीने ह्या कलमावर आपल्यावर कारवाई त्या दुकानाला काही नाहीच आहे. हे दुकान फक्त इनव्हेसमेंट करुन ठेवलेली आहे. मग, अशी गोष्टी करताना प्रशासनाला कोणाला नोटीस दिली पाहिजे, कुठे नोटिस दिली पाहिजे, तो धंदा करतो की नाही, ह्याची पाहणी करायची काही गरज नाही. आणि जेव्हा मी उत्तर दयायला गेलो तेव्हा अधिकारी सांगतात. आमच्याकडे स्टाफ नाही म्हणजे तुम्हाला नोटीस वाटप करण्यासाठी स्टाफ आहे. पण त्या दुकानामध्ये किंवा त्या परिसरामध्ये कुठला धंदा चालू आहे. त्याचा सर्व्हे करण्याचा तुम्हाला वेळ नाही. हा अन्याय चाललेला आहे. या भाईंदरमध्ये एक दहशतीचे वातावरण आपल्या महापालिकेने या एन.ओ.सी. च्या मार्फत केलेले आहे. म्हणून आपला ठराव आणलेला आहे. फार आनंदाची गोष्ट आहे. पण, ठरावामध्ये सुद्धा पुन्हा अधिकाऱ्यांनी म्हणजे मतभेद केलेले आहे. हे जे छोटे व्यापारी आहेत आणि जे हॉटेल मालक आहेत. ह्यांच्यामध्ये जे हॉटेंल मालक लाखो रुपये कमावतात. साहेब, तुम्ही त्यांचे दर बघा. आणि जे छोटे व्यापारी आहेत त्यांचे दर बघा आणि काही मंडळी

आहेत जे छोटे उदयोगापासून मोठया उदयोगामध्ये आलेले आहेत. आम्हांला त्या गोष्टीबद्दल माहित आहे की, कुठे कुठे कुठला टॅक्स लावला पाहिजे. आज एक जो छोटासा किराणा व्यापारी आहे. तो दहा प्रकारचे टॅक्स भरतोय. ऑक्ट्राय टॅक्स तो देतोय, घरपट्टीचे टॅक्स तो देतोय, सेल्स टॅक्स, सर्विस टॅक्स तो देत आहे. इन्कम टॅक्स देतोय असे करुन तो २० हजार रु. टॅक्स भरतो आहे. आणि सदर त्याचे उत्पन्न भाईंदर महापालिका किती मोठी झाली असेल तर आज तुम्ही भाईंदरच्या कुठल्याही दुकानात गेले तर त्याचा रोजचा धंदा २ हजार रु., अडीच हजार रु. च्या वरती नाही. आणि त्यामध्ये पुन्हा रिलायन्स एनर्जी, सुभिक्षा हे जे सहकारी भांडार जे गावात, शहरात आलेले आहे. ते लोक १०टक्के कमी दराने माल विकतात. म्हणून जे छोटे उद्योग आहे ते आज ह्या परिस्थितीने झाले आहे की त्यांना धंदा बंद करण्याची पाळी आलेली आहे. म्हणून आज आपण ठराव आणतेवेळी तुम्ही जे जे काही करता तुम्ही व्यापारांना बोलायला पाहिजे. मी जेव्हा मा. आयुक्त साहेब, मा. उपायुक्त साहेबांना विचारले. तुम्ही हॉटेल मालकांना बोलवले कारण हॉटेल मालक समर्थ आहेत आणि तुम्ही त्यांच्याप्रमाणे केले. तुम्ही किराणा वाल्याला परवा बोलावले. बोलावले नाही. तुम्ही जे हेअरकटींग सलून आणि पी.सी.ओ. चे मालकी आहेत. त्यांनासुद्धा तुम्ही बोलवले नाही म्हणजे, तुम्ही ज्या गोष्टीचा ह्या शहरामध्ये उत्पन्न वाढले पाहिजे, ह्या शहरामध्ये महापालिकेचा काहीतरी व्यापार उदयोग चालू व्हायला पाहिजे. ह्याची आपण नोंद घेतली नाही. म्हणून ही दुःखाची बाब आहे. हा प्रस्ताव आलेला आहे. म्हणून मी आपल्याला धन्यवाद देतो. मी माझा ठराव मांडतो. यामध्ये जे काही सुचना असतील त्यांनी दयावी आणि आमचा ठराव....

**रतन पाटील :-**

आम्हांला सुद्धा मांडायचे आहे. तुम्ही नंतर सुचना घ्या.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी, श्री. धनराजजीसे मैंने बात की है। मैं ठराव रखता हूं। कोई सुझाव होगा वह आप रखिए। मेरा ठराव सुनने के बाद आपका...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य बोर्जीस साहेब, लायसन्स देताना जे पिटीशन घ्यायचे ते माझी सुचना घ्या. तुम्ही आधी सुचना घ्या.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्हांला अगोदर सुचना मांडायची परवानगी दयावी.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर महोदया, जे रेट आहेत ते सगळे नवी मुंबईचे रेट आहेत. आपल्याकडे मोठमोठे कारखाने, उदयोग नाहीत. त्यामुळे लायसन्स फि कमी व्हायला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, एक नगरसेवक निटनेटकी बाजू मांडत असताना दुसऱ्याला त्रास कशाला होतोय? मला बोलू दया. कारखानदारीची बाजू आहे तीही मांडू दया. छोटया मोठया व्यापाऱ्यांची बाजू आहे तीही मांडू दया. घाई-घाई करण्याचे कारण नाही. सात वाजायला अजून पुष्कळ वेळ आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण तुम्ही जे सुचना मांडणार आहे. आपण आज शहरामध्ये लायसन्स पद्धती सुरु केलेली आहे. पहिले तर ह्या सभागृहामध्ये आज खुलासा झाला पाहिजे. कुठला लायसन्स कुठला डिपार्टमेट देणार आहे? आणि कोणाला कुठला लायसन्स घ्यायचे आहे.मा. महापौर मॅडम, ज्या पद्धतीने अधिकाऱ्यांकडून लोकांना हरेसमेंट केले जाते. मा. आयुक्त साहेब, ह्या नोटीसा आहेत. सन्मा. सदस्य बोर्जीस साहेब....

**हॅरल बोर्जीस :-**

आम्हांला ठराव वाचायचा आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एक मिनिटं थांबा, तुम्ही ठराव मांडा. ठराव मांडायचा मग, आम्ही बोलायचेच नाही का? सन्मा. सदस्य बोर्जीस साहेब...

**आसिफ शेख :-**

चार ओळींचा ठराव आहे. तुमच्या ज्या सुचना असतील त्या ॲड करुन घ्या.

**शुभांगी नाईक :-**

सुचना मांडायच्या आधी आमचे दोन मिनिटे ऐका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, मी बोलतोय आपण सभागृहात सभागृहनेते आहात आपण समजून घेतले पाहिजे.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, काही ठिकाणी व्हिडीओवाले आहेत आणि आतमध्ये ॲडल्स पिक्चर चालतात आणि बाहेर चित्रपट सिनेमा असे पोस्टर्स लावतात ह्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार. कारण, त्याठिकाणी एक महिला बसलेली असते आणि विचारायला गेली की, इथे काय तुम्ही परमिशन घेतली आहे का? तर तुम्हाला काय करायचे आहे. तुम्ही विचारणारे कोण? अशी बोलते? म्हणजे आम्ही नगरसेवक असूनसुद्धा ती महिला आम्हांला अशी दादागिरी करत असेल तर तुम्ही त्या महिलेवर सुद्धा कारवाई करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, आपण एकतर ठरवायचे की, कुठला लायसन्स कुठल्या डिपार्टमेंट देणार आहात आपण ह्याची व्यापारास सविस्तर माहिती दिली पाहिजे. आता मी जे अटीशर्ती बोलतो आहे. मा. महापौर मॅडम, आपण जे लायसन्स देणार आहोत. मा. आयुक्त साहेब, आपण जे लायसन्स देणार आहोत त्यामध्ये जी अटीशर्ती् आहे. पहिली अटीशर्ती आहे, महानगरपालिका २००१ पूर्वीच्या उदयोजकांना प्रमाणपत्र. ज्यांच्याकडे स्वतःचे ग्रामपंचायत नगरपालिका काळातील ॲग्रीमेंट, सातबारा उतारा, बिल्डिंग परवाना व सोसायटी एन.ओ.सी ची मागणी करणारे आता आपण जे नवीन लायसन्स आहे. जे २००१ पूर्वी नगरपालिकेच्या काळात जे दुकानाची एस्टॅब्लिशमेंट आहे. त्या सोसायटीमध्ये आपण त्यांच्याकडे एन.ओ.सी. चा दाखला, सातबारा उतारा किंवा परवानगी अशी आपण अटीशर्ती त्याच्यामध्ये देणार आहोत. कारण, ह्याच्यामुळे आज आपण टॅक्स लावू शकलो नाही तर, एक ती अटीशर्त आहे. एक फॉर्म किंवा लिमिटेड कंपनी किंवा एक भागीदार त्याचे दुकान, गोडाउन अनेक ठिकाणे असतील. त्याला फक्त एकच लायसन्स लागू होणार. म्हणजे, श्री. ओमप्रकाश गाडोदिया ह्यांची दहा गोडाउन आहेत. पण, ओमप्रकाश गाडोदीया प्रायव्हेट लिमिटेड ह्यांना एकच लायसन्स देउ केला पाहिजे. मा. आयुक्त साहेब, नविन लायसन्स देताना ज्या ठिकाणी हॉटेल्स किंवा जे आपले खादयपदार्थ बनवतात. ते फारपूर्वी काळापासून असेल. २००१ पूर्वीचे त्यांना जर आपण कम्पलसरी फायरब्रिगेड चे एन.ओ.सी. सांगितली तर त्याला ताबडतोब जे २००१ पूर्वीचे आहेत. त्यांना ताबडतोब फायरब्रिगेड कडून एन.ओ.सी मिळाली पाहिजे. नाहीतर फायरब्रिगेड देणार नाही. सोसायटी एन.ओ.सी. देणार नाही, फायरब्रिगेड एन.ओ.सी देणार नाही म्हणून २००१ पूर्वीचा निकष धरून ज्या ज्या ठिकाणी खादयपदार्थ विक्रिचे दुकान आहे. त्यांना ताबडतोब फायरब्रिगेडची एन.ओ.सी. मालकाला दिली पाहिजे आणि त्यांना लायसन्समध्ये सोशकता आणायला पाहिजे. मा. आयुक्त साहेब, लायसन्स देताना ठाणे महापालिका, मुंबई महानगरपालिकामध्ये किमान एक वर्ष आणि जास्तीत जास्त ३ वर्ष एका वर्षासाठी जो भरतो त्याला एका वर्षासाठी किंवा तुम्ही त्याला किमान ३ वर्षाचे लायसन्स दिले पाहिजे. म्हणजे प्रत्येक वर्षी त्याला लायसन्स दयायला नको. किमान १ वर्ष किंवा जास्तीत जास्त ३ वर्षाचे लायसन्स हे आपण त्याच्यामध्ये अटीशर्ती ठेवा. आणि रिन्यूव्हलच्यावेळी ज्या फॉर्ममध्ये, ज्या पार्टनरशिपमध्ये ज्या दुकानामध्ये कुठलाही बदल झाला नसेल, त्याची रिन्यूव्हल ताबडतोब केली पाहिजे अशी आमची ह्यामध्ये सुचना आहे आणि आपण जे रेट दिलेले आहे. काही किराणाच्या दुकानाला आपण किराणा रेट दिलेला आहे. आता एका किराणाच्या दुकानामध्ये १०० वस्तू असतात. अर्धा किलो मिरची, अर्धा किलो तांदूळ, तुम्ही प्रत्येक गोष्टी जे छोटी मोठी दुकाने आहेत. त्यांच्या इस्कॉल फिट नाही. इस्कॉल फिटने रेट ठरवून आणि लोक जास्त्ीत जास्त टॅक्स भरतील अशी सुचना आम्ही करतो.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, उसमें एक-दो चीज रह गया। इसमें अलग-अलग -- इसमें जो दर दिए है स्क्वेअर फूट पे बार रेस्टॉरन्ट और छोटा किराणा दुकान के लगभग एकही दर है। जो बडे-बडे हॉटेल्स है उसका भी एकही दर है। तो वह दर में सभी नही होते। जैसे अभी सन्मा. हॅरल बोर्जीस साहब से अभी बात हूई की, किराणा दुकान का दर ७५ टक्के से नीचे लाने का है। किराणा दुकान का और जो इसके गोडाउन है और इसमें आपने अलग-अलग दिये है वह व्हेजिटेबल ऑईल इसलिए। वह व्हेजिटेबल हो इसलिए उसका दर भी उसके माप के उपर से नहीं होगा। इसमें भी आपको उसके लिए स्क्वेअर फूट से लगाना पडेंगा। मैं आपको बताता हूँ। व्हेजिटेबल ऑईल नंबर ११ में ह्याच्यात सुद्धा आपण ० ते १५० पर्यंत, १५० ते २५० पर्यंत, २५० ते ३५० पर्यंत ४००, ३५० ते ४५०, ५००, ४५० ते ५५० पर्यंत ६१० असे पर स्क्वेअर मीटर ५० रु. पण त्याच्यात आपल्याला ७५ टक्के कमी करायचे आहे हे दर ह्या लोकांनीच दिलेले आहे. ते किलो मध्ये करता आपण स्क्वेअर फूटमध्ये केलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, आपण एन.ओ.सी.साठी जो प्रस्ताव आणलेला आहे. ना हरकत..

**धनराज अग्रवाल :-**

५ नंबर (२) मध्ये किराणा दुकान स्टोअर्सने मेडिकल स्टोअर्स आहे. आपण त्याच्यामध्येसुद्धा किलो मध्ये दिलेले आहे. ते सुद्धा आपण ० ते १५०...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पण, आता आपल्याला मेडिकलसाठी लायसन्सचा अधिकार नाही. साहेब, तुम्ही मेडिकलचे एन.ओ.सी. देता. फूड ॲण्ड ट्रस्ट डिपार्टमेंट आहे म्हणून मी सांगतोय की, आपण शेवटी लायसन्स कोणाला देणार आहोत? तुम्हाला आमच्या मेडिकल लायसन्सचा अधिकार नाही. तुम्हाला एन.ओ.सी. देण्याचा अधिकार आहे.

**धनराज अग्रवाल :-**

मेडिकल चे काढून टाका. ४ नं.मध्ये किराणा स्टोअर्स आणि दुसरे स्टोअर्स ०रू. ते ५०रु. ते १६०रु. , ५०रु. ते १००रु.,२५०रु., १००रु. ते १५०रु., ४१०रु., १५०रु. ते २५०रु.,६१०रु., २५०रु. ते ३५०रु., ६७०रु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ज्या गोष्टी लागू होत नाही. त्या लागू केलेल्या आहेत ना.

**धनराज अग्रवाल :-**

५ नं. मध्ये, राईस, व्हीट, जवार, शुगर, केन तेल, ऑनियन (कांदा), बटाटा वगैरे ह्याच्यातसुद्धा व्हेजप्रमाणे नाही. ह्याच्यातसुद्धा स्क्वेअर फूटप्रमाणे करा. स्क्वेअर फूट आहे ० ते १५०रु., २५०रु., १५० जे २५०रु., ३२५रु., २५० ते ३५०रु., ४००रू., ३५० ते ४५०रु., ५००रु., ४५०रु. ते ५५०रु. ६१०रु., ५५० आणि अबॉव्ह ते स्क्वेअर मीटरप्रमाणे, याप्रमाणे, आपण चेन्ज करा आणि हे जे रेट दिलेले आहे. त्याचा ७५टक्के कमी ने केले पाहिजे आणि रिन्यूव्हल करता तुम्ही जे कागदपत्र मागवतात. लायसन्स देताना जे कागदपत्र मागवतात. ते एन.ओ.सी. वगैरे सोसायटीचे देत नाही. सोसायटी आता एन.ओ.सी. देत नाही. ज्यांच्याकडे जुने लायसन्स आहे. तुम्ही त्यांना असेच दिले पाहिजे. जो माणूस टॅक्स भरतोय. त्याला तुम्ही असेच दिले पाहिजे. जो टॅक्स भरत नसेल त्याला लायसन्स देउ नका. पण जो माणूस पुढे दुकानदाराचा कर्मशियल टॅक्स भरतो. त्याला आपण लायसन्स दिले पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, दुसरा विषय असा आहे की, तुम्ही कारखानदाराचा विषय दिलेला आहे. तेव्हा तुम्ही नुतनीकरणाचे ३००० रु. टॅक्स लावल्याचे हयात लिहिले गेले आहे. आज अमुक ५ हजार फॅक्टरीपैकी हजार फॅक्टरीसुद्धा सुरु नाही. जकातीच्या नावाखाली सगळे पिळून निघाले. लोक इथून उचलबंदी करुन बाहेर गेले. साहेब, उरलेले तुम्ही सांगणार, नुतनीकरण करायचे आहे, नवीन घ्यायचे असेल तर ५ हजार रु., नुतनीकरणाचे ३ हजार रु. साहेब ही की कोणाला परवडणार? आपण त्यांनाही जिवत ठेवायला पाहिजे ना. ह्याचा कुठेतरी फेरविचार व्हायला पाहिजे. त्यांची फॅक्टरी चालत नाही. ते नुसते अगरबत्ती लावतात, उघडतात आणि निघून जातात. पण, तुमचा माणूस आला की, ३ हजार रु. भरा. हे कसे आहे? आपण कुठेतरी त्याचा अंदाज घेतला पाहिजे. उत्पन्नाची बाजू म्हणून दाखवून चालणार नाही. काही काहींना महापालिकेला तोटा घेउन सुद्धा काही व्यवसाय चालले पाहिजेत. हे ३ हजार रु. दयायला येथे माणूस आहे का? साहेब, ५ हजारापैकी १ हजार फॅक्टरी नामधारी चालू आहे. ४ हजार फॅक्टरी बंद आहेत. कामगार येतात जातात काही काहींनी बंद केले. काही काहींचें शटर महिना महिना उघडत नाही. आपण त्याला ३ हजार रु. कसे देणार? वास्तविकता ठेवा ना. एन.ओ.सी. घेतली पाहिजे बरोबर आहे. एन.ओ.सी. घेणारा स्वतःहून आला पाहिजे. अशी परिस्थिती केली पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ग्रामपंचायत काळात फक्त १००रु. आणि २००रु. होते.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, मी ठराव मांडतोय, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील काही रहिवासी मार्गामध्ये बेकायदेशीर व अनधिकृत मटन कोळीवाडयामध्ये निघणारे दुकानदार आहे. जर त्यांना महानगरपालिकेने परवानगी दिले असेल तर रद्द करावे. व सोसायटीचा ''ना हरकत दाखला'' मंजूरी असल्याशिवाय कुठल्याही परवान्याला मंजूरी देउ नये. असा मी ठराव मांडत आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, साहेब म्हणतात की जो प्रस्ताव आणलेला आहे. ते लायसन्ससाठी आणला आहे की एन.ओ.सी साठी ह्याबद्दल जरा मला खुलासा करावा. आपण लायसन्स देणार आहोत की ना हरकत दाखला देणार आहोत?

**मा. आयुक्त :-**

लायसन्स देणार आहोत.

**नरेंद्र मेहता :-**

लायसन्स देणार आहोत. आता आपण जे रेस्टॉरंट, उपहारगृह म्हटले आहे. तर ह्यांच्याकडे हे लायसन्स जिथंपर्यंत माझा अनुभव आहे. फूड ॲण्ड ट्रस्ट ठाण्याकडून आपल्याला भेटते. आपल्याकडे ऑईल वगैरे टेस्टिंग करण्यासाठी सामुग्री आहेत का? उदया आपण हे सगळे कसे करणार? तेल मिक्सिंग आहे की नाही त्याच्या दृष्टीने त्यांना लायसन्स देण्याअगोदर आपली तयारी आहे का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बरोबर है। बरोबर अभी मुद्देपर आए।

**नरेंद्र मेहता :-**

पहिले हे आले. साहेब, हे धरुनच दुसरा विषय आहे.

**मा. आयुक्त :-**

बोला ना.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, दुसरी गोष्ट म्हणजे, आपला बराच विषय झाला होता. मटन शॉप आणि लॉजिंग आणि बोर्डींग माझ्या वॉर्डात बरेचसे मटन शॉप आहेत. जे मटन खाणारी माणसे आहेत तेच माझ्या वॉर्डामध्ये राहतात. आणि त्यांचीच जास्त तक्रार असते तर असे नाही की, जे खात नाही त्यांचीच तक्रार असते अशातला भाग नाही. मटन शॉपमुळे सर्वांनाच त्रास आहे. तर आपण त्यांना विदाउट एन.ओ.सी. देउ नये. आम्ही ज्यांना एन.ओ.सी नाही दिली त्याच्याबद्दल तक्रार करतो. तर शेवटी जे पूर्वीचे कंपोनेट ऑफिसर आहेत. जे मटनशॉप लायसन्सचे कामकाज बघतात. तुम्ही त्यांच्याकडे ठराविक पॉवर दिलेले आहे. त्यांना बोललो की सिल करा. तर ते बोलले की मा. आयुक्त साहेबांनी पॉवर दिलेले नाही. असे बरेचसे केसेस आहेत. छोटी छोटी गोष्ट आहे तर म्हणजे ह्याच्यामध्ये टाईमवेस्ट जातो. साहेब, आता आपण लॉजिंग बोर्डींग बद्दल म्हटलो. आपण जे ह्यांना उत्तर देतो. त्याच्यामध्ये थोडे कन्फ्युजन होते. आपण हे सांगितले की, ज्याला परवानगी नाही. ते तुम्ही बंद करणार. ज्याला लॉजिंग-बोर्डींग इमारत कर्मशियलची परवानगी नाही. ते तुम्ही बंद करणार. ज्याला परवानगी आहे आणि जर तो एखादा व्यापार करत असेल. तर त्याला अलाउड आहे का? आता सर्व सदस्यांची भावना ही होती की, लॉजिंग-बोर्डींग आम्हांला नकोच. आणि आपण हे उत्तर दिले की, जी इमारत रेसिडन्सिमध्ये कर्मशियल वगैरे काय झालेले आहे. चेन्ज ऑफ यूज केलेले आहे. तर एम.आर.टी.पी. ॲक्ट यूजेजचा इश्यू वर तुम्ही त्यांच्यावर कारवाई करणार का?

**नरेंद्र मेहता :-**

आपण ज्यांना लॉजिंग-बोर्डींगची, इमारतची परवानगी दिलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण परवानगी दिलीच नाही.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब आपण बऱ्याचशा हॉटेलला परवानगी दिलेली आहे.

**मा.आयुक्त :-**

मी तुम्हांला सांगतो ना...

**नरेंद्र मेहता :-**

साहेब मी व्टिस्ट करत नाही. मी व्यवस्थित बोलतोय. कारण मला माहित आहे आणि मी तुम्हांला खात्रीने बोलतोय. एकतरी लॉजिंग-बोर्डींग मिरा-भाईंदरमध्ये बंद झाले तर मी १०१ किलो पेढे वाटणार. मला माहित आहे हे होणारच नाही. साहेब फक्त बोलून काय होणार आहे? करुन दाखवा. होणार नाही. मी तुम्हांला बोलतो, १०१ किलो पेढे वाटणार. कारण मलाही तो मोठा त्रास आहे. साहेब, पहिले तुम्ही एकदम स्पष्ट क्लिअर करा.

**हंसूकूमार पांडे :-**

सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता साहब, आप मा. कमिश्नर साहब को चॅलेन्ज कर रहे है।

**आसिफ शेख :-**

साहेब बरोबर बोलत आहेत. ते चुकीचे बोलत नाही. कारण ते प्रभाग अध्यक्ष होते.

(सभागृहात गोंधळ)

**हंसूकूमार पांडे :-**

मा. कमिशनर साहब ने शिर्डी सुधारा कैसे यह आपको मालूम नही है।

**रतन पाटील :-**

मिरा-भाईंदर को भी सुधारेंगे।

**हंसुकूमार पांडे :-**

मिरा-भाईंदर सुधर जाएगा। आप यह देखिए।

**रतन पाटील :-**

साहेब, आपण ज्याला लॉजिंग-बोर्डींगची इमारत म्हणून परवानगी दिलेली आहे. त्याच्यामध्ये समजा असा एखादा व्यापार होत असेल तर त्याला तुम्ही परवानगी देणार की देणार नाही? समजा, टाउन प्लॅनिंगने त्याला कर्मशियल हॉटेल म्हणून परवानगी दिली असेल...

**मा. आयुक्त :-**

ज्यांना परवानगी दिलेली असेल तर त्यांचा प्रश्नच येत नाही. ज्यांची परवानगी नाही. ज्यांनी युज ऑफ चेन्ज केलेले आहे. मी त्याच्याबाबतीमध्ये सभागृहाला सांगितले आहे ना.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, तेच माझे म्हणणे आहे. ह्या सदस्यांची जी भावना होती ते त्या वेपरबाबत होती.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांची जी भावना आहे. त्या भावनेशी मी सहमत आहे आणि त्यांची भावना हीच होती की जर समजा एखादया इमारतीला रहिवास म्हणून परवानगी दिली असेल तर त्या ठिकाणी जे आज लॉजिंग वगैरे चालू आहे. आपल्याला ते लॉजिंग बंद करायचे आहे. ज्यांना परवानगीच दिली असेल त्यांचे लॉजिंग-बोर्डींग बंद करण्याचा प्रश्नच कुठे येतो?

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, ठिक आहे. आपण पण या सभेत आहेत. मी पण ह्या सभेत आहे. आपण पुढच्या मा. महासभेत हा विषय परत आणू या. आता....

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यासाठी तुमचे सगळ्यांचे सहकार्य पाहिजे. जर सहकार्य मिळालेच नाही तर आपण पुढे काय करणार? कारवाई करण्यापूर्वी शंका उपस्थित केली तर आपण काय करणार? कारवाई झाल्यानंतर मग जे काही प्रसंग येतील आपण त्याला तोंड देउ या.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, आपण पहिले नियम करतो. नंतर कारवाई करतो. आपण पहिले सगळे प्लॅनिंग करतो. नंतर नियम बनवतो. तर जे करायचे आहे ते कंम्प्लीट करा.

**शशिकांत भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, आपण बोलले की आपण हस्तक्षेप करु नका. आपल्याला अधिकार आहेत डिसक्वालिफाईड चे आपण त्याच्यावर हे करु शकतो. जर कोणी नगरसेवक मध्ये आले तर त्या नगरसेवकांचे पद रद्द करु शकतो. साहेब, जर कोणत्याही नगरसेवकांनी तथा लोकप्रतिनिधींनी जर तुमच्या कार्यामध्ये इंटरफेयर केला तर तुम्ही त्याचे पद रद्द करु शकता.

**मा. आयुक्त :-**

पण आपण वेगळे काहीतरी समजत आहात. किंवा वेगळे बोलत आहात. मी असे बोललोच नाही.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तुम्ही बोलले की, तुम्ही सहकार्य करा. आम्ही जेव्हा सहकार्य करा असे बोलतो तेव्हा आम्ही सहकार्य करणारच. असे जर कोणी आले की तुम्ही त्याच्यावर गुन्हा नोंदवून सोबत त्याचे पद रद्द करा. तुमच्यामध्ये आल्यानंतर....

**मा. आयुक्त :-**

मी सन्मा. सभागृह मध्ये असे सांगितले की, सन्मा. सदस्य आता जे बोलत होते ना. क्ष्यांच्या बोलण्याला मी मध्यंतरी थांबवले आणि मी त्यांना सांगितले की, एखादी कारवाई करताना अनंत अडचणी येतात. परंतु, त्या अडचणी येतात म्हणून आपण कारवाई करायची नाही का?

**शशिकांत भोईर :-**

आम्ही तर तुम्हांला कारवाई करण्यासाठी परमिशन देतो. तरीपण तुम्ही बोलता की, तुम्ही येउ नका. आम्ही येणारच नाही. आणि आले तर तुम्ही त्यांच्यावर कारवाई करा. त्याचे नगरसेवक पद तुम्ही रद्द करायला लावा.

**मा. आयुक्त :-**

आपण जी कारवाई करतोय. ही कारवाई आपण सगळे मिळून करणार आहोत. प्रशासन नंतर करणारच आहे.

**शशिकांत भोईर :-**

तुम्हीच बोलता की, आमच्यामध्ये येउ नका, इंटरफेअर करु नका. तुम्हीच बोलता. तर तुम्हांला सांगतो ना. तुमच्याकडे आहे ना.

**मा. आयुक्त :-**

मी आता असे बोललोच नाही.

**शशिकांत भोईर :-**

तुम्हाला तो अधिकार आहे. तुम्ही तो करा.

**आसिफ शेख :-**

साहेब, आपल्याला तो मुद्दा लक्षात आला नाही? त्यांचे असे म्हणणे आहे की, कारवाई करण्यासाठी आपले सर्व लोक आपल्याला सहकार्य करणार. जर एखादा नगरसेवक आपल्याकडे चुकून आला तर ३५३ कलमाखाली गुन्हा दाखल करा. त्याचे नगरसेवक रद्द करा. असे ह्यांचे म्हणणे आहे.

**मा. आयुक्त :-**

पहिली गोष्ट म्हणजे, आपले नगरसेवक एवढे चांगले आहेत, सुज्ञ आहेत ना की, ते आपल्याकडे असे घेउन येणारच नाही. त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्नच येत नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

मग साहेब, तुम्हांला शंका नसावी. डायरेक्ट काम सुरु करा.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, दुसरा असा प्रश्न होता. आपण ज्यावेळी कुठलीही परवानगी देतो. त्यावेळी त्यांच्याकडून बिल्डिंग ऑक्यूपेशन सर्टिफिकेट, सोसायटी एन.ओ.सी. ह्या बऱ्याचशा टाईपचे आपण परवानगी मागतो.

**शशिकांत भोईर :-**

मा. आयुक्त साहेब....

**नरेंद्र मेहता :-**

माझे तसे म्हणणे आहे मग, जूना भाईंदर आहे. आपला १९९५ अगोदर किंवा ९० च्या अगोदर ज्यांच्याकडे ओ.सी. नाही किंवा अनधिकृत इमारत असतील त्यांना परवानगी दयायची की दयायची नाही. ते एक झाले साहेब, पुढचे तुम्ही म्हटले की, एम.आर.टी.पी. यूज, चेन्ज ऑफ युज इश्यू ने आपण कारवाई करु. असे बरेचसे हॉटेल्स आहे, रेस्टॉरंट आहे. ज्यांनी रेसिडेन्समध्ये केलेले आहे. मी लॉजिंग-बोर्डिंग बोलत नाही. रेस्टॉरंट आणि हॉटेल्स सुद्धा आणि बियर-बार वगैरे ते आपल्या रेसिडेन्ट बिल्डिंगमध्ये केलेले आहे. तर तुम्ही त्याच्यावर सुद्धा कारवाई करणार नका. ते एक आहे आणि कारवाई करुन कुठल्या प्रकारची करणार? ते परमनन्ट बंद करणार की फक्त लायसन्स देणार नाही? तो एक विषय आहे. लायसन्स दिले नाही की, तरी त्यांचे काम चालणारच आहे. आजपण चालते. उदया पण चालेल.

**मा. आयुक्त :-**

त्याबाबत पोलिस बघतील ना. आपण पोलिसांना कळवू ना. त्यांना इन्फॉम करु ना.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, आपण ज्यावेळी कुठले लायसन्स देतो तर आपल्याला आपण लायसन्स न घेतल्यावर कुठली कारवाई करायची? तर त्या कारवाईने तुम्हांला सील करण्याचे अधिकार असतील किंवा गुन्हा दाखल करायचे अधिकार असतील तर ते आपण करणार का?

**मा. आयुक्त :-**

कायदयाच्या तरतुदीप्रमाणे, जिथे आपल्याला कारवाई करणे आवश्यक आहे. तिथे आपण कारवाई करणारच.

**नरेंद्र मेहता :-**

आपण हे आरोग्याच्या विषयाने तो विषय आणले. मिरा-भाईंदरमध्ये जास्तीत जास्त इंडस्ट्रीज रेसिडेन्टशियल झोन मध्ये आहे. पॉलिशनच्या इश्यूमुळे काही फॅक्टरी अशा आहेत जे डायरेक्ट घरातच त्यांच्या केमिकलचा धूर जातो. तर ह्याप्रकारे आपण एन.ओ.सी. देतो. कसे असते की, आपण इंडस्ट्रिजला दुसरा अधिकारी एन.ओ.सी. देतो. आरोग्याला दुसरा अधिकारी एन.ओ.सी देणार इंडस्ट्रीचे अधिकाऱ्याला ज्यावेळी एन.ओ.सी. घेतो. त्यावेळी माहित नसते जे आजूबाजूवाले आहेत जो बिल्डिंगमध्ये राहतात त्यांना हा त्रास आहे. तर कुठेतरी तुमचा कम्युनिकेशन गॅपमुळे ते पण जरा तिकडे लक्ष ठेवण्यात यावे. आणि साहेब, महत्त्वाचे म्हणजे, ज्या ज्या अधिकाऱ्याला ज्या त्या लायसन्सचे पॉवर दिले आहे त्याला पूर्णपणे पॉवर दया. म्हणजे काही कारवाई करायचे असतील तर हे आम्हांला सांगतात. मा. उपायुक्त पानपट्टे साहेब यांना विचारा. गेल्या ५ महिनेपासून एक मटनशॉपसाठी बोलतो. त्यांने बिल्डिंगच्या जिन्याखाली मटनशॉप काढले आहे. ते मला रोज बोलतात. की मा. आयुक्त साहेबांची परवानगी घ्यायला लागेल. हे करायला लागेल ते करायला लागेल.

**मा. आयुक्त :-**

हे कोणाला द्यायचे?

**नरेंद्र मेहता :-**

आणि साहेब, त्यांचे असे म्हणणे आहे की आमच्याकडे पॉवर नाही. बंद कसे करायचे? शेवटी काय करतात? काय आणतात, चाकू आणतात. बस तेवढेच करतात. आणि जास्त असताना आपण प्रेशर केले तर दिवसभर तिकडे आपला एक साफसफाई करणारा कर्मचारी उभा करतात की त्याने दुकान उघडू नये. पण दुसऱ्या दिवशी उघडतो परत तेच प्रॉब्लेम आणि त्यांना काय सांगितले की, ते बोलतात साहेब, माझ्याकडे काही पॉवरच नाही. मग, ज्या अधिकाऱ्यांना तुम्ही हे सांगितले लायसन्ससाठी. त्यांना पुढची कारवाई काय आहे त्यांना माहितच नाही. साहेब, दुसरी गोष्ट म्हणजे, मटन जे कापतात ते कुठेतरी कत्तलखाना वगैरे येथे कापले पाहिजे. तर ते त्या दुकानामध्येच मटन कापतात. कितीवेळा ते रक्त बाहेर येते आणि अभिनव स्कूल तेथे त्याठिकाणी एवढे मटनचे शॉप आहेत. गोडदेव नाक्यावर ५-६ लाईनीने मटनचे शॉप आहेत. तर तुम्ही मटनशॉपविषयी परमनन्ट डिसिजन घ्या की, काय करायचे आहे. रोज वारंवार तीच तक्रार असते. सोसायटीचा एन.ओ.सी. घ्या अथवा न घ्या कुठल्याही नगरसेवकाचा विरोध नसतो की कुठल्याही ह्याला लायसन्स देउ नये. पण सोसायटीची जर तक्रार आली की, त्यांना ते कर्तव्य पार पाडायला लागते. साहेब आता आपण ह्याबाबत खुलासा करा.

**मिलन म्हात्रे :-**

प्रकरण क्र. ८ विषयामध्ये उत्पादन करणाऱ्या आस्थापनेस आरोग्य लायसन्स म्हणजे, उत्पादन आरोग्याचे लायसन्स असल्याशिवाय मिळणार नाही, असे मला वाटते. ह्याच्यात कॉलम असल्याशिवाय

मिळणार नाही, असे मला वाटते. ह्याच्यात कॉलम १० दिलेले आहे. मा. उपायुक्त श्री. शेख साहेब, डायस वर बसलेले आहे. मॅडम, ह्याच महापालिकेमध्ये नेहरू रोजगार योजनेअंतर्गत तसेच, आपण जे दरिद्रीरेषेखाली जे कुटुंब आहेत. त्यांना शासनाच्या अनुदानातून म्हणा, कर्जातून आपण त्यांना उदयोग व्यवसाय उभारायला फार मोठी मदत करतो. आम्ही नगरसेवक आपल्याकडे बरीचशी असे केसेस आणतो मी मुद्दामून सांगतो. आज मा. उपायुक्त शेख साहेब उपस्थित आहेत. मागच्या वेळेला एक महिला जिला शिवणकामाचा व्यवसाय सुरु करायचा होता म्हणून तिला बँकेने पाठवले की, महानगरपालिकेची आपल्याला परवागनी घेउन या. ती बाई आली. त्या महिलेने अर्ज केल्यानंतर आपल्याकडून उत्तर असे मिळाले की १ हजार रु. तुम्हाला परवानगीसाठी लागतील. मशीनची किंमत २ हजार रु., कपडालत्ता अमुक तमुक आणि एन.ओ.सी.ची किंमत १ हजार रु. त्या ठरावामध्ये पान पलटून बघितले तर ज्यांनी मॉल काढले आहेत. पाच पाच हजार, १०-१० फूटाचे मॉल आहेत. त्यांना ५ हजार रु. शिवणकाम करणाऱ्या बाईला जी बाई ५० रु. ते १०० रु. दिवसाला स्वतःचे काबाडकष्ट करुन कमावणार तिला १००० रु. हा जो फरक आला. मागचा एक ठराव आहे तो पूर्ण जूना ठराव निरंक किंवा निरस्त करा. आणि मग हा ठराव नविन घ्या. ह्या ठरावामध्ये कुटिरोदयोगाला कुठेही प्राधान्य दिले नाही. जे शासनाच्या संपूर्ण आपल्या स्किम्स आहेत. त्याच्याकडून आपल्याला ग्रॅण्डस मिळतात मिळतात मिळत मिळतात. ह्या कोष्टकामध्ये कुटिरोदयोग छोटे-छोटे लहान जे काही असतील ते त्याच्यात कुटीरोदयोगाची जी लिस्ट आहे. कुटीरोदयोग ह्या लेखाशिर्षाखाली ते आले पाहिजे. ह्यानंतर ह्या ठिकाणी ह्या कोष्टकामध्ये जसाजसा त्याचा उत्पन्नाचा स्त्रोत आहे. त्यानुसार त्याची फी पाहिजे. ही जी १००० रु. ची फी आहे. ह्याच्यामध्ये २५० रु. पर्यंत आपल्याला करायला काही हरकत नाही. दरिद्रीरेषेखालच्या लोकांना आपण सबसीडी देतो. आपलीच लोनची स्किम त्यांना सबसिडी देते आणि आपण त्यांच्याकडून हजार रु. घेते. सबसिडीमध्ये ७ हजार रु. मिळतात. आणि हजार रु. आपल्या फीमध्ये कुठेही सबसिडी नाही. स्वातंत्र्यसैनिक, माजीसैनिक जे आपल्या ह्याच्यातले जे काही सिनियर सिटीजन ह्याच्यासाठीच आपण जो त्यांना रोजगार देणार आहोत. माजी सैनिकासाठी सुद्धा शासनाचा स्किम आहेत. त्याचा कुठेही ह्याचा उल्लेख नाही. आपण त्यांचा काय विचार केलेला आहे? जे अपंग आहेत, अंध आहेत. सुप्रीम कोर्टापासून त्यांना वरुन ऑर्डर्स आहेत की, त्यांच्या रोजगांराकरता स्थानिक जे आपल्या स्वराज्य संस्था आहेत त्यांनी काय काय करावे. ह्याचा कुठेही उल्लेख ह्या कोष्टकामध्ये नाही. चार कॉलम वाढवले आणि असे जे काही समाजातले घटक आहेत. त्यांना उदयोग करताना आपण उलटे एनकरेज केले पाहिजे. आता विधवा बाई आहे. तिचा कर्तासर्वाता नवरा मरतो. स्वतःची जी काही २,३ मुले असतील, नसतील. तिचा उदयोग करताना तिला फार त्रास होतो. घरातलेसुद्धा तिला नवरा मेल्यानंतर घरातून सुद्धा तिला रोजगाराकरता काही साथ मिळत नाही. अशा घटकांचा ह्या कुठल्याही कोष्टकामध्ये, ह्या विषयामध्ये, ह्या ठरावामध्ये कुठेही उल्लेख नाही. तसेच, तुमच्या जुन्या ठरावामध्ये सुद्धा नाही. मागच्या वेळेचा जो जुना ठराव आहे. मा. उपायुक्त अजिज शेख साहेब, मी आपल्याला तो ठराव दाखवलेला आहे. तो ठराव व्दिधा मनस्थितीला आहे आणि म्हणजे त्याला द्विअर्थी येतो. हो पण आहे आणि नाही पण आहे. तो जूना ठराव मागून घ्या. तो पूर्ण निरस्त आहे आणि ह्या सगळ्याची नोंद करुन मग हा ठराव परिपूर्ण रित्या सभागृहापुढे आणा ह्यात सरकारच्या आपल्या अधिकाऱ्यांनी टिपणीमध्ये सुद्धा हे आणलेले नाही. कोण मगाशी म्हटले की, मा. कमिशनर साहेबांना चॅलेज करु नये. का करु नये, शासनाचे जी.आर मा. कमिशनर साहेब पाळत नसतील. शासनाच्या ज्या स्किम योजना आहेत त्या जर मा. कमिशनर साहेब पाळत नसतील तर ह्या सभागृहामध्ये आम्ही मा. कमिशनर साहेबांना चॅलेन्ज करायलाच येत असतो. शासन जर चुकत असेल तर त्या शासनाच्या संपूर्ण जी.आरकडे लक्ष देण्याकरता आमचे नगरसेवकांचे काम आहे. आपण त्यातले जे जी.आर आहेत. जर तुम्हाला जमत नसतील मी आणून देईन. मी जिम्मेदारी सभागृहामध्ये घेतो. सुप्रीम कोर्टाच्या काही डायरेक्शन आहेत. त्या मागवा. आणि त्या अंध, अपंग लोकांकरता तुम्हांला काय करायचे? तुमची ती डयुटी, कर्तव्य आहे. फक्त तुमचे काम नाही. कर्तव्य आहे ते या ठरावात कुठे रिफ्लेकट होत नाही. मॅडम, आपण त्याची नोंद करुन घ्यावी. आपण महिला आहेत. महिलांच्याबद्दल कोण बोललेले मला दिसले नाही. मी आज लेट आलो पण ह्या ठरावामध्ये आपण नंतर काय झाले असेल माहित नाही. पण ह्या टिप्पणीमध्ये प्रशासनातर्फे काही नाही. आज आपण बुथसाठी परवानग्या देतो. गटई कामगारांच्या काय १००रु., १ रु. जे काही घ्याल. त्याची इकडे स्पष्टपणे नोंद पाहिजे. त्यांनतर तो परवानगी मागायला जो कोण कर्मचारी किंवा जो छोटा उदयोग करणारा असेल त्याला आपल्याकडे चप्पल घासायला लागतात. बी.एम.सी. मा. कमिशनर साहेबांकडे पाठवतो. मा. कमिशनर साहेब ठरावाकडे बोट दाखवतो. सचिव साहेब सांगतात, हाच ठराव आहे. आणि त्या ठरावामध्ये काही लिहिले नसते. मागच्या वेळेचा ठराव आहे. तो पटलावर इकडे आणा. तो सरासर चुकीचा ठराव आहे. आणि ह्या ठिकाणी जे काही मॉल्स उभे राहिले आहेत. जे काही आहे ज्याची जशी काही उत्पन्नाची साधने आहेत. त्यानुसार आपण लावले पाहिजे. आज आपण इकडे शितपेयाला, शीतपेये ५०० आणि २५० रु. भाईंदरमध्ये बिअरचे शॉप पण उघडायला लागले आहेत. म्हणजे ताक विकणाऱ्यांनीसुद्धा २५० रु. दयायचे आणि बिअर विकणाऱ्यांनी पण अडीचशे रु. दयायचे हा फरक आहे. त्याकरता शीतपेयामध्ये कुठली पेये? उदया बिअरबार पण त्याच्यामध्ये ढकलून दयाल. मा. कमिशनर साहेब हसत आहेत. म्हणजे ह्याच्या कुठेतरी क्लिअर अगदी क्लेरिफिकेशन दया. तुमच्याकडे प्रत्येक ह्याच्यामध्ये मापदंड असतो. ते मापदंड लावून ह्याचा कोष्टक आणखी

पुढे वाढवा. हे १० च्या पुढे काही तुम्ही कॉलम वाढवा आणि आम्ही ह्या ज्या सुचना दिलेल्या आहेत ह्या ठरावामध्ये माझ्या सुचना तुम्ही घ्या. आम्ही ठराव मांडल्यानंतर बोलायला देणार. हे सगळे ठरावामध्ये ॲड झाले पाहिजे. प्रत्येक बाबतीमध्ये मा. आयुक्त साहेब मी जे म्हणतोय माझ्याकडे आता जी.आर. नाहीत. पण ह्या लोकांकरता सर्वस्वी राज्यशासनाची जी.आर. आहेत. ह्यांचे बंधन तुम्हांला आहे. तुमच्या ठरावामध्ये त्या त्या जी.आर. चा उल्लेख करुन त्या घटकांना तुम्ही काय दिलेत? दलितांकरता कमी ह्याच्यातले फी माफ किंवा काय १ रु. असेल ह्याचा उल्लेख येथे झाला पाहिजे. आदिवास्यांनी जर एखादा उदया निरेचे केंद्र टाकले तर त्याच्याकडून तुम्ही हजार रु. फी २५०रु. देणार हा निरेचा व्यवसाय फक्त ३-४ महिन्यांपुरता असतो. पावसाळ्यामध्ये ४ ते ५ महिने व्यवसाय बंद असतो. मॅडम, हा ठराव परिपूर्णरित्या आता आपली सगळ्यांची टर्म संपते. परिपूर्णरित्या केले पाहिजे. कारण त्यानंतर सहा महिने नोकरशाही ह्या ठरावावरती बोट दाखवून काम करणार आहे. त्या ठरावामध्ये म्हणतील आणि त्यावेळीची जी काही आपल्याला जे काही चुका होतील त्या आपल्या माथी मारल्या जातील. ह्या सभागृहाचे सदस्य उपस्थित आहेत. त्याच्या माथी मारल्या जातील त्याकरता हा ठराव परिपूर्ण करण्याकरता सर्व परत एकदा सांगतो. कुटिरोदयोगामध्ये जे उदयोग त्यामध्ये दिलेले आहे. ती पूर्ण लिस्ट आहे आणि आपल्या ह्या खाली जें नेहरु स्वयंरोजगार केंद्र त्याची अख्खी लिस्ट आहे. उदयोग व्यवसायची त्याची लिस्ट आहे. त्या लिस्टचा कुठेही उल्लेख नाही किंवा त्या विभागाचा पण उल्लेख नाही की त्या विभागातर्फे जे नव्याने उदयोगधंदे आम्ही सुरु करायला परमिशन देउ किंवा कर्ज देउ. त्याकरता अमुक अमुक एवढे पैसे राहतील. नादारीतली ही तुमची दरिद्रीरेषेखालची कुंटूंब असेल तर त्याला आम्ही ही फी १ रु. नाममात्र करु असे कुठेही उल्लेख नाही. हा आपण करुन घ्यावा ही माझी सुचना आहे. आपण त्या ठरावामध्ये नोंद केली तर त्या घटकांना आपण न्याय दिला असे होईल.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी मगाशी ठराव मांडलेला होता की, ह्या शहरामध्ये लॉजिंग-बोर्डींग पाहिजेच नाही. साहेबांनी त्याच्यावर म्हटले की, आपण कितींना परवानगी दिली आहे आणि कितींना दिली नाही ह्याचे व्हेरिफिकेशन करणार आणि त्यांच्यावर कारवाई करणार आपण जरुर करावे परंतु नव्याने परवानग्या देउच नये. उलट झाले असेल तर तेही रद्द करा. हे शहरच लॉजिंग आणि बोर्डींग विरहित राहावे. अशी आमची इच्छा आहे. आणि दुसरे म्हणजे हा संपूर्ण जो विषय आहे. सगळ्यांनी चर्चा केलेली आहे. ह्या विषयाचे मा. सभागृह नेते ठराव मांडतील. तरी पण माझी विनंती आहे की, प्रत्येक विषयाला सेप्रेशन दया, प्राधान्य दया, गोरगरीब आणि दलित असे सगळ्यांचे योग्य रितीने वर्गीकरण करा जसे धंदा कमी जास्त आगरी गरीब माणसाचा धंदा आणि एका धनिकाचा धंदा ह्याच्यामधला फरक जाणून हा विषय नव्याने घेउन या. त्याशिवाय ह्या विषयाला मंजूरी देण्यात येउ नये असे माझे म्हणणे आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, सभागृहाने ज्या फक्त २ सुचना आहेत फक्त तेवढया घ्या. आणि आपण ते ठराव मांडून घ्या. मागच्या वेळेला मा. महासभेमध्ये मिरा-भाईंदर महापालिकेच्या वतीने लायसन्स देण्यात यावे आणि महापालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढवावे, अशा पद्धतीने मी जो ठराव केला होता त्याचपध्दतीने आज मिरा भाईंदर महापालिकेच्या सरते सरते गेल्या साडे चार वर्षानंतर मिरा भाईंदर महापालिकेतले सर्व दुकानदारांना, कारखानदारांना, व्यावसायिकांना जी लायसन्स पद्धती आहे ती आज लागू करण्यासाठी ठराव आलेला आहे. या ठरावामध्ये बऱ्याचशा काही पहिले आपण ज्या वेळेला एकाच पद्धतीने त्याला आकारणी करत होतो. ज्याचे १०० फूटांचे जे दुकान आहे. त्यालासुद्धा २०० रु. आणि ज्याचे हजार फुटाचे दुकान आहे. त्याला सुद्धा २०० रु. चे आहेत. अशा पद्धतीने आपण आकारणी करत होतो. त्याच्यामध्ये आता ह्यावेळेला निश्चितच फरक केलेला आहे. ज्याचे १०० फुटाचे दुकान आहे. त्याला त्या १०० फुटाच्या मानानेच आकारणी केली जाईल. आणि हजार फुटाचे जे आहे. त्याला १००० स्क्वेअर फुटाच्या मापानेच त्याच्यावर आकारण्यात यावे. निश्चितच महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न ह्याच्यातून वाढणार आहे. जी चांगल्या पद्धतीची लायसन्स आणलेले आहे. ती निश्चितच यशस्वी व्हावी. फक्त माझ्या सुचना आहेत. त्या सुचना नमुद करुन घ्याव्या. लायसन्स पद्धतीत मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये जे व्यावसायिक लायसन्स मागणी करील. त्याला एक दोन तीन वर्षापर्यंत फी भरणा करण्याची सुविधा ठेवावी. त्याने मी तीन वर्षाची फीज भरतोय. मला तीन वर्षाचे लायसन्स एकत्रित सुद्धा लायसन्स पद्धतीच्या माध्यमाततून आपल्याला उत्पन्न येणार त्याची आकारणी फॉर्म फी १०० रु. घेण्यात यावी. इथे फॉर्म फी चा कुठेही उल्लेख केला नाही. फॉर्म फी १०० रु. घेण्यात यावी. निश्चितच उत्पन्न वाढणार आहे. चार प्रभाग समितीमध्ये प्रत्येकी एक दिवस वॉर्ड ऑफीसमध्ये ह्या लायसन्स पद्धतीच्या संदर्भात त्यांच्या सुचना त्यांना लायसन्स देण्यासाठी त्यांचे पैसे भरणे् करण्यासाठी चार प्रभाग समितीमध्ये एक दिवस कुठलाही देण्यात यावा. त्याचप्रमाणे कालमर्यादा १ एप्रिल ते ३० मार्च पर्यंत ठेवण्यात यावी. झोपडपट्टी १९९५ चे किंवा फोटो पासेस तपासून त्यांना परवाना लायसन्स देण्यात यावे. गावठण विभागात काही जूने, ग्रामपंचायत पद्धतीने जी घरे आहेत त्या गावठण विभगामध्ये त्यांची टॅक्स पावती किंवा अन्य पुरावा सादर केल्यास लायसन्स देण्यात यावे. जे लायसन्स घेणार नाही. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी. त्याचबरोबर आर्थिकदृष्टया जे मागासलेल्या परिस्थितीने जे निश्चितच गरीब आहेत

किंवा निराधार आहेत. अशांसाठी सुद्धा कमीत कमी फी आकारून त्यांना लायसन्स देण्यात यावे. अशा मी सुचना मांडतो. ह्या सुचना आपण ह्यामध्ये नमुद करुन तशा पद्धतीने ठरावामध्ये नमुद कराव्यात.

**रोहिदास पाटील :-**

मा. उपायुक्त शेख साहेबांना विनंती आहे की, मघासपासून जी चर्चा चालू आहे ते म्हणजे आपण लायसन्स देणार आहोत की एन.ओ.सी. देणार आहोत? ना हरकत प्रमाणपत्र की काय देणार आहोत? कारण मला जेवढे माहित आहे की, आपल्याला लायसन्स देण्याचा कोणताही अधिकार नाही. आपण त्यांना "ना हरकत प्रमाणपत्र" देणार आहोत. लायसन्स संबंधित खात्याची त्यांनी घ्यायची असतात. मग कोणते हॉटेल्स असेल तर ते मा. कलेक्टरकडून मिळेल. त्याचे फिक्स ठरलेले आहे. मला थोडसं माहिती साठी खुलासा करा की, आपण लायसन्स शब्द वापरतो हा लायसन्स शब्द बरोबर योग्य आहे की अयोग्य आहे? योग्य असेल तर तो बदलून घ्यावा. योग्य असेल तरी मला जेवढे वाटते तेवढे आपण एन.ओ.सी. देतो, ना हरकत प्रमाणपत्र देतो.

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख साो.) :-**

मा. महापौरांच्या परवागीने बोलतो...

**एस. ए. खान :-**

फक्त एकाच पद्धतीने होईल. आज जो हेल्थ लायसनसचा विषय आलेला आहे. देणे किंवा घेणेसाठी कोण आहेत ते? आणि जो हेल्थ लायसन्स देणार आहे. आपल्याकडे कुठले अधिकारी आहेत जे हेल्थ लायसन्स देणार आहेत. ते मला जरा दाखवा. मा. महापौर महोदया, कोण हेल्थ लायसन्स देणार आहे? कोण हेल्थ लायसन्स इश्यू करणार आहे? आणि वॉट इज मिनिंग?

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख साो.) :-**

आपल्याकडे परवाना विभाग आहे तर परवाना मार्फत हे लायसन्सेस इश्यू केले जाणार आहेत.

**एस. ए. खान :-**

लायसन्स वेगळे आहे. हे हेल्थ लायसन्स आहे. व्हॉट इज अ मिनिंग ऑफ हेल्थ लायसन्स?

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख साो. ) :-**

द हेल्थ लायसन्स इन द सिन्स आपण लायसन्सचे दोन प्रकार केलेले आहे. जे औषधासंबंधातले हेल्थ लायसन्स आहे. तो एक भाग आणि अन्न वगळून जे लायसन्स आहेत तो दुसरा भाग.

**एस. ए. खान :-**

मग, अन्न जो लायसन्स देणारा आपल्याकडे कोण अधिकारी आहे? कंम्पिटन्ट कोण आहे?

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख साो.) :-**

कशासाठी? अन्नासाठी?

**एस. ए. खान :-**

हो. अन्नासाठी.

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख साो.) :-**

आपल्याकडे आपण फूड इन्स्पेक्टरची नेमणूक केलेली आहे. आपल्याकडे श्री. दुबोले नावाचे इन्स्पेक्टर आपण ह्या कामासाठी नेमणूक केलेली आहे.

**एस. ए. खान :-**

ही इज कंम्पिटन्ट फॉर अ ....

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख साो.) :-**

आपण असे करतो की फूड इन्स्पेक्टर जे आहे. ते वेगवेगळे आस्थापनांना भेटी देतात. शहरामध्ये भेटी देतात. त्यांचा इन्स्पेक्शन रिपोर्ट वगैरे तयार करतात. ते रिपोर्ट आपल्याकडे परवाना विभागामार्फत माझ्याकडे आणि मा. आयुक्त साहेबांकडे पाठवतात. आणि नंतर परवाना विभागामार्फत त्यांना लायसन्सेस इश्यू केले जातात.

**एस. ए. खान :-**

असे व्हायला नाही पाहिजे म्हणजे हे जो हेल्थ लायसन्स आहे. जे नागरिकांचे हेल्थ सुधारण्यासाठी नाही तर नंतर लोकांचे हेल्थ बिघडतील. असे होता कामा नये.

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख साो.) :-**

साहेब, तसे होणार नाही.

**एस. ए. खान :-**

आणि आपले जे दर निश्चित केलेले आहे. त्याच्यामध्ये पण नवी मुंबई, ठाणे महानगरपालिका आणि कल्याण-डोबिंवलीचे आहेत ते जास्त आहे. त्यामध्ये दर कमी करण्यात यावे. दर खूप जास्त आहे....

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सा.) :-**

त्या संदर्भात थोडी माहिती देतो. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) साहेब, तुम्ही सुरुवातीला जो प्रश्न विचारला होता. त्याचाही मी खुलासा करतो. आपल्याकडे हा जो गोषवारा दिलेला आहे. त्याच्या पेज नं. १ वरती जे दर दिलेले आहे. आस्थापनेचा प्रकार...

**रोहिदास पाटील :-**

मी तुम्हाला एन.ओ.सी. आणि लायसन्स ह्याबद्दल विचारले होते...

**एस. ए. खान :-**

आणि ह्याच्यामध्ये वेगवेगळे करायला पाहिजे होते ना. म्हणजे आपला किराणा दुकान आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही फूड ॲण्ड ड्रग्जचे श्री. दुबोले ह्यांना आरोग्य अधिकारी नेमलेले आहे. ह्यांनी दिल्यानंतर परत फूड ॲण्ड ड्रग्ज वाल्याचे प्रमाण आणि ठाण्यावाल्यांचे घ्यायचे की नाही.

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सा.) :-**

आपण हे जे परवाने देणार आहोत. ते आपल्या कायदयाच्या अंतर्गत आपण देणार आहोत. आपल्या कायदयामध्ये महानगरपालिकेला अशा प्रकारचा विविध आस्थापनांना लायसन्स देण्याचे अधिकार आहे आणि त्या अधिकाराचां वापर करुन आपण हे लायसेन्सस देणार आहोत.

**रोहिदास पाटील :-**

म्हणजे २ लायसन्स लागतील का? हे नक्की क्लिअर होउ दया ना. म्हणजे आम्हांला कोणी विचारले तर सांगू शकतो ना.

**नरेंद्र मेहता :-**

श्री. शेख साहेब जिथंपर्यंत माझी माहिती आहे. मुंबई महानगरपालिका ज्यावेळेस फूडचे लायसन्स देतात. त्यावेळेस त्यांना फूड ॲण्ड ड्रग्जचे वेगळे लायसन्स दयायची गरज पडत नाही. आपल्याला ठाणे डिस्ट्रिक्टमध्ये आपल्याला तसे पॉवर डेलिकेड झालेले नाही. शासनातून पॉवर डेलिकेड झाल्यानंतर आपण ते लायसन्स देउ शकतो आणि मुंबई महापालिका ते एकच घेतात. पण दुसरे फूड ॲण्ड ड्रग्ज देत नाही.

**रोहिदास पाटील :-**

हे तुमचे कॉरस्पॉन्डस् पूर्ण झालेले आहे का? त्यांनी तुम्हाला अधिकार दिलेले आहेत का? आणि आपल्याकडे जर खरोखर सुलभरित्या म्हणजे कोणती योजना आहे. आता साहेब, तिकडे जातात. त्यांच्याविषयी लोकांमध्ये फार मोठे चांगले मत नाही. तुम्हांला मी सांगतो. मी पुढचे बोलत नाही. पण जे रेग्यूलर चालतेय त्यांनाही लायसन्स मिळत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब (काका) जे बोलतात त्यावर मी बोलतो. कारण की, हजार रु. फी असेल. तर आपल्याकडे जे अधिकारी लायसन्स देणार असतील ना. ते त्याच्याकडे हजार रु. एक्स्ट्रा मागतात. त्याच्यामुळे लोक लायसन्स काढायला येत नाही आणि त्याच्यामुळे आपल्या महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते. त्यांनाही समजून सांगा ना.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब ती पण स्किम आहे ना. ती पण स्किम आहे. एकावर एक फ्री. करलो दुनिया मुठीमें.

**एस. ए. खान :-**

मा. आयुक्त मॅडम, माझी सुचना आहे. त्या सुचनेची नोंद करुन घ्या. किराणा दुकान काढून टाका. इस्टेट एजन्सीज आहे. टेलिव्हिजन शॉप आहे, टेलिफोनचे दुकान आहे, हे छोटे-छोटे उदयोग आहे. किराण्याचे दुकान आहे. त्यांना वेगळे करुन त्यांना देउन टाका. त्यांच्याकडे एन.ओ.सी. वगैरे मागण्याची गरज काय आहे? किराण्याच्या दुकानाला सोसायटीची एन.ओ.सी का मागायची? किराण्याच्या दुकानामुळे कोणाला तकलिफ आहे? टेलिफोन केणाला तकलिफ आहे? इस्टेट एजन्ट आहे, कटिंग सलून आहे त्याचा कुणाला काय तकलिफ आहे?

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सा.) :-**

किमान कागदपत्रे तर घ्यायला पाहिजे ना.

**एस. ए. खान :-**

ते घ्या ना. समजा, पावती वगैरे, ॲग्रीमेंट वगैरे ते घ्या. सातबारा घ्या. हे दया. ते दया. ते कशाला पाहिजे?

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सा.) :-**

आपण ते घेतो. किमान आवश्यक जे कागदपत्र आहे. आपण त्यांचीच मागणी करतो.

**एस. ए. खान :-**

टॅक्स लागलेला आहे की नाही ते मागून घ्या. त्याच्या नावाचे त्याच्या न्यू लायसन्सचे ॲग्रीमेंट नावावर नसेल तर न्यू लायसन्स केले आहे का ते बघून घ्या. दोन-चार कागदपत्रे पाहून घ्या.

**शिवप्रकाश भुदेका :-**

और जे सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील साहेबने जो आरोप केला. ते खरं आहेत का?

**धनराज अग्रवाल :-**

मा. उपायुक्त श्री. अजिज शेख साहेब, तुम्ही हे लायसन्स देताना कागदपत्र मागतात. तुम्ही दुकानाला काही टॅक्स लावले. बरोबर आहे. तुम्ही सांगता ओ.सी. आणा, सी.सी. आणा, सातबाराचे उतारे आणा. तो कूठून आणणार?

**एस. ए. खान :-**

बिल्डिंग ॲग्रीमेंट आहेत की नाही ते आणा.

**धनराज अग्रवाल :-**

तुम्हीच पहिले त्याला इललिगल सोडून देतात. इललिगल महानगरपालिका देत काय? त्या टाईमाला कारवाई करत नाही. सरळ दुकान विकून बिल्डर जातात. मग तुम्ही त्याला हे लायसन्स देणार ते, लायसन्स देणार मग तो कुठून देणार?

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सो.) :-**

त्यांनी आपल्याला सांगितले आहे की,...

**धनराज अग्रवाल :-**

मी काय सांगतो, कोणीही लायसन्स घेणार नाही. जर तुम्ही असे कागदपत्र मागितले आणि एक दुकान पण लायसन्स घेणार नाही.

**नरेंद्र मेहता :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश साहेब, जाताना बोलून गेले की, त्यांच्याकडून ७/१२ घ्या, डॉक्युमेन्ट घ्या, सर्व पेपर घ्या.

**धनराज अग्रवाल :-**

घ्यायचे नाही असे ते बोलले. तुम्हाला चुकीचे...

**नरेंद्र मेहता :-**

अच्छा.

**एस. ए. खान :-**

७/१२ वगैरे घ्यायचे नाही मागायचे नाही. किती इललिगल आहे किती इललिगल आहे...

**धनराज अग्रवाल :-**

साहेब आणि लायसन्स ॲण्ड फूड ॲण्ड ट्रकाचा जर ठाणा से होगा। तो आपका लायसन्स नही होगा। आपका एन.ओ.सी होगा।

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सो.) :-**

जर त्यांच्याकडे सात बारा नसेल तर किमान समजा, त्यांचे ॲग्रीमेंट वगैरे काय असेल तर ते जरी दिले तरी आपण ते ग्राह्य धरतो.

**धनराज अग्रवाल :-**

ॲग्रीमेंट किंवा भाडयाचे ॲग्रीमेंट.

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सो.) :-**

मी आपल्याला तेच सांगितले की, त्यांनी कोणतेतरी असे कागदपत्र सबमिट करायला पाहिजे ज्यांच्यावरून त्यांची ऑथोरिटीसुद्धा आपल्याला कळायला पाहिजे. काही काही लोक अशी असतात की काही कागदपत्र देत नाही...

**धनराज अग्रवाल :-**

यह बराबर है। साहेब, ते लायसन्स आणि एन.ओ.सी चा मुद्दा अजून क्लिअर झाला नाही. जे ठाणावाले फूड ॲण्ड ड्रग्जवाले येणार ते त्याच्या अलग लायसन्स आहे. एक सोलमाप वाले ते बोलतात, आम्हांला अलग लायसन्स आहेत. वाल्यांचे अलग लायसन्स आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तो विषय परत रितसर आणा. आपल्याला ते लायसन्स देता येणार नाही.

**एस. ए. खान :-**

साहेब, हेल्थ लायसन्स अजिबात देता येणार नाही. आपण एन.ओ.सी. देउ शकतो. आपण एन.ओ.सी. साठी जे काही कागदपत्रे आहेत ते मागवून घ्यायचे आणि एन.ओ.सी देउन टाकायची.

**रतन पाटील :-**

साहेब, ठाणेवाले आहेत तर त्यांना गुमास्ता लायसन्स हा प्रकार काय आहे?

**एस. ए. खान :-**

बिल्डिंग लिगल आहे, बिल्डिंग इललिगल आहे. असे जर कागदपत्रे मागितले तर कोणीही घेणार नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. पिठासिन अधिकारी आणि मा. आयुक्त साहेब, मला जरा ह्या विषयावरती बोलायला परवानगी दयावी आपण ह्या ठिकाणी जो विषय आणलेला आहे तो लायसन्स देण्याचा विषय आहे आणि आपण त्याच्यामध्ये हेल्थ लायसन्स हे असे स्पष्टपणे म्टटलेले आहे.

**एस. ए. खान :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, हेल्थ लायसन्स आहे लायसन्स नाही. हेल्थ लायसन्स आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

हेल्थ लायसन्स असे म्हटलेले आहे आणि तुमच्या गोषवाऱ्यामध्ये आपण असेही म्हटलेले आहे की, "ना हरकत दाखला" आपण इथे असे म्हटले आहे की, लायसन्स. आता मला ह्याठिकाणी जे हेल्थ लायसन्स आहे. त्याबद्दल मा. आयुक्त साहेबांनी, मा. उपायुक्त साहेबांनी ही गोष्ट स्पष्ट करावी की महानगरपालिकेला कोणत्या कायदयाच्या आधारे अशा प्रकारे लायसन्स कुठल्या व्यवसायासाठी देण्याचा अधिकार आहे. असे कुठले कायदे आहेत त्यांच्यासंदर्भात आपण ही माहिती दया कारण आपण जर कायदयाचे पुस्तक उघडून बघितले तर त्याच्यामध्ये आपल्याला मर्यादित स्वरुपाचीच लायसन्स देण्याचा अधिकार आहेत. कलम नं. ३७२ मध्ये, आर्किटेक्ट, इंजिनियर त्यांच्यानंतर संरचना संकल्प चित्रकार म्हणजे आर.सी.सी. डिझायनर, बांधकाम लिपिक नळ कारीगर हे ३७२ अन्वये फक्त या लोकांनाच तुम्ही लायसन्स देउ शकता आणि ह्यांना लायसन्स देताना ह्यांच्या फी ठरवण्याचे तुम्हांला अधिकार आहेत. ३७२ खाली त्याच्यानंतर ३७७ कलमाखाली नगरपालिकेने जर बाजार बांधला असेल म्हणजे बांधला असेल तर त्या बाजारामध्ये कुठलीही विक्री करण्यासाठी नगरपालिकेचे लायसन्स असणे आवश्यक आहे. ३७८ मध्ये, खाजगी बाजार जे आहेत. ते खाजगी बाजार चालवण्यासाठी नगरपालिका, महानगरपालिका ही लायसन्स देते. त्यानंतर खाटिक वगैरे आहेत त्यांना लायसन्स देण्याची महानगरपालिकेला अधिकार आहे. ह्या सर्व दुग्धशाळा, उत्पादनाच्या व्यवहारासाठी महानगरपालिकेला लायसन्स देण्याचा अधिकार आहे. सार्वजनिक जागेवरती विक्री करण्यासाठी लायसन्स देण्याचे अधिकार महानगरपालिकेचे आहे. ह्यात कलम नं. ३७२ ते कलम नं. ३८४ पर्यंत कलमामध्ये दिलेल्या गोष्टींसाठी महानगरपालिका लायसन्स देउ शकते. असे असताना आणखीन कुठल्या नियमाच्या आधारे कुठल्या व्यवसायांना लायसन्स देण्याचे अधिकार आपले आहेत ते ह्या ठिकाणी २ गोष्टी महत्त्वाच्या आहेत. एखादा कारखाना चालू करायचा झाला तर तो स्मॉल स्केल सेक्टरमध्ये येत असेल स्मॉल स्केल इंण्डस्ट्रीज कडून त्याला परवानगी लागते. एखादा हॉटेल चालू करायचे झाले तर कलेक्टर ऑफीसचा परवाना लागतो. बिअर बारला कलेक्टर ऑफीसचा परवाना लागतो. एखादा हॉटेल चालू करायचे असेल तर फूड ॲण्ड ड्रग्ज ठाणे ऑथोरिटीचा परवाना चालू असतो. अजूनही ते चालू आहे. आपल्याच महापालिकेचे लोक तिकडे बसतात. आपल्याच महापालिकेच्या कार्यालयात बसून फूड ॲण्ड ड्रग्ज चे इन्स्पेक्टर घेउन आपल्याकडून इस्टॅब्लिशींग कडून पैसे वसूल करतात. उपागृहांनासुद्धा फूड ॲण्ड ड्रग्जचे तेच लायसन्स देतात. मा. उपायुक्त साहेब, तर अशा पहिल्यांदा आपण ही बाब स्पष्ट करावी की कुठल्या गोष्टींना आम्ही लायसन्स देणार आहोत. त्याच्यानंतर आपण हे सगळे दर ठरवावेत. आम्ही त्यांना जर लायसन्स देणार ना. समजा, तुमचे लायसन्स आम्ही घेतले नाही. एखादे मेडिकल शॉप आहे किंवा एखादा उपहारगृह आहे ते चालू करायला जर फूड ॲण्ड ड्रग्ज इन्स्पेक्टरचे लायसन्स असेल आणि त्यांनी जर महानगरपालिकेचे लायसन्स घेतले नाही तर तुम्ही काय कारवाई करणार? तुमच्याकडे कुठल्या कायदयाखाली कारवाई करण्याची तरतुद आहे. तर ह्या सगळ्या गोष्टींचा ह्या ठिकाणी आपण स्पष्टपणे उल्लेख करावा.

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सो.) :-**

प्रकरण क्र. १८ जे आहे. आपल्या कायदयामधले त्यामध्ये भाग-१, भाग-२, भाग-३, भाग-४ असे जे वेगवेगळे भाग आहे. त्यामध्ये कोणकोणत्या व्यवसायांना किंवा धंदयांना लायसन्सची आवश्यकता असणार आहे. त्याचा उल्लेख केलेला आहे. भाग-४ मध्ये पेज नं. ६०३, कोणत्याही जागेवर किंवा जागेत किंवा लायसन्सशिवाय किंवा धंदयांच्या संबंधित असलेली जी कामे करता येणार नाही असे धंदे किंवा अशी कामे त्यामध्ये त्याचे बायफर्केशन त्यांनी दिलेले आहे. लोकांनी खाण्यासाठी कसात घरगुती उपयोगिता व्यतिरिक्त अन्य कारणांसाठी पाव, बिस्किटे किंवा पिठाचे बनवलिलेले अन्य पदार्थ, भाजणी किंवा तयार करणे, धातूंचे उतकाम, मसाला तयार करणे, निळी किंवा अन्य रंगांचे कापड किंवा सूत रंगवणे, विदयुत विलेपन, खादयगृहे चालवणे. मिठाईची दुकाने चालवणे, आणि त्याचे बायोफर्केशन आपण आपल्या या आम्ही आता जो गोषवारा तयार केलेला आहे. त्यामध्ये त्याचे बायोफर्केशन आम्ही दिलेले आहे आणि हे आपण जी माहिती आहे. जे आसपासच्या काही महानगरपालिका आहेत. नवी मुंबई किंवा कल्याण-डोबिंवली महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका त्या ठिकाणाहून आपण ही माहिती संकलित करुन हा एकत्रित गोषवारा तयार केलेला आहे. कारण त्याठिकाणी ही प्रथा आणि पद्धत चालू आहे.

**रोहिदास पाटील :-**

हा गोषवारा एकंदरीत पाहता, सभागृहाचे मत पाहता, सभागृहातल्या सगळ्या सदस्यांनी त्यांच्या भावना व्यक्त करतात. पण साहेब, हे परिपूर्ण नाही. आपण साधारण कोणाचे बघून काय करतो असे ठरविते वेळी कोणाचे माहितीसाठी बघणे बरोबर आहे. त्यांच्याकडून साधारण सगळा फॅारमेट मिळावा. म्हणून तिथंपर्यत

बरोबर आहे. आपल्या शहराला ते पोषक आहे का? आपल्या शहराला ते पोषक नसेल म्हणजे प्रत्येक सदस्यांनी त्याला आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांनी अगदी छोटया म्हणजे दलित म्हणजे ज्यांच्यासाठी आपण योजनेतून पैसे देतो. त्यांच्यासाठी आपण कोणतीही भुमिका घेतलेल्या नाही. कारखानदारांसाठी भूमिका घेतलेल्या नाही. कारखानदारी निघून चाललेली आहे. त्यांना थांबवण्यासाठी आपण भूमिका घेतलेली नाही. जसे मॉज त्यांच्याकडून उत्पन्नाचे साधन मिळू शकेल. त्यांच्याबाबतीत आपण उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने आपण भूमिका घेतलेली नाही. त्यामुळे आम्हांला असे वाटते की, अजून जरी तुम्ही अन्य माहिती घेतली असेल तरी हा गोषवारा परिपूर्ण नाही. ह्या सभागृहाशी आमचे असे मत आहे किंवा ह्यावर तुम्ही पुन्हा नीट माहिती घ्या. पूर्ण नीट नेटका करुन आणा आणि जेणेकरुन महापालिकेचे उत्पन्न तर वाढलेच पाहिजे. परंतु, महापालिकेतला सामान्य नागरिक चेचला नाही पाहिजे. सामान्य कारखानदार चेचला नाही पाहिजे. साधा दुकानदार आहे त्यालाही सहज परवाना मिळायला पाहिजे. अशा पद्धतीची सिस्टम तयार करावी, असे आमचे मत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, माझ्या माहितीप्रमाणे ९९टक्के आपल्याला ते अधिकार नाही. कारण...

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सो.) :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) साहेबांना मी एका प्रश्नाचे माहिती देतो की, आपण जे सुरुवातीला हे जे लायसन्सचे दर ठरवलेले होते. म्हणजे जे पेज नं. १ वरती नमुद केलेले आहे म्हणजे जे प्रचलित दर आहे. तर त्यामध्ये अनेक त्रुटी होत्या. त्यामध्ये कोणतेही निकष आपण लावलेला नव्हता. तसे कोणतेही युनिट असेल तर त्याचे मेजरमेन्ट युनिट हे वेगळे असते. काही किलोग्रॅमवर असते, काही एरियावरती असते, काही मिटरवरती असते. आणि त्यामुळे वेगवेगळया संघटनांनी ह्या ठिकाणी ऑब्जेक्शन घेतलेले होते की कोणत्याही प्रकारचे निकष न ठरवता सरसकट तुम्ही हे दर ठरवलेले आहे. त्यामुळे त्याचे काहीतरी निकष ठरवले जावे आणि त्यादृष्टीने जर आपण आजूबाजूच्या महानगरपालिकेची माहिती घेउन त्याप्रमाणे प्रस्ताव तयार करुन ह्या ठिकाणी आणलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, महापालिकेची माहिती घेतली हे चांगले केले.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, त्याच्यात फरक काय आहे? लायसन्स किंवा एन.ओ.सी. अजून ते क्लिअर होत नाही. तुम्ही लायसन्स देणार आहे किंवा एन.ओ.सी. हे नक्की.

**रोहिदास पाटील :-**

नाही. साहेब, तुम्ही लायसन्स देउ शकत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मी बोललो, लायसन्स देणार आहे हे नक्की का? मग, फूड ॲण्ड ड्रग्जचे लायसन्स घ्यायचे नाही का? इंटिंग लायसन्स घ्यायचे नाही? आणि फूड ॲण्ड ड्रग्ज ह्याचे लायसन्स दयायला पण काही नॉर्मस आहेत.

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सो.) :-**

मी तोच मुद्दा अगोदर क्लिअर केला की, आपल्या कायदयामध्ये लायसन्सेस देण्याबाबतचे तरतुदी आहेत. त्यानुसार आपण आपल्या कायदयानुसार लायसन्स देत आहोत.

**रोहिदास पाटील :-**

आपल्याकडे असतील ते तिकडचे पण घेणार, इकडचे पण घेणार. त्यापेक्षा तुम्ही कॉरसपॉण्डस करा ना. त्यांनी तुम्हांला पावती दिली ते तुम्ही घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

मी प्रभाग समिती अध्यक्ष बोलतो. आणि माझे -- इथे स्वतःचे हॉटेल होते. ज्यावेळी महानगरपालिका झाल्यानंतर आपण शासनाला पत्र लिहून जे फूड ॲण्ड ड्रग्जचे पॉवर आहेत ते आपल्याकडे हस्तांतरीत करुन घेतल्यानंतर ते लायसन्सलाच महत्व असते. पण सध्या आपल्याकडे अजून ती फॉरमॅलिटीज पूर्ण कम्पलिंट झालेली नाही. म्हणून अजून त्यांचेच लायसन्स लागते आणि त्याला नॉम्स आहे. तुम्ही जसजसे म्हटले की पावत्या फाडा, लायसन्स दया. हे चालत नाही. त्याला नॉर्म्स आहेत. किचन एरिया, हे एरिया वगैरे सगळे नॉर्म्स बघायला लागेल. साहेब, तुम्ही त्याला असेच लायसन्स देउ शकत नाही तर हे आपण पूर्ण खात्री करा आणि मा. महापौर मॅडम दुसरी गोष्ट म्हणजे तिकडे आपण चायनिज रेस्टोरंटला ५००० रु. एखादा माझा चायनिजचा धंदा असता तर मी काय केले असते हे तुम्हाला माहित आहे का? दुकानाच्या बाहेर टपरी लावली असती. रोज १० रु. भरले असते. म्हणजे महिन्याला ३००रु., वर्षाला ३०००रु. असते. मी ५०००रु. चे लायसन्स कशाला घेउ? म्हणजे टपरी लावणाऱ्याला ३०००रु. महापालिकेच्या जागेवर आणि ज्यांचे चायनिज आहे त्याला ५०००रु.

**रोहिदास पाटील :-**

चायनिजबद्दल ह्यामध्ये कोणती व्याख्या नाहीच आहे. चायनिज शब्द वापरलेला आहे. पण त्याची व्याख्या काय आहे? चायनिज मालकी जागेवर की महापालिकेच्या जागेवर आहे? आम्ही त्यावेळी सभागृहात

सांगितले होते. मा. स्थायी समितीमध्ये झाले. ३५८ चायनिज दुकाने चालतात. म्हणून मी सभागृहाला अधिकृत माहिती दिली. त्या लोकांचे कोणाचेही असे काही नाही. फक्त लाल डब्बा आहे. लाल डब्बा आहे. त्याला तुम्ही लायसन्स देणार का? कुठेही लाल डब्बा ठेवला चायनिज.

**रोहिदास पाटील :-**

हे कोणत्या सिस्टिम बनविता येईल. हे त्याच्यामध्ये नाही. तुम्ही उत्पन्नाच्या दृष्टीने जे चायनिजचे घेतलेले आहे. ते रस्त्याच्या कडेला उभे असतील किंवा असे आम्हांला वाटते त्याची तरतुदही नाही. मी तुम्हांला खात्रीने सांगतो...

**रतन पाटील :-**

महापालिकेच्या जागेवर...

**रोहिदास पाटील :-**

कोणत्या दुकानावर कोणते प्रोडक्ट बनवतोय. ते चायनिज पद्धतीने बनवतोय. आता ते मटन असे बनवणार की असे बनवणार त्याच्यावर तुमचे लायसन्स नाही. तो त्यांचा आयटम आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आपण ज्यूस सेंटर ५०० रु. मागितले आहे असे इथे म्हटले आहे. बरोबर आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मघासपासून आपण काय करतो ते कायदयाच्या तरतुदीनुसार...

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, त्यांच्याकडून आपण ३०० रु. महिन्याचे घेतो. कचरा उचलण्यासाठी ३०० रु. महिन्याचे घेतो. म्हणजे, ३६०० रु. वार्षिक उत्पन्न कचरा उचलण्यासाठी घेतो कारण लायसन्ससाठी फी ५०० रु. कुठल्याही अँगलने ते मेलच खात नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. सदस्य नरेंद्रजी सर्वांत महत्त्वाचे आहे की आपण लायसन्स देउ शकतो का? ती पहिली गोष्ट आहे. आणि लायसन्स देउ शकतो तर कुठल्या कायदयानुसार आणि कुठल्या वस्तूंसाठी लायसन्स देउ शकतो. आता आपण जे प्रकरण वाचून दाखवले ते प्रकरण क्र. १८. १८ मध्ये भाग १ मध्ये लिहिले आहे. डायनामाईट कोण विकतो का? सुरुंगाची दारु, हलमिलेट आणि मर्क्यूरी, गन कॉटन, नायट्रो ग्लिसरीन आणि फॉस्फरस. भाग २ मध्ये लिहिले आहे विडीची पाने, कापूर, सेल्यूडाईल, चलचित्रपट, खोबरे, खराब कापूस, गाय कापूस, सरकी म्हणजे ही सगळी किराणामालाची दुकाने आहे. तसेच, गंधक, रंग, तारपीठ, डांबर, बीटी टर्पेटाईन वॉर्निस म्हणजे हे हार्डवेअर आयटम झाले. त्यांच्यानंतर भाग ३ मध्ये लिहिले आहे बांबू म्हणजे वखारित, हाडे माहिती नाही. हाडे, कात्या, कोळसा, दगडी कोळसा, कोक, चरबी, जळाउ लाकूड म्हणजे स्मशानातले. दारुकाम, मासळी, सुके गवत, पोती, केस, वाळलेले गवत, वैख, ताक, गोणपाट, कातडी, खूर, खोकी किंवा लाकडी पेटया, चिंध्या, चामडी, इमारती लाकूड आणि लोकल कच्ची. भाग ४ मध्ये त्यांनी म्हटलेले आहे धातूचे ओतकाम, मसाला तयार करणे निळरंगात कापड किंवा सूत रंगवणे, विदयुत इलेबन, इलेक्ट्रोब्लेटिंग, खादयगृहे चालवणे, केस कापण्याची दुकाने म्हणजे न्हाव्याची दुकाने, ओली किंवा वाळलेली चामडी कमवणे, दाबणे, वायु मिश्रित केलेल्या हाडे, विटा आणि कवले, जनावरांच्या आतडयापासून केलेली तार, कापूस किंवा खराब कापूस दाबलेला दगडी कोळसा, डांबर, डायनामाईट, चरबी, दारुकाम, बर्फ, आईसकॅण्डी, आईसफ्रूट, चुना कागद, जूना रबरी माल, तपकिरी आणि साबण. एवढया वस्तूंसाठी लायसन्स देण्याच्या संदर्भात आपल्या कायदयामध्ये तरतुद आहे. लायसन्स देण्याचेच आहेत. दुसरी बाब अशी आहे की, आपण जो गोषवारा दिलेला आहे. आपण गोषवाऱ्यामध्ये असे म्हटले आहे की, द इश्यू ऑफ गिविंग हेल्थ लायसन्स ॲण्ड परमिशनस्. लायसन्स आणि परमिशन्स असे वेगवेगळे का आहे? द लायसन्स ॲण्ड परमिशन्स फॉर मॅन्यूफॅक्चरींग स्टॉक सेविंग अंडर वेरियस प्रोविजन ऑफ बी.पी.एन.सी. ॲक्ट १९४९ इज अंडर कन्सिडरेशन द प्रोसिजर फॉर गिविंग हेल्थ लायसन्स हॅज बीन सेट आउट ॲण्ड पॉवर आर अल्सो बिइंग डेलिकेटेड बाय द हॉन्रेबल कमिशनर ऑफ सेट परपज टू वेरियस ऑफीसरस् ऑफ द म्यूनिसिपल कॉर्पोरेशन. इट इज नॉ नेसेसरी टू फिक्स रेट ऑफ हेल्थ लायसन्स फी अंडर सेक्शन ३८६ टू ऑफ द बिपीएमसी ॲक्ट फॉर इश्यू ऑफ लायसन्स ऑर रिटर्न परमिशन टू बी ग्रॅन्टेड अंडर सेक्शन ३७६ १३८३ मी मगाशी सांगितले त्याप्रमाणे ३७२ ते ३८६ पर्यंत तुम्ही कशाकशाला लायसन्स देउ शकता हे निश्चित केलेले आहे. आणि तुम्ही कायदा ३८६(२) हे तुम्ही कशापद्धतीने म्हणजे कुठल्या अटीशर्ती टाकून करु शकता ते दिलेले आहे. मग तुम्ही ह्याच्यात सरसकट सगळ्या गोष्टी घेतलेल्या आहेत. हे कुठे आलेले आहे. कारखाने म्हणा किंवा असे जे तुम्ही लांबलचक या लिस्ट काढलेल्या आहेत. ह्या कुठे आलेल्या आहेत. तर हे कुठेतरी आपल्याला व्यवस्थित बसून हे सेग्रीगेट करायला पाहिजे. ज्यांना आम्ही लायसन्स देउ शकतो. त्या गोष्टीचा तुम्ही पहिला समावेश केला पाहिजे. आणि त्यांच्यानंतर तुम्हांला ज्यांना लायसन्स दयायचे आहे. त्यासंदर्भात तुम्हांला कायदा करावा लागेल. तर कायदा करावा आणि त्याच्यानंतर हे लागू करावे कारण, सरसकट अशा पद्धतीने २-२ लायसन्स चालू असतील तर ते चुकीच्या पद्धतीचे होईल. आणि त्यापेक्षा "ना हरकत दाखला" म्हणून आपण काय म्हणत

असाल तर तो भाग वेगळा आहे. "ना हरकत दाखल्या "शिवाय त्यांना लायसन्स इश्यू करु नये. आणि तो "ना हरकत दाखला" देताना तुमची काही फी आकारायची असेल ती आकारा. आणि तुम्ही ज्या गोष्टींना लायसन्स देउ शकता. जे कायदयात दिलेले आहे की, ह्या गोष्टींना आम्ही लायसन्स देउ शकतो. उदा. किराणा मालाची दुकाने, खादयगृहे, शितपेयगृहे, न्हाव्याचे दुकान वखारी, ह्या सगळ्या गोष्टी आहेत. तुम्ही ह्यांना लायसन्स देताना हे नियम लावा आणि त्यानुसार त्यांचे फी आणि आकारणी ठरवा कारण मा. महापौर मॅडम, हा विषय एवढा झटपट करुन चालणार नाही. ह्यावरती पुन्हा शोध झाला पाहिजे. थोडसं संशोधन होण्याची गरज आहे.

**हंसुकूमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, इस विषय पर मा. स्टॅण्डींग कमिटी मे बहूत चर्चा हूई थी। यह विषय किसने लाया है? गोषवारा किसने लाया है। प्रशासनने लाया है लेकिन, प्रशासन को यह मालूम नही है की, लॉजिंग-बोर्डींग का, बिअर बार का इतना फिज कम करने के लिए लाया है। इसका लॉजिंग और बोर्डींग का फीज ३ पट और ज्यादा बढना चाहिए। जो एग्जिस्टिंग है, लायसन्स है उसका ३ पट ज्यादा बढाओ। ऐसा इललिगल काम होता है उसका जो एग्जिस्टींग है ना। जिसका लासयन्स है उसका फिज बढाओ। हम लोग अभी भी बोलते है की देने का नहीं। लेकिन यह क्या चल रहा है वह समज में नही आ रहा है। इसलिए आपको पुछ रहा हूँ की, कौन यह सब लेके आय है।...

**धनराज अग्रवाल :-**

मा. उपायुक्त साहेब,

**हंसुकूमार पांडे :-**

एक तो सौ फूट का दुकान रहेगा वह उसके ३०० फूट आगे वह कवर डालके बैठता है। --- लगता है।

**नरेंद्र मेहता :-**

हा विषय परत आणू या.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, लॉजिंग-बोर्डींग आणि किराणा दुकान एकच रेट ठेवलेले आहे. हा बरोबर आहे का?

**हंसुकूमार पांडे :-**

आप यह भाडा बढाओ। महानगरपालिके के लिए उत्पादन बढाओ ना। आप कम करने का देख रहे हो। इसका मतलब आप लोग भी इस काम में मिलीभगत हो गए हो।

**हॅरल बोर्जीस :-**

साहेब, सभागृहातली आजची चर्चा ध्यानात घेता प्रशासन आपल्या भुमिकेशी कुठे ठाम आहे बरेचसे सदस्यांनी प्रश्न विचारले परंतु...

**हंसुकूमार पांडे :-**

इसके लिए विशेष सभा लिजिए।

**हॅरल बोर्जीस :-**

सभासदांच्या सभागृहातले उत्तर अजूनपर्यंत प्रशासनाकडून मिळाले नाही. त्यासाठी हा विषय पेंडिंग ठेवा आणि ह्या विषयावरती सर्व गटनेत्यांचे बेठक बोलवा. सर्व गटनेत्यांना विश्वासात घेउन पुन्हा एकदा हा विषय येत्या महासभेत परिपूर्ण पद्धतीने ठेवा.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या विषयाशी संबंधित जेवढे जी.आर. आहेत ते मागवून घ्या. हे लोक जी.आर. देत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

इन केस जर पॉवर डेलिकेट करुन घ्यायचे असतील तर पत्रव्यवहार करुन ते पॉवर आपल्याकडे मागवले आहेत. ते अजून मिळालेले नाहीत.

**हंसुकूमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, छोटे-छोटे दुकानों को...

**मिलन म्हात्रे :-**

ऐसा नहीं होता है आपने बजेट पर सब प्रोव्हिजन किया है। वह आप क्या करोंगे। इसके अंदर छह महिना जायेगा।

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृह विक्री/साठा/उत्पादन करण्याऱ्या आस्थापनेस आरोग्य लायसन्स देणेबाबतचा विषय सभागृहात सर्व सदस्यांनी मोठया प्रमाणात ह्या विषयावर चर्चा घडवून आणली. परंतु, ह्या विषयावरती कुठल्याही प्रकारे एकमत न झाल्यामुळे हा विषय पेंडिंग ठेवण्यात येत आहे. आणि ह्या विषयाबाबत सर्व

पदाधिकाऱ्याची एक कमिटी गठित करुन ह्या विषयावर सखोल चर्चा करुन हा विषय पुन्हा मा. महासभेत आणला जाईल. आणि लॉजिंग बोर्डींगची कारवाई चालू राहिल.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आता जे लायसन्स देतात त्याचे काय? आता जे घेतात, देतात त्यांचे काय? बंद करायचे?

**मा. महापौर :-**

सध्या लायसन्स बंद राहतील.

**धनराज अग्रवाल :-**

मॅडम, आता ज्यांनी घेतले आहेत त्यांचे काय?

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ज्यांनी अर्ज केलेले आहेत...

**धनराज अग्रवाल :-**

त्यांना एन.ओ.सी. म्हणून दया.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ज्यांनी अर्ज केलेले आहेत त्यांना देउन टाका.

**रतन पाटील :-**

परवानगी म्हणून देण्यात यावी. वसूली करावी. आर्थिक नुकसान कशाला करत आहात? बजेटमध्ये तरतुद केलेली आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य शिवप्रकाश भुदेका साहेबांनी एक सुचना मांडली होती की, मिरा-भाईंदर शहरामध्ये विशेष करुन त्यांनी मटण-कोळीवाडयाचा उल्लेख केलेला आहे. उघडयावरती मटन शॉप असतात. पूर्ण शहरामध्ये नियमाचे पालन न करता जी विक्री केली जाते. तर प्रशासनाला यावरुन सुचित करण्यात येते की, आपण त्यांना जे नियम घालून दिलेले आहे. त्या नियमाचे पालन झाले पाहिजे. आणि बंद दुकानामध्ये किंवा आपण जे नियम दिलेले आहे की, पडदा वापरुन किंवा त्या वस्तूवरती कपडा टाकून मांस मटनाची विक्री केले पाहिजे. तशा प्रकारे नियम जर एखादयाने पालन केले नसेल तर त्याची परवानगी त्वरित रद्द करावी.

**नरेंद्र मेहता :-**

परवानगी घेतली नसेल तर काय?

**मा. महापौर :-**

परवानगी घेतली नसेल तर त्याच्यावर कडक कारवाई केली जाईल, त्याचे दुकान बंद केले जाईल.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, सोसायटीमध्ये ज्या परवानग्या देतात ना. त्या सोसायटीची एन.ओ.सी. घ्या. असा तुम्ही रुलिंग दया.

(सदरचा विषय प्रकरण क्र. ०८ मा. महापौरांच्या मान्यतेने तहकुब करण्यात आला.)

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढील विषय घ्यावा.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ९ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. ९ हा बहूधा शेवटचा विषय आहे. आरोग्य केंद्राचा स्टाफ ज्यांना आपण मुदतवाढ देण्याचा विषय समोर आणलेला आहे. प्रत्येक वेळेला आपण मुदतवाढ देतो, दिली. आम्ही सुद्धा काही विरोध केला नाही. परंतु, त्या आरोग्य खात्याच्या प्रमुखांनी काय दिवे लावले ते सर्वांना सर्वश्रुत आहे. त्यावर मी काही जास्त नाही. आपल्यापुढे जो स्टाफ आहे ज्यांना आपण मुदतवाढ देणार आहेत. या स्टाफची ह्यांची कार्यपद्धती काय आहे? कारण, परवा मा. आयुक्त साहेब माझ्या बरोबर होते. आणि आपण कुत्रे चावल्याची जी वॅक्सिन देतो. रॅबीजवरती औषधे जी देतो. हा उतारा माझ्याकडे आहे. प्रत्येक पी.एच.सी. ला जे डॉक्टर आहेत. त्यांच्या गोडाउनमध्ये किती औषधे आहेत, ते त्यांना माहित नाही. ५ हजार औषधे मागितली. तर तिकडे मुश्किलने २०० औषधे फक्त मिळतात. म्हणजे वॅक्सीन सांगायचा दृष्टीकोन असा आहे की, डॉक्टर असो किंवा आता जे गेले त्यांचे मी सांगत नाही. पण, आपल्या गोडाउनमध्ये कुठली कुठली औषध आहेत. मी मागे आपल्याला सांगितले होते. मी परवा मा. उपमहापौर साहेबांना सुद्धा सांगितले. आरोग्याचे आपले जे मा. सभापती आहेत किंवा मा. कमिशनर साहेब आहेत किंवा ते जाउन राहिले ते आता सोडून दया. पण किती लोकांनी गोडाउन चेक केले. मी आपल्याला छाती ठोकून सांगतो आणि पुराव्यानिशी सांगतो की, आपल्या गोडाउनमध्ये एक्सपायरी डेटची औषधे आजही आहेत. त्या डॉक्टराने आपल्याला रिपोर्ट केलेले आहेत का? तुमच्यासमोर हा तक्ता ठेवतो. आजही आपल्या इकडे औषधे नाहीत. आजच्या तारखेला कुत्रा चावल्याच्या रॅबिजवरती औषध नाही. आणि कुठलीही गॅरेंटी नसते. एक कुत्रा १० माणसांना चावणार नाही किंवा ५० माणसांना चावणार नाही किंवा बिलकूल चावणार नाही किंवा १०० माणसांना चावेल. ह्याची कुठलीही गॅरेंटी

आपल्याकडे नसते. गोडाउनला अक्षरशः त्या औषधाची आपल्याकडे वाताहात आहे आणि गोरगरिब लोक आणि भाईंदरचा माणूस उत्तनला गेला. मा. आयुक्त साहेब आपण स्वतः गाडीमध्ये होतात. त्या माणसाने मला फोनवर सांगितले, डॉक्टराने सांगितले. औषध नाही आणि नंतर त्याच डॉक्टराने त्याला ते औषध दिले म्हणजे इंजेक्शन दिले. ही परिस्थिती आपली केविलवाणी आहे. आपण कितीही ढोलनगारे पिटतात असे नाही. आपण त्यांना जे कायम करतोय. ह्या प्रस्तावामध्ये प्रशासनाने तुम्हाला कसे सविस्तर सांगितले आहे. ते बघा. ५ महिन्यानंतर तांत्रिक खंड देउन वरती दिलेले आहे. एक दिवसाची रजा. पण पाच महिन्यानंतर तांत्रिक खंड किती तासाचा दिला? एक तासाचा दिला, २४ तासाचा दिला, ३६ तासाचा दिला ह्याच्यात कुठे नमुद केलेले नाही. ह्या गोषवाऱ्याशी मी स्वतः ह्या सभेमध्ये तुमच्याशी सहमत नाही. कारण, उदया हा जर गोषवारा घेउन कोण मॅटमध्ये गेला. तर त्याला कायमस्वरुपी नोकरीवरती घ्यावे लागेल. भले तो असो किंवा आणखीन कोण असो. सांगायचा दृष्टीकोन असा आहे की हा गोषवारा कोणी दिला आहे, खाली इकडे सही नाही काही नाही. इकडे कोणाचीही सही नाही आणि हा वैध आहे का? वैध आहे की अवैध? सचिव साहेब, मला एक सांगा त्या अधिकाऱ्याची खाली सही नसताना गोषवारा येतो कसा? तुम्हांला सभागृह म्हणजे मौजमस्ती वाटते का? आम्हांला एवढया लोकांना पगार दयायचा आहे. ४७ टक्के च्या वरती हे गेले आहे. माझ्याकडे त्याच्यावर नाही. आम्ही ती सही मानणार नाही. तुमची विधिवहत गोषवारा येतो. त्याच्यावर मा. आयुक्त साहेबांची सही असली पाहिजे. डिपार्टमेंन्टची इकडे सही नाही. ही सही मी उदया व्हाईटनर लावून खोडून टाकीन. हा तुमचा व्यवस्थित विधिवहत आलेला गोषवारा नाही. आणि ह्याच्यामध्ये तांत्रिक खंड ह्याचा उल्लेख कुठेही नाही. तो का गेला नाही? बरं, तांत्रिक खंड किती लोकांना दिला गेला. हे आम्हांला सविस्तर पाहिजे. हा स्टाफ किती आहे? ह्याला तांत्रिक खंड दिला का? तांत्रिक खंड किती तासाचा दिला म्हणजे २४ तासाच्यावरती दिला का? परमनन्ट होण्याकरिता हा करार घेउन मॅटमध्ये जाउन उदया कोणी तुमच्या डोक्यावर बसणार आणि ऑर्डर घेउन येणार. आज आपल्याकडे गोडाउनमध्ये अत्यंत दयनीय आणि वाईट अवस्था आहे. कोणाचेही लक्ष नाही. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वरिष्ठ लेवलच्या अधिकाऱ्यांनी कधी भेट दिली आहे का? मा. आयुक्त साहेबांनी सांगावे मी भेट दिली आहे. मग मी त्या प्राथमिक आरोग्यकेंद्राचा पूर्ण इतिहास सांगेन. भाईंदर पश्चिमेच्या पोलिस स्टेशनच्या बाजूच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पावणे २ वर्ष इन्स्पेक्शनचे टेबल नव्हते. रुग्ण गेला की त्याला रिक्रोबिक खाटेवरती झोपवून तो डॉक्टर तपासायचा एवढी भिक आपल्या महापालिकेला लागलेली आहे. मेन म्हणजे जे आपल्या भाईंदर (पश्चिम)चे सगळ्यात महत्त्वाचे आणि मोठे प्राथमिक केंद्र आहे. तिकडे पावणे २ वर्ष आपल्याकडे इन्स्पेक्शन टेबल नव्हते. तीन आयुक्त बदलले. परिस्थिती सुधारली नाही. डॉक्टर बावीस्कर गेले तेवीस कर आले. ते परत जाउन राहिले. अजूनपर्यंत आलेले नाही. ही परिस्थिती वास्तव आहे. महिलांना, बायकांना तिकडे अक्षरशः तो डॉक्टर खाटेवरती, बिछान्यावर झोपवून चेक करतोय. आपल्याकडे पैशाची तरतुद नाही का? औषध तुमची ५०० वॅक्सिन बाकी असतील त्यावेळेला तुमची पार ५० हजार, २५ हजार, दिड हजार, २ हजार, ५ हजार ही वॅक्सिन आलीच पाहिजे. त्याचा रिपोर्ट त्या डॉक्टरने मा. कमिशनरपर्यंत केला पाहिजे. मा. कमिशनर साहेबांनी जाउन ते बघितले पाहिजे की, वास्तव काय आहे. लोक आज दारोदार भटकत आहेत. भाईंदरचा माणूस मिरारोड जातोय, पेणकर पाडयाला जातोय, उत्तनला जातोय, उत्तनची माणसे भाईंदरला येत आहेत. ही परिस्थिती आहे. साडे तीनशे रु. जे इंजेक्शन आहे. ते परवडणारे नाही आणि परवडतही नाही. आज रस्त्यावरती आम्ही नगरसेवक भेटलो तर लोक आम्हांला शिव्यांची लाखोली वाहतात, पेपरमध्ये बातम्या येतात. तुम्ही आमच्यासाठी ही सुविधा दिलीत. पण, परिस्थिती निराळी आहे. आज आपण सर्व लोकप्रतिनिधी आहोत. निवडणुका डोळयासमोर आहे म्हणून बोलत नाही. पण, प्रत्येकाचे कर्तव्य आहे. मी मात्र तिकडे जाउन चेक करतो. तिकडे कुठल्याही औषधाचा कुणालाही मागमूस नाही. आणि जे आता परवाचे प्रकरण घडले. त्याच्यात त्या वैदयकिय अधिकाऱ्यांने सरळ सांगितले. गोडाउन मध्ये जे औषध आहे ते सुद्धा माल सगळा विकायचा आहे. त्याच्याकडे एक लिलाव बोलून टाका. हे स्टेटमेंटमध्ये रेकॉर्ड झाले आहे. रेकॉर्ड झालेले आहे. आपण स्टेटमेंट मागवले आहेत का? म्हणजे तुमच्या गोडाउनचा ताबासुद्धा त्या डॉक्टरने घेउन टाकला. मॅडम आजही वेळ गेलेली नाही. पावसाळा येतोय. मागच्या वेळेला डॉक्सिलिंगच्या गोळया नव्हता. मा. आयुक्त साहेब आपण नविन आला होतात. माझ्या वॉर्डमधल्या एका मुलाला लेप्टोपायरोसिस झाले होते. तेव्हा आपल्या गोडाउनला औषधे नव्हती. शेवटी ती औषधे आपल्याला इमरजन्सी बेसिसवरती मागवायला लागली. तुमची टिरानिॲन्स इंजेक्शन्स् नसतात. आता नाले सफाईचे काम सुरु होईल तो पण एक मजूर आहे. आमच्या वॉर्डमधल्या सर्व मजूरांना माझी गेल्या ५ वर्षापासूनची सवय आहे. पूर्वी आपल्याकडे प्राथमिक आरोग्य केंद्र नव्हती. तेव्हा आम्ही खाजगी आणायचे. खाजगी १ रु. दराने आम्ही टिटानियस चे इंजेक्शन आणलेले आहे. आम्ही सगळ्या मजूरांना देउन पार करायचो आता त्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पहिल्या मजुरांनाही टिटायनियस इंजेक्शन आम्ही देउन घेतो आणि आज आपल्याकडे जो काही स्टॉक आहे. त्या स्टॉकची जबाबदारी त्या डॉक्टरकडे असली पाहिजे. आणि आहे आणि त्यांनी तुम्हांला कळवले पाहिजे. मी परवा गेलो. तेव्हा डॉक्टरने माझ्याशी वाद घातला की वॅक्सिन आहे. नंतर डॉक्टरला बोललो की साहेब नाही आहे. आणि हा तर मी तुम्हांला दाखला देतोय. माझ्याकडे संपूर्ण उताराच आहे. जास्त नाही तपशिल आहे. म्हणजे माझे कोणाशी वैयक्तिक वाद नाही. चांगला डॉक्टर असेल त्याला तुम्ही दया. त्याच्या काही चुका झाल्या असतील तरी तुम्ही दया. पण, त्याच्यामध्ये कोणाला काही नोटीस निघाले आहेत का? कारण आपण त्यांना ३ वर्षे

टेम्परारी ठेवलेले आहे. तो काम करण्यासाठी पात्र आहे का? त्याने काम कसे केलेले आहे? त्याने प्रशासनाला काही धुळफेक केली आहे का? किंवा प्रशासनाकडून काही दडवून ठेवले आहे का? प्रत्येक नागरिकाच्या आरोग्याशी निगडीत ही संपूर्णपणे सेवा आहे. उदया एखादी घटना घडली तर त्याला विधान परिषदेपासून विधानसभेपर्यंत सगळे विचारायला आपल्यावरती बसलेले आहेत. हा स्टाफ आपण कायम करताना पहिला ह्यांचा गोपनियता अहवाल तयार असेल तर सांगा. त्याच्यात त्याबद्दल काही बोलले नाही. ह्या गोषवाऱ्यामध्ये आम्ही २५ कर्मचारी घेतले. त्याच्यातले तिघांचे रेकॉर्ड बरोबर नाही. राहिले २२ तर आम्हांला त्यांना एक्सटेंशन वगैरे दयायचे आहे. ही भाषा गोषवाऱ्यामध्ये कुठेही केलेली नाही. आणि कुठला डॉक्टर अकार्यक्षम आहे. त्याच्यावरती मा. कमिशनर साहेबांनी नोटीस काढली आहे का? हा जो तक्ता सांगतोय. ह्या तक्त्यावरती मा. कमिशनर साहेबांनी नोटिस गेली पाहिजे. मी लेखी पत्र दिलेले आहे. मा. कमिशनर साहेबांना भेटून त्यांना तोंडी सांगितलेले आहे. त्यादिवशी फोनवर बोलणे झाले आहे. आणि आम्ही एकत्र जात असताना हे ध्येय नक्की झाले की, उत्तनव्या पी.एच.सी. ला भाईंदरचा माणूस गेलेला तिकडे नकार दिला गेला आणि नंतर त्याला ते औषध दिले गेले. म्हणजे, तुम्ही त्या डॉक्टरची काम करण्याची पद्धत कशी ठरवाल. योग्य आहे की अयोग्य आहे? तुमच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जर मी गेलो आणि तुमच्या महापालिकेने ठरवलेले जो दर आहे ५० रु. जर तो दर भरून ते औषध घेण्याची माझी तयारी असेल तर कुठल्याही डॉक्टरांनी विचारले नाही पाहिजे की इकडे औषध नाही. आज आमच्या इकडची लोक भगवतीला जाउन इलाज घेतात. ते नाही असे सांगत नाही की, तुम्ही मिरा भाईंदरचे आहेत म्हणून जा. त्या डॉक्टरने त्या माणसाला सरळ सरळ “नाही” सांगितले. मा. आयुक्त साहेबांनी फोन केला. नंतर त्याच माणसाला औषध दिले गेले. ह्या सगळ्याचा विचार करुन त्यातले कोण नोटिस वगैरे काय दिलेले असतील त्या माणसांना घरी बसवा. तर बाकीचे काही सुधारतील. अन्यथा नाही. मी हे जे काही बोलतोय. तुम्ही घाईघाईत ठराव ठेवायच्या अगोदर ह्यामध्ये आमच्या सुचनांचा उल्लेख करा आणि ही वास्तव दर फी ह्याच्यात आपल्याला रेशो कळेल किती मागितले आहे किती आले आहेत, गोडाउनवरती कोणाचेही लक्ष नाही. हा कागद जवळ जवळ एक महिन्यापासून माझ्याकडे आहे. त्यादिवशी मी मा. आयुक्त साहेबांना सुद्धा दाखवला. पण, ह्या कागदावर आजच्या परिस्थितीपर्यंत आजच्या तारखेपर्यंत कुठलीही कारवाई नाही आणि अशा लोकांना आता आपण प्रमोशन देणार आहोत. परत पुढच्या काही महिन्याकरता आणि ह्या गोषवाऱ्यामध्ये तो कालावधी का टाकला गेला नाही आपण ह्याचा जरा खूलासा करावा.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, तुमच्या परवानगीने बोलते, मॅडम, त्यादिवशी माझ्याकडे आंबेडकरनगरचा एक माणूस आला आणि मला सांगू लागला की, मॅडम, माझ्या मुलाला कुत्रा चावला आहे म्हणून मी त्याला नगरपालिकेत पाठवले की जा एक इंजेक्शन मारुन ये. तो बिचारा इंजेक्शन मारायला गेला. पण आपल्याकडे इंजेक्शनच नाही. मग, १०-१२ दिवस गेले आणि रेवानगरची एक लहान मुलगी आली. मॅडम, तिला कुत्रा एवढा चावलेला की, रक्ताच्या धारा लागलेल्या होत्या. तिकडे मी इंजेक्शन मारायला पाठवले तर इंजेक्शनच नाही. शेवटी त्या बाईंनी त्या पोरिला प्रायव्हेट इंजेक्शन मारले. आणि मॅडम, आपले डॉक्टर काय बोलतात माहित आहे का? हा टि.बी. डॉक्टर आहे. हा काविळचा डॉक्टर आहे, आपल्याकडे दवाखान्याचे डॉक्टर कशाला ठेवायचे म्हणे. मग, टि.बी. वाल्याला चणे बांधून देणार? आणि काविळ वाल्याला वाटाणे बांधून देणार आहे का? मॅडम, तिकडे औषध नको का? मॅडम, अशा डॉक्टरांना जर अशी कामे नसतील तर त्यांना घरी बसवा.

**अनिता पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ही सत्य परिस्थिती आहे. माझ्या वॉर्डमध्येसुद्धा एका कामगाराला कुत्रा चावला. तेव्हा आपल्याकडे इंजेक्शन अव्हेलेबल नव्हते. टेंभ्यावर पण नव्हते आणि आपल्या आरोग्य केंद्रावर सुद्धा नव्हते. आम्हांला सांगितले की, मिरारोडला जा. पण असे नको. प्रत्येक आरोग्य केंद्रात आणि टेंभा हॉस्पिटलसुद्धा हे पाहिजे. हे गरजेचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सभागृह नेते हॅरल बोर्जीस साहेब, आम्ही जे काही बोललो, त्यावरती प्रशासनातर्फे आम्हांला खुलासा हवा आहे. कारण, तुम्ही इकडे जो प्रस्ताव पाठवलेला आहे, जो गोषवारा दिलेला आहे तो फॉल्टी आहे. पहिले त्याच्यामध्ये तुम्ही त्यांना किती कालावधीकरिता तांत्रिक खंड दिला आहे, ह्याचा पहिला खुलासा होउ द्या. घाई करु नका.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी आरोग्याच्या विषयाबाबत बोलतोय. आमच्या निर्दशनास आले होते की, मच्छर फवारणी औषध आहे ते १५ दिवसापासून बंद आहे आणि आज विचारपूस केली तेव्हा त्यांनी सांगितले की, आमचे कॉन्ट्रॅक्ट संपलेले आहे. आता आम्ही पाठवू शकणार नाही. तर त्याची अजून मुदतवाढ का दिलेली नाही? शहरामध्ये अजून मच्छर केवढे आहेत?

**मिलन म्हात्रे :-**

आपला ठेका आता संपलेला आहे.

**शरद पाटील :-**

ठेका संपलेला आहे. पण त्याचे काहीतरी करायला पाहिजे. आज १५ दिवस झाले. मच्छर फवारणी होत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

एक महिना अगोदर बीफोर तुमच्याकडे सगळे आले पाहिजे.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, १५ दिवस नाही दोन महिने झाले. माझ्या वॉर्डमध्ये औषध फवारणी अजिबात होत नाही. मी त्यांना सांगितल्यानंतरही ते अजिबात करत नाही. त्यांना औषध फवारणी किती महिने झाले ते विचारा.

**शरद पाटील :-**

ठेका संपलेला आहे. मी तेच सांगतोय.

**सुधा गोयंका :-**

१५ दिवस झाले असे ते सांगतात. १५ दिवसापासून चालत नाही.

**शरद पाटील :-**

१५ दिवस अगोदर मारत होते. १५ दिवस झाले आता काहीच करत नाही.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, आमच्या वॉर्डात झालेले नाही आणि दुसरे म्हणजे आता जो विषय चालू आहे की, एक्सापायरी डेटची जी दवा आहे ती मी अगोदरसुध्दा सांगितले होते. पुढे पावसाळा येणार आहे. बरसात येणार आहे. उस पिरीयड के अंदर चुहा कॉटनेसे जो बिमारी होती है, लेप्टोपायरसीस की जो बात चल रही थी। अपने पास जो दवा है वो एक्सपायरी थी, तो नॅच्युरल है की, हम जिस बिमारी के उपर नियंत्रण करते है। वही चिज आपने पास गलत है। तो उस चिज का हम नियंत्रण कैसे करेंगे? और सुका पावडर डाला जाता है। अभी जैसे वह लोक गटर निकालते है। वह सुकने के लिए दो दीन रखते है। वह सुखता है पहले उस पहले उसके उपर पावडर डालना चाहिए ना की, वह सुख रहा है तो उसके उपर सुका पावडर डाला जाए। ताकी वह मच्छर कीसीको कॉंटे नही। मलेरिया जैसी शिकायत ना हो। मॅडम, उसके उपर भी पावडर डाला नही जाता। तो यह सब चिजे किस लिए है। हम इतना इतना जो दवॉं का स्टॉक लेते है। आप उसके उपर कारवाई किजिए और पुरी जानकारी अधिकारीयोंसे निकलवाईए। क्या चल रहा है?

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब मच्छरांच्या बाबतीत जे सांगितले गेले. जर आपला ठेका संपलेला असेल तर आपल्या कर्मचाऱ्यांनी आवश्यक ते औषध फवारणी करायला पाहिजे ना.

**मिलन म्हात्रे :-**

तुमची सगळी गोडाउने खाली आहेत. उगीच आश्वासने देउ नका. गोडाउनमध्ये जावून बघा. तुमची गोडाउने सगळी खाली आहेत. तुमच्याकडे इमरजन्सी स्टॉक नाही आणि तुम्ही तुमच्या स्वतःचा टेंडरही काढलेला नाही. उद्या जर एखादे काही आपतकालीन घडले. २६ जुलैसारखा जर प्रलय आला. तुमच्याकडे कुठलीही सुविधा नाही. तुमच्याकडे गोडाउनला कुठलेही औषध नाही. तुम्ही कधी मागणार? आम्ही हजार वेळा सांगितले की, तुम्ही तुमच्याकडे थोडा इर्मजन्सीचा स्टॉक ठेवा. पण हे कोणी ऐकले नाही. मा. आयुक्त आर.डी. शिंदे साहेब असताना पासून सांगतोय. आज या ठेकेदारांनी काम बंद केले आहे. त्यास १५ दिवस झाले. आमच्याकडे आता त्या टिम ही फिरत नाही. लोकांना त्रास होत आहे. आपल्या गोडाउनमध्ये काही नाही. परिस्थिती बदलत नाही. एकदम वाईट परिस्थिती आहे. तुम्ही पहिले गोडाउनला इर्मजन्सी तुमच्या १० लाखाचे तुमचे जे पॉवर्स आहेत. त्याच्यात औषध कधी खरेदी करुन आणणार आहे. तेवढे आम्हाला आश्वासन या सभेमध्ये पाहिजे. तुम्हाला जे दहा लाखाचे जे पॉवर्स आहेत त्यामध्ये.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, तर आज शहरामध्ये ...........

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मी पहिला बालकल्याण समितीची सदस्य देखील आहे. पण चार महिन्यापासून लहान मुलांचा सकस आहार बंद आहे. मॅडम, त्याचा विचार करा. ४ महिन्यापासून बंद आहे. मॅडम, आज बालवाडीची मुले-मुली तिकडे खाउसाठीच जातात आणि ४ महिन्यापासून त्या मुलांचा खाउच बंद आहे. मॅडम, तर ती मुले तिकडे जातील का? आमचे मा. सभापती काही बोलणार नाही. तेरी भी चुप मेरी भी चुप आमच्या मा. सभापती बोलल्या असत्या तर त्या दिवशी बजेटची मिटींग झाली. त्याचदिवशी मा. सभापतींनी आम्हाला २० लाख रु. वाढवून द्या असे बोलायला पाहिजे होते. आमचे मा. सभापती का बोलल्या नाहीत? म्हणजे त्यांना कसले पडलेलेच नाही. म्हणून मी मुद्दामहून विषय काढला.

**अनिता पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ह्याविषयी आम्ही मा. उप-आयुक्त साहेबांना सुध्दा सांगितलेले होते की, टेंडर खरोखर बंद झालेले आहे. ह्याची मुदत वाढवून द्या. कारण मुलांना सकस आहार आणि सगळी खेळणी वगैरे बंद झालेले आहे. तुम्ही त्याच्यावर वाढवून द्या असे मा. उपायुक्त साहेबांनासुध्दा सांगितलेले होते.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, हा आरोग्याचा विषय असताना शहरामध्ये आरोग्य सांभाळणे हे सर्व प्रशासनाचे सर्व लोकप्रतिनिधींचे निश्चितच काम आहे. पण आज शहरामध्ये १५-२० दिवसापासून जास्त दिवस झाले आहे. औषध फवारणी होत नाही. त्यामुळे मच्छरांचे प्रमाण जास्त वाढलेले आहे. उष्णता असूनसुध्दा मच्छरांचे प्रमाण जास्त वाढलेले आहे. पण ह्याला कारणीभूत कोण आहे? तर डॉक्टर, आणि आपण जे आरोग्य अधिकारी नेमले आहेत ते जबाबदार आहेत. कारण ज्यावेळेला आपल्याला साफसफाईचे टेंडर देतेवेळी थोडा उशीर झाला. त्यावेळी आपण त्यांना मुदतवाढ दिली आहे. पण ह्यावेळेला जी धुर फवारणी आहे. ह्याची मुदत संपत आली तरी आपण ह्याला मुदतवाढ दिली नाही. काही कारणास्तव हे आपले आरोग्य अधिकारी त्या ए.सी.च्या ऑफिसमध्ये बसून ठेकेदारांना जोडीला घेउन टक्क्याचे गणित करत होते. ज्यांनी टेंडर घेतले होते. त्यांच्याकडे ४५ टक्के तो मागत होता. ४५ टक्के हे देतात. तुम्ही ५० टक्के जर आम्हाला देत असाल तर तुम्हाला टेंडर आम्ही देतोय. अशा पध्दतीनेसुध्दा रेकॉर्डींग झालेले आहे. त्यामुळे हा प्रकार मिरा भाईंदरमध्ये जे आज धुर फवारणीचे टेंडर आहे. ते त्यामुळे रखडले गेले आहे. कारण ह्याला जबाबदार ते आरोग्य अधिकारीही आहेत, प्रशासनसुध्दा आहे. कारण मा. आयुक्तांनी त्याच्यावर लक्ष दिले नाही. कारण १५ दिवस शहरामध्ये धुरफवारणी नाही, औषध फवारणी नाही. मच्छरांचा फैलाव, लोकाचे आरोग्य धोक्यात येण्याची परिस्थिती आलेली आहे. मा. आयुक्त साहेबांना विनंती करतो की, त्यांनी लवकरात लवकर आपल्या अखत्यारित धुर फवारणीचा आणि औषध फवारणीचे जे टेंडर आहे. विहीत आहे की, लवकरात लवकर काढा. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आरोग्य सांभाळण्याची कृपा करावी अशी मी त्यांना विनंती करतो. त्याचबरोबर आजच्या ह्या ठरावामध्ये एक तांत्रिक शब्द म्हणून लिहलेला आहे. तांत्रिक खंड देउन. हा तांत्रिक या शब्दाचा अर्थ काय आहे? मला समजत नाही. ह्या गोषवाऱ्यावर सहीसुध्दा नाही. ह्याला कोण मायबाप आहे का? की असेच खरडून आलेले आहे. हा गोषवारा आपण ८ आरोग्य केंद्र चालवतोय. आणखी ५ आरोग्य केंद्र चालवणार आहोत. त्याच्यासाठी आणखी कशाला स्टाफ लावतोय. ती जेव्हा चालू होईल तेव्हा आपण मागवू ना. पण पहिला प्रश्न सांगावा की, तांत्रिक खंड देउन. तांत्रिक खंड किती तासाचा देण्यात येतो, किती दिवसाचा देण्यात येतो? किती दिलेला आहे? काहीच नाही. तांत्रिक खंडाबद्दल आम्हाला जरा सांगावे. प्रशासनाने याबाबत खुलासा करावा.

**हॅरल बोर्जीस :-**

साहेब, पुन्हा एकदा परिस्थिती तीच आहे. प्रशासनाकडून अजूनही असमर्थता आहे. हा विषय तुम्हाला त्याचप्रमाणे पेन्डीग ठेवावे लागेल. सन्मा. सदस्यांनी जे प्रश्न विचारलेले आहेत, खात्याकडून समाधानकारक उत्तर अजूनही प्राप्त होत नाही. त्यामुळे हा विषय सुध्दा पेन्डीग ठेवा. आपण पुढच्या विषयासाठी सचिवांना निर्देश द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही फवारणीबद्दल सांगा ना. औषधांबद्दल क्लिअर करा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभागृह नेता ह्या पुढे विषय पत्रिकेवरती आपण जे विषय, टिपण्या आणतात. त्याला जबाबदार अधिकाऱ्याची सही असल्याशिवाय विषयपत्रिकेवरती आलेच नाही पाहिजे. हू इज रिसपॉन्सीबल? मा. आयुक्त साहेबांची सही नाही, त्या वैदयकीय अधिकाऱ्यांची सही नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. सचिव साहेब, आपल्याकडे जेव्हा गोषवारा येतो, तेव्हा आपण त्याची तपासणी करायला पाहिजे. नुसते वैदयकिय अधिकाऱ्यांनी सही करुन गोषवारा तुमच्याकडे पाठवून दिलेला आहे. तुम्ही पिठासिन अधिकाऱ्यांच्या निदर्शनास ही बाब आणायला पाहिजे.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, अभी जैसे धुवाफवारणी नही हो रही है। वॉर्ड के अंदर में मच्छर बहूत ज्यादा है। जब तक आपका टेंडर नहीं निकालता है तब तक उसी को ही मुदतवाढ बढाके दिजिए। काम तो चालू रहना चाहिए।

**शरद पाटील :-**

तुम्ही ह्याच्यावर रुलिंग दया. आम्हांला सुध्दा नागरिकांना उत्तर दयायला लागते.

**मा. आयुक्त :-**

मा. महासभेमध्ये सन्मा. सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. प्रकरण क्र. ९ च्या बाबतीमध्ये जे प्रश्न उपस्थित केलेले आहे. कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्याच्या संदर्भामध्ये जो गोषवारा डिपार्टमेंट ने दिलेला आहे. त्या डिपार्टमेंटचे एकही अधिकारी आज नाही.

**मिलन म्हात्रे :-**

जाउन राहिलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

इथेही अधिकारी उपस्थित नाही. दुसरा म्हणजे, आरोग्य विभागाचे जे श्री. राजकूमार कांबळे आहेत. तर ते घरगुती धार्मिक कार्यासाठी बाहेर गेले आहेत. त्यांना एक-दोन दिवसाची परवानगी देण्यात आलेली आहे. परंतु, सभागृहामध्ये जी काही चर्चा होते. त्या अनुषंगाने मी सभागृहाला एक आश्वासन देउ इच्छितो की, सन्मा. नगरसेवक मिलन म्हात्रे, त्याचप्रमाणे बरेचसे नगरसेवकांनी या ठिकाणी आरोग्यविषयक मुद्दा उपस्थित केलेला आहे. औषधांचा साठा पुरेसा प्रमाणामध्ये नाही किंवा अजिबातच नाही. तर अशा प्रकारे जे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले आहे. त्याची नियुक्ती कुठपर्यंत आणि अशाप्रकारची जे रॅबीज वगैरे आहे ते त्वरित उपलब्ध करुन देण्याबद्दल मी संबंधित डिपार्टमेंटला निर्देश देतो. तसेच, धुर फवारणीच्याबाबतीमध्ये म्हणजे, आपण जी काही डासनिर्मूलनची मोहिम मध्यंतरी घेतली होती. ती सुरु केलेली होती. त्या संदर्भामध्ये बरीचशी चर्चा झाली होती. मध्यंतरी बऱ्याच सन्मा. नगरसेवकांकडून त्याबाबतीमध्ये तक्रारही आलेल्या होत्या. जी काही औषधांचा साठा आहे. किंवा जे औषध वापरतात. तर त्याची क्वालिटी बरोबर नाही किंवा फक्त रॉकेलचाच फवारा वगैरे करतात. अशा पद्धतीचा तक्रारी आल्या होत्या अशा पद्धतीच्या तक्रारी आल्या होत्या. त्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित कॉन्ट्रक्टरला नोटीससुद्धा आपण काढली होती. आणि त्याचाही खुलासा आलेला आहे. परंतु, मध्यंतरीच्या काळामध्ये हे संपूर्ण डिपार्टमेंटची जबाबदारी श्री. राठोड यांची होती आणि श्री. राठोड यांनी ह्याबाबतीमध्ये जेवढे लक्ष दयायला पाहिजे होते. त्याप्रमाणामध्ये दिले गेले नाही. परंतु, ह्या सभागृहाला आश्वासन देतो की, उदयापासून ज्या आरोग्य विभागाच्या कार्यप्रणालीसाठी मी स्वतः वैयक्तिक प्रयत्न करीन आणि संबंधित खातेप्रमुखांची ताबडतोब, तातडीने बैठक आयोजित करीन उदयाच्या उदया शक्यतो माझ्या अखत्यारिमध्ये जेवढे जेवढे औषधे खरेदी करायचे आहेत. त्या औषधांची खरेदी तातडीने केली जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही मा. सभापती साहेबांना बरोबर दया. त्यांना वाहन दिले आहे. मा. सभापतींना बरोबर घ्यायचे आपण गोडाउन चेक करायची. आणि बायर इंडियाच्या चांगल्या कंपनीची गोडाउन मागवा. मा. सभापती साहेब कुठे आहेत?

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेबांना किती घोडया दिल्या, किती टायपिस्ट दिले, किती क्लार्क दिले, एक सोडून अनेक सभापती झाले.

**मिलन म्हात्रे :-**

विधी सभापती पण आहेत.

**रोहिदास पाटील :-**

त्याचा परिणाम काय झाला? त्याचा परिणाम असा झाला की, गेल्या सभेमध्ये आम्ही तुम्हांला प्रेमाने, अत्यंत नम्रतेने विनंती केली होती की, हा स्टॉक नाही. हा दर्जा चांगला नाही. परिणाम आज काय झाला की, सभागृहाच्या लक्षात आले. तो दर्जाचा नाहीच आहे पण स्टॉक सुद्धा नाही.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) साहेब, ह्या संदर्भामध्ये आता मी मगाशी सांगितले त्याप्रमाणे की जे कोणी सन्मा. सभापती आहे. त्या सन्मा. सभापतींना सुद्धा मी माझ्याबरोबर घेईन. आणि जो स्टॉक मिलन म्हात्रेंनी मात्र मी...

**रोहिदास पाटील :-**

साहेब, आम्ही तोच प्रयत्न करतो की, समजा, आपले अधिकारी अकार्यक्षम ठरले असे समजा. पण, जे मा. सभापती म्हणून बसले आहे त्याने तरी करायला पाहिजे ना. ते सभापती गाडया घेउन काय करतात?

**मिलन म्हात्रे :-**

मा. स्थायी समितीच्या सभापतींने पण फिरले पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

एकतर तुमच्या खात्याच्या अधिकाऱ्यांनी रिपोर्टींग केले नसेल. हा एक वेगळा प्रशासनाचा भाग झाला. लोकप्रतिनिधी म्हणून मा. सभापती म्हणून बसले. त्यांच्याकडे तुमच्याकडे तक्रारी आल्या की आल्या नाही? त्याचाही खुलासा झाला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

मी उदयाच्या उदया ह्या संदर्भामध्ये त्या कामाचा आढावा घेतो. साठा चेक करतो आणि जे जे औषध नाहीत किंवा अपूर्ण आहेत तर ती तातडीने मागवण्याची व्यवस्था करतो. त्याचप्रमाणे सभागृहाला मी दुसरे आश्वासन देउ इच्छितो की, पावसाळा जवळ येत चाललेला आहे. आणि पावसाळा जवळ येत असल्या कारणाने पावसाळ्या अगोदर आपल्याला जेवढा औषधांचा स्टॉक करता येईल. तो औषधांचा स्टॉक मागच्या वर्षीप्रमाणेच ह्या वर्षी करण्यात येईल, अशी मी खात्री देतो.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब , मागच्या वेळेला १५ एप्रिलला नाले सफाई झाली होती. अजून नाले-सफाईचा ठिकाण नाही. आणि कामाला सुरुवात झाली नाही. टेंडर निघाले आहे. मे महिना सुरु झाला. कधीही पाउस येण्याची शक्यता आहे. माझ्या प्रभागामध्ये फार लांब लांब नाले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, नाले सफाई, नाले खोदाई कशावरुन सुरुवात होत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हांला काही प्रॉब्लेम आहे का? टेंडर एक होते ते १७ तारखेच्या मिटींगमध्ये पास झाले आहे.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते, पावडरसुद्धा संपलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, नाले सफाईचे अतिमहत्त्वाचे काम त्यादिवशी त्या सभेत आपण सगळे विषय बाजूला ठेवून पुढे घेतले. पण, त्यात कोणतीही कारवाई नाही. नाले-सफाईचे काम सुरु झाले पाहिजे की नाही?

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, ते काम का थांबले आहे? का सुरु झालेले नाही? कार्यादेश का दिले गेले नाही? प्रत्यक्षात कामाला सुरुवात झालेले नाही. आता त्याच्यामध्ये तुम्हांला सगळे नविन मजूर दोन महिन्यांकरता, दिड महिन्यांकरता कामाला घ्यायला लागतात, वाहने घ्यायला लागतात, जे.सी.बी. घ्यायला लागतात. आजपर्यंत आता कुठेही सुरुवात कसलीच झालेली नाही. साहेब, वर्कऑर्डर दिले गेले आहेत का? नाले सफाईच्या कामामध्ये.

**रोहिदास पाटील :-**

नाले सफाई, नाले खोदाई...

**मिलन म्हात्रे :-**

प्रोग्रेसिव्ह कधी होणार? आता ३ मे झाले.

**हॅरल बोर्जीस :-**

निविदा मागवले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, ते कधी करणार? ते कधी व्हायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

आपली जी १७ तारखेला मिटींग झाली. त्याच्यामध्ये सगळे मंजूरी मिळाली. आता तुम्हाला अडचण कुठे आहे?

**हॅरल बोर्जीस :-**

परवा निविदा मागवले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या १७ तारखेला महिना होईल.

**लिला पाटील :-**

पाउस कधीही पडेल. तुम्हांला सांगून पडणार नाही.

**मा. आयुक्त :-**

नालेसफाईच्या बाबतीत ज्या निविदा मागवलेल्या आहेत. त्या निविदा अदयापपर्यंत उघडलेल्या नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

हे शासकीय उत्तर झाले.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, पण ते कधी उघडणार?

**लिला पाटील :-**

साहेब, पाउस पडल्यानंतर उघडणार आहात का?

**मिलन म्हात्रे :-**

हे शासकीय उत्तर टिपिकल, व्यवस्थित आहे. लंकेमध्ये सोन्याच्या विटा आहेत. इकडे नाहीत.

**मा. आयुक्त :-**

उदया सकाळी ११ वाजता उघडण्यात येतील.

**रोहिदास पाटील :-**

ठिक आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, कामाला लवकर सुरुवात करा. पुढे फार त्रास होईल.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मी सकस आहारबद्दल बोलते, मॅडम, ह्या जून महिन्यापासून ते पुढच्या एप्रिलपर्यंत असा एखादा ठेका आला तर टेंडर दया आणि मॅडम, तीन महिन्यांसाठी देउ नका. फक्त तीन महिन्यासाठी देतात. मग ते ठेकेदार पण बदलतात. तसं करु नका. ठेकेदाराला एक वर्षाचा ठेका दया. जून ते पुढच्या एप्रिलपर्यंत दया. मॅडम, रुलिंग दया.

**मा. महापौर :-**

बालवाडयासाठी जो पुरवल्या जाणारा सकस आहार आहे. सध्या सभागृहामध्ये सन्मा. सदस्या नयना म्हात्रे यांनी समस्या आणि सुचना उपस्थित केली. त्याप्रमाणे त्यांनी मागणी केल्याप्रमाणे शासनाने शाळा सुरु झाल्यावर जून ते एप्रिल महिन्यापर्यंत अशी निविदा काढावी की, जेणेकरुन विदयार्थ्यांना, मुलांना सकस आहार त्या पिरीएडमध्ये मिळेल.

**नयना म्हात्रे :-**

धन्यवाद.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, औषध फवारणीच्या बाबतीमध्ये सभागृहामध्ये अतिशय गांभीर्यपूर्वक चर्चा झाली. साहेब, आपण ज्या एजन्सीला काम दिले. मॅडम, गेल्या वर्षाभराचा जर लेखा-जोखा बघितला महापालिकेच्या इतिहासामध्ये एवढे खराब काम, एवढे निकृष्ट दर्जाचे काम एकही एजन्सीने आजपर्यंत केले नसेल. मा. आयुक्त साहेबांकडे अनेक सदस्यांच्या तक्रारी लेखी स्वरुपामध्ये प्राप्त झालेले आहेत. माझी सभागृहाला आपणासं विनंती आहे की, सदर ठेकेदाराला मुदतवाढ न देता ताबडतोब आपण नविन निविदा काढाव्यात आणि ह्या एजन्सीला लक्षदा ट्रेडींग कंपनी नावावर एजन्सी आहे. मॅडम, ह्या माणसाने अतिशय खराब काम केले आहे. आज महिन्याच्या २० लाख रु. प्रमाणे अडीच कोटी रु. चे टेंडर आपण त्याला वार्षिक दिलेले आहे. आणि तुम्ही पूर्ण शहरामध्ये जर बघितले ह्या माणसाने अतिशय निकृष्ट दर्जाचे काम केलेले आहे. ह्या लक्षदा ट्रेनिंगला अजिबात पुढच्या ह्याच्यामध्ये तुम्ही उभे करु नका. आणि साहेब, त्या मुदतवाढ न देता तुम्ही परत एकदा निविदा काढा.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, आजचे सभागृहाचे कामकाज बघता जसे दुष्काळात तेरावा महिना येतो. अशा पद्धतीचे हे काम चालले आहे. आपण नव्या वर्षात ३५० कोटी रु. संपवायचे आहेत. महिना संपला. सभागृहाकडे पैसेच नाहीत अशा पद्धतीचे काम चालले आहे म्हणजे ह्याचा कोणी वाली नाही कोणी जबाबदारी घेईल अशा पद्धतीचे कामकाज चालले आहे. मा. आयुक्त साहेब, आमची तुम्हांला विनंती आहे की, कोण किती चुकत जरी असेल तरी तुम्ही चुकणार नाही. ह्याची आम्हांला खात्री आहे, असा लोकांचा विश्वास संपादन करुन घ्या आणि असे जे दिसते ओघड की, माल संपला, हे संपले. ज्यांच्याकडे पैसे नसतील त्यांच्यापूर्ती ठिक आहे ना. आपल्याला तर रु.३५० कोटी संपवायचे आहे. दि.१ एप्रिल पासून आज ३ तारीख आहे. एक महिना गेला तरी आपण व्यवस्था करु शकत नाही. आपल्याकडे भरपुर पैसे आहेत हे पैशासाठी काम थांबवू नका ज्यांना काम द्यायचे त्यांना द्या प्रभावी काम करतील असा शब्द खर्च करा उन आहे हे नक्की तरीपण साहेब तुम्हाला आता महानगरपालिकेच्या बाहेर पडायला लागेल. महानगरपालिकेच्या बाहेर पडून ही लोक काम करतात करत नाही. ठेकेदार काम करतोय,करत नाही साहेब, हे असे फार बोलणे योग्य वाटत नाही. आम्हालाही आमच्या लक्षात येते की, आपण किती वेळ कोणत्या गोष्टीवर बोलावं.

**मा.महापौर :-**

सन्मा.सदस्यांनी प्रकरण क्र.९ आरोग्य विषय कर्मचारी व पदाधिका-यांना मुदतवाढ देण्याचा विषय सभागृहाने स्थगित ठेवण्यास सांगितलेला आहे. तर हा विषय पुढील सभेत घेण्यांत येईल आणि सद्या हा विषय स्थगित ठेवण्यांत येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, पुढील सभेत घेणार पण आम्ही ज्या त्रूटी काढल्या आहेत त्याचे काय? त्या व्यक्ती किती आहेत? त्याच्यावर काय कारवाई आहे? त्याबद्दल बोला. पुढच्या विषयात त्यांनी परिपुर्ण करुन विषय आणला पाहिजे आणि व्यवस्थित सही, शिक्केनिशी आला पाहीजे. जवळजवळ आपण ६० लोकांना पुढे मुदतवाढ देवून पगार देणार आहोत. आपल्या महानगरपालिकेचा ४७% आस्थापनेवर खर्च चालला आहे. त्यामानाने काम काही नाही म्हणून जरा डिटेल व्यवस्थित आणा.

**मा. महापौर :-**

मा.सभागृहाने आणि सन्मा.सदस्याने मागणी केल्याप्रमाणे पुढील सभेत विषय घेत असतांना गोषवारा पध्दतशिर द्यावा त्या गोषवा-यात पूर्ण माहिती असावी.

**अनंत पाटील :-**

मा.महापौर महोदया, शासकीय पत्र काही आले असतील ना तर ए.सी.झेड.चे गेल्यावेळी आपल्याला पत्र आले होते. शासकीय पत्र आले होते. त्या शासकीय पत्रावर चर्चा करावी. नाहीतर पुढच्या वेळी येणा-या मिटींगध्ये विषय घ्या.

**हॅरल बोर्जीस :-**

मा.महापौर मॅडम, सभागृहातले आपले २ मिनिटे जरा घेउ इच्छितो. सन्मा. सभागृहाचे सदस्या उर्मिला कोमल भामरे यांनी एक पत्र प्रशासनाला दिलेले आहे. सन्मा.सदस्य उर्मिला भामरे मॅडमच्या वार्डामध्ये बाजूच्या वार्डा चे नगरसेवक त्यांनी एक काम सुरु केले आहे. जूने शौचालय तोडून त्या ठिकाणी कोणत्याही सभागृहाची आर्थिक व प्रशासकीय मान्यता नसतानासुध्दा बाजूच्या वार्डातील नगरसेवकाने त्याच्या वार्डामध्ये एक शौचालयाचे काम सुरु केलेले आहे. त्यांनी वाटते प्रशासनाला पत्र सुध्दा दिलेले आहे. मा.आयुक्त साहेब, आर्थिक व प्रशासकीय कोणतीही मंजूरी नसतानासुध्दा आज ते काम सुरु आहे. सन्मा.सदस्या ठेकेदाराला बोलायला गेल्या तर ठेकेदाराने त्यांच्याशी उद्धटपणे वर्तन करुन अर्वाच्च भाषेमध्ये त्याचा अपमान केलेला आहे. तर कृपया आपण संबधित खात्याचे जे आपले अधिकारी असतील त्यांना मा. महापौरांना विनंती करतोय की हे काम ताबडतोब थांबवावे, अशी मी आपणांस विनंती करतोय.

**रोहिदास पाटील :-**

साहेब मला हयांची माहिती आहे. म्हणून मी सांगतोय त्या ठिकाणी गेले ४ वर्षे झाले ती लोक अनेक म्हणजे माझेही त्याच्यात पत्र आहे. म्हणूनसांगतो जेम्स कोलासो च्या नगरसेवक फंडातून किंवा प्रभाग समितीचे कोण ते मला हे नक्की माहित नाही. पण ज्या ठिकाणी ते बांधकाम चालले आहे. सभागृहाचा पुर्ण कार्यकाल साडे चार वर्षाचा पुर्ण होवून सुध्दा त्या २००-२५० महिलांना आपण न्याय देवू शकत नाही. आज त्या डोगरीवर जाण्यासाठी कुठेही जागा नाही. एक महिला दोन महिलांना सुरक्षित बरोबर घेईल किंवा ती डब्बा घेवून जाते. अशी स्थिती आहे म्हणून त्या शौचालयाचे काम सुरु झाले आणि आपण एकदा करु शकलो नाही तर दुसरा नगरसेवक देत असेल तर त्याला........

**हॅरल बोर्जीस :-**

काम करा पण एखाद्याची आर्थिक प्रशासकीय मान्यता घेवून तूम्ही काम करा. तूम्ही सगळया गोष्टी धाब्यावर बसून काम करत असाल तर ते चुकीचे आहे ना.

**रोहिदास पाटील :-**

मा.सभागृह नेते, तूम्ही मा.आयुक्त साहेबांना अशी विनंती करा की त्याचे प्रशासकीय सगळी कामाची जी पुर्तता असेल ते त्वरीत करुन काम लवकरात पुर्ण करा. अशी सुचना करा. सन्मा.सभागृह तुमचे स्वागत करेल.

**हॅरल बोर्जीस :-**

तुम्ही सक्षम प्रभाग अधिकाऱ्यांकडून किंवा प्रभाग समितीकडून त्याची मान्यता घ्या आणि त्यानंतर तुम्ही काम सुरू करा. साहेब, कोणत्याही प्रकारच्या कामाची मंजुरी नसताना त्या भागातील नगरसेविका ठेकेदाराला विचारणा करायला गेल्या. तो त्यांच्याशी अतिशय उद्धटपणे वागला.

**रोहिदास पाटील :-**

साहेब मी मा. आयुक्त साहेबांना विनंती करतो की, ताबडतोब काम असेल त्यांना योग्य ती आवश्यक असेल ती परवानगी द्या आणि ते शौचालय पुढे येउ द्या. ह्या सभागृहास मी नम्र विनंती करतो किंवा तो कोणी प्रतिष्ठेचा आहे किंवा त्याचा विषय घेउ नये.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, तुर्तकाम थांबवा. ह्याच्यानंतर पुढे ज्या मंजुऱ्या आहेत त्या मिळून ते काम सुरु करा. .

**रोहिदास पाटील :-**

आजचा दिवस थांबवा. उद्या द्या. मा. आयुक्त साहेब, काही महिलांची गरज आहे. आम्ही मा. सभागृहाचे मान ठेवतो. मा. सभागृह नेतेबद्दल मान ठेवतो.

**एस. ए. खान :-**

श्री. खांबित साहेबांशी मॅडमशी काहीतरी बोलणं झालय.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सन्मा. सभागृहनेते अगर दुश्मन भी कोई आपका काम करता है। तो उसे वह दुखाना नही चाहिए। असे चालूही रखिए।

**हॅरल बोर्जीस :-**

हम अच्छे काम मे कभी रूकावट नही लाते है।

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही असे रूलिंग द्या म्हणजे आमची अशी अपेक्षा आहे की ते महिलांसाठी आहे. त्याची जी काही कायदेशीर पूर्तता करायची आहे. ती त्वरीत २४ तासात करावी. आणि त्याला काम करण्याची परवानगी द्यावी. ठिक आहे आपण सभागृहनेतेचा मान देवू या. पण काम पूर्ण होणे गरजेचे आहे. परवानग्या घेणेही गरजेचे आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, त्या नगरसेविकेने प्रभाग समिती निधीमधून तेच काम प्रस्तावित केलेले आहे. आणि बाजूच्या वॉर्डातील नगरसेवकांना कोणत्याही प्रकारची आर्थिक प्रशासकिय मान्यता नसताना तेच काम सुरू केलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

तसे मला डीटेल माहिती नाही पण मला जेवढे माहित आहे तेवढे.........

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृह नेते, आम्ही काळ्या यादीत टाकू. आम्ही नावाची लिस्ट देवू. अशा नगरसेवकाला मिरा भाईंदर शहरामधले एकही प्रशासकिय काम देउ नये. अशा ठेकेदाराला की जे चुकीच्या पद्धतीने काम करतात आणि नगरसेवकांचा अपमान करतात. प्रत्येक नगरसेवक हा सन्मानित आहे. त्याच्या सुचनेप्रमाणे कारण त्याला त्याच्या वार्डाची माहिती अधिक असते त्याच्या सुचनेप्रमाणे काम झाले पाहिजे आणि त्या त्या वॉर्डमध्ये काम करत असताना जर इतर नगरसेवकांनी मागणी केली असेल तरी त्या वॉर्डातल्या नगरसेवकांना विश्वासात घेउन काम करणे गरजेचे आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही आदेश द्या. आर्थिक प्रशासकिय मान्यता नसतानासुद्धा चालू असलेले काम त्वरीत बंद करावे असे तुम्ही पहिले आदेश द्या.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस साहेब, आम्ही सांगितले आहे की पूर्तता करून घ्या आणि तो पर्यंत ठेवा ना.

**शिवप्रकाश भुदेका :-**

उद्या तुम्ही त्याला सहकार्य करून ते कागद त्यांच्याकडे कमी असेल तर तुम्ही त्याला तुरंत करून द्या.

**हॅरल बोर्जीस :-**

फुकटचे वाद निर्माण झालेले आहेत ना.

**शिवप्रकाश भुदेका :-**

वाद कसले? तुम्ही सहयोग केले तर वाद कसले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

ती गरज आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

तुम्ही सहयोग करावा. वाद संपला असे समजा.

**हॅरल बोर्जीस :-**

मॅडम तुम्ही काम थांबवायला सांगा.

**शिवप्रकाश भुदेका :-**

साहेब, चांगले काम कधी थांबवायचे नाही.

**रोहिदास पाटील :-**

ह्याची एक चोवीस तासामध्ये पूर्तता करून द्या. नंतर काम सुरू करा.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सन्मा. सभागृह नेते तुम्ही मा. आयुक्त साहेबांना विनंती करा की ते कागद........

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब मी तुम्हाला विनंती करतोय मा. महापौर मॅडम त्याठिकाणी एक नाही तर जर तीन शौचालय बांधली तरीसुद्धा ती कमीच आहे. मला त्यातले माहित आहे. सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस साहेबांना सुद्धा माहित आहे. दोन्ही नगरसेवकांची पूर्तता पुर्ण करा. मलासुद्धा माहित आहे. कोण तीसरा नगरसेवक असेल तर सांगा. त्यांचा सुद्धा फंड द्या. सन्मा. सदस्य बोर्जीस साहेब तुमचा असेल तर तुम्ही पण द्या.

**हॅरल बोर्जीस :-**

तुर्त काम थांबवा. आर्थिक प्रशासकिय मान्यता घ्या आणि त्यानंतर काम करा. नगरसेवक निधितून काम करतो आहे. आणि तो बाजूच्या वॉर्डमधला नगरसेवक आहे. ह्या वॉर्डमध्ये काम करतो आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

उसमे आपको खुश होना चाहिए की वह नगरसेवक आपके वॉर्ड का ध्यान रखता है।

**रोहिदास पाटील :-**

साहेब असे तर काम करू शकतो. आपण असे तर कामे केलेली आहेत. तशी पाच उदाहरणे सुद्धा माझ्याकडे आहे. प्रभाग समितीची, नगरसेवकांची........

**हॅरल बोर्जीस :-**

अशाच प्रकारचे वाद या पूर्वी सुध्दा उत्पन्न झालेले आहेत. प्रभाग समितीमध्ये, मा. महासभेमध्ये पोलिस स्टेशनच्या वरचा शेठचे काम तुम्हाला आठवण असेल की त्या कामामध्ये काय परिस्थिती झाली होती.

**शिवप्रकाश भुदेका :-**

आपतो सन्मा. सभागृह नेता है। आपकेलिए सब नगरसेवक एक जैसे ही है।

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, तुम्ही काम करा परंतु, ज्या आवश्यक परवानग्या आहेत त्या मिळाल्यानंतर काम करा.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभागृह नेते, आम्ही प्रेमाने बोललो की नाही. तुमचा मान ठेवून सांगतो की ते काम आजच्या दिवस बंद करा. तुम्ही त्याला मदत करून द्या आणि दोन शौचालये बांधा दोन ते तीन बांधली तरी हरकत नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

वह नगरसेवक को तकलिफ होता है वह आपको देखना चाहिए। अभी आप देखते है क्योंकी आप नगरसेवक के नेता है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे आर्थिक आणि प्रशासकिय मंजुरी घेउन ते काम सुरू करण्यात यावे. तुर्तास दोन ते तीन दिवस काम बंद ठेवावे.

**रोहिदास पाटील :-**

धन्यवाद.

**शानु गोहिल :-**

मा. महापौर मॅडम, गए १५ से २० दिन से लेके जेसल पार्क मे पानी की समस्या इतनी बढ गई है। और आए दिन श्री. बारकुंड साहब से मैने इस बारे मे कम्प्लेन्ट भी की है। लेकीन अभी तक कोई स्ट्रिक ॲक्शन नही लिया गया है। तंग आकर जब पुछा जाता है की पानी क्यो कम आता है। वह बोले की, आगेसे शट डाउन रहा। लोडशेडिंग है। यह है, वह है। कोई ना कोई नये बहाने निकालते है। पब्लिक ने तंग आकर टाकी के उपर जाकर पब्लिक ने जब वॉलमन को जाकर पुछा की पानी क्यो कम आता है तो वह बोले की सन्मा. सदस्य हमारे ऐसे लोकप्रतिनिधी है उनका हमारे उपर दबाव आ रहा है। उनका हमारे उपर प्रेशर आ रहा है। की आप लोग पानी कम छोडो। जेसल पार्क के कुछ झोन मे जहाँ पर टॉवर्स है। वहा पर पानी कम छोडो। और पब्लिक पुछने आयेंगे तो उन्हे कहना की, नगरसेवक को फोन करे फिर हम पानी छोडेंगे। इस तरह से हमे वॉलमेन का जवाब मिला है। और बाकायदा वह वॉलमेन रजिस्टर लेके हर कॉम्प्लेक्स घुमता है। की, मुझे पैस दिजिए तो मै आपको पानी रेग्युलर बराबर छोडूंगा। दिवाली के अलावा पुरे सालभर रजिस्टर लेके घुमता है। और अनफॉरच्युनेटली वह मेरेही कॉप्म्लेक्स मे पकडा गया है। यह तीन बार हो गया है। मैने उसकी कम्प्लेन्ट भी श्री. बारकुंड साहेब से की है। लेकीन अभी तक उसके उपर कोई स्ट्रीक ॲक्शन नही लिया गया है। तो प्रशासन को क्या वो लोकप्रतिनिधी चलाते है? प्रशासन रिस्पॉन्सीबिलीटी मालूम नही है।

**शुभांगी नाईक :-**

नगरसेवक कौन है?

**रोहिदास पाटील :-**

नगरसेवक कोण असेल जर त्यांचे नाव घेतले तर चांगले आहे. आणि कोण पैसे मागत आहे त्याचे नाव घेतले तर चांगले आहे. तर आता १० दिवस झाले सन्मा. सदस्य मदनसिंग नाही आणि मी तिकडे आहे.

**शानु गोहिल :-**

नगरसेवक का नाम और पेपर के अंदर भी आया है। वॉलमेन ने रिक्वेस्ट किया है मॅडम, मुझे सस्पेंड मत करना उसने मेरे सामने हाथ पैर जोडा है। यह फॅक्ट है। इसके बारे मे आप स्ट्रिकली कारवाई किजिए। क्योंकी यह पानी का सवाल है। और अभी गरमी है। गरमी मे लोगो को पानी की बहूत आवश्यकता है।

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, जरा खुलासा करायच्या अगोदर मा. महापौर मॅडम, शहरामध्ये लोडशेडींगमुळे किंवा कोणत्या तरी कारणामुळे पाणी फार कमी मिळते. परंतू ज्यावेळेला पाणी येते त्यावेळेला भाईंदर पश्चिमेला रात्री फिरलो असता आपण जर स्वतः अधिका-यांना बरोबर घेवून फेरफटका मारला असता बऱ्याचशा इमारतीच्या ग्राउंड फ्लोअरच्या टाकीतले पाणी रस्त्यावरती गटारात वाहून जाते. मी या तक्रारी गेल्या दीड महिन्यापासून सगळयांना करतोय अजूनही कोणाला उसंत मिळाली नाही. आणि वेळही मिळालेला नाही म्हणजे टाक्या लिटरली ओव्हरफ्लो होवून गटारात पाणी फूकट जाते. मी बिल्डींगची नावे सुध्दा दिलेली आहेत. पण त्याच्यावर कारवाई काय झाली काही कळत नाही. आमच्याकडे प्यायला पाणी नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतो. सन्मा.सदस्य म्हात्रे साहेबांनी सांगीतल्यानुसार मी मागच्या ४-५ दिवसापासूनच हा प्रयोग चालू केला आहे. मोदी पटेल, विनायक नगर पहाटे ४ वाजता तेथील नगरसेविका रिटा शाह होत्या. सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल होते, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल होते. आम्ही पूर्ण वॉर्ड फिरलो होतो. तर मी ती कारवाई चालू केली आहे. तुम्ही जी सांगितली होती आणि दुसरा प्रश्न...

**मिलन म्हात्रे :-**

दुसरा प्रश्न सांगायच्या अगोदर मी जो एरिया फिरलो तिकडे आपण फिरला नाहीत हे कबूल करा. तुम्ही फिरलात ना. मी कुठे नाही म्हणतो. तुम्ही मोदी पटेल रस्त्यावरून फिरला असाल. मोदी पटेल रोड म्हणजे पुर्ण भाईंदर नव्हे आणि आज रात्री तुम्हाला सांगतो आज तुम्ही मला पाण्याचे टायमिंग द्या. तुमच्या तिकडच्या जर पाण्याच्या टाक्या ओव्हर फ्लो होत असतील तर तुम्ही सर्विसमधला राजीनामा द्यायला तयार रहा नाहीतर मी द्यायला तयार आहे. इकडे लोकांना पाणी मिळत नाही. तुम्हाला दोन-दीड महिन्यापासून बिल्डींगची नावे देउन मी तक्रारी केलेले आहेत आणि तुम्ही मला या मिटींगमध्ये डायस वरती बसून मोदी पटेलचा इतिहास सांगत आहात का? मी स्पेसिफिक ज्या एरियाचे नाव दिले त्याचे बोला. मी नावे दिले आहे. तुम्हाला लेखीसुद्धा नाव दिले आहे. इकडे महापालिकेत प्यायला पाणी मिळत नाही आणि धो धो गटारामध्ये वाहून जाते. आणि आपण तिकडे संत गाडगेबाबा अभियानाचे आणि पाणी चांगले चांगले परितोषिक मिळवतो. मॅडम, नावानिशी कळवले आहे. अजुनही सांगतो मा. सभागृहामध्ये आजचे झोन काढा आणि तुम्ही ४ दिवसाच्या काय गोष्टी करत आहात? ४ दिवस भाईंदरला पाणीच आले नाही. तुमच्या टाक्या ३-३ फुटांवरती पणी भरलेले नाही त्या तुम्हाला कशा काय क्रिएटस होणार. ज्यावेळेला शहरामध्ये फुल पाणी येते. त्यावेळेला तुम्ही व्यवस्थित पाणी सोडता आपल्याकडे पाण्याची कमतरता नसते. त्यावेळेला हा प्रश्न उद्‌भवत असतो. त्यावेळेचे बोला. आज तुमच्या पाण्याच्या टाकीमध्ये पाणी नाही. मग ते ओव्हरफ्लो कसे होणार? आज माझ्या गोविंदनगरमध्ये मी जिकडे गोविंदनगरमध्ये राहतो तिकडे दोन तास पाणी येते. आज तिकडे फक्त १५ मिनिटे पाणी आले. आमची पाण्याची टाकी कशी काय अंडरग्राउंड ओव्हर फ्लो होईल. मॅडम, कॉमन सेन्स आहे. ह्या गोष्टीवरती मी तुम्हाला सांगतो मा. आयुक्त साो. हा जोक नाही. आपल्याकडे इस्टला पाण्याच्या टाकीवरती जा अक्षरक्षः त्या टँकरच्या मारामाऱ्या पडलेल्या असतात. लोक पैसे भरून तिकडे मारामाऱ्या होतात आणि त्या टँकरवरती प्रायव्हेट ड्रायव्हर एवढे मस्तावले आहेत. ते टँकरचे पहिले विचारतात की भाडे जवळचे आहे की लांबचे आहे आणि सरळ सांगतात की टँकर घेण्याचे तुमचे बजेट आहे का? म्हणजे तुमचे ३५० रु. भरायचे. प्लस त्या टँकरवाल्याला १५०-२०० रु. दयायचे. आणि मग तो येणार. मॅडम्, ही परिस्थिती आहे. मी तुम्हांला सांगतो. आपण रात्री कधीही अनएक्सपेक्टेड व्हिजीट देवू या आणि बघा, काय प्रकार चालला आहे. माझे कोणावरती व्यक्तिगत आकस नाही. आपले जे पाणी फूकट जाते. आमच्या एरियामध्ये एकदा असेच झाले. रस्त्यावरती पाणी टाकून धुताना मी बघितलं. त्यावेळेला मी सांगितलं की इकडे १५-२० मिनिटे तरी पाणी कमी करा. लोकांना पाण्याची किंमत कळली पाहिजे. आज तुम्ही काहीतरी स्ट्रिक घेतले. आपल्याला अजून १५ जून पर्यंत वेळ आहे. आणि परिस्थिती फार वाईट होणार आहे. इलेक्शनसुद्धा जवळ आले आहेत. नाही त्या विषयावर मोर्चे निघतात. आज पाण्याचा स्त्रोत मागे तुम्हांला मी जे बोलतो ते करुन दाखवले आहे. मागे तुम्हांला मी जे बोलतो ते करुन दाखवले आहे. मागे आपण त्या मीटरचा जेव्हा साफ-सफाईचे अभियान घेतले. त्याच्यामध्ये ८०टक्के इमारतीची मीटर बंद आढळलेली आहेत. फोटोग्राफर सकट त्यापुढे काय झाले? त्याचे उत्तर लेखी मला आजही नाही. मॅडम्, आम्ही जवळ जवळ २०० बिल्डिंगची मीटर चेक केली. आपण साफ करुन दिली आणि आता ते ग्राहक कनज्यूमर कोर्टाने आता एक निकाल दिला आहे की, संपूर्ण महापालिकेची जिम्मेदारी आहे. ग्राहकाचे मीटर कसे असणं कसे नसणं आणि नवीन बदलायचे काय ते आपल्या महानगरपालिकेची जिम्मेदारी आहे. असा कनज्युमर कोर्टाचा असा कनज्युमर कोर्टाचा असा फ्रेश एक महिन्यापूर्वी निकाल लागलेला आहे. आम्ही फिरलो आणि सगळी साफ-सफाई करुन घेतली. ज्या ठिकाणची मीटर बंद होती. त्यांना लमसम मीटरचा आकार देत होते. त्याबद्दल मला काहीच लेखी अजून दिलेले नाही. म्हणजे आम्ही जे काही ४-५ दिवस १०-१२ तास मेहनत केली. स्वतः फोटोग्राफ्स आणून दिले. एकही अधिकारी आला नाही की चला एक फोटो काढून आम्ही तुम्हांला देतो. कॅमेरेमध्ये फोटो आणून ह्यांना सगळ्यांना स्वतः मी दिले. त्याच्यानंतर कारवाई काय झाली? काहीच नाही मा. आयुक्त साहेबांना फोटो दिले, श्री. बारकुंड साहेबांना दिले. श्री. खतगांवकर साहेबांना दिले. लेखी पत्र दिले. ह्या गोष्टीला आता दीड महिना व्हायला आला. अजून अधिकाऱ्यांना मला दोन ओळीचे उत्तर दयायला त्यांना अजून वेळ मिळालेला नाही. आणि शहरामध्ये सगळीकडे पाण्याच्या टाक्या ओव्हरफ्लो होउन जात आहे. ही परिस्थिती आहे. तुम्ही मला फक्त सांगा. मी जे बोललो ते. मी रात्री फिरतो. भलतीसलतीकडे नाही. जिकडे जायचे तिकडेच फिरतो. नगरभवनच्या समोरची बिल्डिंग आहे. त्या बिल्डिंगचे नाव दिले आहे. आपल्या परिवहनच्या बसेस तिकडे टर्न होतात. ५ ते ६ फूटाच्या फवाऱ्यासारखी मोठी पाईपलाईनचे पाणी अगदी त्या टाकीमधून दररोज वाहते. राममंदिर रोडला सुद्धा लहान लहान घरांच्या टाक्या अगदी रस्त्यावरती पाणी येईपर्यंत वाहतात. आणि सगळ्यात मोठे म्हणजे काँग्रेसचे पुढारी बसलेले आहेत. देवचंद नगरला काँग्रेसच्या ऑफीसच्यावरती जी ओरिएंट टँक आहे. ५-५ तास, ६-६ तास पूर्ण त्या टाकीतले पाणी वाहत राहते. साहेब, गाव दुनिया ओव्हरफ्लो

होते. अक्षरशः रस्त्यावरती चिखल असतो, कोणाचे लक्ष नाही. त्यांचे नाही पण तुम्ही देखील नोटिस दया. आम्ही गेलो. आमचे निरिक्षण केले. त्यांनी बघितले आपले पाणी फुकट चालले होते. लोकांना प्यायला पाणी मिळत नाही. रात्री तिकडे त्या कॉंग्रेसच्या ऑफीसच्या टाकीचे भयंकर तमाशा होतो. धो-धो पाणी सगळ्या रस्त्याभर वाहत असते.

**हंसुकूमार पांडे :-**

उधर कॉंग्रेस का क्या राजनिती है यह हमें बताइए।

**मिलन म्हात्रे :-**

हमें राजनिती नही करना नही है।

**हंसुकूमार पांडे :-**

कॉंग्रेस का क्या राजनिती यह बताइए।

**मिलन म्हात्रे :-**

कॉंग्रेस का राजनिती नहीं है। वह आपका जो ऑफीस है उसके उपर पानी का टँक है। वह पानी ओव्हरफ्लो होता है, वह इन लोगों ने बंद करना चाहिए। यह मैं बोलता हूँ। हमें राजनिती नही करना है।

**हंसुकूमार पांडे :-**

तो आप कॉंग्रेस का नाम क्यू ले रहे हो। कॉंग्रेस का ऑफिस है।

**मिलन म्हात्रे :-**

वह टाकी आपके ऑफिस का है। वह टाकी आपका खुद का है।

**हंसुकूमार पांडे :-**

कौनसे ऑफिस का टाकी है।

**मिलन म्हात्रे :-**

फिर आपको मालूमही नही है। आप ऑफिस नही गए होंगे।

**हंसुकूमार पांडे :-**

हमें हमारा हिस्ट्री पुरा मालूम है। अभी चाहिए ......

**मिलन म्हात्रे :-**

अभी चलेंगे, ऑफिसर को लेके अभी चलेंगे। आपके ऑफिस का उपर का टाकी रातभर बहता है।

**हंसूकुमार पांडे :-**

आपको कौनसे ऑफिसर को लेना है? आप मेरे साथ चलो।

**मिलन म्हात्रे :-**

आपके ऑफिस के उपर का टाकी रातभर बहता है।

**हंसुकूमार पांडे :-**

सवालही नही पैदा होता है।

**मिलन म्हात्रे :-**

आप बोलके चलता नहीं है।

**हंसुकूमार पांडे :-**

हम लोगों को मालूम है ना।

**मिलन म्हात्रे :-**

जब पानी फूल रहेगा तभी हम सब साथ मं चलेंगे। अभी नहीं।

**हंसुकूमार पांडे :-**

कभी भी चलिए।

**मिलन म्हात्रे :-**

देवचंद नगरच्या नाक्यावरती जे कॉंग्रेसचे ऑफिस आहे. आपल्या संतोष टॉकिजच्या नाक्यावर त्या ऑफिसची टाकी रात्रभर वाहत असते. हम पानी फुकट जा रहा है यह बोल रहे है।

**हंसुकूमार पांडे :-**

पानी के लिए हम लोग भी लढते है यह हम लोगों को मालूम है। हम लोगों ने टँकर पातलीपाडा, भाईंदर हम लोगों ने व्हिजीट किया। कॉंग्रेस के लोगों वहा जा के देखा की पानी क्यों कम आ रहा है। और कोई वहाँ जा कर व्हिजिट नही किया। बाकी कोई नगरसेवक वहाँ देखने के लिए नही गया।

**मिलन म्हात्रे :-**

सवाल यह है की, पानी फुकट जाता है। उसकी बात किजिए।

**हंसुकूमार पांडे :-**

पानी फुकट जाता है यह देखना प्रशासन का काम है।

**मिलन म्हात्रे :-**

हमने यह बोला नही है की, उस टाकी का पानी बंद करो, आप वहाँ जाकर देखके आइए।

**हंसुकूमार पांडे :-**

कॉंग्रेस का ऐसा वैसा मत किजिए। इलेक्शन आया है इसलिए राजनिती मत किजिए।

**मिलन म्हात्रे :-**

हम लोगोंको बहूत विषय है। आप मत डरिये। रस्ते का काम भी करेंगे।

**हंसूकुमार पांडे :-**

हम लोग भी तयार है।

**मिलन म्हात्रे :-**

आप चुनाव की बात मत किजिए। हर जगह से तैयार है। नया नगर से स्टार्ट करेंगे आप चिंता मत किजिए। पानी का विषय की बात है। पानी फुकट जा रहा है वह रोकने की बात कर रहा हूँ। जो मुझे दिखता है। मैंने उन्हें यह भी कहा की, बिल्डिंग का नाम दिजिए। मैंने नाम दिया है। जब उनके मुँहसे नाम नहीं अया तब भी मैं बोल रहा हूॅं। बाकायदा मैंने नाम दिया है। कौनसे कौनसे बिल्डिंग के टाकी का ओव्हरफ्लो हो जाता है। उन्हें वह नाम दिये है।...

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य तुम्ही बसा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मला ह्याच्यावर रुलिंग पाहिजे. आम्ही दिड महिन्यापासून एवढे पत्रव्यवहार करतोय...

**मा. महापौर :-**

आपण ज्या ज्या विभागाची माहिती दिलेली आहे.

**शानु गोहिल :-**

मा. महापौर मॅडम, मी प्रश्न विचारलेला आहे. त्यांना जरा खुलासा करु दया. आधी मी प्रश्न विचारला आहे. श्री. बारकुंड साहेबांना सांगा की मला प्रश्नाचे उत्तर दया.

**मा. महापौर :-**

त्या डिपार्टमेंटच्या अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**एस. ए. खान :-**

श्री. बारकुंड साहेब, खुलासा करा आणि उत्तर दया.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, की सन्मा. सदस्यांनी जी तक्रार केलेली आहे. त्यात एकदा माझ्याकडे तक्रार केल्यानंतर दोन वेळा सर्व वॉलमेनची मी बैठक घेतलेली आहे. सर्वांना सुचना दिलेली आहे की, कामे कशा पद्धतीने करायची याबाबत सुचना दिलेली आहे. आणि वैयक्तिक सर्व नगरसेवक कुठे बिल्डिंगला पाणी कमी आले तरी मला घरी किंवा मोबाईलवर फोन करतात. मी स्वतः पाहणी करतो. याबाबत जेसलपार्कला पाणी कमी आले किंवा कुठल्या बिल्डिंगलाही मॅडम, कुठल्या बिल्डिंगला पाणी कमी आले आणि मी पाहणी करायला आलो नाही, असे झाले नाही. जनरली शक्यतो, जेसलपार्कमध्ये आजच्या परिस्थितीलाही कुठे अडचण नाही. जर एखादया बिल्डिंगला असेल तर मला जर तक्रार केली तर मला स्वतः व्हिजिट करतो. परवाचे मी उदाहरण देतो. मला बोलू दया. या उपरही वॉलमन लोक असतात त्याच्यावरती मिस्त्री असतात. त्याच्यावर ज्युनिअर इंजिनियर त्याच्यावरती डेप्यूटी इंजिनियर असतात. ह्या उपरही जर कुठल्या वॉलमनने आज सकाळीच तुम्ही मला सांगितले की, वॉलमनचे असे असे केले पैसे मागतात किंवा काही दुसरा अन्य लोकांचे....

**शानु गोहिल :-**

तुम्हांला ह्या आधी पण सांगितले होते. आज सांगितले होते.

**शिवाजी बारकुंड :-**

हे राजकीय लोकांचे किंवा आपआपसात म्हणजे मला कृपा करुन एक विनंती करायची आहे की ह्या पाणी प्रश्नावर कोणीही राजकारण करु नका. हात जोडून विनंती आहे. कारण जी काही तक्रार असेल, पाण्याची अडचण आहे आपल्याला माहित आहे. प्रॉब्लेम सॉल्व्ह करण्यासाठी आपण २४ तास प्रयत्नात आहे. आपण त्यात १०० टक्के यशस्वी होउ असे नाही. परंतु, माझे पण ह्यामध्ये प्रामाणिक प्रयत्न आहे की, असे जाणूनबुजून एखादयाला फेवरेबल करायचे, आणि अनफेवरेबल करायचे असा उद्देश कोणालाही नाही. एखादया वॉलमेनने मागे वॉलमेन ते असे कार्य केले ते ४ वॉलमेन सस्पेन्ड केलेले आहेत. आजही ते सस्पेन्ड आहेत. मी विनंती करतो की, कोणी असे पैसे मागितले किंवा काय केले असेल तर साहेबांनी सांगितल्यानुसार....

**शानु गोहिल :-**

मी त्या वॉलमेनची कम्प्लेंट केली होती की त्याचे ट्रान्सफर केले का? तुम्ही त्याला सस्पेन्ड केले का? मी तुम्हांला जेव्हा कंम्प्लेट केली तेव्हा...

**शिवाजी बारकुंड :-**

एकदा तक्रार आल्यानंतर त्यांना समज देण्यात आली दोन वेळा बैठका घेतल्या, एवढे झाले ना.

**शानु गोहिल :-**

अजून तो सुधारला नाही ना?

**शिवाजी बारकुंड :-**

सुधारणार नाही. आता साहेबांशी...

**शानु गोहिल :-**

तो सुधारणारच नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेबांना सांगून त्याच्यावर काय कारवाई करायची आहे.

**शानु गोहिल :-**

तुम्ही त्याच्यावर काय ॲक्शन घेतली?

**शिवाजी बारकुंड :-**

ॲक्शन म्हणजे कसे तर आता ४ वॉलमन सस्पेन्ड केले आहे. त्यांच्यावर कारवाई, चौकशी चालू होईल. आता जी कारवाई सांगितली आहे. त्यांच्यावर कारवाई करतो ना. साहेबांना रिपोर्ट देईन तेव्हा पुढची कारवाई....

**शानु गोहिल :-**

साहेब, त्यांनी सन्मा. सदस्याचे नाव घेतले आहे. दुसरे काय पाहिजे. त्याने नाव सुद्धा घेतले आहे आणि त्यांचे नाव पेपरमध्ये सुद्धा आले आहे आणि पेपरचे नाव मानव मुकाम आहे. ह्या मानव मुकाम पेपरमध्ये त्या नगरसेवकाचे नाव झाले आहे. प्रशासन क्या नगरसेवक के बोलने पर चलती है? प्रशासन की डयुटी क्या है? वह प्रशासन ने करनी चाहिए। वह नगरसेवक बोले की पानी छोडो तो छोडेंगे क्या?

**शुभांगी नाईक :-**

तुम्ही नगरसेवकाचे नाव सांगा. मघासपासून तुम्ही नुसते नगरसेवक कशाला बोलता? त्या नगरसेवकाचे नाव काय आहे ते समोर येउ दया. म्हणजे, ह्याचा अर्थ तुम्ही गप्प बसता आहात. तुम्ही त्याला कमजोर पडलात ना.

**शानु गोहिल :-**

आम्ही गप्प बसत नाही.

**शुभांगी नाईक :-**

मग, तुम्ही नाव सांगा. आणि म्हणावं त्या नगरसेवकाला बोलवावे. ज्याने पाणी कमी सोडायला सांगितले त्या नगरसेवकाला बोलवावे. त्याच्यावर सुद्धा शासन करतील ना.

**शानु गोहिल :-**

ते प्रशासनाला माहित आहे. मी साहेबांना सांगितले आहे. तुम्ही चिंता करु नका.

**शुभांगी नाईक :-**

आपल्या वॉर्डाचासुद्धा विषय आहे. मा. महापौर मॅडम्, एम.आय.उदयोग, पूजा नगर, भैरव दर्शन या ठिकाणीसुद्धा पाणी पुरवठा कमी प्रेशरने येते. श्री. बारकुंड साहेब, एम.आय.उदयोग, पूजानगर लिहून घ्या. आज सातत्याने मी पत्रव्यवहार करुनही सुद्धा त्याठिकाणी पाणी कमी प्रेशरने येत आहे. भैरवदर्शन, एम.आय. उदयोग, पूजा नगर संकल्प आणि आमच्या ९० फूटला गेल्या वर्षभराचे पाणी कमी आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

५० एम.एल.डी. मध्ये जी राहिलेली कामे आहेत ना. ती कामे त्यांनी चालू केलेली आहेत आणि त्याचे पेमेन्ट आपण अदयापपर्यंत केलेले नाही. एम.जी.पी ला आपण पेमेन्ट करणार आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

ठराव पास किया है।

**शिवाजी बारकुंड :-**

ठराव पास केलेला आहे. परंतु, पेमेन्ट झालेले नाही त्यांनी त्याची कामे पण करायला पाहिजे. त्याची काही कामे त्यांनी चालू केलेली आहे. आता स्टेडियमच्या जवळचे सम्पचे काम जोरात चालू होते.

**शिवाजी बारकुंड :-**

कधी कधी साहेब, आता हे ग्राउंन्ड लेव्हलला होते. आता किती दिवस झाले.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

पिछले ५ साल यही होता रहा। और उसे बारेमें किसीने ध्यान नही दिया।

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, मगाशी म्हणजे पाण्याचा विषय नसताना पाण्याचा विषय आलेला आहे. आज गेली कनकियापासून जेसलपार्कपर्यंत जी मेन लाईन जाते. मॅडम, कित्येक दिवसापासून लिकेज आहे. म्हणजे आमचे नगरसेवक आणि प्रभागाध्यक्ष श्री. नलावडे साहेबांनी सुद्धा मुद्दा उपस्थित केलेला

होता. पण, त्याच्यावर अदयाप कोणाचे लक्ष गेलेले नाही. रोज तिकडे २०० ते ३०० लोक पाणी भरत असतात. कारण पाणी लिकेज आहे ना. तर पाण्याची टंचाई आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये खूप आहे. तसेच, जिथे जिथे जलकुंभ आहेत. त्याच्या वरची झाकणे आहेत ती ओपन आहेत आणि तिकडे कबूतरे वगैरे मेलेली असतात. सडलेल्या अवस्थेमध्ये असतात. ते पाणी त्यांची हाडे आपल्या नलाव्दारे टाकीमध्ये पडली जातात. ह्याकडेही कोण लक्ष देत नाही आणि सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे एक मुद्दा उपस्थित केला होता. त्याच्याशी मी सहमत आहे की हे टँकरवाले जे आहेत. त्यांना कुठेही जायचे असेल, जवळचे असेल तर ते लवकर देतात परंतु, त्यांची बिदागी घेतल्याशिवाय ते निघत नाही. आणि मी श्री. बारकुंड साहेबांच्या निदर्शनास पण आणून दिलेले की ते असे असे करतात. परंतु, त्यांच्याकडून अदयाप कारवाई झालेली दिसून येत नाही. तसेच, ज्यावेळेस ज्या झोन पाणी सोडणार त्यावेळेस त्या वॉलमनला काही काम नसते. तो फक्त वॉल खोलतो आणि परत जाउन आपल्या टाकीवर बसतो. किंवा त्याची काय सोय असेल त्या ठिकाणी जाउन बसून गप्पा गोष्टी करत असतो. किंवा अन्य काही कार्य करत असेल परंतु त्या झोनमधले पाणी सोडतो. त्या झोनमध्ये पाणी सोडतो. त्या झोनमध्ये कुठे लिकेजेस आहेत, गटरमध्ये पाईप कुठे तुटलेली आहेत का? ते काही बघत नाही. कुठे पाणी कमी येते, कुठे पाणी ओव्हरफ्लो होते. हे लक्ष कोणी केंद्रित करायचे आहे? नगरसेवकांनी करायचे आहे? मी त्यांना वेळोवेळी सुचना दिली. त्यांनी वेळोवेळी मिटींग घेतली. पण त्यांचा काय निर्णय आहे? आजपर्यंत एकही निर्णय लागलेला नाही. मग, असे अधिकारी कार्यक्षम आहेत का, हे आपणच ठरविले पाहिजे. ह्याचा अर्थ त्यांच्या हातात पॉवरच नाही. जर त्यांचा खासदार आहे ते बोलतात. प्रथम माझ्या येण्यापेक्षा आपण पहिले जेई ला भेटा. नंतर उपअभियंता आहेत. उपअभियंतांनी काम केले नाही तर कार्यकारी अभियंताला भेटा. पण, तिथंपर्यंत जाउन सुद्धा काम होत नाही. तर ही कार्ये कधी होणार? आम्ही ज्यावेळी पत्र देतो त्या पत्राचे उत्तर आतापर्यंत माझ्याजवळ दिले नाही. आज गेले ४ महिने माझे पत्र आहे. आज-उदया, आज-उदया करतात. उत्तर का देत नाही? उत्तर देण्यासाठी काय आहे? मॅडम, तुम्ही असे निर्देश दया की, पत्राचे उत्तर आपण आता नागरिकांचा जाहिरनामा लिहिलेला आहे. अमुक खात्याला पत्रव्यवहार केला की, २१ दिवसातंत तुमचा पाठपुरावा होईल. तुम्हांला १५ दिवसांत उत्तर मिळेल का? ते नगरसेवकांनी फाडून टाकायचे का? आपण नागरिकांची दिशाभूल करायची का? जर प्रशासनाला जमत नसेल तर नागरिकांचा जाहिरनामा तिकडून काढून टाका. कारण, आपण आतापर्यंत सक्षम नाहीत की, १५ दिवसात कोणते काम करायचे की, २१ दिवसात कोणते काम करायचे. पाण्याची टंचाई कुठे नाही. सर्वच ठिकाणी पाण्याची टंचाई आहे. एक दिवस पाणी बंद पडले तर आमच्या तिकडे ४८ तासाने-५० तासाने पाणी येते. आणि हे अधिकारी हे कारवाई कधी करणार? त्यांना स्टाफ पाहिजे होता स्टाफ दिले. साधनसामुग्री पाहिजे होती ते दिले. मग कोण काम करणार? लिकेजमुळे एवढे पाणी वाया जाते. आपल्याला बरोबर चेन्याच्या मोटर पर्यंत ८३-८४ एम.एल.डी. पाणी येते. नंतर हे पाणी कशाला लिकेज होते? म्हणजे, आपली यंत्रणा कार्यरत नाही. हे ह्यातून दिसून येते. मा. महापौर मॅडम, आपल्याला मी पुन्हा विनंती करिन. आपल्याला जी पत्रे दिले आहेत. त्या पत्राचे उत्तर कमीत कमी तर दया. दोन शब्दांत तरी उत्तर दया की होईल की नाही? ह्यासाठी कृपया आपण संबंधित खात्याशी जे अधिकारी असतील त्यांना निवेदन करायला सांगा.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, मा. महापौर मॅडम आता लग्नसराई चालू आहे आणि आपले नेहमीच पाणी कधीतरी शट डाउन घेणे, त्यादिवशी मी टँकर मागवला पण मला तिकडून पण पाणी मिळाले नाही. मॅडम, नंतर ४ वाजता पाणी दिले. मग लग्नसराईत तिकडे पाणी कोठून आणायचे?

**शिवाजी बारकुंड :-**

सन्मा. सदस्या मॅडम, आणि सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब जे बोलले. त्याबद्दल मी बोलतो. सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेबांनी सांगितले की नवघरकडून जी लाईन जाते ती स्टेम ची लाईन आहे. २० तारखेला जो शट डाउन झाला होता. त्यावेळेस त्यांनी ते लिकेज काढले होते. ज्यावेळेस आता मागच्या २० तारखेला जो शट डाउन झाला. त्यावेळेस ते शटडाउन काढले होते. ते स्टेम चे काम होते. आपणही सांगितले होते. आणि ज्यावेळेस कल्याणला त्या गावाजवळ लाईन फुटली होती. मी तिकडे होतो. त्या दिवशीच त्यांनी हे काम केलेले होते. हा पहिल्या प्रश्नाचे उत्तर होते. दुसरा प्रश्न आहे की जलकुंभावर जी काय झाकणे उघडी असतील तर ती त्वरित लवकरात लवकर जाळ्या लावून बसवून घेउ. उदयाच्या उदया करुन घेउ.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तिकडे लिकेज आतापर्यंत चालूच आहे. लिकेज अजून सुरु आहे.

**मिलन म्हात्रे :-**

जलकुंभावरती मागे अशी अफवा उडवली होती की टाकीमध्ये माणूस पडला आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

२० तारखेला आपण काढलं होते.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या त्या पाण्याच्या टाकीमध्ये माणूस पडलेला आहे, अशी अफवा शहरामध्ये उडवली होती. त्यापासून आपल्याकडे सिक्युरिटी बसवायला लागले आहेत. आता सिक्युरिटी कुठेच दिसत नाही. प्रत्येक टाकीवर खालच्या दरवाजाला सिक्युरिटी असते. ती अफवा उडवली होती. मागच्या वेळेला ती आठवते का?

**सुधा गोयंका :-**

मैं भी उसी बारेमें बताना जा रही थी। हमारे यहाँ के २-३ बिल्डिंग के अंदर कबूतर की किसीकी मुंडी आई है। किसीकी टाँग आई है। यह किस तरह से चल रहा है? मतलब यह है की, टाँकी के उपर ढक्कन नही लगता है क्या? आप अपने घर के अंदर जो बरतन रहता है उसको हम धोते है। आप अपने टाँकी को धोते है या धोते नही है?

**शिवाजी बारकुंड :-**

कुठल्या बिल्डिंगमध्ये आले होते?

**सुधा गोयंका :-**

महादेव, साईदर्शन धाम बिल्डिंग में आये थे। आप वह बिल्डिंग के नाम लिखिए। उसमें क्या दिक्कत है? महादेव बिल्डिंग, साई दर्शन धाम बिल्डिंग, जिवनछाया केबिन क्रॉस रोड, नर्मदानगर.

**शिवाजी बारकुंड :-**

त्यांचे म्हणणे असे आहे की, जे आलेले होते ते मीटरमध्ये चेक केले का?

**सुधा गोयंका :-**

हो. मीटरमध्ये आलेले होते. म्हणूनच त्यांना माहित पडले.

**शिवाजी बारकुंड :-**

मी सांगतो, हे जे सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे बोलत होते आम्ही मीटर चेकिंगचे भाईंदर वेस्टला चालू केले होते. ती पूर्ण शहरभर चालू आहे. जवळ जवळ काही भागांमध्ये ६० टक्के मीटरमध्ये कचरा अडकलेला आढळला.

**मिलन म्हात्रे :-**

कार्यक्रम एकदम भारी होता ना?

**सुधा गोयंका :-**

त्याच्यासाठी मीच कंम्प्लेट केली होती. कारण मीटर चालू नसतानाही बिले येतात.

**शिवाजी बारकुंड :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, आपण बरोबर होता ना.

**मिलन म्हात्रे :-**

पण कार्यक्रम भारी होता ना?

**शिवाजी बारकुंड :-**

मी तेच म्हणतोय, आपण बरोबर होतो.

**सुधा गोयंका :-**

ते माझेच पत्र होते. तेव्हा आपण ते मीटर बघायला निघाले होते.

**शिवाजी बारकुंड :-**

त्यामुळे सर्व भागांमध्ये मीटर चेक करण्याचे पूर्ण शहरामध्ये चालू आहे. काही भागांमध्ये कचरा वगैरे अडकलेला आहे. आपण ते साफ केलेले आहेत. अजून काय अडचण आता झाकणात आहे. ते तातडीने करुन घेउ.

**सुधा गोयंका :-**

कचरा निकाला है वह बात समझमें आती है। लेकिन वह जिस तरह से जिन निकलते है।

**शिवाजी बारकुंड :-**

हे तातडीने करुन घेउ. झाकणे बंद करुन घेउ.

**सुधा गोयंका :-**

झाकणे बंद करुन घ्या. पण उसके अंदर जो भी अच्छा कव्हर डालते वह भी डालिए ना।

**शिवाजी बारकुंड :-**

दुसरा प्रश्न असा होता की ते टँकरवाले येत नाही. मागे टँकरबाबत तक्रार काली होती. एक आली होती ती प्रभाग अध्यक्ष श्री.दिनेश नलावडे आणि अजून एक आली होती ते २ टँकर महापालिकेच्या टँकर पॉईंटवरुन कायमचे बॅन्ड केलेले आहे. त्या टँकरला अलाउड नाही. अशी जर कुठल्या टँकर वाल्याची तक्रार आली तर फक्त आमच्याकडे नंबर द्या. तो कायमचा तिथून बॅन्ड केला जाईल आणि सन्मा.सदस्या संगिता म्हात्रे मॅडमने सांगीतले होते की, ज्यावेळी लग्न होते त्या दिवशी पूर्ण भाईंदर शहराचा २५ तास शटडाउन होता. मॅडम टँकर कोठून देणार ही जी अडचण होती तेव्हा पूर्ण शहराचे पाणी बंद होते.

**संगिता म्हात्रे :-**

साहेब तुम्ही तेवढे पाणी संपवता मग लग्नासाठी पाणी कुठले आहे. ?

**शिवाजी बारकुंड :-**

मॅडम पाणीच बंद असल्यानंतर मग लग्नासाठी पाणी कोठून देणार? हा प्रश्न आहे.

**संगिता म्हात्रे :-**

मी जवळजवळ २५ वेळा फोन केले होते. त्यासाठी लग्नालासुध्दा गेली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही ज्या सुचना सुचवल्या रात्रीचे जे ओव्हर फ्लो होतात त्याच्याबद्दल काय?

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम पण पत्राचे उत्तर देत नाही त्याचे काय? पत्राचे उत्तर का दिले जात नाही ? कारण त्यांना आमचे पत्र टोचते. त्याबद्दल त्यांनी खुलासा करावा.

**शिवाजी बारकुंड :-**

आपण टाकीचे ते चालू केले आहे. जसे मीटर चेकींगचे काम आण पूर्ण शहरभर केले आहे. तसंच टाक्याचेही आण काम चालू करुन पूर्ण शहरभरचा तो सर्व्हे करुन घेवू.

**सुधा गोयंका :-**

मा.महापौर मॅडम मुझे एक खुलासा चाहीए हम लोग इतने कनेक्शन दे रहे है और बिल्डींग का जो कामही चालू नही है. कार उस समय हम लोग चर्चा कर रहे थे बजेट के अंदर टॅक्स फी वाढीव होने वाला नही है. यह कुछ सुनने मे आया था जब हम इतना कनेक्शन दे रहे है उसमे तो कोई कमी नही हुई इसका कारण क्या है इसका जरा खुलासा किजीए.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदया, राई आणि मोर्वा गावाला जी पाण्याची टंचाई भासत चाललेली आहे आता लोक तर कटो-याने पाणी भरायला लागलेले आहेत.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम आता राई गावात गटारामध्ये पाणी भरतात. पाणी येत नाही प्रेशर कमी झाल्याने गटारामध्ये पाणी भरतात.

**अनंत पाटील :-**

पाणी अजिबात येत नाही. पाण्याचा प्रेशर कमी झालेला आहे.

**संगिता म्हात्रे :-**

मॅडम राममंदिराच्या इकडे पाणीच येत नाही. ती लोक नळ असून दुस-या लोकांच्या नळाचे पाणी भरतात.

**अनंत पाटील :-**

लोक आता कटोऱ्याने पाणी भरायला लागले आहेत.

**शानु गोहिल :-**

मा.महापौर मॅडम मानव-मुकाम पेपर मेरे हाथ मे है अगर आप सबकी अनुमती हो तो मै पढके बता दूँ की उसमे क्या है पुरी पढके बताउँ या शुरुवात से पढू स्टार्टींग छोटा है मिरा भाईंदर शहरमे महानगरपालिकेके आनेवाले चुनाव के मदये नजर यहॉ के कुछ नगरसेवक अपने कार्यकाल मे जनता के हीतो को नजरअंदाज किये और अब जनता को अपनेसे दुर होते देखकर गर्मी के दिनोमे नितांत जरुरी पानी को ही रुकवाकर एवं पब्लिक को परेशान कर अपनी ओर आकर्षित करने की घटीया राजनीत पर उतर गए है ताकी पानी की किल्लतसे त्रस्त लोग उनके पास आए और वे नगरसेवक पानी प्रशासन विभाग के कर्मचारीयोंको जिनके उन्होंने नियमित पानी आपुर्ती करने से रोक रखा है उन्हे जनता के सामने फिल्मी अंदाज मे डॉटे की जनता को परेशान मत करो विविध वक्त पानी छोडो विश्व सुत्रो के मुताबित यह पता चला है की बिगर कुछ महिनो से यहॉ का एक पुराना भाजपा नेता एवं शहरप्रमुख तथा भाजपा गटनेता भाईंदर पुर्व के नवघर रोड के एवं बी.पी रोड के नई लाईन की उपरवाले खोलनेवाले को यह कहकर मना कर दिया या की जब हम कहेंगे तब भी वॉल खोला करो। इससे त्रस्त हो कर इन इलाके के कुछ सोसायटी के कर्मचारी, जनता एवं उस क्षेत्र के समाजसेवकोंका दिनांक २६ एप्रिल, गुरुवार को भाईंदर के कमला पार्क में पानी प्रशासन केंद्र पर जमा हूए। जहाँ बातचीत के दौरान पुछताछ में यह पता खुलकर इस नेताओं के सामने आई। की अब पानी परेशानी पैदा की गई है। हालाकी महानगरपालिका में पानी की कमी नहीं है। वहाँ उपस्थित हूए उप अभियंता पानी प्रशासन श्री. शरद नाणेगांवकर तथा श्री. नेमाडे, श्री. मिश्री ने यह कहते हूए गलती मानी की अब ऐसाही नहीं होगा और पानी विविध छोडा जाएगा। तो मैं इसे अभी क्या समजू? आप मुझे पहले खुलासा किजिए।

**रोहिदास पाटील :-**

ह्याच्यावर एकतर पहिल्यांदा पेपरची न्युज ही वाचायला तुम्ही परवानगी दिली. वाचल्या बद्दल धन्यवाद पण त्यात किती तथ्य आहे, कोण आहे,. कोणते एरिया आहे असे मोकाम बनवून आपल्याला काहितरी अक्कल आहे असे दाखवण्याचा प्रयत्न करण्यासाठी कारण नाही. आम्ही एवढेच सांगू शकतो. जर आमच्या वॉर्डाशी सबंधित असेल तर वॉलमनशी माझा महिना आणि महिने संबंधही नाही. पण, जेव्हा जेसलपार्कमध्ये पाणी येत

नाही. मी दिड महिन्यापूर्वी पत्र दिलेले आहे किंवा त्याठिकाणी पाणी पोहचत नाही आणि कोणीही सांगून कोणी वॉलमन पाणी सोडत नाही. असे कुठे होत नाही. ज्या दिवशी चार दिवस पाणी बंद होते. पूर्ण भाईंदर डिस्टर्ब होते. कुठेतरी आपण डिस्टर्ब झालो की आपण कुठे तमाशा करुन दाखवायचा ही पद्धत जर असेल तर असे होणार नाही. मा. आयुक्त साहेब तसे चांगले नाही. आज मी मा. सभागृहाला सांगतो.

**शानु गोहिल :-**

आप चार दिन की बात कर रहे है। हम लोग पानी की तकलिफ छह महिने से झेल रहे है। और यह पानी की तकलिफ पैदा की गई है। मैं जेसल पार्क में १५ साल से रही है। कभी कोई पानी की तकलिफ नहीं हूई है। यह राजकारण नहीं तो और क्या है?

**रोहिदास पाटील :-**

जर पाण्याची तकलिफ पैदा केली असेल तर मा. आयुक्त हा विषय नक्की करा. आणि त्याचे निवेदन येणाऱ्या मा. सभागृहामध्ये तुम्ही पुन्हा निवेदन करा. पण, आपल्याला नाचता येते. म्हणून कोण आपल्याकडे बघेल अशा पद्धतीने मा. सभागृहात जे काम चालले आहे ते योग्य नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, पेपर के न्यूज में चर्चा होने लगी है।

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, कोई भी सन्मा. नगरसेवक अगर बोलेगा की पानी बंद कर दो तो आपके अधिकारी क्या पानी बंद करेंगे? आप पहले यह बताईए।

**शानु गोहिल :-**

प्रशासन नगरसेवक के बोलने पर चलती है।

**धनराज अग्रवाल :-**

वह अधिकारी पानी कैसे बंद करेगा। कोई भी नगरसेवक बोलेगा की पानी बंद करो तो पानी बंद हो जाएगा क्या?

**रोहिदास पाटील :-**

तोल गेल्यानंतर असे बोलणे योग्य नाही.

**धनराज अग्रवाल :-**

पानी कैसे बंद हो सकता है?

**शानु गोहिल :-**

बंद हो सकता है। वह आदमी झुठ नहीं बोलेगा। उसने सबके सामने यह बात बोला है।

**रोहिदास पाटील :-**

त्याची शहानिशा करा. त्याच्या बोलण्याबद्दल पाहणी करा.

**शानु गोहिल :-**

यह प्रॉब्लेम क्रिएट की गई है। इधर सब को मालू है। श्री. बारकुंड साहब को क्या मालूम नहीं है? आप वहाँ पर रहते हो। फिर कभी पानी की इतनी तकलिफ हूई है क्या? वैयक्तिक गोष्ट नाही.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर महोदया, आपल्याकडे वॉलमेन कोण आहे? तिथे नाव सांगितले आहे.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य आम्ही ह्या सभागृहात मागणी करतोय. तुम्ही वॉल्मेनची चौकशी करावी, त्यांनी एक शब्द जरी सांगितले.

**एस. ए. खान :-**

श्री. बारकुंड साहेब, तो वॉलमेन कोण आहे हे जरा बघा.

**शानु गोहिल :-**

तुम्ही वॉलमेनला सस्पेन्ड करा. आम्हांला सहा महिने पासून तकलिफ आहे. आम्ही त्याला कम्पलेंट केली आम्ही त्याला रंगेहाथ पकडले.

**एस. ए. खान :-**

तो वॉलमेन कोण आहे त्याला जरा बोलवा.

**शानु गोहिल :-**

मा. महापौर मॅडम, वॉलमेन श्री. कैलास पाटील आहेत. तो पैसे मागत फिरतो.

**एस. ए. खान :-**

श्री. बारंकुंड साहेब त्यांनी स्पष्ट असा आरोप केला आहे.

**शानु गोहिल :-**

तो कॉम्प्लेक्स मध्ये पैसे मागायला आला.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तो वॉलमेन सहा महिन्यांपासून असे बोलत असेल आणि सहा महिन्यापूर्वी पासून त्याच्यावर काही ॲक्शन घेतली नसेल तर कसे काही होईल.

**एस. ए. खान :-**

प्रशासनाची चुकी आहे.

**शरद पाटील :-**

नगरसेवक सांगतो आणि नगरसेवकानेच घरी पेसे मागायला पाठवले ना. त्या वॉर्डमध्ये श्री. बारकुंड साहेब पण राहतात. वॉलमेनला नगरसेवकानेच घरी पैसे मागायला पाठवले ना.

**शानु गोहिल :-**

नगरसेवक इज नॉट रिस्पॉसीबल फॉर दॅट.

**शरद पाटील :-**

नगरसेवकाने सांगितले आणि एखाद्या वॉलमेनने वॉल सोडला नाही. ह्या गोष्टीत काही तथ्य नाही. पेपरमध्ये तर काहीही छापतात.

**एस. ए. खान :-**

ठिक आहे. पेपरमध्ये काहीही छापतात पण त्याची चौकशी तर झाली पाहिजे.

**शिवाजी बारकुंड :-**

मी काय बोललो की, कोणीही असे ८४ नगरसेवक किंवा अन्य पॉलिटीकल लोक सांगून ती लोक काम करत नाही. एखाद्याने काही जर गैरवर्तन केले असेल, कामचुकारपणा केला असेल तर त्याच्यावर निलंबनासारखी कारवाई करता येईल.

**शरद पाटील :-**

साहेब, एक टँकर सांगायचा असेल तर आम्हाला दहा वेळा फोन करावा लागतो. क्ष्या वॉलमेनला वॉल खोलायला सांगितले जर त्याने वॉल खोलला नाही ही मोठी गोष्ट आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

श्री. बारकुंड साहेब, तुम्ही तुमच्या मिस्त्री आणि वॉलमेनवर पण एवढा अंधविश्वास ठेवू नका. हाताची पाचही बोटे एकसारखी नाहीत. तुम्ही जेवढे प्रामाणिक काम करता ना तेवढा तुमचा स्टाफ करत नाही. मॅडम जे बोलत आहेत ना त्यामध्ये काही तथ्य आहे. म्हणून ते बोलत आहेत. तो कैलास पाटील नावाचा वॉलमन आहे. मॅडम, त्याला ताबडतोब सस्पेन्ड करायची ऑर्डर द्या.

**शानु गोहिल :-**

त्याला सस्पेन्ड करा.

**हॅरल बोर्जीस :-**

एका वॉलमेनसाठी मा. सभागृहामध्ये जर सदस्यांमध्ये वाद होत असेल तर त्यावर त्वरीत कारवाई करा.

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

चौकशी तर कराच आणि अधिकाऱ्यांनी इथे नगरसेवकांमध्ये झगडे लावायचे काम लावले आहे या मा. सभागृहामध्ये हे काम नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

म्हणूनच एका वॉलमेनपोटी ह्या सन्मा. सदस्यांमध्ये शाब्दीक चकमक घडत असेल तर ताबडतोब त्या वॉलमेनला सस्पेन्ड करुन टाका.

**एस. ए. खान :-**

तुम्ही वॉलमनला सस्पेन्ड करा.

**रोहिदास पाटील :-**

पहिली चोकशी करा.

**शुभांगी नाईक :-**

सस्पेन्ड करण्या अगोदर पहिली त्याची चौकशी करा. मग सस्पेन्ड करा.

(सभागृहात गोंधळ)

**नयना म्हात्रे :-**

असं कसं त्याला घरी बसवणार. पहिली व्यवस्थित चौकशी करा.

**एस. ए. खान :-**

तुम्ही एवढे घरी बसण्याच्या गोष्टी कशाला करता?

**नयना म्हात्रे :-**

असं कसं? एखाद्या कर्मचाऱ्याचा विषय येतो. साहेब, त्याची चुक असेल तर त्याला घ्झरी बसवा पण पहिले चौकशी तर करा.

**अनंत पाटील :-**

निर्णय घेणार त्यचे काय? मॅडम, चौकशी करुन काय कसे?

**नयना म्हात्रे :-**

चौकशी करा आणि त्याला घरी बसवा.

**हॅरल बोर्जीस :-**

मॅडम, खात्याचे प्रमुख म्हणून श्री. बारकुंड साहेबांनी त्यांना दोन वेळेस समज दिली आहे.

**एस. ए. खान :-**

ऑलरेडी समज दिली आहे ना.

**हॅरल बोर्जीस :-**

खात्याचे प्रमुख या नात्याने त्यांना जी कारवाई करायची आहे ती त्यांनी केलेली आहे. त्याच्या पलिकडे जर हा वॉलमन ऐकत नसेल तर ताबडतोब त्याच्यावर कारवाई करा.

**एस. ए. खान :-**

एवढे लाड करायचे का? मॅडम, तुम्ही सस्पेन्ड करायचे रुलिंग द्या.

**नयना म्हात्रे :-**

मॅडम, पहिली चौकशी करायची असे रुलिंग द्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या शानु गोहिल ह्यांनी उपस्थित केलेली जी समस्या आहे. तेथील जो वॉलमेन आहे. त्याच्याबद्दल त्याची जी तक्रार आहे. बऱ्याच कालावधी पासून जेसलपार्कला पाण्याची अडचण आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. संबंधित वॉलमनला दोन वेळेस समज देउनही त्याच्या वर्तनामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल झाला नाही. संबंधित वॉलमेनची दुसरीकडे बदली तरी करावी नाहीतर त्याला १५ दिवस चौकशी करुन घरी बसवावे. दुसरीकडे चेंज करुन टाका.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, अगर वह वॉलमेन गलत है तो उसे किसी वॉर्ड मे मत भेजीए। फिर वह वहॉ पर भी वही काम करेगा ना। या तो उसे कुछ शिक्षा दिजिए।

**रोहिदास पाटील :-**

आणि तुम्ही त्याच्यावरती नक्कीच चौकशी करा. आम्ही तसे बोलणार नाही. पण, आम्ही तक्रार केली म्हणून त्याला सस्पेन्ड करा अशा पध्दतीने हे होणार नाही, असे होणार नाही. तुम्ही सांगता ना तुमच्या वॉर्डमध्ये चार दिवस पाणी आले होते का? मॅडम, तुम्ही कशा पध्दतीने बोलता ते काही समजत नाही.

**मा. महापौर :-**

सगळीकडेच संपूर्ण शहरामध्येच ४ दिवसाची परिस्थिती होती.

**रोहिदास पाटील :-**

मग, त्याच्यानंतर कुठच तरी निमित्त काढायच, कुठचा ना कुठेतरी काढायचा.

**मा. महापौर :-**

त्या वॉलमेनची चौकशी करुन नंतर त्याच्यावर कारवाई केली जाईल.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही असे दरवेळी मान ठेवणार नाही ...........

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, अगर पेपर के कटींग पर अगर सदन चलता आएगा। तो पेपर इतना लिखके आता है की उसका कोई लिमिट नही है।

**रोहिदास पाटील :-**

ही काय पध्दत आहे. त्या वॉलमेनची वर्तणूक वाकडी असेल तर तुम्ही वाटेल ती शिक्षा करा. पण चौकशी शिवाय नाही.

**शानु गोहिल :-**

मा. महापौर मॅडम, जब यह घटना घडी थी। जिस वक्त उस वॉलमेन को पुछा गया की तुम ऐसा क्यु कर रहे हो। उस समय वहॉ पर पेपरवाले को बुलाया नही था। पेपरवाला वहॉपर ऑलरेडी हाजीर था। जब वॉलमेन की मिटींग बुलाई तब वहॉ पेपरवाला भी हाजीर था।

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांनी चौकशी करावी अशी आमची एक विनंती आहे. कोण पेपरवाला, कोण छापेल काय करेल? ह्याच्या आधी भरपुर छापून आणलेले आहे. त्या साईशक्तीच्या वेळीसुध्दा भरपूर छापून आणलेले आहे. आम्ही अशा पेपरना तर किंमत पण देत नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मग, महापौर मॅडम, पेपर के कटिंगपर सभेमे चर्चा होती नही है।

**रोहिदास पाटील :-**

मेहनत करुन आमचे ते कॅरेक्टर पण नाही आणि कॅरियर पण नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी बसून घ्यावे.

**रोहिदास पाटील :-**

जर तो वॉलमेन दोषी असेल तुमची खात्री पटली, मा. आयुक्तांची खात्री पटली की हवी ती शिक्षा करा. पण, त्यांना वाटले दोषी म्हणून तुम्ही निर्णय द्यायचा नाही.

**मा. महापौर :-**

तो दोषी आढळल्यास त्याच्यावर कारवाई केली जाईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. पीठासीन अधिकारी, मला पाण्या संदर्भात थोडेसे निवेदन करायचे आहे. प्रशासन माझ्या निवेदनाकडे लक्ष देतील अशी माझी अपेक्षा आहे. मी एवढावेळ सांगतही आलो आणि सदस्य सुध्दा बराच वेळ बोलले. प्रशासन ह्या गोष्टी किती गांभीर्याने बोलत आहेत. त्याच्यावर आमची पुढची परिस्थिती ४-५ महिन्यावर अवलंबून आहे. मे महिना येतोय, पाण्याची टंचाई आहे, लोडशेडींग आहे. ह्या सगळ्या गोष्टी विचारात घेउन यापुढे पाण्याच्या वाटपाचे नियोजन जे आहे आपण त्याच्याकडे जास्त लक्ष देणे गरजेचे आहे. माझ्या माहितीप्रमाणे ८४ एम.एल.डी. पाणी जर ह्या शहरात येते तर आम्हाला पाण्याचा पुरवठा सगळ्यांना व्यवस्थितरित्या होईल त्या पध्दतीनेच तो पाणी पुरवठा होतोय. असे होत नाही की, ८४ एम.एल.डी. पाणी येते आणि आमची लोकसंख्या खुप जास्त आहे.आम्ही पुन्हा पुन्हा हे गणित मांडण्याचा प्रयत्न करणार नाही. प्रत्येक माणसाला प्रत्येक दिवशी १०० लीटर म्हटले, साडे आठ लाख लोकसंख्या म्हटले तरी १०० लीटर पाणी प्रत्येक माणसाला मिळायला पाहिजे आणि ते मिळत नाही याचा अर्थ आमची वितरण व्यवस्था कुठेतरी सदोष आहे. आजच्या सभेमध्ये "ज'' प्रस्ताव सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेबांचा होता. यापूर्वीसुध्दा मी वितरणा संदर्भात अनेक वेळा ह्या गोष्टी मांडलेल्या आहेत. एकतर तुमचा ५० एम.एल.डी. पाणीपुरवठा योजनेतील जी कामे रखडलेली आहेत. ती अजिबात चालू झालेली नाहीत. भविष्यकाळात ती कामे चालू होतील की नाही ह्याचीसुध्दा काही शाश्वती दिसत नाही. ती चालु करण्याच्या दृष्टीने प्रशासनाकडून कुठली कारवाई तशी दिसत नाही किंवा ह्यांची धावपळ चाललेली आहे. ही टाकी सुरु करा. ती टाकी सुरु करा. किंबहुना घोडबंदरच्या टाकीचे काम ज्या एजन्सीला दिले होते. त्या घोडबंदरच्या टाकीचे काम सुध्दा कुठंपर्यंत आल्याचे विचार करा. गेल्या ३ वर्षामध्ये फक्त फुटींगचे काम चालू झाले आहे. हे बरोबर आहे का? मग ही एजन्सी ३-३ वर्ष काय करते? आज सन्मा. सदस्या शानु गोहिल मॅडम बोलल्या की, त्यांच्याकडे पाणीपुरवठा अपुरा आहे. परवापर्यंत सन्मा. सदस्या ज्योत्स्ना हसनाळे मॅडम बोलत होत्या की, त्यांच्याकडे पाणी पुरवठा कमी आहे. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे बोलतात त्यांच्याकडे पाणी पुरवठा कमी आहे. सन्मा. सदस्या संगिता म्हात्रे बोलतात, सन्मा. सदस्य हंसुकुमार पांडे बोलतात. कोणीही असे बोलत नाही की, आमच्याकडे पूर्ण पाणी पुरवठा आहे. म्हणजे भरपूर आहे, असे कोणीही का बोलत नाही? ह्याचा अर्थ ८४ एम.एल.डी. पाणी पुरवठ्याची वितरण व्यवस्था आमची संपूर्ण बिघडलेली आहे. आम्ही कुठे तरी अशा काही कार्यपध्दती सुरु केल्या आहेत की, आमची वितरण व्यवस्था कोलमडलेली आहे. मला तुर्त माझ्याकडे असलेल्या अनुभवाला धरुन मी जे काही आपल्याला दोन गोष्टी सांगणार आहे. त्या जरा तुम्ही ऐकल्यात, मी तुम्हाला उपदेश करत नाही. मी तुम्हाला मार्गदर्शनही करणार नाही. मी तुम्हाला सल्लाही देणार नाही. परंतु, मी जे काही अनुभव घेतलेले आहे. ते ह्या ठिकाणी तुम्हाला सांगतो की, सर्वप्रथम जेसलपार्कच्या पाण्याचा जो प्रश्न आहे. म्हणजे, तिथे कधीही समस्या आली नाही पाहिजे मी ह्या मताचा आहे. का? तर ह्याचे कारण तुम्ही मला विचारा की, संपूर्ण मिरा भाईंदर शहराला जेव्हा ३१ एम.एल.डी. पाणी पुरवठा होत होता तेव्हा ७०० एम.एम. ची पाईपलाईन आमच्याकडे होती आणि ती शहरात आल्यानंतर ५०० एम.एम. च्या बाय कनेक्शन दोन ५०० एम.एम. ची लाईन त्याला जोडलेल्या होत्या. एक ५०० एम.एम. ची लाईन भाईंदर वेस्टला होती. एक ५०० एम.एम. ची लाईन इस्टला होती. अशा दोन ५०० एम.एम. च्या लाईन वाय करुन ७०० एम.एम. ला जुळलेल्या होत्या. आता खुद्द जेसलपार्ककडे जाणारी आमची जी पाईपलाईन आहे. ती कनकिया पर्यंत ७११ एम.एम. ची पाईपलाईन आहे. म्हणजे एक लक्षात घ्या की, अख्ख्या मिरा भाईंदर शहराला जी पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन होती. तेवढी मोठी पाईपलाईन ही कनकीया पासून ते जेसल पार्कच्या एरियापर्यंत एवढी मोठी पाईप लाईन आहे. म्हणजे तेवढ्या एरियाला तेवढे पाणी पुरवठा होउ शकतो. म्हणजे ३१ एम.एल.डी. पाणीपुरवठा कनकीयापासून ते जेसलपार्क पर्यंत होउ शकतो. मग, आता तुम्ही जर गणित मांडले की, ह्यांचे असे म्हणणे आहे की, ४-४ दिवस पाणी येत नाही. ते ३१ का ३ एम.एल.डी. पण पाणी जात नाही. त्याच्यापुढे आपल्याला गणित सांगतो की, ७११ ची लाईन ही नवघरच्या टाकीपर्यंत आल्यानंतर ५५० एम. एम. पाईपलाईनने जेसलपार्ककडे गेलेली आहे. या मेन लाईनवरती कुठेही फिडर लाईन नाही. म्हणजे असे म्हणण्या पूर्वी या मेन लाईनवरती दुसरी लाईन असावी, जर तिकडे पाणी जात असेल, डायव्हर्ट होत असेल जेसलपार्कला पाण्याची समस्या येतेच का? कारण मला माहित आहे. मी जेव्हा योजना सुरु केली तेव्हा जेसलपार्कच्या पाण्याच्या टाक्या ओव्हरएट टॅंकला भरुन गेल्या. कुठे म्हणजे, लोकांची अजिबात तक्रार

राहिलेली नाही. त्याच्याही पुढे तुम्हांला सांगतो. जेसलपार्कच्या कंपाउंडच्या बाहेर साडे पाचशे एम.एम. ची पाईपलाईन आल्यानंतर जेसलपार्कच्या कंपाउंडच्या आत ५०० एम.एम. ची पाईपलाईन तिथल्या इ.एस.आर. वरती गेलेली आहे. आता प्रश्न काय राहतो की, एक तर तुमच्या ७११ च्या पाईपलाईनमध्ये हटकेश उद्योग नगरला ९११ च्या पाईपलाईनला ७११ ची पाईपलाईन जोडलेली आहे. त्याठिकाणी ९११ मधून ७११ मध्ये एकतर आम्हाला बरोबर पाणी येत नाही. तुमचा एक दोष तिकडे शोधा. दुसरी बाब ७११ ची पाईपलाईन ही कनकीयाच्या टाकीमधून आलेली आहे. कनकीयाला एक टाकी आहे. कनकीयाला ई.एस.आर. दिलेला आहे. कनकीयाच्या ई.एस.आर. ची कॅपिसीटी किती आहे? मला वाटते, दीड एम.एल.डी. पेक्षा जास्त नाही. कारण आज मी त्याचा चार्ट आणला नाही. नाही तर सांगितले असते. मग दीड एम.एल.डी. पाणी तिकडे गेल्यानंतर बाकीचे सगळे पाणी ते नवघर टाकीपर्यंत आले पाहिजे आणि नवघरच्या टाकीची जवळ जवळ अडीच एम.एल.डी. ची कॅपिसीटी आहे. अडीच एम.एल.डी. पाणी गेल्यानंतर तुमच्या पाउण एम.एल.डी. च्या टाकीला जेसलपार्कला पाणी भरपूर जायला पाहिजे. ह्याचा अर्थ असा आहे की, कनकियाच्या पाईपलाईनमध्ये कनकीयाच्या ई.एस. आर. मधून तुमची विड्रॉल जास्त आहे. हे तुम्ही चेक करा की, कनकीयामधून जे विड्रॉल होत असेल हे खुप जास्त होत असेल. तिथल्या लोकांना खुप पाणी पुरवठा होत असेल किंवा त्या ठिकाणी विड्रॉल वाढले. त्याच्यामुळे नवघर टाकीकडे जाणारे विड्रॉल हे कमी झाले आहे. कधीही नवघरच्या भागामध्ये जेव्हापासून पाणी पुरवठा योजना सुरु झाली. सन्मा. सदस्य दिनेश नलावडे इथे नाहीत. नाहीतर आता बोलले असते. सन्मा. सदस्य हंसुकुमार पांडे साहेब पण सांगतील की, जेव्हापासून योजना सुरु झाली तेव्हापासून नवघर रोडला पाण्याची कधीही समस्या नव्हती. का नव्हती? कारण नवघरचा जो इ.एस.आर. आहे. आता नवघरचा जो पूर्ण एरिया आहे. आज नवघरच्या इ.एस.आर. वरुन, नवघरच्या टाकीवरुनच दिलेला आहे. त्याच्यामुळे कधीही पाणी पुरवठ्याचा प्रॉब्लम झालेला नाही. पण, आता गेल्या एक वर्ष भरातून त्यांना खुप प्रॉब्लम सुरु झालेले आहेत. ह्याचा अर्थ नवघरच्या टाकीमध्ये सुध्दा पाणी बरोबर येत नाही आणि उरलेले पाणी जे साडे पाचशे च्या पाईपलाईनने जेसल पार्कला जाते. हेसुध्दा कमी प्रमाणात जाते. ह्याचा अर्थ असा आहे की कनकीयाच्या इथेच आमचा कुठेतरी फॉल्ट आहे. कुठेतरी आम्ही दुर्लक्ष केलेले आहे. कुठेतरी आम्ही विड्रॉल त्या एरियाला जास्त दिलेला आहे. आता ते कसे दिले हेसुध्दा आम्ही तुम्हाला सांगतो. कारण, एकतर नगरसेवक जेव्हा मागणी करतात की, आमच्या भागामध्ये पाईपलाईन टाका किंवा नव्या एरियामध्ये टाका. तेव्हा आपण पहिली गोष्ट म्हणजे आपण त्यांना एक सांगितले पाहिजे की, जर तिथे अस्तित्वात असलेल्या पाईपलाईनमध्ये जर पुरेसे प्रेशर असेल तर आम्ही पाईपलाईन टाकु. हे तुम्ही लक्षात घ्या. नगरसेवक जरी नाराज झाले किंवा काही असेल तरी तुम्ही त्यांना सांगण्याची हिंमत ठेवा की, सॉरी इथे कुठे अडीचचे प्रेशर मिळत नाही. कुठल्याही पाईपलाईनला २.५ कि.ग्रॅ. पर स्क्वेअर इंचचे प्रेशर असायला पाहिजे. कमीत कमी छोट्या छोट्या राय मीटरच्या पाईपलाईनला असायला पाहिजे. ते नसेल तर आम्ही ही पाईपलाईन पुढे नेणार नाही. तुम्ही काय करता की एखाद्या एरियामध्ये ६ इंचाची पाईपलाईन जोडून पूढे नेता. कुठल्याही पाईपलाईनची लेन्थ वाढविली की, त्याची व्हेलॉसिटी कमी होते. त्याचे प्रेशर कमी होते आणि मग पाणी मिळत नाही. लोक सांगतात की, पाईपलाईन टाकली तरी पाणी येत नाही. मग तुम्हाला काही नवीन आयडीया सुचते, काय सुचते की तुम्ही सांगता की ठीक आहे. ही सहा इंचाची पाईपलाईन टाकली ना, मग आता मागची आठ इंचाची पाईपलाईन टाकु. आपण म्हणतो ना की, आड्यात नसेल तर नसेल तर पोहऱ्यात कुठून येणार? मागच्या आठ इंचाच्या पाईपलाईनमध्ये येण्यासाठी ह्याच्यावरती त्याला जी १२ इंचाची फिडर लाईन आहे. त्याच्यामध्ये तेवढे पाणी पाहिजे. म्हणून हे करत असताना तुम्ही दुसरी बाब तपासून बघा. साहेब, जे आपल्याकडे हायड्रोलीक इंजिनिअर नाही. आपल्याकडे हायड्रोलीक इंजिनिअर नसेल तर तसा तो घ्या. तो प्रतिनियुक्ती वरती घ्या. आणि आपण ज्या ज्या वेळेला अशाप्रकारचे नवीन पाईपलाईन टाकण्याचे प्रस्ताव येतात तेव्हा हायड्रोलीक इंजिनिअर वगळून त्यांच्याकडून तो सेटअप करुन घ्या. तांत्रिक सल्ला घ्या की, इथे इतकी पाईपलाईन टाकता येईल. ह्या ठिकाणी इतके पाणी आहे. तरच ती पाईपलाईन टाका. अन्यथा ती पाईपलाईन टाकु नका. कारण, पाईपलाईन टाकल्याने पाणी वाढत नाही. हा समज पूर्णपणे चुकीचा आहे. अशा पध्दतीने नवघर ह्या एरियामध्ये नवघर टाकीवरती इ.एस.आर. चे पाणी कमी झालेले आहे. त्याच्यामुळे ते पाणी वाढले पाहिजे. म्हणून त्याच्यासाठी आपण कनकीया टाकीवरती कंट्रोल करा. या योजनेचे एक वैशिष्ट्य तुम्हाला पुन्हा सांगतो. तुमच्याकडे एम.जी.पी. च्या अधिकाऱ्याने पण वारंवार दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे मी तुम्हाला दोष देणारच नाही. एम.जी.पी चे अधिकारी नेहमी टाळाटाळ करायचे. प्रत्येक टाकीला मीटर आहे. तुम्ही चेण्याला जाउन टाकीचे स्लम्प बघा. आमचे काँग्रेसचे नगरसेवक सगळे श्रीम. नुरजहाँ हुसेन (मम्मी) पासून सगळे आगरी, शहाड पासून ते संपूर्ण भाईंदर पर्यंत सगळे तपासून आले. त्यांना मी सगळ्यांना सांगितले की, तुम्हाला आम्ही भरपूर पाणी देतो. आता त्यांचा असा समज झालेला आहे की, भाईंदरच्या पाणी पुरवठ्याचे अधिकारी गडबड करतात म्हणून ही पाणी टंचाई आहे. हे तुमच्या समोरच झालेले आहे. तर तशा प्रकारचे तुमच्यावरती दोषारोप येउ नये. म्हणून सांगतो की, जसे पाण्याचे मीटरला .........

**प्रफुल्ल पाटील :-**

तेव्हा तुमच्या लक्षात येईल की, सन्मा. सदस्य खान साहेब तक्रार का करतात? कारण अस्मिता पार्कच्या मीटरवरती त्यांचे रिडींग दाखवत नाही. याचा अर्थ त्यांच्याकडे पाणी जात नाही. जेव्हा शीतल पार्कचे

लोक, सिल्वर पार्कचे लोक तक्रार करतील तेव्हा त्या सिल्वर पार्कच्या टाकीमध्ये तेवढे पाणी गेलेले नाही. हे तुमच्या लक्षात येईल. दुसरी बाब म्हणजे भाईंदर (प.) आता ते राई, मोर्वा, मुर्धा येथील लोक बोलतात. पण त्यांना माहिती नाही. त्याच्या पलिकडे ते काय बोलणार? ह्या नगरसेवकांना एवढे ज्ञान आहे. म्हणून ते बोलतात की, मी लग्नाला गेली नाही, टँकर मिळाला नाही. ह्या शुल्लक बाबी आहेत. साहेब, तुम्हाला सांगतो की, ५०० एम.एम. ची पाईपलाईन ही पूर्वी आमची होती. त्याच्यानंतर नव्या लाईनमध्ये आम्ही जेव्हा आलो तेव्हा ॲक्च्युअली ती शामराव विठ्ठल को-ऑ. बँकेवरती आपण क्रॉस कनेक्शन केले होते. हे तुम्हाला माहिती असेल हे क्रॉस कनेक्शन पुढे का आणले? कारण भाईंदर पश्चिमेकडे कालांतराने उत्तनकडे. हा तुमचाही प्रश्न आहे की, जाणाऱ्या पाण्याच्या पुरवठ्यामुळे वाढ व्हावी म्हणून माझ्या माहितीप्रमाणे हे क्रॉस कनेक्शनचे इथले वॉल न वापरता हटकेशमध्ये कुठेतरी आपण वॉल लॉक केलेला आहे. त्याच्यामुळे तिकडे जाणारे पाणी अडले जाते. तुम्ही व्यवस्थित बसून ...... तुम्हाला वाटले की, मी कधीपण यायला तयार आहे. रात्री - बेरात्री कधीही बोलवा. २४ तासातून कधीही मला फोन करा. संयुक्तरित्या बघू. इथे काय प्रोटोकॉलचा आम्हाला विषय नाही. माजी नगराध्यक्ष म्हणून मला मोठी खुर्ची पाहिजे किंवा अशातला विषय नाही. पण हा विषय तुम्ही मुद्दामहून जाणून बुजून तुम्ही काही करत नाही. सन्मा. सदस्या शानु गोहिलजींनी श्री. बारकुंड साहेबांना काही सांगितले की, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) यांच्या वॉर्डमध्ये पाणी सोडू नका. म्हणून ते सोडत नाही किंवा सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेबांनी सांगितले की, सन्मा. सदस्या शानुजी तिथे राहतात तिथे पाणी सोडा. हा विषय नाही. हा नगरसेवकांचा उगाच भांडणाचा काळ आलेला आहे. त्यातल्या त्यात फायदा घेतात ते आमचे वॉलमेन, हुषार आहेत. पूर्वीपासून त्यांना वाईट सवय लावलेल्या आहेत. आता सुधारायला थोडा वेळ लागेल. मा. आयुक्त साहेब चांगले आलेले आहेत. मा. महापौर मॅडम पण स्ट्रिक्ट आहेत. कार्यकारी अभियंता पण सगळे चांगले आहे. पण साहेब आमची जी जुनी यंत्रणा आहे ना ती फार विकलेली आहे, फार गंजलेली आहे. मी तुम्हाला एक साधे उदाहरण देईन. मगाशी ते त्यांना उत्तर दिले की, एक टँकर ते पाठवू शकले नाही. का तर २५ तास पाणी शटडाउण होतं. आता मी तुम्हाला ह्यावर छोटे उपाय सांगतो. भाईंदर पूर्वेला आमची एक टाकी बांधलेली आहे. कित्येक वर्षापासून ती टाकी तशीच पडून आहे. तुम्हाला सांगतो नगरपरिषदेच्या कारकीर्दीमध्ये ती टाकी सुरु करण्यासाठी तिथे त्याच टाकीच्या खाली एक अंडरग्राउंड टाकी आहे. त्या अंडरग्राउंड टाकीमध्ये पाणी येते. ते पाणी वर घेण्यासाठी १ कोटी १० लाख रु. खर्च करुन पंप बसविले. पम्पींग मशिनरी, फिटींग सगळे केले. साहेब, एक दिवससुध्दा ते बटण ऑन झाले नाही. आमचे दुर्देव असे आहे की, तेव्हासुध्दा पाणी पुरवठ्याच्या अधिकारी आमच्याकडे होते. तेच अधिकारी आजसुध्दा आहेत. त्यांनी त्यांच्या डोळ्यांनी हा सर्वनाश पाहिलेला आहे की, १ कोटी १० लाख रु. ची मशीन सडलेली आहे. आता तुम्ही जा. पम्प बघा. त्यासगळ्या पम्पच्या आईलसिल, रबरसिल सगळ्या सडून खराब झालेल्या आहेत. एक दिवससुध्दा पम्पींग मशीन वापरलेली नाही. आज जर ती टाकी मघाशी जसे श्री. बारकुंड साहेबांनी जरी उत्तर दिले की, ती जर टाकी चालू असती तर आम्हाला जेव्हा जेव्हा पाणी पुरवठा खंडीत होतो. २० तासांसाठी, १५ तासांसाठी जेव्हा पाणी पुरवठा खंडीत होतो, तेव्हा आम्हाला इर्मजन्सी म्हणून ती टाकी वापरता येते आणि ती आली असती पण दुर्देवाने ह्या गोष्टी झाल्या नाहीत. आता तरी निदान त्या पुढे होउ नये, एवढी आपण काळजी घेउ या आणि ज्याकाही ५० एम.एल.डी. मधले ज्या स्किममध्ये ज्या महत्वाच्या बाबी आहेत. म्हणजे आता जसे गोडदेवच्या टाकीचे तुम्हाला सांगतो. तेव्हा फार हट्टवादी भुमिका राष्ट्रवादी पक्षाने घेतली. मी असे म्हणेन. मी त्यांना दोष देत नाही. का माहित नाही. त्यांनी गोडदेवच्या टाकीचा सम्प नको म्हणूनच सांगितले. इतका त्यांनी हट्ट धरला. मी म्हणालो असे नाही, गोडदेवच्या टाकीचा सम्प पाहिजे. आणि सम्पाची जागा अभिनव विद्यामंदिर शाळा देणार आहे. आणि त्यांना ते पैसे मिळणार आहेत म्हणून नको. आम्ही तुम्हाला अभिनवची जागा फुकट देउ. जागा दिली. तिथे पायलींगसुध्दा केले. ४२ पाईल झाल्या. परंतु, आपल्या लोकांनी अरेरावी करुन तिथला सम्प बंद केला. ऑथोरिटीला कळवले की, आम्हाला इथे सम्पची गरज नाही. आता मी त्याच्यावरती येतो. तुम्ही म्हणाल की, सम्प सम्प का करता? इतर ठिकाणी पण सम्प नाही. तर मग पाणी मिळत नाही का? पण मी त्याठिकाणी का येतो कारण सम्प बंद केल्यानंतर एम.जी.पी. च्या पथ्यावर पडले. साहेब, एम.जी.पी. कुठलाही सम्प करायला तयार नव्हते. नवघरला जेव्हा ई.एस.आर. बांधायला घेतला. तेव्हा त्यांनी सांगितले की, ह्या खाजण्यामध्ये आम्ही ई.एस.आर. कसा बांधणार? तो थांबणार नाही तो कोसळणार आहे. मी म्हटले की, समुद्रात खाडीमध्ये पुल बाधंला आहे हिंदुस्तान कंस्ट्रक्शन कंपनीने आणि आता नवीन कंपनी गॅमन ही आलेली आहे. म्हणे खाडीमध्ये एवढा मोठा पुल होउ शकतो. तुमचा होउ शकत नाही? तर ते म्हणतात की, खालून पाण्याचा प्रवाह फार आहे. मी म्हणालो की, तुम्ही पाईप केसिंग करा. ते म्हणाले की हो. तुम्हाला हे कसे माहित आहे? मी म्हणालो मला माहित आहे. तुम्ही पाईप केसिंग करा. ते म्हणाले की त्याच्यासाठी खार्चाची तरतुद नाही. मी म्हणालो आम्ही ती करुन घेउ. मा. पाणी पुरवठा मंत्री आर. आर. पाटील साहेबांना सांगुन मी ती तरतुद करुन घेतली. पाईप केसिंग झाले. त्याच्यानंतर त्या पाईल झाल्या. आज टाकी दिमाखाने उभी आहे. आता तिकडे सांगतात की अंडरग्राउंड टँक कशी होणार? जर तिकडे टाकी होउ शकते तर अंडरग्राउंड टँक का होउ शकत नाही? साहेब जर अंडरग्राउंड त्याठिकाणी झाली असती. तर जेसलपार्कमध्ये, नवघर रोडला कधीही पाण्याचा प्रॉब्लम झाला नसता. तोच प्रश्न आता गोडदेवला का भेडसावतो आहे. गोडदेवची टाकी ई.एस.आर. जुनी आहे. जुन्या योजनेचा ई.एस.आर. आम्ही

गोडदेवला वापरतो. नव्या योजनेमध्ये गोडदेवला ई.एस.आर. नाही. तुम्हाला नर्मदा नगरला पाण्याचा प्रश्न सारखा का भेडसावतोय? कारण गोडदेवच्या ई.एस.आर. ची इनलेट जर तुम्ही पाहिली तर. ती फक्त ३०० एम.एम. ची आहे. तुम्ही ३०० एम.एम. च्य पाईपलाईनमध्ये संपूर्ण खारीगाव, बी. पी. रोडची डावी बाजु, तिकडून येताना उजवी बाजु, गोडदेव आणि संपूर्ण इंद्रलोक पर्यंतचा इकडचा पट्टा संपूर्ण गोल्डन नेस्टचा भाग अजून, नविन गोल्डन नेस्ट, ती न्यु फेज आहे. फेज नं. ४ की ५ आहे. त्यासगळ्या एरियाला त्या गोडदेवच्या टाकीवरुन तुम्ही पाणी देता. मग, आमचे इंजिनिअर काय करतात ते तुम्हाला सांगतो. जेव्हा ४ तास टाकी भरते, तेव्हा ते वॉल खोलायला सुरुवात करतात. ४ झोन होत नाही. टाकी भरायला ४ तास लागतात का लागतात? कारण इनलेट ३०० च आहे. सम्प जर टाकला असता तर इनलेट ५०० चा बसला असता. टाकी २ तासात भरली असती. तुमचे ४ झोन जे ४ तासात होतात, ते २ तासामध्ये ४ झोन झाले असते. म्हणजे आम्ही ह्यांना जेव्हा पाणी साठ तासाने देतो. ते पाणी मी २० तासासाठी आणले आहेत आणि २० तासाने देतो ते मी ४ तासाने आणले असते, साहेब, तुम्हाला मी एक ह्या योजनेचे वैशिष्ट्य सांगतो. ह्या योजनेमध्ये एक मोठे बुकलेट प्रसिध्द केले.

**रोहिदास पाटील :-**

सात वाजले आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी दोन मिनिटे आटपतो. महत्वाचे नसेल तर मी बोलत नाही. कारण मला शेवटी वाईट वाटते. मला इतकं दुःख होते की, आम्ही सगळ्या लोकांनी एवढं सगळं केले. आम्ही फॉरेस्टला घाबरलो नाही, फॉरेस्टच्या लोकांना घाबरलो नाही. त्यांच्या अटकेला घाबरलो नाही. सहा महिन्याच्या तुरुंगवासाला घाबरलो नाही. अजुनही माझ्यावरती फॉरेस्टवाल्यांचा एफ.आय.आर. आहे. पण, पोलिसांनी सहकार्य केले म्हणून मी आज बाहेर आहे. नाहीतर सहा महिने आतमध्ये असतो. तर अशा परिस्थितीमध्ये आपण आपणच निर्माण केलेल्या अडचणीमुळे आपल्यावरती हा प्रसंग आलेला आहे. तर माझ्या सांगण्याचा उद्देश हा होता की, भाईंदर पूर्व गोडदेव ह्या ठिकाणी जे प्रॉब्लेम सुरु झाले हे केवळ तिथल्या ई.एस.आर. ला आजची इनलेट ३०० एम.एम. ची आहे. तिथे सम्प नाही आणि जर तिथे आम्ही इनलेट वाढवला तर तो ई.एस.आर. लवकर भरेल. भाईंदर पूर्वेचा प्रश्न निघून जाईल. जसे भाईंदर पश्चिमेला पाणी जास्त येते. परंतु, पुढे ते कमी जाते. कारण पुढे सगळ्या पाईपलाईन तशाच प्रकारच्या आहेत. अशा पध्दतीने आपण ते करावे आणि दुसरी महत्वाची बाब अशी की मी एक ह्या योजनेचे वैशिष्ट्य सांगतो की, मगाशी आपण मागच्या मिटींगमध्ये जसे बोलतात की ३५ एम.एल.डी. पाणी येईल. आपल्याला खुप आनंद झाला. आपल्या मा. आमदार साहेबांनी, मंत्री महोदयांनी, मुख्यमंत्री साहेबांनी खासकरुन मा. महापौरांनी आणि तुम्ही सगळ्यांनी मेहनत केली. मग तुम्ही मेहनत कशाला करता? या मेहनतीतून तुम्हाला काय पैसा मिळणार नाही. पण तुम्हाला जे गुडविल मिळणार आहे. आज मला समाधान आहे. मला ही योलना पूर्ण केल्याचे समाधान आहे. मला ही योजना पूर्ण केल्याचे समाधान आहे. मी कुठेही गेलो तरी अभिमानाने सांगतो. आम्ही ही योजना पूर्ण केली. तसे तुम्हालाही मिळणार आहे. हेच तुमचे गुडविल आहे. पैसा काय फार टक्केवारी आली तरी सन्मा. सदस्य श्री. भुदेकाजींनी सांगितल्यामुळे फार थोडेच दिवस आहे. ते काही जास्त टिकत नाही. तर ही जी गुडविल तुमच्याकडे आहे. केवळ योजना जेव्हा बनवताना तुम्हाला जो आनंद झाला की, आम्ही ३५ एम.एल.डी. योजना बनवली. तशी ही योजना बनवली. एक मोठे बुकलेट प्रसिध्द केले. बुकलेटमध्ये त्यांनी या योजनेचे एक वैशिष्ट्य दिले आहे. असे तर त्यांनी मागील योजनेचा जो दोष सांगितला आहे, जी मागील योजना होती ती ग्रॅव्हीटीवर चालणारी होती. म्हणजे डायरेक्ट प्रेशरने टाकी भरणारी होती. एक दोन मिनिटे लागेल आणि त्याला कुठ खाली टाक्या नव्हत्या. पण सारखं वीजपुरवठा खंडीत होत असल्यामुळे ह्या टाक्या भरायच्या नाहीत. हा पाण्याचा मागच्या योजनेचा दोष होता तो त्यांनी नव्या योजनेत तो दोष काढून टाकला. सगळीकडे अंडरग्राउंड आणि वरच्या दोन्ही टाक्या बनवायच्या आणि हे बनविल्यानंतर जेव्हा ही योजना सुरु होईल. आज तुम्ही सांगताना हा खारीगावला सन्मा. सदस्या सुधा गोयंका ह्यांच्या गल्लीतला झोन बंद केला की सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेबांच्या गल्लीतला झोन चालू केला की, सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेबांच्या गल्लीतला झोन बंद केला. हे जे नगरसेवक वाईज किंवा गल्लीवाईज हे जे झोन पडले आहेत ना. हे कुठलेही झोन राहणार नाहीत. पूर्ण मिरा भाईंदरमध्ये ही योजना पूर्ण साकार झाल्यानंतर फक्त दोनच झोन राहतील. फक्त दोनच झोनमध्ये पाणीपुरवठ्याचे वितरण होणार होते. अशी ही टेक्नॉलॉजीची स्टडी केली आणि त्याच्याप्रमाणे आपण खरच चाललो तर मला वाटत नाही काही कोणत्या नगरसेवकाची तक्रार राहील आणि दुसरी बाब म्हणजे आता आपण जे नविन ३५ एम.एल.डी. ची जी योजना आहे. त्याच्या संदर्भात चर्चा घडवून आणा. कारण ती पुढे नंतर प्रॉब्लेम येण्यापेक्षा आताच त्याच्यावर काहीतरी चर्चा होईल. मी दोन शब्द नाही जास्तच २०० शब्द बोललो. आपण मला निवेदन करायला दिल्याबद्दल मी तुम्हाला पुन्हा धन्यवाद देतो आणि सभागृहामध्ये कोणीही नगरसेवकाने अशाप्रकारची ठेवून उपयोग नाही. कारण अशा पध्दतीने काही चालत नाही. जे काही थोडे वॉलमन आहेत. त्या लोकांना जेव्हा पाण्याचा पुरवठा भरपुर झाला. तेव्हा त्या लोकांना उपासमारीचे जीवन झाले आहे. म्हणजे संध्याकाळी जे बारला जाउन बसायचे ते ओट्यावर बसलेले दिसायचे. तशी परिस्थिती पुन्हा आणली पाहिजे. तशी वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती आहे की, पूर्वीपासून आमच्या लोकांना

वाईट सवय लागलेली आहे. त्या कुठेतरी निघायला वेळ लागेल. त्याच्यावर तुम्ही लक्ष केंद्रीत करा आणि मा. सभागृहाचे कामकाज चांगले चालल्याबद्दल पुन्हा आता मा. सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी माझे दोन शब्द पूर्ण करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र!

(सदरचा विषय प्रकरण क्र. ०९ मा. महापौरांच्या मान्यतेने तहकुब करण्यात आला.)

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढील विषयाला सुरुवात करावी.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, शोकप्रस्ताव .........

**रोहिदास पाटील :-**

मा. माजी नगराध्यक्ष प्रफुल्लजी पाटील त्यांनी त्यांच्या अनुभवावरुन निवदेन करण्याचा प्रयोग मी केला की, त्यांचे निवेदन जे आहे ते साधरण टेक्निकल थोडेसे बरोबर आहे. शंभर टक्के नाही. मला माहित आहे की ते इंजिनिअर नाहीत. पण, प्रॅक्टीकल जे आहे ते १०० टक्के चुकीचे आहे. हे चुकीचे असे वाटते. कारण की जेसलपार्कला पाणी पुरवठा कुठून होतोय? त्यांना एवढेच माहित आहे की, कुठे पाईपलाईन पडलेल्या आहेत.

**मा. महापौर :-**

सचिवांना विषय पूर्ण करु द्या. मग तुम्ही .......

**रोहिदास पाटील :-**

मी दोन मिनिटात पूर्ण करतो.

**मा. महापौर :-**

'ज' चे तीन विषय आहेत. फक्त ते विषय वाचून घ्याचे आहेत.

(नगरसचिवांनी 'ज' च्या प्रस्तावाच्या विषयाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्य लिओ कोलासो गैरहजर आहेत, सन्मा. सदस्य ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल गैरहजर आहेत, सन्मा. सदस्या सुरेखा गायकवाड गैरहजर आहेत.

**मा. महापौर :-**

ज्या सन्मा. सदस्यांनी 'ज' चे प्रस्ताव दिले होते. ते सदस्य उपस्थित नसल्याने हे विषय रद्द करण्यांत येत आहे.

(मा. महापौर यांच्या आदेशान्वये सन्मा. सदस्यांनी मांडलेले "ज" चे प्रस्ताव सदस्य उपस्थित नसल्याने रद्द करण्यात आले.)

**रोहिदास पाटील :-**

पुढच्या सभेत बोलायला मला वेळ द्या.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, एक शोकप्रस्ताव राई मोर्वा मुर्ध्याचे माजी सरपंच हरिश्चंद्र केशव पाटील (माधवराव) यांच्या धर्मपत्नी चंद्राबाई हरिश्चंद्र पाटील यांचे दुःखद निधन झालेले आहे. तसेच प्रतिष्ठीत नागरिक कै. रामचंद्र केशव भोईर, मुर्धा यांचेसुध्दा निधन झालेल आहे. म्हणून शोकप्रस्ताव मांडत आहे.

**एस. ए. खान :-**

तसेच आपले मा. उपमहापौर चंद्रकांत वैती यांचे चुलत भाउ यांचेसुध्दा निधन झालेले आहे.

**रोहित सुवर्णा :-**

सभा सदस्य श्री. सुरेंद्रप्रसाद तिवारी यांच्या मातोश्री यांचेदेखिल निधन झालेले आहे.

**दुखवठा ठराव :-**

आपल्याकडील राई मोर्वा मुर्ध्याचे माजी सरपंच हरिश्चंद्र केशव पाटील (माधवराव) यांच्या धर्मपत्नी चंद्राबाई हरिश्चंद्र पाटील, प्रतिष्ठीत नागरिक कै. रामचंद्र केशव भोईर, मुर्धा, मा. उपमहापौर चंद्रकांत वैती यांचे चुलत भाउ तसेच श्री. सुरेंद्रप्रसाद तिवारी यांच्या मातोश्री यांचेसुध्दा निधन झालेल आहे.

तरी या सर्व मृतात्म्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात ही महासभा सहभागी आहे. देव त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना करून दुःखवटा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनंत पाटील.** **अनुमोदन :- श्री. रोहित सुवर्णा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

आजची मा. महासभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली ह्याबद्दल सर्व सन्मा. सदस्यांचे आभार मानून आजची मा. महासभा संपली असे मी जाहिर करते.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ७.०० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**